

शांखो चौधरी यांनी ब्रॉंझ धातुचा केलेला गांधीजींचा पुतळा

महात्मा गांधी : जीवनचरित्र

महात्मा गांधी : जीवनचरित्र

कृष्ण कृपलानी

अनवाद
उमाकान्त ठोमरे

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-0960-9

1994 (शके 1916)

रूपये. 45.00
Gandhi : A Life *(Marathi)*
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5, ग्रीन पार्क,
नवी दिल्ली 110016 यांनी प्रकाशित केले.

ऋणनिर्देश

गांधीजींच्या साहित्यातील उतारे उद्धृत करू दिल्याबद्दल नवजीवन ट्रस्टचे आणि छायाचित्रांच्या पुनर्मुद्रणास अनुमती दिल्याबद्दल गांधी स्मारक संग्रहालयाचे लेखक आणि प्रकाशक मन:पूर्वक आभारी आहेत.

नंदितास —

हे लेखन हाती घेण्याची
तिने मला सतत प्रेरणा दिली.
आणि मृत्युनंतर आजही
ती माझे प्रेरणास्थान आहे.

अनुक्रमणिका

प्रास्ताविक

भारतीय उपखंडाच्या प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडात, गांधीजींच्या जन्मापासून आजपर्यंत गेल्या १०० वर्षात, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात जितके महत्त्वपूर्ण असे बदल घडून आले, तितके त्यापूर्वी क्वचितच् घडून आले असतील. ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण असा हा कालखंड आता शेवटास येत आहे. महात्माजींच्या जन्माच्या वेळेस ब्रिटिश सत्तेने हिंदुस्थानात घट्ट पाय रोवले होते. १८५७ च्या उठावाचे वर्णन शिपायांचे बंड, महान उठाव वा पहिले स्वातंत्र्यसमर, असे केले जाते. या घटनेनंतर इंग्रजांच्या प्रारंभिक व्यापारी साहसाचे साम्राज्यात रूपांतर झाले. देशाची ही गुलामी केवळ राजकीय नव्हती. या सत्तेचा देशाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक क्षेत्रावर एवढा प्रभाव पडला की या ''सुसंस्कृतीकरण करणाऱ्या पाश्चात्य प्रवाहा''चे स्वागत करण्याची शिक्षित भारतीयांची मनापासून तयारी झाली. आपण होऊन पारतंत्र्याची बेडी हातात अडकवून घ्यायची तयारी झाली की मग गुलामगिरीचे कोणाला काय वाटणार ? मानसिक गुलामगिरीची ही पकड इतकी घट्ट होत गेली की ब्रिटिश साम्राज्य हे हिंदुस्थानला वरदान असून ते आता इथं कायम पाय रोवणार असेच वाटू लागले.

गांधीजींचा मृत्यू झाला तेव्हा एक नवस्वतंत्र राष्ट्र दु:खसागरात बुडाले. स्वतंत्र राष्ट्र म्हणून देश आता उदयास येत होता. सर्वस्व गमावलेल्यांनी आपला महान वारसा पुन्हा मिळविला होता. मुकस्तंभ झालेल्या देशाने आपली प्रभावी वाणी पुन्हा मिळविली होती. शतकभर भीतीग्रस्त झालेली भारतीय मने आता नव्या जोमाने, ताठ मानेने, आत्मविश्वासाने पुन्हा उभी राहू लागली होती. नि:शस्त्र देशाने असे एक प्रभावी हत्यार उगारले की त्यापुढे बलशाली ब्रिटनही निष्प्रभ झाले होते. कोणाचीही हत्या न करता युद्ध जिंकण्याचे सामर्थ्य त्या हत्यारात होते.

या साऱ्या महान चमत्काराची हकीकत म्हणजेच गांधीजींचे जीवन होय. कारण या साऱ्या ऐतिहासिक घटनांचे मुख्य शिल्पकार आणि त्यातील प्रमुख नायक तेच होते. देशवासियांनी त्यांना राष्ट्रपिता म्हटले ते उगाच नव्हे.

आणि तरीही हे सर्व संक्रमण गांधीजींनीच घडवून आणले असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरेल. एखादा मनुष्य कितीही थोर वा महान असो, साऱ्या ऐतिहासिक प्रक्रियेचे आपणच एकमेव शिल्पकार आहोत असा दावा तो करणार नाही. त्यांच्या आधीच्या पिढीतील अनेक अग्रणींनी आणि ज्येष्ठ समकालीनांनी

देशाची भीतीग्रस्त मन:स्थिती, अंधश्रद्धा आणि मरगळ दूर व्हावी यासाठी बरीच पूर्वतयारी करून ठेवली होती. प्रारंभिक कार्याचा शुभारंभही केला होता. त्या धुरीणांनी युद्धक्षेत्र कोठले, शत्रू कोण ते आधीच हेरून स्पष्ट केले होते. गांधीजींनी या युद्धक्षेत्रावर देशाचे प्रभावी नेतृत्व केले आणि त्याला स्वतंत्र केले. गांधीजी शंभर वर्षे आधी जन्मास येते, तर ते फारसे काही करू शकले नसते. त्याचप्रमाणे, गांधीजींचे नेतृत्व नसते, तर भारत फारसे काही करू शकला नसता. विशेषत: ज्या मार्गाने गांधीजींनी देशाला परदास्यातून मुक्त केले त्याने देश केवळ स्वतंत्र झाला नाही, तर जगात त्याने मानाचे स्थानही मिळविले. देशाने ज्या रीतीने स्वातंत्र्य मिळविले तो मार्ग जगाने आतापर्यंत कोठे कधी चोखाळला नव्हता. या प्रयोगाची कोठे कधी पुनरावृत्ती होऊ शकेल की काय याचीही जगात अनेकांना शंकाच आहे.

गांधीजी जगले, त्यांनी सोसले आणि हौतात्म्य पत्करले ते सारे काही आपल्या देशवासीयांसाठी. तरीही त्यांच्या जीवनचरित्राचे आणि कार्याचे महत्त्व देशकालापुरते मर्यादित नाही. देशभक्त किंवा क्रांतिकारी सुधारक म्हणूनच केवळ ते ओळखले जाणार नाहीत. मानवाच्या सदसद्‌विवेक बुद्धीला महात्माजींनी आवाहन केले, त्या आवाहनात फार मोठे नैतिक सामर्थ्य होते. म्हणूनच त्यांच्या विचारदर्शनाने जगाला गवसणी घातली. त्यांच्या विचाराचा जगावर कायम प्रभाव उमटला. गांधीजी आपल्या देशवासीयांसाठी झटले ते केवळ या देशात जन्माला आले म्हणून. आपल्या देशवासीयांची होत असलेली परवड, आणि अवमान पाहून त्यांच्या अंगी नैतिक बळ आले आणि त्यातूनच त्यांना राजकीय लढ्याची स्फूर्ती मिळाली. त्यांचे जीवनचरित्र म्हणूनच सर्वांसाठी आहे. सर्वांनी अभ्यासावे, वाचावे असे आहे.

केवळ प्रखर देशप्रेम आणि राजकीय लढ्याची यशस्वी इतिश्री या दोनच गोष्टी लक्षात घेऊन भारतीयांनी त्यांच्यावर अलोट प्रेम केले तरी ते समजू शकते. परंतु गांधीजींच्या व्यक्तिमत्वाला, जीवनकार्याला एवढाच एक पैलू नव्हता. तसे असते तर जग आज गांधीजींना एवढे का मानते त्याचे कसे स्पष्टीकरण करणार ? जगात आज सर्वत्र नि प्रत्येक देशात राष्ट्रपिते आहेत. त्यांपैकी काहींना तर तसे म्हणण्याची-देखील गरज नाही. परंतु हा लुकडा, काळासावळा नि कसेबसे अंग झाकणारे कपडे अंगावर चढवून फिरणारा महात्मा एखाद्या राष्ट्रपित्याच्याही पलीकडे गेला होता.

अनेक क्षेत्रात गांधीजींनी यशस्वी संचार केला नि अनेक आघाड्यांवर विजयश्री खेचून आणली. त्यांपैकी कोणत्याही एका क्षेत्रातील यशस्वी कामगिरी त्यांना जागतिक कीर्ती मिळवून देऊ शकली असती. जगातील एकपंचमांश लोकसंख्येला

त्यांनी स्वातंत्र्याचा लाभ मिळवून दिला. या स्वातंत्र्याने, आग्नेय आशिया तसेच आफ्रिकेतील अनेक देशांचा स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग खुला केला. ''अस्पृश्य'' म्हणून ज्यांची पूर्वी अवहेलना केली जात असे त्यांच्यासाठी गांधीजींनी केवढे मोठे कार्य केले. शतकानुशतके या लोकांवर चाललेल्या जातीय जुलमाला त्यांनी पायबंद घातला. आणि त्यांच्या सामाजिक अवमानाच्या श्रृंखला तोडल्या. देशातील कोट्यवधी ग्रामीण जनतेची सर्वांगीण सामाजिक, नैतिक आणि आर्थिक उन्नती नि प्रगती साधली तरच या लोकांना स्वातंत्र्याचा खरा लाभ झाला असे म्हणता येईल, असे सांगून त्यांनी त्यासाठी कोठल्या उपाययोजनांचा आणि कार्यक्रमाचा अवलंब करावा, तेही दाखवून दिले. या मार्गाचा आम्ही अवलंब केला तर जीवनाचे बराकीकरण करणाऱ्या आणि सध्याच्या शोषणप्रवण अर्थव्यवस्थेला पर्यायी अशा जीवन पद्धतीचा उदय कसा होऊ शकेल तेही गांधीजींनी सिद्ध केले.

महात्माजींच्या मृत्यूनेही फार मोठा चमत्कार साधला. द्वेषाने आंधळे झालेल्या आणि हिंसाचाराच्या मार्गाने जाणाऱ्या संतप्त लोकांना गांधीजींच्या हौतात्म्याने मान खाली घालावयास लावली. नवस्वतंत्र भारतात धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रक्रिया प्रबळ होत गेल्या त्या गांधीजींच्या हौतात्म्यामुळे.

परंतु मानवी सिद्धी कितीही मोठी असो, बदलत्या जगात ती कायम टिकू शकत नाही. गांधीजींनी जो मार्ग दाखविला आणि जे साध्य केले, ते काळाच्या ओघात वाहूनही जाईल, किंवा कायम नष्ट होऊन त्याच्या केवळ आठवणी मागे राहतील, ही शक्यता आहे. परंतु तरीही जगाला गांधीजींचे विस्मरण होणार नाही, कारण तो महात्मा त्याच्या कार्यापेक्षाही मोठा होता. गांधीजी हे शाश्वत सत्याच्या शोधार्थ निघालेले महामानव होते. त्यांनी गाठलेली नैतिक उंची डोळे दिपविणारी होती. गांधीजींनी म्हटलेच आहे की, ''आपल्या लोकांच्या केवळ हालअपेष्टांना पायबंद घालण्याचा माझा मर्यादित हेतू नाही. मानवी स्वभावातील रानटी मनोवृत्ती नष्ट व्हावी हा माझा प्रयत्न आहे. आपण एकाच ईश्वराची लेकरे असू तर त्याच्या देवत्वाचा अंश आपल्यात असला पाहिजे. माणूस आपला असो वा कोणत्याही जाती-धर्माचा वा वंशाचा असो, प्रत्येकाच्या पापातही आपण वाटेकरी झाले पाहिजे, असे मग आपल्याला वाटू लागेल.''

रवींद्रनाथांनी १९३८ मधील एका लेखात तर स्पष्टच म्हटले आहे, की जगात अनेक देशात देशभक्त होऊन गेले आहेत. अनेक धर्मात्मेही झाले आहेत. यांपैकी अनेकांनी आपल्या देशासाठी, ध्येयसिद्धीसाठी, धर्मासाठी इतका भयंकर छळ सोसला आहे की त्यांच्याशी तुलना करता गांधीजींना काही सहन करावे लागलेले

नाही, असे म्हणता येईल. परंतु ते देशभक्त केवळ देशभक्तच होते आणि त्या धर्मात्म्यांनी केवळ आपल्या धर्मासाठीच सारे सहन केले. त्यांचे सद्‌गुण निवडक होते. याउलट गांधीजींचे आहे. ते त्यांच्या सद्‌गुणांपेक्षाही मोठे आहेत. त्यांचे सद्‌गुणही महान आणि तेही स्वत: केवढे थोर, ते वर्णन करणे कठीण.

गांधीजींनी कोणत्याही धर्मपीठाची स्थापना केली नाही. ते श्रद्धाळू होते परंतु आपल्या मागे कोठल्या धर्मश्रद्धेपायी कलह माजावा, अशा कोणत्याही एकांगी विचाराचा त्यांनी कधी पुरस्कार केला नाही. जन्माने हिंदू आणि वृत्तीने श्रद्धाळू असले तरी कर्मकांड वा धार्मिक आचार-विचार मानवात भेदभाव निर्माण करणारे, संकुचित वा उदार दृष्टिकोनाच्या आणि आदर्श नैतिक आचरणाच्या विरोधी वाटले तर त्यावर प्रहार करण्यास गांधीजींनी मागेपुढे पाहिले नाही. त्यांचे एक स्नेही आणि धर्मगुरु जोसेफ डॉक यांनी १९०९ सालीच त्यांचे वर्णन करताना म्हटले की गांधीजी कोण्या एका धर्माचे पुरस्कर्ते आहेत, असे मला वाटत नाही. त्यांचे विचार ख्रिश्चन धर्माशी इतके जुळतात, की त्यांना हिंदुधर्मीय मानणे चूक ठरेल. त्याचबरोबर त्यांच्या आचारविचारावर हिंदुधर्माचा एवढा पगडा आहे की त्यांना ख्रिश्चन धर्मीय तरी कसे म्हणावे ? ''गांधीजी अशा एका अवस्थेला पोहोचले आहेत की तेथे धर्म, पंथ आदींना काही स्थानच नाही,'' असे त्यांचे अनेक शिष्य आणि अनुयायी म्हणतात, तेच खरे.

गांधीजींच्या आदर्शाचा प्रसार करण्यासाठी १९३५ च्या सुमारास काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या नावे एक संस्था स्थापन केली. त्यावेळी त्यांना इशारा देताना गांधीजींनी म्हटलं की, ''गांधीवाद म्हणून काही विचारसंप्रदाय आहे, हे मला मान्य नाही, आणि माझ्या मागे असा एखादा संप्रदाय मागे सोडून जाण्याचीही माझी इच्छा नाही. एखादा नवा विचार, सिद्धान्त, वा तत्त्वज्ञान जगाला मी दिले असा माझा दावा नाही. शाश्वत सत्याचा आपल्या दैनंदिन आयुष्यात पुरस्कार करण्याचा केवळ माझा प्रयत्न आहे. माझी मते आणि मी काढलेले निष्कर्ष अंतिम आहेत, असे मला वाटत नाही. उद्या मला अधिक चांगला विचार सुचला तर मी माझी मते बदलीनही. जगाला नवे असे काही शिकवावे, असे माझ्यापाशी काहीही नाही. सत्य आणि अहिंसा ही तत्त्वे तर अनादी नि अनंत काळाइतकी पुरातन आहेत. मी फक्त माझ्या कुवतीप्रमाणे, व्यापक प्रमाणावर त्यांचे प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. तसे करताना मी काही वेळा चुका केल्या आहेत, आणि त्यापासून खूप काही शिकलो आहे. माझे सारे तत्त्वज्ञान, त्यासच तत्त्वज्ञान म्हणायचे असेल तर, आता मी जे काही सांगितले तेच आहे. त्याला तुम्ही गांधीवाद असे संबोधू नका. कारण त्यात 'वाद' असा काही नाहीच. बरं,त्याचा खुलासा करण्यासाठी वा ते समजावून सांगण्यासाठी

खास पुस्तिका वा साहित्य प्रकाशित करण्याची वा प्रचाराचीही गरज नाही. माझ्या काही विचारॉविरुद्ध, पवित्रग्रंथांतील उतारेही उद्धृत केले जातात. परंतु माझे नेहमीच असे म्हणणे आहे की कशासाठीही सत्याचा बळी जाता कामा नये. मूलभूत सत्याविषयी मी जे काही आतापर्यंत सांगितले त्यावर ज्यांची श्रद्धा असेल त्यांनी तसे आचरण करूनच प्रसारकार्य साधावे.''

सत्याखेरीज कोणत्याही ईश्वराला गांधीजींनी कधी मानले नाही. सत्याचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी कोणते कर्मकांड वा आचारही सुचविला नाही. कोणालाही न दुखविता अखंड शोध घेत सत्याचाच पाठपुरावा करावा, असं ते म्हणत. गांधीजी केवळ आपल्याच विचाराचे आहेत, असा दावा कोण करू शकणार ? कारण अखेरीस ते सर्वांचेच होते.

गांधीजींचे व्यक्तिमत्व परिस्थितीच्या भोवऱ्यात घडत गेले. त्या मुलाचे पाय कोठे पाळण्यात कोणाला दिसले नाहीत. त्यांच्या महान गुणांचा प्रत्यय येऊ लागला तो त्यांच्या प्रौढावस्थेत. असामान्य असेच त्या गुणांचे वर्णन करावे लागेल. मात्र बाळपणी शाळेत त्यांच्या या गुणाचा कोठे मागमूसही नव्हता वा कोणाला त्याचा कधी अनुभवही आला नाही. रवींद्रनाथांसारख्या त्यांच्या काही समकालीनांसारखे ते कोणा थोरा-मोठ्यांच्या प्रभावाने झपाटले गेले नव्हते. शालेय वयात, रामकृष्णांच्या आध्यात्मिक दिव्य ज्ञानाचा वा विवेकानंदांच्या विचाराचा कोणताही प्रभाव त्यांच्यावर नव्हता. सर्वसाधारण शालेय वयातील मुलासारखेच त्यांचे वर्तन असे. त्यातही ते स्वभावाने थोडे अधिकच लाजाळू, भिडस्त, खेळात मागे आणि मितभाषी होते. या दुर्गुणांनी तरुण वयातही त्यांना अनेकदा दगा दिला.

अशा या सर्वसामान्य युवकाच्या मनात कोठे काही स्फुलिंग चेतत असेल, अशी कोणाला शंकाही येऊ शकत नव्हती. त्या महान चैतन्यशक्तीचे दर्शन योग्यवेळीच व्हावे यासाठी नियती ते रहस्य लवकर उघड करू इच्छित नव्हती. आपल्या आंतरिक आणि आत्मिक शक्तीची जाणीव झाली तेव्हा कोणताही आव न आणता, अहंकाराचे प्रदर्शन न करता, आपल्या अंतरात्म्याला साक्षी ठेवून त्या चैतन्यशक्तीचे प्रखर स्वरूप प्रकट करण्यास त्यांनी शांतपणे प्रारंभ केला. वडिलधाऱ्यांपुढील आज्ञाधारकपणा, कर्तव्यबुद्धी आणि असत्याविषयीची चीड हे गुण गांधीजींच्यात प्रकर्षाने होते, परंतु त्यात काही असामान्य आहे असे त्या काळी कोणाला वाटत नसे.

गांधीजींसारखी सर्वसामान्य व्यक्ती, तरुणपणी केवळ इच्छाशक्तीच्या बळावर आयुष्यात पुढे एवढी थोर होऊ शकते, तर इतरांनाही आयुष्यात काही करून दाखविण्याची स्फूर्ती त्यांच्या जीवन चरित्रापासून सहज मिळू शकेल. लहानपणी

अंधारात झोपायला भिणाऱ्या, भुतांच्या भीतीने गारठणाऱ्या त्या मुलाने उत्तरायुष्यात साऱ्या जगाला निर्भयतेचे अंतिम प्रखर स्वरूप कसे असते, ते आपल्या उदाहरणाने दाखवून दिले. आपले ईप्सित ध्येय गाठण्यासाठी आणि सत्याच्या शोधार्थ अविश्रांतपणे, निर्भयपणे गांधीजी आयुष्यभर झटले. अहिंसक, सत्याग्रही लढ्याचे यशस्वी नेतृत्व करताना गांधीजी अशा एका स्थानापर्यंत गेले की साऱ्या जगाचे डोळे त्याने दिपले. या शतकातील एक महान शास्त्रज्ञ आणि थोर मानव अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी गांधीजींविषयी म्हटलंच आहे की असा हा महामानव या पृथ्वीतलावर होऊन गेला, यावर भावी पिढ्यांचा विश्वास बसणेही कठीण आहे.

या जगाचा निरोप घेतला तेव्हा, असामान्य आणि अतुलनीय महामानव म्हणूनच गांधीजींना सारे जग ओळखत होते. त्यांचे बालपण आणि तरुणपण सर्वसामान्य माणसासारखेच होते, यातच त्यांच्या जीवनाचे खरे सौंदर्य सामावले आहे. सार्वजनिक क्षेत्रात त्यांचे मोठे नाव होण्याआधी त्यांचे जीवन कसे होते, ते त्यांनीच नमूद करून ठेवले आहे. आपली राजकीय आणि नैतिक जाणीव कसकशी वाढत व विकसत गेली तेही त्यांनी आडपडदा न ठेवता खुल्या मनानं सांगितले आहे. त्यांनी आत्मचरित्रात त्याचे वर्णन केले नसते, तर अनेक शिष्योत्तमांनी त्यांच्या बालपणाविषयीच्या अनेक भाकडकथा सांगून त्यांच्या जीवनाभोवती बालवयापासून तेजोवलय निर्माण करण्याचा काहीतरी कृत्रिम प्रयत्न केला असता. रवींद्रनाथ टागोरांनी म्हटलेच आहे :

''हे जगन्नियंत्या, तुझे साधे बोल मी समजू शकतो. परंतु, तुझे गुणगान करणाऱ्यांचे शब्द मला उमगत नाहीत. त्यांचे आकलन मला होत नाही.''

गांधीजी राजकारणी होते की संत ? ते राजकारण्यांमधील संत होते की संतांमधील एक राजकारणी ? त्यांचे अनुयायी दावा करतात त्याप्रमाणे, राजकारणाला ते अध्यात्माची जोड देऊ शकले का ? त्यांना राष्ट्रपिता मानणारा हा देश, राजकारणाला धर्माप्रमाणे पवित्र मानून तसे आदर्श राजकारण करतो का ? भावी पिढ्या हे प्रश्न सतत विचारीत राहणार.

गांधीजी कसेही असोत, या युगातील कोणत्याही अन्य माणसाशी तुलना करता येईल असे ते नव्हते हे तर सर्वांनाच मान्य होईल. रवींद्रनाथांनी, गांधीजींच्या मृत्यूच्या दहा वर्ष आधीच फार मार्मिकपणे लिहून ठेवले आहे. रवींद्रनाथ म्हणतात : ''एखादेवेळेस त्यांना आपल्या कार्यात यश मिळणारही नाही. मानवातील त्रुटी-उणीवा दूर करण्यात ख्रिस्ताला अपयश आले, बुद्धालाही अपयश आले-तसे गांधीजींनाही अपयश येईल. परंतु यापुढेही, युगानुयुगे, मानवजातीने ज्यांच्या जीवनापासून धडा घ्यावा, असा महामानव म्हणून गांधीजी सदासर्वकाळ सर्वांच्या कायमचे स्मरणात राहतील, यात शंका नाही.''

: १ :

बालपण आणि संगोपन

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील पोरबंदर या छोट्या शहरात दि. २ ऑक्टोबर १८६९ रोजी मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म झाला. सध्याच्या गुजरात राज्यातील सौराष्ट्र विभागात आणि त्याकाळी काठीयावाड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात पोरबंदर हे एक छोटे संस्थान होते. अरबी समुद्रात, पश्चिम सागराने वेढलेल्या आणि सुमारे ३०,००० चौरस मैलांच्या या भूप्रदेशाच्या माथ्यावर कच्छचे आणि खाली खंबायतचे आखात पसरले असून त्यापलिकडे उत्तरेस रणचे वाळवंट आहे.

अगदी अलिकडेपर्यंत काठीयावाड म्हणजे राजकीयदृष्ट्या मागासलेलाच भाग समजला जात असे. मात्र तत्पूर्वी गेल्या काही शतकात परकीयांच्या आक्रमणाने आणि लढायांनी हा प्रदेश चांगलाच तावून-सुलाखून निघाला. ब्रिटीश राजवटीत ३०० वर छोटी मोठी संस्थाने या भागात पसरली होती. त्यांपैकी काहींचे क्षेत्रफळ एखाद्या खेडेगावाइतके, काहींचे तालुक्या एवढे तर काहींचे जास्तीत जास्त सध्याच्या एखाद्या जिल्ह्या एवढे असे. राणा, ठाकूर किंवा नबाब म्हणून हे संस्थानिक ओळखले जात. हे छोटे जहागीरदार एकमेकांचा दु:स्वास करीत, प्रसंगी भांडणेही करीत, परंतु अखेरीस इंग्रजांच्या अधिपत्याखालीच ही संस्थाने आणि जहागीऱ्या असल्याने ब्रिटिश रेसिडेंटच्या भीतीच्या दडपणाखाली स्वत:च्या अधिकाराची सीमित मर्यादा सांभाळीत. आपली छोटीशी राजवट शांततेनं चालविण्याचा प्रयत्न करीत.

अशा या सरंजामशाही राजवटीत जीवन कितीसे सुरक्षित असणार ? कारण या संस्थानातून सतत दरबारी कटकारस्थाने चालत. तेथली न्यायव्यवस्था म्हणजे सारा लहरीपणा. अशा वातावरणात कायदा धाब्यावर बसवून शासनाला आव्हान देत भटकणाऱ्या बंडखोरांनी आणि वाटमारी करीत फिरणाऱ्या 'बहारवटीयां' नी सर्वत्र

उच्छाद मांडलेला असे. या बंडखोरांच्या आणि दरोडेखोरांच्या अनेक चटकदार कथा-कहाण्या या भागात अनेक कथा आणि लोकगीतांतून सांगितल्या जातात.

अस्थिर परिस्थितीचे चटके सोशीत धामधुमीचे जीवन कंठावे लागल्याने या भागातील माणसे चांगलीच सोशिक असून आलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्याची धीरोदात्त वृत्ती त्यांच्यात निर्माण झाली आहे. उत्तम दर्यावर्दी परंपरा असलेल्या या भागातील लोकांनी व्यापारातही फार मोठे नाव कमावले आहे. त्यात चांगली परंपरा निर्माण केली आहे. अशा वातावरणात सर्वसामान्य माणसं श्रद्धाळू आणि अंधश्रद्धही न झालीच तर नवल नाही. खेरीज भगवान श्रीकृष्णाची द्वारका याच भागात आहे. श्रीकृष्णाने या द्वारकेतच राज्य केले अशी हिंदू भाविकांची श्रद्धा असते. हिंदू धर्मातील श्रद्धाळू वैष्णव पंथाची परंपरा असलेल्या या भागात नंतरच्या काळात जैन धर्म आणि इस्लाममधील सुफी पंथ यांनीही आपले पाय रोवले. या साऱ्याचा स्थानिक जनमानसावर सर्व साकल्याने परिणाम होणे साहजिकच होते. त्यामुळे परंपराभिमान आणि सहिष्णुता, निरिच्छता आणि अनुकंपा, सुखासीन जीवनाभिलाषा आणि निरामय जीवन यांचा विचित्र परंतु सुरेख संगम येथे झाल्याचे प्रत्ययास येईल. अशा सामाजिक वातावरणात आपला जीवन चरितार्थ चालविणाऱ्या एका मध्यमवर्गीय वैश्यव्यापारी कुटुंबात मोहनचा जन्म झाला. या कुटुंबाचा पारंपारिक व्यवसाय दुकानदारीचा होता, परंतु हळूहळू या कुटुंबातील लोकांनी चांगले शिक्षण वगैरे घेऊन आपले सामाजिक स्थान उंचावण्याचा प्रयत्न केला. परिणामी मोहनचे आजोबा उत्तमचंद हे त्या काळी पोरबंदरच्या राणाचे दिवाण वा त्या संस्थानच्या पंतप्रधान पदावर पोहोचले. अत्यंत प्रामाणिक, सचोटीच्या आणि निर्भय वृत्तीच्या उत्तमचंदांना आपल्या स्वभावामुळे राणाच्या मृत्युनंतर कारभार पाहणाऱ्या राणीचा रोष ओढवून घ्यावा लागला. त्यामुळे त्यांनी पोरबंदर संस्थान सोडले आणि शेजारच्या जुनागढ संस्थानच्या नबाबाकडे आश्रय घेतला. असे म्हणतात की उत्तमचंदांनी जेव्हा नबाबाच्या दरबारात प्रवेश केला तेव्हा त्यांनी त्यास डाव्या हाताने सलाम केला. त्याचा खुलासा करताना ते म्हणाले, की 'महाराज, माझा उजवा हात अद्यापी पोरबंदरच्या सेवेत आहे.' राजनिष्ठा वा व्यक्तिगत निष्ठा त्या काळात इतकी कडवी असे. विसाव्या शतकापर्यंत अशी जिवाला जीव देणारी राजनिष्ठ माणसं त्या सागरी प्रांतात अगणित होती. तो नबाब मनाचा मोठा होता. त्या उत्तरानं त्याला राग आला नाही, उलट कौतुकच वाटलं. स्वतःचं वजन खर्च करून त्यानं नंतर पोरबंदर संस्थानात शब्द टाकला आणि नवा राणा सिंहासनावर येताच सन्मानानं उत्तमचंदांना तिकडे रवाना केलं.

उत्तमचंदानंतर त्यांचे पुत्र करमचंद पोरबंदर संस्थानचे दिवाण झाले. आपल्या

वडिलांप्रमाणेच त्यांचेही नियमित असे काही शिक्षण झालेले नव्हते. परंतु वडिलांप्रमाणेच सचोटी, खरेपणा, निष्ठा, व्यवहारकुशलता हे गुण त्यांच्याही अंगी भरपूर होते. आपल्या वडिलांच्या आठवणी सांगताना त्यांच्या इतकीच सत्यनिष्ठा असलेल्या गांधीजींनी म्हटले आहे: ''सुखासीन जीवनाची त्यांना आवड होती. म्हणूनच बहुधा तिसऱ्या पत्नीचे निधन झाल्यावर वयाच्या ४० व्या वर्षी त्यांनी चौथा विवाह केला.'' हा चांगलाच योग असावा, कारण याच पुतळीबाईंच्या पोटी महात्माजींचा जन्म झाला. त्यांचे नाव मोहन ठेवण्यात आले. आई त्यांना लाडाने मोनीया म्हणत असे.

ती वृत्तीने धार्मिक, स्वभावानं प्रेमळ आणि समजूतदार होती. अत्यंत कडक उपास तापास ती करीत असे. आपल्या मुलावर तिचा फार मोठा प्रभाव होता; मुलगाही तिला फार मानत असे. अनेक वर्षानंतर पुण्याजवळील येरवडा तुरुंगात असताना गांधीजींनी आपले चिटणीस महादेवभाई देसाई यांच्याशी बोलताना म्हटलं: ''माझ्यात तुला जर काही सात्त्विकता आढळली तर तो माझ्या पित्याने नव्हे तर माझ्या आईने मला दिलेला वारसा आहे, असं समज. माझ्या मनावर तिनं साधुत्वाचे संस्कार केले.''

पोरबंदर येथील एका प्राथमिक शाळेत मोहन जाऊ लागला, परंतु त्याला गणित विषयात काही गती येईना. ''माझी बुद्धी सुमार आणि स्मरणशक्ती मर्यादित असावी.'' यानंतर गांधी कुटुंबानं पोरबंदर सोडलं आणि सर्वजण राजकोटला गेले. हेही एक संस्थानच होतं. तिथेही गांधीजींचे वडील संस्थानचे दिवाण झाले. येथे मोहनने प्रथम प्राथमिक शाळेत आणि नंतर माध्यमिक शाळेत शिक्षण घेतले. कष्टाळू, अभ्यासू असताही, सर्वसाधारण मध्यम दर्जाचा विद्यार्थी म्हणून तो समजला जात असे. लाजाळू, भित्रा, इतरांच्या संगतीत बुजरा आणि खेळाच्या मैदानापासून सतत दूर राहणारा. मात्र, मोहनचे नैतिक आचरण कसे शुद्ध आणि आदर्श असे याचा प्रत्यय आणून देणारा एक प्रसंग याचवेळी त्याच्या शालेय जीवनात घडला. एकदा शाळा-तपासनीसांनी मोहनच्या वर्गाला भेट दिली. इंग्रजी शब्दांच्या स्पेलिंगची त्यांनी चाचणी घेतली. त्यावेळी मोहनने 'केटल' या शब्दाचे स्पेलिंग चुकीचे लिहिल्याचे वर्गशिक्षकांच्या लक्षात आले. मोहनला पायाने खुणावून त्यांनी ते स्पेलिंग बरोबर करण्यासाठी शेजारच्या मुलाची कॉपी करण्यास त्याला सांगितले. परंतु मोहनने त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. या त्याच्या मूर्खपणाबद्दल त्याची नंतर कानउघाडणीही करण्यात आली. ही आठवण सांगताना महात्माजी नंतर विनोदाने म्हणाले की 'कॉपी करण्याची कला मला कधीच जमली नाही.'

वर्गाबाहेरही जीवन असेच कंटाळवाणे आणि शुष्क होते. कोठेही लक्षात राहावी अशी घटना घडत नव्हती. परंतु याही आयुष्यात मनावर संस्कार करणाऱ्या, भावी जीवनाला आकार देणाऱ्या छोट्यामोठ्या घटना मोहनच्या सभोवताली घडत होत्या. नैतिक साहस म्हणून वा प्रयोग म्हणून काही धाडस करण्याचे या भीरू स्वभावाच्या मुलाचे प्रयत्न त्याही काळात आणि तशा परंपराभिमानी वातावरणात चालू होते. समाजसुधारक या नात्याने इतरांच्यात सुधारणा करण्यासाठी नंतरच्या काळात गांधीजी एखाद्या लढवय्यासारखे झगडले. त्या स्वभावधर्माचे बीजारोपणही याच काळात झाले. त्यासाठी मोहन कसा भरकटत गेला, तोही किस्सा सांगण्यासारखा आहे. मोहनच्या थोरल्या भावाचा एक मुसलमान मित्र होता. त्याचे नाव शेख महताब. मोहनला त्याच्याविषयी फार आपुलकी वाटे. स्वत: मोहन किरकोळ शरीर प्रकृतीचा होता. भुतं, चोर-दरोडेखोर आणि सापाची त्याला मोठी भीती वाटत असे. याउलट शेख महताब होता. निर्भय, अंगाने बळकट आणि दणकट. सामाजिक आणि नैतिक आचरणांची पर्वा न करणारा. मोहनवर त्याची चांगलीच छाप बसली. एकदा बोलता बोलता शेख महताबनं मोहनला म्हटलं की आपल्यासारख्या दुर्बल, भितऱ्या भारतीयांवर हे तगडे इंग्रजलोक राज्य करू शकतात कारण ते मांसाहारी आहेत. मांसाहारी लोकच शूर आणि तगडे होऊ शकतात. झालं, शाकाहारी कुटुंबातील मोहननं चोरून मटन खाण्याचा प्रयत्न केला. बहुधा देशभक्तीचा हा गांधीजींचा पहिला प्रयोग असावा. परंतु मांसाहाराचा सराव नसल्यानं, मटनाचा पहिला तुकडा तोंडात पडताच, जणू काही आपण आख्खा बोकड घशात घालीत आहोत असं मोहनला वाटू लागलं. शिवाय ही गोष्ट आईवडिलापासून लपवून ठेवणं आवश्यक आहे हेही त्याच्या लक्षात आले. म्हणजे खोटारडेपणा आला. मोहनच्या सद्सद्विवेक बुद्धीला हे दडपण सहन करणं कठीण होतं. आणखी एक दोन वेळा मांसाहाराचे हे प्रयोग झाल्यानंतर त्यानं तो प्रयोग बंद केला. ''आईवडिलांना कसं फसवायचं ? त्यांच्या मृत्यूनंतर स्वतंत्र जीवन जगू लागलो की उघडपणे मांसाहार करणं त्यापेक्षा अधिक बरं-''असा दिलासा मोहननं स्वत:ला दिला आणि मांसाहाराचा प्रयोग सोडला तो कायमचा.

याचवेळी, मोठ्या माणसांनी फेकून दिलेली विडीची थोटकं उचलून ती ओढून पाहणे; पुढे पुढे मोह आवरता न आल्याने, विड्या विकत घेण्यासाठी कोठे नोकरांच्या खिशातली नाणी पळवणे अशी 'साहसे' सुरू झाली. एकदा तर शेख महताबने मोहनला एका वेश्येकडे नेले, ''तेथे पोहचताच मी अवाक् झालो. मला घाम फुटला. त्या वेश्येच्या शेजारी पलंगावर मी बसलो परंतु माझ्या तोंडून शब्द फुटेना. त्यामुळे ती वेश्या भडकली आणि तिने शिव्या देत मला घराबाहेर काढले.

आपल्या पौरुषाचा अपमान झाला असं वाटून लाजेनं मी अर्धमेला झालो. भूमी आपल्याला पोटात घेईल तर बरं असं वाटू लागलं. परंतु देवानंच आपल्याला वाचवलं असं नंतर आयुष्यभर मला सतत जाणवत राहिलं' ही आठवण सांगितली तेव्हा गांधीजी महात्माजी म्हणून ओळखले जाऊ लागले होते. अशी हकीकत सांगण्याचे धैर्य त्यांच्यात होते. ते म्हणतात : ''नैतिकदृष्टीनं विचार केला तर हे सर्व प्रसंग म्हणजे नैतिक अध:पातच होय. कारण, आपण ते सुख घ्यावे अशी मुळात इच्छा निर्माण झाली होती. आणि अशी इच्छा होणे हेही ते पापकृत्य प्रत्यक्षात करण्यासारखेच होय.''

गांधीजींनी आपल्या तरुणपणीची आणखी एक हृदयस्पर्शी आठवण सांगितली आहे. गांधीजींना थोडं कर्ज झालं होतं ते फेडण्यासाठी त्यांनी भावाच्या सोन्याच्या कड्यामधील काही सोने काढून घेतले आणि ते विकून कर्ज फेडले. परंतु गुपचूपपणे केलेले हे कृत्य गांधीजींच्या मनाला डाचू लागले. अखेरीस न राहवून गांधीजींनी सारी कहाणी लिहून काढली, आपली चूक कबूल केली आणि ते पत्र वडिलांना नेऊन दिले. आपल्याला या चुकीबद्दल योग्य ती शिक्षा करण्यात यावी अशीही त्यांनी त्यात मागणी केली. ''वडिलांनी ते पत्र वाचले आणि वाचता वाचता त्यांच्या नेत्रातून झरझर अश्रू गळू लागले. त्या अमोल अश्रूंनी माझे हृदय स्वच्छ केले. माझे पाप धुवून निघाले.''

अशा प्रकारच्या मैत्रीचा आणि मित्राच्या प्रभावाचा किती गैरपरिणाम झाला, याविषयी नंतर भाष्य करतांना उत्तर आयुष्यात गांधीजींनी एकदा म्हटलं : ''ज्याला ईश्वराशी नाते जोडावयाचे आहे त्याने जीवनात एकाकी रहावे वा साऱ्या मानवजातीशीच स्नेहाचे बंध जोडावे.''

वयाच्या १३ व्या वर्षी मोहनचा कस्तुरबाईशी विवाह झाला. यावेळी कस्तुरबाईही १३ वर्षाच्याच होत्या. या वयात विवाह म्हणजे वराला मोठा सण-समारंभच वाटे. लग्न म्हणजे चांगले कपडे घालावे, नटूनथटून बसावे, विवाह सोहळ्यात सर्वांकडून कौतुक करून घ्यावे आणि विवाहविधीतील मंत्र संस्कृतभाषेत उच्चारत सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यावे. असा मुलांचा समज असे. खेरीज लग्नामुळे एक अपरिचित परंतु गोड आणि प्रेमळ साथीदार यापुढे बरोबरीने खेळायला मिळणार त्याचाही आनंद केवढा !

परंतु विवाहामागील कामजीवनाचा अर्थ समजण्यास मोहनला फार विलंब झाला नाही. विशेष म्हणजे आपल्या कामजीवनाबद्दल काहीही लपवून न ठेवता गांधीजींनी त्याबद्दलचे आपले विचार फार परखडपणे आणि सुस्पष्टपणे मांडले आहेत.

कामवासनेनं गांधीजींना फार छळलं. त्याबद्दल त्यांनी स्वत:ची कधीही फसवणूक करून घेतली नाही. आपल्या कामातूरपणाला आपली पत्नी जबाबदार आहे, आपला छळ करणाऱ्या साऱ्या कामेच्छेचा उगम तिच्या स्त्रीत्वात आहे, असा दोषारोप गांधीजींनी कधीही केला नाही. गांधीजींना स्त्रियांबद्दल अत्यंत आदर आणि कणव वाटे. स्त्रीशक्तीचा त्यांनी आयुष्यभर आदर केला. संपर्कात आलेल्या महिलांना आपुलकीनं आणि प्रेमानं समजून घेतलं. आपल्या तरुण आणि भाबड्या पत्नीच्या सहवासात त्यांना जीवनाचा आणि स्त्रीप्रेमाचा जो दाहक अनुभव आला त्यातच या त्यांच्या या स्वभाव वैशिष्ट्याचं बीज होतं.

उदात्त मनानं स्त्रीजीवनाचा विचार करणारा तो महात्मा होता. त्यामुळे स्त्रीविषयक संबंधात हिणकस ते जळाले आणि अस्सल होते ते सोन्याहून अधिक तेजाने उजळून निघाले. म्हणूनच त्यांच्याविषयी बोलताना गुरुदेव रवींद्रनाथ टागोर म्हणतात : ''मानवाच्या नैतिक उत्थानाशी कामजीवनाचा मेळ बसू शकत नाही, असं गांधीजींना वाटतं. अनावर कामवासनेच्या भीषणतेची त्यांना जाणीव आहे, परंतु टॉलस्टॉयप्रमाणे ते तिचा तिरस्कार करीत नाहीत. स्त्रियांविषयी त्यांना जी आपुलकी नि प्रेम वाटते, त्यांचा उगम त्यांच्या या उदात्त आणि प्रेमळ स्वभावात आहे. आयुष्यभर ज्या महान चळवळीचे त्यांनी नेतृत्व केले त्याच्या बिनीच्या सैनिकात आणि विश्वासू सहकाऱ्यात अनेक महिलांचा समावेश होता, ही वस्तुस्थितीच गांधीजी स्त्रियांना किती मानीत त्याचा प्रत्यय आणून देते.''

गांधीजींच्या आठवणीत कायम राहिलेली एक घटना तर त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला त्या रात्रीच घडली. तरुण गांधीजी त्या रात्री आजारी वडिलांची शुश्रूषा करीत होते. परंतु त्यांचे सारे लक्ष आपल्या तरुण पत्नीकडे लागले होते. ती आपली शयनगृहात वाट पहात असावी, असे सारखे त्यांना वाटत होते. त्यांच्या चुलत्याने आपण भावाजवळ बसतो असं म्हणताच तरुण मोहनने सुटकेचा नि:श्वास टाकला. आणि तो सरळ शयनगृहाकडे धावला. ''गरीब बिचारी माझी धर्मपत्नी गाढ झोपली होती. परंतु मी तेथे असताना ती कशी झोप घेणार ? मी तिला उठवले,'' थोड्या वेळाने दार खडखडले आणि मोहनची समाधी उतरली. वडिलांचे निधन झाल्याचे त्याला सांगण्यात आले.

''वडील मृत्युशय्येवर असताना आपण मात्र विषयवासनेच्या आहारी गेलो ही गुन्हेगारी भावनेची जाणीव मी माझ्या मनातून कधी पुसून टाकू शकलो नाही. माझे माझ्या आई-वडिलांवर किती प्रेम होते, आणि त्यांच्या सुखा-समाधानासाठी काहीही करण्यास मी मागेपुढे पाहिले नसते, ही गोष्ट खरी, परंतु कसोटीच्या त्या

क्षणी कर्तव्य विसरून विषयवासनेच्या मी पुरा आधीन झालो, आणि माझ्या कर्तव्यात चुकलो, अशी खंत मला आयुष्यभर छळत राहिली. मी एकनिष्ठ पती असेन पण मी फार विषयविकारी होतो यात शंका नाही. यातून सुटण्याची आणि त्या मोहावर विजय मिळविण्याची मी फार धडपड केली. अखेरीस अनेक कसोट्यातून गेल्यानंतर या विकारावर मी विजय मिळवू शकलो.''

गांधीजींचे व्यक्तिमत्व किती अनाकलनीय आणि गुंतागुंतीचे होते ते समजून घेण्यास, मानसशास्त्राची बैठक असलेल्या एखाद्या भावी चरित्रकारास हे प्रसंग निश्चितच मार्गदर्शक ठरतील.

: २ :

भावी जीवनाची पदचिन्हे

सन १८८५ मध्ये मोहनचे वडील निवर्तले. दोन वर्षानंतर तो मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला आणि त्याने भावनगरमधील एका महाविद्यालयात प्रवेश घेतला, कारण राजकोटला त्यावेळी महाविद्यालय नव्हते. मात्र, तेथला एकूण अभ्यासक्रम त्याला कंटाळवाणा वाटू लागला. इंग्रजी माध्यमातून अभ्यास करणे तर अधिकच जड जाऊ लागले. खेरीज एकूण वातावरण स्वभावाला मानवणारेसे नव्हते. गांधी कुटुंबाच्या एका स्नेह्यानं सुचविलं की मोहनला त्याच्या वडिलांप्रमाणेच संस्थानी सेवेत शिरायचे असेल तर त्याने इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर व्हावे. मोहनला ही सूचना एकदम पसंत पडली.

इंग्लंडला जाऊन शिकायच्या कल्पनेनं मोहन चांगलाच अस्वस्थ झाला. केव्हा एकदा आपण इंग्लंडला जातो असे त्याला झाले. दैव भावी जीवनाला आकार देत होते. अर्थात मोहनला त्याची कशी कल्पना असणार ? या परदेश प्रवासासाठी पैसा कसा उभा करायचा ? कुटुंबाजवळ तर फारसा पैसा नव्हता. राजकोट संस्थानचे ब्रिटिश पोलिटिकल एजंट आणि ठाकोरसाहेब यांच्याकडे मोहनने शिष्यवृत्ती मिळावी म्हणून अर्ज केला, परंतु त्यांचे मन तो वळवू शकला नाही. तरीही मन खचू न देता पैशासाठी त्याने अविरत प्रयत्न चालूच ठेवले. अखेरीला प्रवासासाठी कर्ज उभे करण्यात आले. आई आपल्या लाडक्या मुलाला स्वत:पासून फार दूरवर जाऊ देण्यास तयार नव्हती. त्या परक्या देशात अनेक मोहात तो फसेल अशी कुशंका तिच्या मनात सतत भेडसावीत होती. मोहनने आईचे मन मोठ्या प्रयासाने वळविले. परदेशात आपण मद्य, मांसाहार आणि मदनिका यांच्या वाटेस कदापी जाणार नाही, अशी त्यानं शपथ घेतली.

अखेरीस लंडनला जाणारी बोट गाठण्यासाठी त्याने मुंबईस प्रयाण केले. परंतु अद्यापी सर्व अडथळे पार पडले नव्हते. त्याकाळी, जाती-धर्माच्या पूर्वापार

समजुतीप्रमाणे समुद्रपर्यटन निषिद्ध मानले जात असे. समुद्रपार जाण्याने माणूस बाटला जाणार अशी सर्वत्र पक्की समजूत होती. ज्ञातीने त्याला जाती बहिष्कृत करण्याचीही धमकी दिली. परंतु मोहनचा निर्धार पक्का होता. जात राहो वा जावो, आपण परदेशात जायचेच हा निश्चय वज्रकठोर होता. ज्ञाती-पंचायतीने त्याला बहिष्कृत केले, परंतु कशालाही न जुमानता मोहनने सौदेम्पटनला जाण्यासाठी दि. ४ सप्टेंबर १८८८ रोजी मुंबईत बोटीवर पाऊल टाकले. यावेळी मोहन १८ वर्षांचा होता. याआधी कस्तुरबाईने एका मुलाला जन्म दिला.

जहाजावरील प्रवासात मोहनने रोज इंग्रजीत दैनंदिनी लिहिण्यास प्रारंभ केला. आपल्याला कोणत्या अडचणी आल्या आणि कशी कोठे मानहानी सहन करावी लागली, ते त्याने त्यात स्पष्टपणे लिहून ठेवले. ''माझ्या जागी दुसरा एखादा माणूस असता तर त्याला काही इंग्लंडचे दर्शन घडले नसते. ज्या अनंत अडचणी मला सहन कराव्या लागताहेत त्यामुळे तर मला इंग्लंडविषयी आपुलकीच वाटू लागली आहे.'' असं त्यानं लिहून ठेवलं आहे.

पाश्चात्य संस्कार झालेल्या मुंबई व कलकत्ता येथील एखाद्या हिंदू कुटुंबात मोहनचे संगोपन झाले असते, तर हा प्रवास म्हणजे काही नावीन्य आहे, असे कोणाला वाटले नसते. परंतु मोहनची गोष्ट वेगळी होती. या महानगरांपासून दूर पश्चिम किनारपट्टीवरील एका छोट्या आणि जवळजवळ मागासलेल्या संस्थानात त्याचे बालपण गेलेले; तेही कर्मठ हिंदू कुटुंबात. आईची वेडी माया मुलाला दूर जाऊ देण्यास तयार नव्हती. अशाही परिस्थितीत मोहनने निर्धाराने परदेशी जाण्याचा निर्णय घेतला ही दैवगतीच होती. भावी काळात याचे काय परिणाम होतील, याची तमा न बाळगता त्याने लंडनची वाट धरली ती चांगले व्यावसायिक शिक्षण घेऊन आर्थिक उन्नती करण्यासाठी आणि कुटुंबाला सुखा-समाधानाचे, वैभवाचे दिवस दाखविण्यासाठी. तीन वर्षांनंतर इंग्लंड सोडताना 'व्हेजिटेरियन' या नियतकालिकाच्या वार्ताहराने गांधीजींना विचारले की इंग्लंडला येऊन कायद्याचे शिक्षण घेण्याची प्रेरणा त्यांना कशी झाली, तेव्हा मोहननं म्हटलं की केवळ महत्त्वाकांक्षा ! ''मी विचार केला की आपण इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर झालो (मला बॅरिस्टरीचे फार महत्व वाटत असे) तर चांगला व्यवसाय तर मिळेलच पण त्याखेरीज तत्त्वज्ञ, लेखक, कवी यांचे माहेरघर आणि युरोपीय संस्कृतीची गंगोत्री असा इंग्लंड देश पहायला मिळेल.''

लंडनमधील सुरुवातीचे काही दिवस म्हणजे हालाची परमावधी होती. ''मला सतत घरची आणि आपल्या देशाची आठवण येई. येथे माणसं, त्यांच्या चालीरीती

आणि त्यांची कुटुबसंस्था किती भिन्न होती. इंग्लिश चालीरीतींच्या बाबतीत तर मी चांगलाच अनभिज्ञ होतो. ते रीतीरिवाज पाळण्यासाठी मला सतत काळजी घ्यावी लागे. शाकाहारच घ्यायचा ही प्रतिज्ञा फार गैरसोयीची ठरली. तेथील शाकाहारी पदार्थही किती बेचव असत.''

परंतु सुदैवाने चांगले शाकाहारी पदार्थ मिळविण्यातील अडचण दूर झाली ''फॅरिंग्डन रस्त्यावर एक चांगले शाकाहारी उपाहारगृह अचानक सापडले. एखाद्या लहान मुलाला हवी ती वस्तू हातात मिळाली की कसा आनंद होतो, तसे मला झाले.''

लंडनमधल्या त्या भोजनगृहात चांगले शाकाहारी पदार्थ पोटभर खाल्ल्यावर मोहनने, हेन्री सॉल्ट यांनी शाकाहारावर लिहिलेले एक पुस्तकही विकत घेतले. ते वाचून झाल्यावर त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्या ग्रंथाने मोहनच्या मनाची आणि विचारांची चांगलीच पकड घेतली. आपल्या विचारात क्रांतिकारक बदल होत आहे, असे त्याला वाटू लागले. कारण आतापर्यंत सवयीमुळे आपण शाकाहारी आहोत, शाकाहारच घेण्याची आपण शपथ घेतली आहे म्हणून आपण ती पाळत आहोत अशी त्याची समजूत होती. परंतु पुस्तकाच्या वाचनाने शाकाहार किती चांगला असू शकतो याची त्याला मनोमन खात्री पटली. यानंतर गांधीजींनी आयुष्यभर सतत शाकाहाराचाच पुरस्कार केला.

यानंतर मोहनने आहार शास्त्रावरची अनेक पुस्तके वाचून काढली. आपले पूर्वज शाकाहारच चांगला असे मानत असत. त्याला आता वैज्ञानिक संशोधनाची चांगलीच पुष्टी मिळाली, अशी त्याची खात्री झाली. शाकाहाराच्या प्रसारासाठी आपण जणू वचनबद्ध आहोत या निर्धाराने गांधीजींनी उत्तरायुष्यात त्याचा हिरीरीने पुरस्कार केला.

इंग्लिश रीतीरिवाजांची मोहनच्या मनावर सुरुवातीस चांगलीच छाप पडली. त्यावेळी इंग्रजांची भ्रष्ट नक्कल करण्याचा आपण केविलवाणा प्रयत्न केला, असं गांधीजींनी म्हटलं आहे. त्यापायी मोहनने नवे कपडे केले - एक सिल्कहॅट विकत घेतली, सायंकाळचा पोशाख शिवून घेण्यासाठी १० पौंड खर्च केले आणि घड्याळासाठी सोन्याची डबलचेनही करून घेतली. वक्तृत्वकला आत्मसात करण्यासाठी आणि फ्रेंच भाषा शिकण्यासाठी,तसेच इंग्लिश नृत्य करता यावे यासाठी मोहनने शिकवणीच्या वर्गात जाण्यास सुरुवात केली. याचवेळी गांधीजींच्या मनाची घडण घडत होती. माणूस चारित्र्यसंपन्न नसेल तर त्याला आदर्श वा उत्तम नागरिक (जंटलमन) समजायचं कसं! आणि तो उत्तम नागरिक नसेल तर त्यानं केवळ

पोशाख चांगला केला, आणि रीतीरिवाज सांभाळले म्हणून काही त्याला जंटलमन समजता येणार नाही; असं गांधीजींना त्या तरुणवयातच जाणवू लागलं.

याच काळात इंग्लंडमधील शाकाहारवाद्यांशी मोहनचे संबंध घनिष्ट होत चालले होते. त्याचे वाचनही वाढत होते. एडवर्ड कार्पेण्टर, एडवर्ड मेटलॅज आणि ॲना किंग्जफोर्ड यांच्या साहित्याची त्यांच्या मनावर चांगलीच छाप बसली होती. मॅडाम ब्लॅव्हाटस्की आणि ॲनी बेझंट यांचे विचारही मोहनने समजून घेतले होते. आदर्शवादी आणि नवविचाराचे प्रवर्तक यांच्याविषयी गांधीजींना आयुष्यभर आपुलकी वाटत राहिली. त्यांचे नवे विचार प्रत्यक्ष कृतीत कसे उतरविता येतील यासाठी गांधीजींनी पुढाकार घेऊन काही प्रयोग केले. या प्रयत्नात अनेकदा त्यांना चटके बसले, परंतु माघार त्यांना ठाऊक नव्हती.

थिऑसॉफीचा पुरस्कार करणारांच्या सान्निध्यात आल्यानंतर एकदा एडविन अर्नॉल्ड यांनी केलेला भगवद्गीतेचा इंग्रजी अनुवाद गांधीजींच्या हाती पडला. ''या पुस्तकाने मला नवी जीवनदृष्टी दिली. मी ज्याची वाट पहात होतो तो नवा प्रकाश मला इथे दिसला.'' एडविन अर्नॉल्डचे बुद्धाच्या जीवनावरील 'लाईट ऑफ एशिया' तसेच कार्लाइलचे 'हिरोज ॲन्ड हिरो वर्शीप' या ग्रंथातील प्रेषित महंमदाविषयीचे प्रकरण गांधीजींच्या वाचनात आले. याचवेळी शाकाहारी भोजनगृहात भेटलेल्या एका नव्या स्नेह्याने त्यांना बायबलची प्रत भेट दिली. त्यातील 'पर्वतावरील प्रवचन' या प्रकरणाने तर त्यांना चांगलीच मोहीनी घातली. 'भगवद्-गीता' 'लाईट ऑफ एशिया' आणि 'पर्वतावरील प्रवचन यामधील आदर्श शिकवणुकीचा मेळ घालण्याची माझ्या तरुण मनाला छंदच जडला. सर्वसंग परित्याग हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे, या विचाराने तर मी झपाटून गेलो.

गांधीजींना तरुण वयापासूनच सर्वधर्माविषयी आदर वाटत असे. प्रत्येक धर्मातील उदात्त आणि उच्च विचार समजून घेण्याचा त्यांनी प्रथमपासून प्रयत्न केला. सर्व धर्मातील सार अखेर समान आहे हे त्यांच्या मनावर फार लवकर बिंबले गेले. विशेष म्हणजे, आपल्या देशाचा आणि धर्माचा वारसा किती महान आहे, याची जाण त्यांना इंग्लंडमध्ये असताना आणि इंग्रजी भाषेतील साहित्य वाचून झाली. इंग्लंडमध्ये पाऊल ठेवेपर्यंत ते केवळ सवयीने शाकाहाराचा अवलंब करीत, परंतु शाकाहारच उत्कृष्ट अशी त्यांची मनोमन खात्री झाली ती इंग्लंडमध्ये. शाकाहार हा आता त्यांचा श्रद्धेचा विषय होता. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध त्यांनी आयुष्यभर लढा दिला. परंतु ब्रिटनची महान वैचारिक परंपरा आणि ब्रिटिश लोकांचे ऋण याचे त्यांना आयुष्यभर विस्मरण झाले नाही.

इंग्लंडमध्ये असताना गांधीजींनी लिहून ठेवलेली रोजनिशी दुर्दैवाने कोठेतरी हरवली वा कोणीतरी नष्ट केली. त्यातील काही पाने नंतर कशीबशी हाती लागली. आपले अनुभव आणि विचार किती सहजपणे, नव्हे अगदी भाबडेपणाने त्या रोजनिशीत गांधीजी लिहून ठेवीत, हे या पानावरील मजकुरातून लक्षात येते. खेरीज, त्यांची इंग्रजी भाषा किती सुधारत गेली, आणि त्यावर त्यांनी हळूहळू कसे प्रभुत्व मिळविले, हेही या मजकुरावरून लक्षात येते. भावनगरला महाविद्यालयात शिकत असताना इंग्रजी भाषेने एकवेळ त्यांची कशी भंबेरी उडविली होती, याचेही मग आश्चर्य वाटू लागते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे दर आठवड्याला ते राजकोटला आपल्या भावाला गुजराती भाषेत फार छान पत्रे लिहीत परंतु ही पत्रं काळाच्या ओघात नष्ट झाली. मातृभाषेत सहजगत्या विचार आणि भावना व्यक्त करता येत असल्याने, लंडनमध्ये त्या काळात गांधीजींनी कसे दिवस काढले; त्यांचे व्यक्तिमत्व तेथे कसे घडत गेले. हे समजावून घेण्याची सुवर्णसंधी त्यामुळे आपण गमावली.

लंडनहून गांधीजी सर्व सविस्तर हकीकत नियमितपणे घरी पत्रातून कळवीत, हे त्यांनी आपल्या सुनेला १९३२ साली येरवडा तुरुंगातून लिहिलेल्या पत्रावरून लक्षात येते. त्यांनी पत्रात सुनेला (मणीलालच्या पत्नीला) लिहिलं : ''तुझं दोन पानी पत्र मिळालं. पत्र फार मोठं झालं असं तुला वाटतं - पण तू आळशी आहेस असंच मी म्हणेन. मी इंग्लंडमध्ये असतांना भावाला २० ते २५ पानं भरलेली पत्रं पाठवीत असे; आणि तेव्हाही मला वाटायचं की आपण काही पुरेसा मजकूर लिहिलेला नाही. भावाला पत्र लांबलचक वा कंटाळवाणी वाटतील असं मला कधी वाटलं नाही. नव्हे, त्याला ती पत्रं वाचायला खूपच आवडेल, अशी माझी खात्री होती. आठवडाभर आपण काय केलं, कोणा कोणाला भेटलो, कोण भेटीला आलं, कोणती पुस्तकं वाचली आणि याकाळात कोणत्या चुका केल्या, कसा गोंधळ घातला याची सारी हकीकत तू बिनदिक्कत पत्रात लिहून काढ. आपल्या भावाला पत्रातून अशा हकीकती सांगणं, किती चांगलं ?''

तीन दशकानंतर मोहनदास करमचंद गांधी महात्माजी म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले होते. भूतकाळातील जीवनाला आता फारसा अर्थ राहिला नव्हता. महात्माजी अशावेळी आपल्या जीवनातील आठवणी वा प्रसंग सांगत ते त्या आपल्या ध्येयवादाशी, आचाराशी आणि विचाराशी किंवा सत्याच्या प्रयोगाशी कोठे सुसंगत असतील तरच. तरुणपणी लंडनमध्ये असताना त्यांना आलेले अनुभव आणि त्यांच्या आवडीनिवडी किती विविध असतील ते सांगणे कठीण. अद्ययावत पोशाख घालून तीन वर्षे लंडनमध्ये घालविलेल्या त्या तरुणाचे विचार चांगलेच परिपक्व झाले. स्वतंत्रबुद्धीने विचार करण्याची त्याची आता सिद्धता झाली होती.

कायदा वा धर्म-तत्त्वज्ञान या विषयांवरील थोडी पुस्तके वाचली, सभांना हजर राहिले म्हणजे माणूस आचार-विचाराने समतोल आणि परिपक्व होतो, असे थोडेच आहे ? पण गांधीजी ही वेगळीच असामी होती.

शाकाहारीत्व हा आपला सत्याचा प्रयोग होता, असे गांधीजी मानीत. लंडनमधील शाकाहाऱ्यांच्या संस्थेविषयीच्या आठवणी त्यांनी लिहून जपून ठेवल्या आहेत. एकदा अशीच या संस्थेची एक सभा भरली होती. येथेच आपल्या स्वतंत्र विचारशक्तीचा प्रत्यय गांधीर्जीनी सदस्यांना आणून दिला.

त्या सभेत एका सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्याचा ठराव पुढे आला कारण या माणसाचा संतती-प्रतिबंध (बर्थ कंट्रोल) पद्धतीवर विश्वास होता, आणि तो त्याचा प्रचारही करीत असे. गांधीर्जींना या विषयात स्वारस्य होते कारण नैतिकदृष्ट्या संततीनियंत्रण पद्धतीचा त्यांचा विरोध असला तरी शाकाहारी चळवळीच्या आड हा प्रश्न येत नसल्याने त्या सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्यास त्यांचा विरोध होता. त्यांनी त्या ठरावास विरोध केला.

या घटनेचे वैशिष्ट्य आहे, ते असे की, गांधीर्जींनी आपण ठरावाला का विरोध करीत आहोत, ते सविस्तर लिहून काढले. त्यांनी त्यात म्हटले की अन्य विषयावर सदस्यांचे काहीही मत असो, कोणीही शाकाहारी व्यक्ती असली की ती या संस्थेची सदस्य होऊ शकते. एवढाच नियम आहे. परंतु आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते भाषणास उभे राहाताच त्यांचे धैर्य गळाले. दुसऱ्या कोणीतरी सदस्याने मग त्यांचे भाषण वाचून दाखविले. गांधीजींच्या समर्थनाचा उपयोग झाला नाही आणि त्या सदस्याला संस्थेतून काढून टाकण्यात आले. ''आयुष्यात प्रथमच मी जवळजवळ पराभूत बाजूचे समर्थन करण्यासाठी उभा राहिलो आणि ती लढाई हरलो. परंतु माझी बाजू न्याय्य होती, इतका विश्वास मला होता.''

त्या तरुणवयात एकीकडे स्वतंत्र विचार करण्याची समर्थता निर्माण होत असतानाच स्वभावातील मूळच्या लाजरेपणावर आणि बुजरेपणावर गांधीजी लगेचच मात करू शकले नाहीत. अवसान गळण्याची ही काही त्यांची पहिलीच खेप नव्हती. त्याआधी इंग्लंडला जाण्यासाठी ते निघाले तेव्हा त्यांच्या हायस्कूलतर्फे निरोप देण्याचा एक समारंभ गावात आयोजित करण्यात आला होता. आभारप्रदर्शनाचे भाषण करण्यासाठी मोहनने काही मुद्दे आधीच टिपून घेतले होते. ''परंतु वेळ आली तेव्हा मी थरथरू लागलो. तोंडून शब्द फुटेना. लिहून आणलेल्या भाषणातील वाक्ये डोळ्यांना दिसेनात.''

पुढे इंग्लंडमध्येही एकदा याची पुनरावृत्ती घडली. व्हेंटनॉट येथे १८९१ च्या मे

महिन्यात शाकाहारावर एक परिषद भरली होती. आपल्या मुझुमदार या मित्रासमवेत मोहन परिषदेला उपस्थित होता. त्याने आपले भाषणही लिहून आणले होते. परंतु भाषणाला उभे राहताच, ''माझ्या नजरेपुढे तारे चमकू लागले. ते एकपानी भाषणही मी वाचू शकलो नाही. मग मुझुमदारने ते भाषण वाचले. इंग्लंडमधील माझ्या वास्तव्यात हा माझा लाजरे-बुजरेपणा कमी झाला नाही. कोणाच्या मी भेटीस गेलो आणि तिथं ८-१० माणसं सभोवताली पाहिली की माझी वाचा जात असे.''

सार्वजनिक ठिकाणी भाषण करण्याची हिंमत येत नव्हती, परंतु त्याचवेळी गांधीजींना चांगले भाषण लिहून काढणे सहज जमत गेले. भावनगर येथे महाविद्यालयात मोहनने प्रवेश केला तेव्हा इंग्रजी भाषेतील प्राध्यापकांची व्याख्याने त्यांच्या डोक्यावरून जात. मात्र इंग्लंडमध्ये असताना, आपल्या लोकांच्या आहाराच्या सवयी, आपले सण-समारंभ, प्रथा-परंपरा यांवर गांधीजींचे लेख 'व्हेजिटेरियन'मध्ये अनेकदा छापून येत. त्या कालखंडातील त्यांचे साधे सोपे निवेदन असलेले बालबोध वळणाचे वृत्तपत्रीय लेखन आजही वाचावेसे वाटते. मोहनची निरीक्षण शक्ती आणि आकलन-क्षमता किती चांगली होती, याचे त्यातून दर्शन घडते. पुढे आयुष्यभर गांधीजींनी पत्रकारीताही केली. परंतु त्याचा पाया हा असा इंग्लंडमधील वास्तव्यात घातला गेला. त्यात सत्य बाजूवर, साधार मुद्यांवर आणि नैतिक दृष्टिकोनावर भर असे.

हिंदू समाज प्रामुख्याने शाकाहारीच असल्याने लढाऊ, आक्रमक, विजीगीषु वृत्तीचा त्यात अभाव आढळतो, असा सर्वसाधारण सर्वत्र समज असे. गांधीजींनी यावर म्हटलं की, बालवयातच विवाह करण्याची हिंदू समाजातील पद्धती आणि त्याचा दुष्परिणाम म्हणजे हिंदू माणसाची सर्वसाधारण बारीक कुडी. आपले स्वतःचे उदाहरण देऊन त्यांनी म्हटले : ''अकरा वर्षाच्या मुलाचे, त्याच्याच वयाच्या मुलीशी लग्न होते. या वयात विवाह म्हणजे काय हे उभयतांना कळतही नाही, परंतु पती आणि पत्नीच्या नात्याचा बोजा त्यांच्यावर टाकण्यात आलेला असतो. मुलाचे हे शाळेत जायचे वय परंतु त्याचवेळी घरी लहानखोर बायकोचीही जबाबदारी त्याच्या खांद्यावर आलेली असते. अभ्यास, घरसंसाराची जबाबदारी यांचे दडपण त्या मुलाच्या मनावर येऊन त्याची प्रकृती चांगली रहाणार तरी कशी ? आणि तो देहामनानं सुदृढ होणार तरी कसा ?''

मायदेशातून इंग्लंडकडे जाण्यासाठी निघताना आपली मनोवस्था कशी होती तेही गांधीजींनी 'व्हेजिटेरियन'च्या वाचकांना खुलवून सांगितले आहे. ते लिहिताना, ''जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी, जेवताना, झोपताना, जागेपणी इंग्लंडला

जाण्याचा विचार माझ्या डोक्यातून जाईना. परदेशी निघण्याच्या दिवशी आपण काय काय करावयाचे तेही मी ठरवून टाकले होते. अखेरीस तो दिवस उजाडला. एकीकडे आई नजर लपवीत आपले डोळे पुशीत होती, परंतु तिचे हुंदके मला ऐकू येत होते. दुसरीकडे ४०-५० मित्रांनी घरात मला वेढा घातला होता. आप्तांच्या विरहाच्या कल्पनेनं माझं मन विदीर्ण झालं होतं. परंतु मी आपलं दुःख बाहेर दाखवू शकत नव्हतो. पत्नीचा निरोप घेणं तर त्याहून कठीण होतं. नातेवाईक-स्नेह्यांच्या समोर तिच्याशी काही बोलणं योग्य नव्हतं. अखेरीस मी तिला खोलीत बोलावलं. ती केव्हांपासून हुंदके देतच होती. मी तिच्याजवळ गेलो आणि एखाद्या पुतळ्यासारखा क्षणभर निश्चल उभा राहिलो. मी तिचे चुंबन घेतले, तेव्हा ती म्हणाली : 'जाऊ नका' - त्यानंतर काय घडले ते वर्णन करणे कठीण आहे.''

राजकीय, सामाजिक आणि बौद्धिक क्षेत्रात त्याकाळी लंडन म्हणजे अनेक नव्या क्रांतिकारी विचारांचे आणि चळवळींचे केंद्रस्थान झाले होते. आमच्या तरुण पत्रकाराच्या मनावर त्याचा कितीसा परिणाम झाला, त्या विचारांशी त्याचा परिचय कितीसा झाला, हे कळत नाही. आपल्या आठवणी लिहिताना गांधीजींनी त्याबद्दल फारसे काही म्हटले नाही. मात्र ज्या काही आठवणी कथन केल्या त्यावरून त्यांच्या मनाची घडण कशी घडत होती, त्याचा प्रत्यय येतो.

सन १८९० मध्ये पॅरिसला एका प्रदर्शनाला भेट दिल्याची आठवण गांधीजींनी सांगितली आहे. नॉत्रदॅम येथील चर्च आणि अन्य काही ख्रिश्चन प्रार्थना-स्थळांचे वास्तुशिल्प सौंदर्य पाहून ते स्तंभित झाले. ''लाखो रुपये खर्च करून अशी सुंदर प्रार्थनामंदिरे उभारणारांच्या मनात ईश्वराविषयी केवळ श्रद्धा आणि प्रेम याखेरीज दुसरे काय असणार ?'' मात्र पॅरिस येथील इफेल टॉवर त्यांना आकर्षित करू शकला नाही. उलट, त्याचा उल्लेख करताना गांधीजींना टॉलस्टॉयचे इफेल टॉवरसंबंधीचे उद्गार आठवले. टॉलस्टॉयने म्हटले आहे की हा टॉवर म्हणजे मानवाच्या कर्तृत्वशक्तीचे वा बुद्धिमत्तेचे स्मारक नसून माणूस किती मूर्खपणा करू शकतो याचे ते गगनभेदी स्मारक आहे, एवढेच म्हणता येईल. त्या रशियन विचारवंताचा गांधीजींच्या विचारावर प्रभाव कसा वाढत होता आणि उभयतांचे विचार एकमेकांशी कसे जुळत होते, याचा हा एक वानगीदाखल नमुना. पाश्चात्य संस्कृतीतील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आणि प्रगतीचाही टॉलस्टॉय तिरस्कार करीत. गांधीजींचे विचार यांकाळात त्या विचारांशी जुळणारेच होते.

तीन वर्षांच्या वास्तव्यानंतर दि. ११ जून १८९१ रोजी गांधीजी बॅरिस्टर झाले; आणि त्यांना उच्च न्यायालयाची सनदही मिळाली. त्या तरुण बॅरिस्टरने दुसऱ्याच

दिवशी मायदेशी जाण्यासाठी इंग्लंडचा निरोप घेतला. गांधीजींना इंग्लंडमधील वास्तव्याने नवा जोम मिळवून दिला. भावी काळातील त्यांच्या साऱ्या कर्तृत्वाचा, विचारांचा, पाया येथे घातला गेला. व्यक्तिमत्वाला नवे पैलू पडले. यानंतर अनेक वर्षांनी आपले पहिले चरित्रकार जोसेफ डॉक यांच्याशी बोलताना गांधीजींनी म्हटलं की, ''आता जर मला कोणी विचारलं की भारतानंतर कोठे रहाणं तू पसंत करशील ? तर मी लंडनचीच निवड करीन.''

: ३ :

निराशेचे ढग

मायदेशी परतल्यानंतर, घरी जाऊन आपल्या कुटुंबियांना भेटण्याचा आनंद, आईच्या दु:खद निधनाच्या बातमीनं मावळला. मोहन इंग्लंडमध्ये असतानाच आई देवाघरी गेली, परंतु तिची मोहनवरील माया लक्षात घेऊन भावानं त्याला मृत्यूची बातमी कळविली नव्हती. मोहन हळव्या स्वभावाचा असला तरी प्रसंगी भावविवश होत नसे. आईच्या निधनाचं दु:ख त्यानं मोठ्या धैर्यानं सोसलं.

लंडनहून परतल्यानंतर राजकोटला घरी जाण्याआधी भाऊ मोहनला घेऊन प्रथम सरळ नाशिकला गेला. निषिद्ध असा समुद्रापार प्रवास करून काही वर्ष फिरंग्यांच्या देशात काढल्यानंतर गोदावरीत पापक्षालन करणे आवश्यकच होते. राजकोटला परतल्यानंतर गावातील आपल्या जातीच्या ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळींना, प्रायश्चित म्हणून जेवण घालणंही आलंच. जातीपातीची बंधनं आणि अर्थहीन रीतिरिवाज गांधीजींना तेव्हांही मान्य नव्हते, परंतु आपल्यासाठी झिजणाऱ्या वडील भावाला दुखवू नये म्हणून मोहनने सारे मुकाट्याने सोसले. भावासाठी मोहनला बराच त्रास आणि मानहानीही सोसावी लागली. एकदा तर भावाच्यावतीने काही रदबदली करण्यासाठी त्यानं राजकोटच्या ब्रिटिश पोलिटिकल एजंटला भेटण्याचा प्रयत्न केला असता, त्याला तेथून हाकलून लावण्यात आलं.

आदर्शवादी मोहनने याआधी, मद्य, मांस आणि मदनिका यापासून दोन हात दूर राहाण्याचं आईला वचन दिलं होतं. आता आपल्या आहार पद्धतीत क्रांतिकारक सुधारणा करण्याचा त्यांचा उत्साह त्यांच्या अंगी संचारला होता. जेवणाची पंगत, तसेच पोशाख याबाबतीत युरोपीय पध्दतीचा अंगीकार आपल्या कुटुंबातील सर्वांना करावा म्हणून मोहनने घरातील सर्वांना सूचना देण्यास प्रारंभ केला. परिणामी घरखर्च तेवढा वाढला.

लंडनहून बॅरिस्टर होऊन आल्यानंतर मोहन भरपूर कमाई करील आणि कुटुंबाला

सुखाचे दिवस दाखवील, या आशेने भावानं त्याच्यासाठी कर्ज उभे करून त्याला लंडनला धाडले होते, त्याची मोहनला जाणीव होती. ताबडतोब त्यासाठी धडपड करणे हेच आता त्याच्या नजरेपुढील एकमेव उद्दिष्ट होते, परंतु राजकोटसारख्या छोट्याशा संस्थानात एका बॅरिस्टरला कितीशी प्राप्ती होणार ? वकिलीवर इथं खोऱ्यानं पैसे करणे अशक्य आहे, हे लक्षात येताच मोहनने वकिली व्यवसायासाठी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला, परंतु इनर टेंपलहून मिळालेली बॅरिस्टरीची पदवी सोडली तर मोहनला भारतीय कायद्याचे काही ज्ञान नव्हते; किंवा वकील म्हणून, या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी अन्य काही सामाजिक उपाधीही नव्हती. आजच्या युगात कठोर नैतिक आचरण आणि निर्धार म्हणजे अनेकवेळा अडचण होऊन बसले. खटले मिळविण्यासाठी मध्यस्थ दलालांना दलाली देण्याचीही त्यामुळे त्याची तयारी नव्हती. त्यामुळे न्यायालयात हात चोळीत बसण्याखेरीज आणि झोपा काढण्याखेरीज त्याला दुसरा मार्ग उरला नव्हता.

अखेरीस एकदाची एक केस त्याला मिळाली. लघुवाद न्यायालयापुढील ते प्रकरण होते. वादीची उलट तपासणी करण्याची वेळ आली तेव्हा मात्र मोहनचा नेहमीचा बुजरा,भिडस्त स्वभाव आडवा आला. ''माझे डोके गरगरू लागले आणि सारे न्यायालय स्वत:भोवती फिरते आहे असे वाटू लागले. उलट तपासणीत काय प्रश्न विचारावे, तेच मला कळेना.''

गोंधळून गांधी खाली बसले आाणे अशिलाची फी त्यांनी दलालाला परत केली.

त्यानंतर गांधीजींनी त्या न्यायालयात पुन्हा पाऊल टाकले नाही. एका शाळेत त्यांनी इंग्रजी भाषेचे शिक्षक म्हणून अर्धवेळ नोकरी करण्यास सुरुवात केली. परंतु येथेही दैव आडवे आले. त्या शाळेच्या प्राचार्यांच्या जेव्हा लक्षात आले की हा उमेदवार विद्यापीठाचा पदवीधर नाही, तेव्हा त्याने त्यांना ''नोकरी देण्यास सखेद नकार दिला.''

अशाप्रकारे सहा महिने मुंबईत नशिबाची परीक्षा अजमावीत वेळ घालविल्यानंतर गांधीजींनी मुंबई सोडून राजकोटला परतण्याचा निर्णय घेतला. पक्षकारांना अर्ज वा निवेदने लिहून देण्याचे काम तेथे मिळाल्याने त्यांना बरी प्राप्ती होऊ लागली. भावाने खटपट करून त्यांना काम मिळवून देण्यासाठी बरेच प्रयत्न केले. एका बॅरिस्टराने स्वत:च्या निर्वाहासाठी असे क्षुल्लक कारकुनी काम करावे, हीही मानहानी तसेच निराशाजनक अनुभव होता.

राजकोट येथील ब्रिटीश पोलिटिकल एजंटाने बॅ. गांधींना, मागे सांगितल्याप्रमाणे, अपमान करून घालवून दिल्यानंतर त्यांच्या आणि त्यांच्या

बंधूंच्या, कोठे न्यायालयात नोकरी मिळविण्याच्या आशाही धुळीला मिळाल्या. या अपमानाने गांधीजी फार अस्वस्थ झाले. त्यात त्या छोट्या संस्थानाच्या कारभारात सर्वत्र भ्रष्टाचार, कुरबुरी आणि कुटिल डावपेच यांना ऊत आला होता. गांधीजींसारख्या, त्या तरुणवयातही अत्यंत शुद्ध आचरण असलेल्या व्यक्तीला नैतिकदृष्ट्या ते वातावरण सहन होण्यासारखे नव्हते. इंग्लंडहून मोठ्या आशेने परतलेले गांधीजी त्यामुळे फार निराश झाले. अपेक्षाभंगाच्या त्या दु:खात त्यांना काय करावे आणि कोठे जावे, हेही सुचेना.

अशा परिस्थितीत दैवाने एक फार मोठी संधी त्यांना मिळवून दिली. काठीयावाडमधील एका मुस्लिम उद्योगपतीचा फार मोठा व्यापार दक्षिण आफ्रिकेत होता. त्या व्यापारी फर्मविरुद्ध तेथे चाललेल्या एका मोठ्या खटल्यात आपल्या वकिलाला साह्य आणि सल्ला देण्यासाठी गांधीजींना तेथे पाठविण्याची तयारी फर्मने दर्शविली. या व्यापारी कंपनीने देऊ केलेला पगार आणि अन्य सोयी-सवलतीही चांगल्या होत्या. खेरीज तेथे एक वर्षपर्यंतच रहावयाचे होते. निराशाजनक आणि अपमानास्पद वातावरणातून बाहेर पडण्याची एक फार मोठी संधी चालून आली होती. बाहेरच्या विशाल जगात आता आपण आपले नशीब अजमावून पहावे, असा विचार करून गांधींनी ती नोकरी स्वीकारली आणि १८९३ च्या एप्रिल महिन्यात ते तिकडे जाण्यास निघाले.

: ४ :

नियतीचे प्रहार

आपण काय करीत आहोत, कोठल्या वाटेनं जात आहोत याची तरुण गांधींना फारशी कल्पना नव्हती. सभोवतालच्या प्रतिकूल परिस्थितीतून सुटका व्हावी आणि चार पैसे मिळवावे या मर्यादित हेतूनं त्यांनी दक्षिण आफ्रिकेची वाट धरली होती. कुटुंबाची आर्थिक स्थिती त्यामुळे सुधारण्याला मदत व्हावी हाच मर्यादित हेतू नजरेसमोर होता. दैवानं पुढं काय वाढून ठेवलं आहे, आणि कोणता सापळा रचला आहे, याची कल्पना त्यांना कशी यावी ?

अननुभवी, एकाकी आणि पराभूत मनोवृत्तीच्या या तरुणाला पुढे दक्षिण आफ्रिकेत अशा संकटातून आणि कसोटीतून जावे लागले की तेथे त्याच्या साऱ्या निद्रिस्त गुणांची आणि नैष्ठिक सामर्थ्याची खरी परीक्षा झाली. परिस्थितीच्या भोवऱ्यात त्याचे सारे सुप्त गुण उफाळून वर आले. मानहानी आणि संकटे यांना तोंड देता देता त्यातूनच एक नवा क्रियाशील अध्यात्मिक अनुभव प्रत्ययास येऊ लागला.

अशाही परिस्थितीत, आपण इंग्लंडमध्ये शिक्षण घेतलेले एक बॅरिस्टर आहोत, याचा गांधींना अभिमान होता. द. आफ्रिकेत नाताळ येथे जाताना बोटीच्या पहिल्या वर्गात जागा शिल्लक नव्हती. खालच्या वर्गानं प्रवास करणे प्रतिष्ठेला शोभून दिसले नसते. अखेरीस गांधीजींनी आपली अडचण जहाजाच्या मुख्य अधिकाऱ्याच्या कानावर घातली. तरुण बॅरिस्टरची अडचण अधिकाऱ्याच्या लक्षात आली आणि त्याने त्यांना आपल्या केबीनमध्ये जागा दिली.

या प्रवासात स्वाभिमानाला कोठे धक्का लागला नाही. बॅ. गांधी नाताळ बंदरात (किंवा दरबान या शहरी) एकदाचे पोहोचले. त्यावेळी डोक्यावर पगडी आणि अंगात काठियावाडी पोशाख त्यांनी परिधान केला होता. त्यांचे अशिल अब्दुल्ला-शेठ त्यांना घ्यावयास बंदरात आले होते. ज्या स्वाभिमानाची जपणूक करीत आपण इथपर्यंत आलो आहोत, तो टिकविणं या देशात कठीण आहे, हे

गांधीजींच्या लवकरच लक्षात आले. द. आफ्रिका ही ब्रिटिश वसाहत असली तरी इंग्लंडमध्ये अनुभवास आलेल्या ज्या पाश्चात्य आदर्श मूल्यांबद्दल गांधींना आदर होता, ती मूल्ये येथे सतत पायदळी तुडविण्यात येत होती. दैवाने त्यांना अशा ठिकाणी आणून ठेवले होते की त्याचे वर्णन करताना त्यांनी म्हटले की, ''प्रत्यक्ष ईश्वरालाही ज्या ठिकाणी उभे राहण्याची इच्छा होणार नाही, अशा खंडात मला मात्र माझा भगवंत सापडला.''

आफ्रिकेतील अन्य वसाहतीप्रमाणेच, नाताळमध्ये ब्रिटिश आणि डच गोरे अल्पसंख्य असले, तरी राज्यकर्ते असल्याने स्थानिक काळे लोक आणि भारतीय यांना ते तुच्छतेने वागवीत. तेथील युरोपियनांच्या मळ्यांची मशागत आणि देखभाल करण्यासाठी त्या लोकांनीच १८६० च्या सुमारास काही भारतीय लोकांना त्या देशात आणले होते. पाच वर्षांपर्यंत कराराप्रमाणे तुम्ही मजूर म्हणून काम करा, नंतर येथे स्वतंत्र नागरिक म्हणून राहण्यालाही परवानगी दिली जाईल, असे आमीष दाखवून भारतीयांना द. आफ्रिकेत आणण्यात आले होते.

या मजुरांपाठोपाठ भारतातून व्यापार-उदीमासाठीही अनेकजण आफ्रिकेत येऊन पोहोचले. मात्र गोरे युरोपीय लोक या सर्वच भारतीयांना पाण्यात पहात, तुच्छ लेखीत, आणि कोणाचा व्यवसाय काहीही असो, वा समाजातील स्थान कोणतेही असो, सर्वांनाच कुली वा मजूर समजून वाईट वागणूक देत. गोरे लोक स्थानिक निग्रोंपेक्षाही भारतीयांचा द्वेष करीत, कारण ते भारतीयही तसे काळे तर होतेच परंतु त्यापेक्षाही शेती, व्यापार-उदीमात भारतीयांशी स्पर्धा करणे या गोऱ्यांना फार जड जात असे, म्हणून दु:स्वास अधिक होता. काही वर्षांनंतर लिओनेल कर्टिस यांनी गांधीजींशी बोलताना म्हटलं की, ''या देशातील युरोपीय लोकांना भारतीयांच्या दुर्गुणांची नव्हे, तर गुणांची, कष्टांची, श्रमांची भीती वाटते.''

यथावकाश तरुण गांधीजींना या गोष्टीचा प्रत्यय येऊ लागला. मानहानीचा पहिला प्रसंग तर दरबानला गेल्यानंतर तीनचार दिवसातच आला. गांधीजींचे अशिल त्यांना दरबान येथील न्यायालयात घेऊन गेले तेव्हाची ही गोष्ट आहे. ''कोर्टात प्रवेश केल्यानंतर मॅजिस्ट्रेट माझ्याकडे निरखून पाहू लागले. त्यांनी मग मला माझा फेटा काढण्यास सांगितले. मी त्यास नकार दिला आणि कोर्टाबाहेर पडलो.'' आपला राष्ट्रीय पोशाख आणि शिरपेच वापरण्याचा प्रत्येकाला हक्क आहे, अशा आशयाचे एक पत्र गांधींनी वृत्तपत्रात लिहिले आणि सारी हकीकत कथन करून आपल्या मुद्याचे जोरदार समर्थन केले. यावर वृत्तपत्रात बरीच चर्चा झाली. अनेक वृत्तपत्रांनी या ''नावडत्या पाहुण्याला'' दक्षिण आफ्रिकेत थारा देऊ नये, असा

युक्तिवाद केला.

दक्षिण आफ्रिकेत प्रवेश केला न केला तोच या ''नावडत्या पाहुण्याची'' सर्वत्र दुष्कीर्ती होऊ लागली. नियतीने आतापर्यंत बरीच वाट पाहिली असावी. गांधीजींच्या साऱ्या व्यक्तिमत्वाचा, स्वभाव वैशिष्ट्याचा, नैतिक आचरणाचा आणि ध्येयाचा कस लागावा यासाठी नियती आता आतूर झाली होती. त्यामुळे एकामागून एक प्रसंग घडत गेले. तरुण गांधी त्यातून तावून-सुलाखून कसे बाहेर पडतात ते नियती पाहू इच्छित होती.

एक आठवड्यानंतर गांधींच्या अशिलाने त्यांची नजिकच्या ट्रान्सवाल बोअर प्रजासत्ताकाच्या प्रिटोरीया या राजधानीकडे रवानगी केली. तेथेही अशिलाचा खटला चालणार होता. त्यांच्यासाठी पहिल्या वर्गाच्या रेल्वे प्रवासाची सोय करण्यात आली होती. गाडी रात्री ९ वाजता नाताळच्या मारित्सबर्ग या राजधानीच्या शहराच्या स्थानकावर येऊन पोहोचताच, एक गोरा प्रवासी गांधींच्या डब्यात आला. डब्यात 'काला आदमी' बसलेला पाहून त्याचे पित्त खवळले. त्याने त्यास आक्षेप घेतला. रेल्वे अधिकाऱ्याला बोलावण्यात आले, त्याने गांधींना दुसऱ्या डब्यात चलण्यास सांगितले परंतु गांधींनी त्यास नकार देताच एका शिपायाने त्यांना ढकलून बाहेर काढले. रेल्वे अधिकाऱ्यांनी त्यांच्या सामानाचा ताबा घेतला.

ते हिवाळ्याचे दिवस होते. त्या रात्री अतिशय थंडी पडली होती. गांधीजींचा ओव्हरकोट सामानाबरोबर रेल्वे अधिकाऱ्यांच्या ताब्यात गेला होता, परंतु तो मागून घेण्याचे त्यांना धैर्य होत नव्हते. प्रतिक्षालयाच्या अंधाऱ्या जागेत, थंडीत रात्रभर ते कुडकुडत बसून राहिले. ''आपल्या हक्कांसाठी झगडत रहावे की हिंदुस्थानात परत जावे—'' हा विचार त्यांना रात्रभर छळीत होता. यानंतर बऱ्याच वर्षांनी अमेरिकन धर्मोपदेशक डॉ. जॉन मोर यांनी वर्ध्याजवळील सेवाग्राम येथे महात्माजींची भेट घेतली. ''तुमच्या आयुष्यात तुम्हाला आलेला सर्वाधिक महत्वाचा असा अनुभव कोणता ?'' असं श्री. मोर यांनी विचारलं असता गांधीजी म्हणाले की माझ्या आयुष्यात अनेक प्रसंगातून आणि अनुभवातून मला जावे लागले परंतु मारित्सबर्ग येथील रेल्वे प्रवासात आलेल्या अनुभवाने माझे जीवन पार बदलून टाकले.

या प्रसंगाची आठवण सांगताना गांधीजी पुढे म्हणाले, ''माझ्या जीवनावर मोठा परिणाम करणारा हा प्रसंग होता. इथं माझ्या जीवाला धोका आहे अशी मला भीती वाटू लागली. त्या अंधाऱ्या प्रतिक्षागृहात मी प्रवेश केला तेव्हा एक गोरा प्रवासी तेथे बसलेला होता. मला त्याची भीती वाटू लागली. काय करावे ? कसे वागावे ? असा प्रश्न मी स्वत:ला विचारू लागलो. हिंदुस्थानला परत जावे की धैर्यानं पुढे

होऊन ईश्वरावर श्रद्धा ठेवून आलेल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी सिद्ध व्हावे ? काय होईल ते होवो, मी तेथे रहाण्याचा आणि त्या प्रसंगाला तोंड देण्याचा निश्चय केला. माझा अहिंसक लढा त्या दिवसापासून सुरू झाला.''

असे प्रसंग पुढे वारंवार येणार होते. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गांधी पुढल्या प्रवासास निघाले. सुदैवाने यावेळी काही घडले नाही. परंतु एकदा फार मोठी आपत्ती ओढवली ती—चार्ल्सटाऊन ते जोहान्सबर्ग या घोडागाडीतून झालेल्या प्रवासात गांधींना गाडीवानाच्या शेजारी पुढे बसून प्रवास करावा लागला. मागे गाडीत, गाडीचा मालक एका गोऱ्या प्रवाशाबरोबर बसला होता. प्रवास चुकू नये म्हणून गांधीजींनी सारा अपमान गिळला. प्रवासात असताना त्या गाडीच्या मालकाला धूम्रपान करण्याची लहर आली. तेव्हा गाडीवानाच्या शेजारी बसून धूम्रपान करण्यासाठी त्यांनी गांधीजींना उठविले आणि एक गोणपाटाचा तुकडा गाडीच्या पायपट्टीवर टाकून तेथे त्यांना बसण्यास सांगितले. गांधीजींनी सरळ नकार दिला. तसा गाडीचा मालक संतापाने हिरवा-निळा झाला. एका ''कुली''ने आपल्याला नकार द्यावा हे सहन न होऊन त्याने गांधीजींना दणके द्यावयास सुरुवात केली. आपल्या जागेवर बसून गांधीजींनी धातूचे पितळी गज घट्ट धरून ठेवले, आणि जागा न सोडता मुकाट्याने मार खात राहिले. काही गोऱ्या प्रवाशांनी या भ्याड हल्ल्याचा निषेध केल्यानं तो गाडीचा मालक ओशाळला. पुढील प्रवास गांधीजींनी आपल्या ठरलेल्या जागेवर बसूनच केला.

जीवाला धोका असताही अन्यायापुढे न वाकण्याचे आणि नापसंत गोष्टीला नकार देण्याचे धैर्य आता त्यांच्या अंगी येऊ लागले. या आधी त्यांनी मनावर ताबा मिळवून मोहापासून दूर रहाण्याचा निर्धार केला होता, आणि आईला दिलेले वचनही पाळले होते. प्रवासात, अन्याय्य सूचनेला नकार देऊन त्यांनी फार मोठे धैर्य दाखविले. आयुष्यभर गांधीजींनी जी मूल्ये जपली आणि आदर्शाचा पाठपुरावा केला त्यांचा पाया या त्यांच्या निर्भय वृत्तीत आढळेल.

गांधीजींच्या मृत्युनंतर त्यांच्याविषयी सांगताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, ''निर्भय स्वभाव ही त्यांना मिळालेली फार मोठी देणगी होती, असंच मी म्हणेन. हा लहानखुरा माणूस शारीरिक, मानसिक आणि आत्मिकदृष्ट्या इतका निर्भय वृत्तीचा होता की त्याने आपला हा अमोल वारसा भारतीयांना दिला आणि त्यांनाही निर्भय केले.''

अन्यायाचा वरचष्मा असलेल्या त्या काळ्या खंडात आपल्या देशबांधवांची चाललेली परवड पाहून, गांधीजी अस्वस्थ झाले. प्रिटोरीयाला पोहचताच त्यांनी

आपल्या अशिलाच्या एजंटाची भेट घेतली; आणि लगोलग तेथील भारतीय समाजाची एक सभा बोलावली. ''त्या सभेत मी केलेले भाषण बहुधा माझे आयुष्यातील आणि सार्वजनिक सभेतील पहिलेच भाषण असावे.'' यावेळी त्यांचे मनोधैर्य गळाले नाही. शब्दासाठी ते अडले नाहीत. अवसान गळाले म्हणून भाषण न करताच खाली बसण्याची नामुष्की यावेळी आली नाही. सारे मनोधैर्य यावेळी एकवटून आले. यानंतरच्या आयुष्यात कोठेही, कोणत्याही क्षणी त्यांच्या या गुणाने त्यांना दगा दिला नाही. धैर्याचा अविरत आणि अखंड संचार जणू तेव्हांपासून त्यांच्या ठायी सुरू झाला होता.

अनेक दृष्टींनी त्यांचे ते पहिले भाषण अविस्मरणीय ठरले. अन्य एखाद्याचा असा अवमान झाला असता आणि मारही खावा लागला असता, तर त्याने आपल्या भाषणातून प्रतिस्पर्ध्यावर शिव्याशापांची आणि टीकेची लाखोली वाहिली असती. परंतु कोणताही वावगा शब्द न काढता, न रागावता, चिडता आणि आक्रस्ताळीपणा न करता गांधीजींनी शांतपणे भाषणात आपले मुद्दे मांडले. अल्पसंख्य गोऱ्यांच्या वांशिक असहिष्णू वृत्तीवर हल्ला न चढवता, गांधीजींनी आपल्या देशबांधवांचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या काय यावर भाषणात भर दिला. व्यापारात सचोटी, व्यक्तिगत आचरणात चांगल्या सवयी, सर्वत्र धीरोदात्तपणे परस्परांना मदत करण्याची तत्परता, धर्म-जाती-समाज यांचा विचार न करता, आपण सारे एक आहोत ही भावना जपण्याची गरज, त्यांनी प्रतिपादन केली. आपण भारतीय लोक परदेशात दूरवर रहात असताना या गुणांची जपणूक करण्याची किती गरज आहे ते सांगून गांधीजी म्हणाले की या परक्या देशात आपण कसे वागतो यावरच आपले मूल्यमापन केले जाणार आहे.

आपल्याला शिक्षकाची भूमिका सर्वाधिक प्रिय आहे. असे नंतरच्या आयुष्यात गांधीजींनी वेळोवेळी बोलून दाखविले. शिकवण वा सल्ला देताना कोणी आपल्याहून लहान आहे, असे गांधीजींनी कधी मानले नाही. आणि कोणाला काही मार्गदर्शन करताना आपण वयोवृद्ध वा जाणकार आहोत, असा आवही त्यांनी कधी आणला नाही. दुसऱ्याला चार शब्द कसे नीट समजावून सांगावे ही कला गांधीजींनी चांगलीच आत्मसात केली होती. कोणाला काही सांगताना त्यात शिकवण, उपदेश, प्रचार, प्रसार, सल्ला सारे काही जणू एकवटलेले असे. प्रिटोरीया येथील जाहीर सभेत आपल्या पहिल्याच जाहीर भाषणात गांधीजींची ही शिक्षकाची भूमिका उठून दिसली. नंतरच्या आयुष्यात सर्वत्र हजारो ठिकाणी भाषणे देताना गांधीजींची हीच भूमिका अधिकाधिक उजळ आणि प्रभावी होत गेली. प्रिटोरीया येथील भाषणाचा समारोप करताना त्यानी उपस्थित भारतीयांना आपली संघटना उभारण्याचे

आवाहन केले. आपल्या समान समस्यांवर चर्चा करण्यासाठी आणि आपल्या समाजाची गाऱ्हाणी मांडण्यासाठी संघटनेच्या व्यासपीठाचा कसा उपयोग होऊ शकेल, ते गांधीजींनी सभेला समजावून सांगितले. अशा उपक्रमासाठी आपली सेवा केव्हाही रुजू आहे असे सांगून गांधीजींनी, कोणाला इंग्रजी शिकायची इच्छा असल्यास आपण त्यांना शिकवू असेही जाहीर केले.

गांधीजींच्या सार्वजनिक जीवनाचा शुभारंभ या सभेपासून झाला असे म्हणण्यास हरकत नाही. स्वत:ची प्रतिष्ठा जपण्यासाठी अन्यायाविरुद्ध उठून उभे राहण्याचे धैर्य त्यांच्यात आता आलेच होते, परंतु आपल्याप्रमाणेच इतरांनाही मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व आणि मोल लक्षात यावे, त्याची जपणूक करण्याचे धैर्य अंगी यावे, आणि अन्यायाविरुद्धची मशाल सतत धगधगत रहावी यासाठी यापुढे सतत लढत आणि धडपडत राहण्याची ईर्षा आता त्यांच्या मनात निर्माण झाली होती. भित्र्या आणि लाजऱ्या-बुजऱ्या त्या तरुणाचे एका रात्रीत धीरोदात्त अशा सार्वजनिक नेत्यात रूपांतर झाले होते. हा क्रांतिकारक कायापालट एकाएकी झाल्यासारखे वाटले, तरी वस्तुस्थिती तशी नव्हती. नियतीने आपली झाकली मूठ आता खुली केली होती.

ट्रान्सवालमध्ये रहाणाऱ्या भारतीयांची स्थिती तर नाताळमधील भारतीयांपेक्षा दयनीय होती. या लोकांना तीन पौंड निवडणूक कर देण्याची सक्ती होती. एका ठराविक प्रदेशाखेरीज अन्यत्र भारतीयांना भूखंड वा जमिनीचे मालक होता येत नसे त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता; संतापाची गोष्ट म्हणजे, खास व्यक्तिगत परवानापत्र असल्याखेरीज कोणाही भारतीयाला रात्री नऊ वाजल्यानंतर घराबाहेर पडण्यास वा रस्त्याने जाण्यास मज्जाव होता.

केव्हाही बाहेर फिरता येईल असा परवाना गांधीजींना राज्याच्या ॲटर्नीकडून मिळाला होता. एका संध्याकाळी अध्यक्ष क्रुगर यांच्या बंगल्या बाहेरून जात असताना तेथील रखवालदाराने त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता धक्का मारून पदपथावरून खाली पाडले आणि लाथाही मारल्या. इंग्लिश क्वेकर पंथाचे श्री. कोटस् त्या बाजूने जात होते. ते गांधीजींना ओळखत होते. सारा प्रकार त्यांनी पाहिला, त्या रखवालदाराविरुद्ध कारवाई केल्यास आपण साक्ष देऊ असे कोटस् गांधीजींना म्हणाले. परंतु त्यांनी त्यास नकार दिला, वैयक्तिक गाऱ्हाणी घेऊन न्यायालयात जायचे नाही, असा त्यांचा निर्धार होता.

: ५ :

ख्रिश्चन नागरिकांच्या संपर्कात

गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असताना त्यांनी आपले अशिल अब्दुल्लाशेठ यांचे मुख्य वकील श्री. बेकर यांच्यामार्फत श्री. कोट्स या ख्रिश्चनधर्मीय नागरिकाशी चांगले संबंध जोडले होते. उभयता श्रद्धाळू होते, आणि अनेक वेळा गांधीजींना घेऊन ते चर्चमध्ये प्रार्थनेला जात आणि त्यांच्या भल्यासाठी प्रार्थनाही करीत : '' हे दयाघना, आमच्यात आलेल्या या आमच्या नव्या बंधूला मार्ग दाखव आणि आमच्या मनाला तू जी शांती मिळवून दिली आहेस ती त्यालाही मिळू दे. भगवान येशू आमचे संरक्षण करीत आहे, तसे त्याचेही करो ! '' अशी ही प्रार्थना असे. उभयतांनी गांधीजींना ख्रिश्चनधर्माविषयी काही पुस्तकेही दिली होती. गांधीजी ती मन:पूर्वक वाचून काढीत.

एके दिवशी श्री. कोट्स यांनी गांधीजींच्या गळ्यात तुळशीची माळ पाहिली-त्याबरोबर ते चमकले : ''हा लोकभ्रम तुला शोभत नाही''-चल काढ ती माळ गळ्यातून-'' ते म्हणाले.

''ते शक्य नाही महाराज, माझ्या आईने मला दिलेली ती पवित्र भेट आहे.''

''परंतु तू त्यावर विश्वास ठेवतोस ?''

''मला त्यातील रहस्य माहीत नाही-'' गांधीजी उत्तरले : ''माळ घातली नाही तर काही नुकसान होईल, असेही मला वाटत नाही- परंतु विनाकारण ती मी काढणार नाही. कारण माझ्या आईने ती मोठ्या प्रेमानं मला दिली आहे. त्यामुळे माझे भलेच होईल, अशी तिची श्रद्धा होती. काही काळानंतर ही माळ झिजून आपोआप तुटून पडली की नवी माळ गळ्यात घालण्याची काही मला इच्छा होणार नाही पण सध्या मात्र मी ही माळ तोडू शकत नाही.'' ती माळ जुनी झाल्यानंतर एकदाची तुटली त्यानंतर काही गांधीजींनी नवी माळ गळ्यात घातली नाही.

प्रायमाऊथ येथील चर्चच्या एका ब्रदरने भूतकाळातील आणि भविष्यकाळातील सर्व पापांचे क्षालन करण्याचा एक मार्ग एकदा गांधीजींना सुचविला. श्री. कोटस् यांच्यामुळेच या ब्रदरशी त्यांचा परिचय झाला होता. तो म्हणाला : ''आपण पाप केले पाहिजे. या जगात पाप केल्याखेरीज कोणी जगणे अशक्य आहे. अखेरीस मानवजातीने केलेल्या पापाचे क्षालन व्हावे म्हणूनच तर ख्रिस्ताने हाल सोसले. सर्व पापाचे क्षालन केले. त्या जगन्नियंत्याने दाखविलेल्या मुक्तिमार्गाचा जो स्वीकार करील त्यालाच या जीवनात चिरशांती लाभेल.'' परंतु गांधीजींवर अशा उपदेशाचा परिणाम होणे कठीण होते. ''पापाचे अशाप्रकारे क्षालन करण्याचा मार्ग मला पसंत नाही.'' ''केवळ पापाचरणापासून नव्हे, तर पापी विचारापासूनही मुक्त होण्याचा मी प्रयत्न करीत आहे. त्यावर मी जोपर्यंत विजय मिळवीत नाही, तोपर्यंत मी अस्वस्थच राहीन.''

सत्याच्या शोधात गांधीजी अखेरपर्यंत अस्वस्थच राहिले. ते कसेही असो, ख्रिश्चन धर्मीय मित्रांची संगत आणि बायबलचे वाचन यांनी त्यांच्या. मनावर खोलपर्यंत ठसा उमटवला. आयुष्यभर ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्वाने त्यांच्या मनावर मोहिनी घातली. यानंतर काही वर्षांनी जोहान्सबर्ग येथे त्यांनी आपले कार्यालय उघडलं तेव्हा त्यांच्या टेबलामागील भिंतीवर ख्रिस्ताची मूर्ति कायमची विराजमान झाली होती.

एक दिवस पोलाक यांच्याशी बोलताना गांधीजी म्हणाले की ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेण्याचा मी एकेकाळी गंभीरपणे विचार करीत होतो. ख्रिस्ताची ती प्रेमळ, सहिष्णू, दयाळू स्वभावाचे दर्शन घडविणारी मूर्ती पाहून माझे मन भरून येई. ''कोणी अवमान केला वा दुखापत केली तरी मनाचा तोल जाऊ न देता त्या व्यक्तिला क्षमा करण्याची त्याची शिकवण; एका गालावर कोणी थप्पड मारली तर दुसरा गाल पुढे करावा असे सांगणारी सहिष्णू वृत्ती. परमोच्च कोटीला गेलेल्या मानवाचे यापेक्षा अन्य कोठले उदाहरण देता येईल, असे मला वाटे.''

''पण मग तुम्ही ख्रिश्चन धर्माची दीक्षा तर काही घेतली नाही.'' श्रीमती पोलाक म्हणाल्या.

''खरं आहे ते—'' गांधीजी उत्तरले. ''मी तुमच्या धार्मिक ग्रंथांचे मन:पूर्वक वाचन केले आणि त्यावर खोल विचार केला. ख्रिश्चन धर्माकडे मी बराचसा आकर्षित झालो होतो, परंतु अंती मी या निर्णयाला आलो की ख्रिश्चन धर्मात जो सुंदर उपदेश केला आहे, तो सारा आपल्याही धर्मात आहेच की, याचाच अर्थ आदर्श हिंदुधर्मीय म्हणून आचरण करणारा आदर्श ख्रिश्चन धर्मियासारखाच होय.

खिस्ताचे सुंदर विचार आणि आदर्श तत्त्वज्ञान अंगिकारण्यासाठी धर्म बदलून मुद्दाम खिस्ती होण्याची गरज आहे, असे मला वाटेना.''

''माणसाने आपल्या जन्मजात धर्माचे खरे सार मनापासून समजून घेतले, आत्मसात केले तर अन्य धर्मांचे सारही त्याने आत्मसात केले, असाच तुम्हाला अनुभव येईल. खरं सांगायचं म्हणजे...'' गांधीजी पुढे म्हणाले : ''ईश्वर एक आहे, त्याच्यापर्यंत पोहोचण्याचे मार्ग भिन्न असू शकतात.''

आपल्या सान्निध्यात आलेल्या खिश्चनधर्मीय लोकांविषयी आत्मचरित्रात लिहिताना गांधीजींनी म्हटलं आहे : ''ज्या वाटेनं मी गेलो त्या वाटेनं मी जाईन असं माझ्या खिश्चनधर्मीय स्नेह्यांना कधी वाटलं नाही, परंतु खऱ्या धर्माचा शोध घेण्याची प्रेरणा, आणि धार्मिक वृत्ती त्यांनी माझ्यात निर्माण केल्याबद्दल मी आयुष्यभर त्यांचा ऋणी राहीन.''

काही खिश्चन मित्र मात्र आपण गांधींना आपल्या धर्मात कधीतरी सामावून घेऊ अशी आशा बाळगून होते. काही जण याबाबतीत त्यांच्या फार मागे लागत. अशावेळी गांधीजी धार्मिक अतिरेकेपणाबद्दल त्यांची कानउघाडणी करीत. १९३२ साली गांधीजी येरवड्याच्या तुरुंगात असताना एका भारतीय खिश्चन महिलेनं त्यांना पत्रातून खिश्चन धर्माची महती पटविण्याचा प्रयत्न केला होता. आणि म्हटलं होतं की केवळ खिस्तानेच जगाचा उद्धार केला आहे. त्यावर उत्तर देतांना गांधीजींनी लिहिलं :

''तुमचा धार्मिक उत्साह मी समजू शकतो, परंतु तुमचे विचार शहाणपणाचे आहेत, असे काही मी म्हणू शकणार नाही. गेली ४५ वर्षे माझी प्रार्थना आणि ध्यान धारणा चालू आहे, परंतु धर्माविषयी तुमच्यात जो कडवेपणा आहे तसा तो माझ्यात निर्माण झालेला नाही. उलट त्याने माझ्यात उदार आणि सहिष्णू वृत्तीच निर्माण केली आहे. ईश्वर म्हणजे काही एखाद्या बंद खोलीत कोंडून ठेवलेली पवित्र मूर्ती नव्हे, आणि त्याच्या पायापाशी जायचे म्हणजे एखाद्या विवक्षित छोट्या गवाक्षातून वा अरुंद मार्गानेच गेले पाहिजे असेही नव्हे. ईश्वराची दारे सर्वांना खुली असतात, आणि जे मनाने पवित्र, निष्पाप आणि निगर्वी आहेत ते कोणत्याही मार्गाने आणि कोणत्याही प्रवेशद्वाराने त्याच्यापर्यंत सहजपणे जाऊ शकतात.''

धर्म प्रचारासाठी कोणी गांधीजींकडे आले की ते त्या व्यक्तीला धर्माचे महत्त्व समजावून सांगत. कधी विनोद-कोट्या करून परधर्म स्वीकारण्याची गोष्ट हसण्यावारी नेत. खिश्चन धर्मोपदेशक आणि मानववंशशास्त्रज्ञ डॉ. व्हेरीयर एल्विन यांनी आपल्या आठवणीत एक हकीकत सांगितली आहे. येरवडा कारागहातून

सुटका झाल्यावर गांधीजी विश्रांतीसाठी काही दिवस पुण्यात राहिले होते. एल्विनही पुण्यात होते. त्यांच्या यजमानाच्या आईने आदल्या दिवशी गांधीजींची भेट घेतली होती, आणि त्यांना ख्रिश्चनधर्म स्वीकारण्याची विनंती केली होती. ती वृद्धा गांधीजींना कळकळीने धर्म बदल करण्यास विनवीत होती. ते पाहून गांधीजींच्या प्रेमळ चेहऱ्यावर हसू पसरलं. त्या वृद्धेचा चेहरा दोन्ही हातात प्रेमानं घेऊन गांधीजी म्हणाले : ''माताजी, तुमच्या मार्गाने जावे अशी ईश्वराची इच्छा असेल, तर तो मला तसे करण्यास नक्की प्रवृत्त करील.''

लंडनमध्ये शिकत असतानाच गांधीजींनी, हिंदुधर्मासहित ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम आदी सर्वच धर्मांचा तौलनिक अभ्यास केला होता. सर्व धर्मातील आदर्श तत्त्वांचा सारखाच आदर करण्याच्या त्यांच्या मनोवृत्तीत कधीही पालट झाला नाही. वर्षे गेली तशी सर्व धर्माविषयीचा सखोल अर्थ त्यांच्या अधिकाधिक लक्षात येऊ लागला. एखादा धर्म बाह्यत: वेगळा वाटला, त्यातील कर्मकांड वेगळे वाटले, तरी सर्वांचे सार समान आहे, ही जाणीव खोलवर रुजत गेली. विविध धर्मांचे वेगवेगळे बाह्य स्वरूप पार करून खऱ्या धर्माची कास धरणे हीच यातली खरी कसोटी आहे, याबद्दल गांधीजींची खात्री झाली होती.

यासंबंधीचे आपले विचार गांधीजींनी व्हेरियर एल्विन यांना येरवडा तुरुंगातून लिहिलेल्या एका पत्रात अधिकच स्पष्ट केले. एका बिशपने एकदा एल्विन यांना ख्रिश्चनद्रोही असं म्हटलं होतं आणि त्यांना चर्चमध्ये प्रवचन करण्यासही बंदी घातली होती. त्याचा उल्लेख करून गांधीजींनी आपल्या पत्रात म्हटलं : ''बिशपने तुम्हाला काय दूषण दिले ते तुम्ही मनाला लावून घेणार नाही, अशी मला खात्री आहे. अखेरीस तुमचे मन, हृदय हेच खरे प्रार्थना स्थल; आणि हेच आपले धार्मिक व्यासपीठ होय. या प्रार्थना मंदिराला निळ्या स्वच्छ आभाळाचे सुंदर छत लाभले आहे. अखेर पवित्रता-श्रद्धा म्हणजे तरी काय ? पवित्रतेचा-श्रद्धेचा उगम हृदयात होतो, आपली श्रद्धा व्यक्त करण्याचे अनेक मार्ग असतात. माणसांनीच ते मार्ग आखून दिले आहेत. बायबलमध्ये दिलेल्या ख्रिस्ताच्या संदेशाचा जो अर्थ आणि अन्वयार्थ मला अभिप्रेत आहे तो लक्षात घेतला तर रोमन वा इंग्लिश कोणताही पंथ असो, त्यांच्या धर्मगुरुंकडून ख्रिस्ताच्या संदेशाला हरताळ फासला जात आहे, असंच माझं मत आहे. त्या प्रार्थना मंदिरात विशाल मनाच्या माणसाला स्थान नसते. साऱ्या विश्वावर प्रेम करणाऱ्या, दु:खितांचे अश्रु पुसणाऱ्या, उदार हृदयी, प्रेमळ ख्रिस्ताची आपण आपल्या कृत्याने, प्रार्थना मंदिरातून जणू हकालपट्टी केली आहे, ही जाणीव या लोकांना नाही. तुमच्यावरील बहिष्कार म्हणजे सत्याचे खरे कैवारी तुम्हीच आहात, सत्य तुमच्या बाजूला आहे, याची मला खात्री झाली आहे.

तुम्ही एकांतात ईश्वराचे मनन-चिंतन करीत असताना "तू योग्य मार्गानेच चालला आहेस" असे त्याचे दिलासा देणारे शब्द तुमच्या कानात घुमले नाहीत तर माझ्या या प्रतिपादनाला तरी काय अर्थ आहे ? तुम्हाला तसे वाटले पाहिजे. खात्री असली पाहिजे. तुमच्या श्रद्धेची, आदर्श विचाराची तीच खरी कसोटी आहे."

आपल्या हिंदुधर्मातील कर्मकांडांविरुद्ध तर गांधीजींनी आयुष्यभर लढा दिला. १९२१ साली लिहिताना त्यांनी म्हटलं की, "हिंदू धर्मग्रंथ, आणि या धर्मातील पवित्र वचने यावर माझी श्रद्धा असली तरी त्या धर्मग्रंथातील प्रत्येक वाक्य अन् प्रत्येक वचन जणू ईश्वराच्या तोंडून वदले आहे म्हणून पवित्र नी आचरण योग्य आहे, असे मी मानीत नाही. माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला आणि नैतिक विचारसरणीला पटले नाही तर या धर्मग्रंथातील कोणत्याही वचनांचा कसाही अर्थ आणि अन्वयार्थ स्वीकारण्याची माझ्या मनाची कदापी तयारी नाही." याबाबतीत गांधीजींच्या आधीच्या पिढीतील थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांची आठवण सांगण्यासारखी आहे. ते श्रद्धाळू, धर्मप्रेमी होते, परंतु त्याचबरोबर अर्थहीन कर्मकांड, प्रथा-परंपरानी धार्मिक भोळ्या समजुती याविरुद्ध त्यांनी मोठी मोहीम काढली होती. बुद्धिवादी राजा राममोहन रॉय नेहमी वसिष्ठ ऋषीचे एक वचन उद्धृत करीत. "एखाद्या लहान मुलानं विचारपूर्वक काही योग्य असं विधान केलं तर ते स्वीकारावं. त्याचवेळी प्रत्यक्ष ब्रह्मानेही काही चुकीचा निराधार विचार सांगितला तर तो कचऱ्यासारखा दूर फेकून द्यावा."

: ६ :

वकील आणि देशभक्त

आपले विचार प्रभावीपणे मांडून आपली मते इतरांवर ठसविण्याची आणि त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्याची प्रभावी इच्छाशक्ती आणि धार्मिक प्रवचने करण्याची आवड आता गांधीजींच्याठायी निर्माण झाल्याने प्रिटोरियास ज्या कामासाठी ते गेले होते त्यापासून त्यांचे मन विचलित होणे सहाजिक होते. गांधीजी हे गांधीजी आणि महात्माजी झाले ते या इच्छाशक्तीच्या जोरावरच.

लंडनमध्ये बॅरिस्टरीचा अभ्यास करताना किंवा मुंबईत बेकार वकील म्हणून काळ कंठताना वकिली व्यवसायातील बारकावे जाणून घेण्याचा त्यांनी कधी फारसा प्रयत्नही केला नाही. खेरीज ज्या गुंतागुंतीच्या खटल्यात ते वकील म्हणून आफ्रिकेत उभे रहाणार होते, त्यातील हिशेबाच्या आणि जमाखर्चाच्या व्यवहाराची त्यांना काडीमात्र माहिती नव्हती. हिशेबांच्या वह्या आणि व्यापारी जमाखर्चाचे व्यवहार जाणून घेण्याचा मग त्यांनी निर्धार केला. कामचुकारपणा अंगी नसल्याने त्यांनी ती सर्व माहिती अल्पावधीत आत्मसात केली. यातून दोन गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या. पहिली गोष्ट कायदा म्हणजे तीनचतुर्थांश सत्य घटना आणि दुसरी गोष्ट म्हणजे खटल्यात दोन्ही पक्षकारांचे नुकसानच असल्याने न्यायालयाबाहेर उभय पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यात तडजोड घडवून आणणे हे वकिलाचे प्रथम कर्तव्य होय. गांधीजींसारख्या तरुण वकिलाकडे आलेला हा पहिला मोठा आणि महत्त्वाचा खटला असल्याने त्यांनी महत् प्रयासाने आपल्या अशिलाला आणि विरोधी पक्षकाराला एकत्र आणले आणि तडजोड मान्य करण्यास त्यांचे मन वळविले. ''माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. वकिलीचा व्यवसाय कसा करावा ते येथे मी शिकलो. मानवी स्वभावाची उदात्त बाजू शोधून काढण्याची आणि दुसऱ्याच्या मनात शिरकाव करण्याची कला आत्मसात करण्याची या खटल्याने मला संधी मिळवून दिली.''

प्रिटोरियातली जबाबदारी संपवून गांधीजी दरबानला परतले आणि त्यांनी मायदेशी परतण्याची तयारी सुरू केली. याचवेळी, त्यांच्या अशिलाने गांधीजींना निरोप देण्यासाठी एक समारंभ आयोजित केला होता. योगायोगाने स्थानिक वृत्तपत्रातील एका बातमीकडे त्यांचे तेथे लक्ष गेले. नाताळच्या विधानसभेपुढे लवकरच एक विधेयक मांडण्यात येणार होते. तेथील भारतीयांना मताधिकार काढून घेण्याची या विधेयकात तरतूद होती.

तेथील प्रचलित कायद्यानुसार फक्त २५० भारतीयांना मताधिकार होता; तर असा मताधिकार असलेल्या युरोपियनांची संख्या सुमारे १०,००० होती. मालमत्ता, करभरणा यांच्या जोरावर केवळ २५० भारतीयांना तोपर्यंत असलेला मताधिकारही आता नव्या विधेयकान्वये काढून घेण्याचे कुटिल डावपेच चालले होते. कारण ते भारतीय होते, तेव्हा त्यांना एवढासाही मताधिकार कशाला द्या ?

त्या काळ्या विधेयकातील कावेबाजपणा गांधीजींच्या ताबडतोब लक्षात आला. तेथे उपस्थित असलेल्या तसेच अन्य भारतीयांना ते कधी लक्षात आले नव्हते आणि त्याची फारशी माहितीही त्यांना नव्हती. ''तुमच्या अस्तित्वावर घाला घालण्याचा येथल्या शासनकर्त्यांचा हा प्रयत्न आहे,'' गांधीजींनी उपस्थित भारतीयांना इशारा देताना म्हटले. सर्वांनी मिळून या काळ्या कायद्याला विरोध करण्याचेही त्यांनी भारतीयांना तेथेच आवाहन केले. परंतु याबाबतीत आम्ही हतबल आहोत, तुमच्या-सारख्याची मदत आणि मार्गदर्शन लाभल्याखेरीज आम्ही काही करू शकणार नाही असं सर्वांनी गांधींना सांगितलं. गांधींनी आपला भारताला परतण्याचा बेत किमान महिनाभर पुढे ढकलावा आणि विधेयकाला विरोध करण्यासाठी सर्वांना संघटित करण्यास मदत करावी. अशीही विनवणी गांधींना करण्यात आली. गांधींचा तेथला खर्च भागविण्यासाठी योग्य ती फी देण्याचीही सर्वांनी मान्य केले.

आपल्या मार्गदर्शनाखेरीज आफ्रिकेतील भारतीय काही करू शकणार नाहीत हे गांधीजींच्या लक्षात आले. अन्यायाला प्रतिकार करण्याची ही संधी वाया जाऊ देता कामा नये, हे लक्षात घेऊन त्यांनीही आपला घरी परतण्याचा बेत रद्द केला. मात्र सेवेबद्दल कोठलाही मोबदला घेण्यास त्यांनी नकार दिला. ''सार्वजनिक सेवेबद्दल कोणी पैसा घेऊ नये. एक समाजसेवक म्हणून मी येथे राहीन—'' असं त्यांनी स्पष्ट केलं. समाज सेवकाने कसे वागावे, त्याचे आचरण कसे असावे, कोणती बंधने त्याने स्वत:वर लादून घ्यावी, यासंबंधी गांधीजींनी बराच विचार केला होता. स्वत:वरही बंधने लादून घेतली होती. भावी काळात भारतातील अनेक पिढ्यातील देशभक्तांना आणि त्यागी, सेवाभावी कार्यकर्त्यांना गांधीजींच्या या आचार संहितेने

आकृष्ट केले आणि समाजात जाऊन कार्य करण्यास उद्युक्त केले.

आफ्रिकेतील तो एक महिना लांबलेला मुक्काम आपल्याला पुढे आयुष्यभर सार्वजनिक सेवेत गुंतवून ठेवील, अशी गांधींना कल्पनाही नव्हती. "अशाप्रकारे ईश्वरानेच जणू माझ्या भावी सार्वजनिक जीवनाचा दक्षिण आफ्रिकेत पाया घातला; आणि राष्ट्रीय स्वाभिमानासाठी झगडण्याची प्रेरणा माझ्यात निर्माण केली," असे गांधीजींनी नंतर लिहून ठेवलं.

आपल्यासाठी कोणता सापळा रचण्यात आला आहे. याचा जराही विचार न करता यानंतर गांधींनी त्या लढ्यात उडी घेतली. वेळ न दवडता तेथेच त्या निरोप समारंभात त्यांनी अन्याय विरोधी कृती समितीची स्थापना केली. दुसऱ्या दिवशीच एक विनंती अर्ज तयार करण्यात आला. त्याच्या प्रती काढण्यात आल्या आणि त्यावर ५०० स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान आणि विधान सभेचे अध्यक्ष यांना तारा पाठवून विनंती अर्जावर विचार होईतो नवे विधेयक मंजूर न करण्याची विनंती करण्यात आली. विनंती अर्जाला दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रातून भरपूर प्रसिद्धी मिळाली. मात्र ते विधेयक मंजूर करण्यात आले.

यावर नाउमेद न होता गांधीजींनी आणखी एक विनंती अर्ज लिहून काढला आणि तो वसाहती खात्याचे ब्रिटिश मंत्री लॉर्ड रिपन यांच्याकडे इंग्लंडला रवाना केला. तत्पूर्वी त्यावर पंधरवड्यात १०,००० भारतीयांनी स्वाक्षऱ्या केल्या. अर्जाच्या एक हजार प्रती काढून इंग्लंड आणि भारतात त्या प्रती वाटण्याची व्यवस्था करण्यात आली. विशेष म्हणजे लंडन टाइम्सने भारतीयांची बाजू उचलून धरली. दक्षिण आफ्रिकेत आपल्या देशबांधवांना कसा छळ सहन करावा लागत आहे आणि कोणत्या अवमानास्पद स्थितीत जीवन कंठावे लागत आहे, त्याची यावेळी प्रथमच भारतीयांना माहिती झाली.

दादाभाई नौरोजी त्यावेळी ब्रिटिश संसदेचे सदस्य होते. गांधी त्यांना फार मानीत. या भारतीय नेत्याला गांधींनी ताबडतोब एक पत्र लिहिले. "माझ्या माहिती प्रमाणे ॲटर्नी जनरल श्रीयुत एस्कॉम्बी यांनी असा अहवाल तिकडे पाठविला आहे की स्थानिक जनतेच्या शासनावर आशियाई लोकांना नियंत्रण ठेवता येऊ नये या हेतूने हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की भारतीयांना आफ्रिकेत जिणे असह्य व्हावे आणि अपमान सहन न होऊन ती वसाहत सोडून जाणे त्याना भाग पडावे हाच हेतू या विधेयकामागे आहे. अर्थात सर्वच भारतीयांना घालवून देण्याची त्यांची इच्छा नाही. स्वतः खर्च करून आणि स्वेच्छेने जे भारतीय आफ्रिकेत, विशेषतः आफ्रिकेतील ब्रिटिश वसाहतीत येऊन पोहोचले आहेत, त्यांनी

लवकर येथून जावे ही या राज्यकर्त्यांची इच्छा आहेच. मात्र त्याचवेळी त्यांना कष्टाच्या कामासाठी भारतीय मजुरांची गरज आहे. करार-मदारात अडकविलेल्या अशा मजुरांनी कामाची मुदत आणि करार संपताच स्वदेशास परतावे, ही त्यांची इच्छा आहेच. संधिसाधू कराराचा हा नमुना आहे. या गोऱ्यांना कल्पना आहे की या भारतीयांना ते ताबडतोब घालवू शकणार नाही. त्यांचे मतलबही ते मग साधू शकणार नाहीत. परंतु कालांतराने या लोकांना आफ्रिकेतून घालवता यावे म्हणून या विधेयकाचे हत्यार त्यानी हाती ठेवले आहे. या प्रश्नावर आपल्या ब्रिटिश सरकारची काय प्रतिक्रिया होते ते चाचपून पाहण्याचाही हा एक उद्योग आहे.'' आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभिक अवस्थेतच आपल्याला राजकीय धोरणातील बारकावे कोणते आहेत आणि आपल्या विरोधकांची चाल आपण कशी ओळखतो ते गांधीजींनी या निवेदनातून लक्षात आणून दिले. राजकारणाचे गुंतागुंतीचे स्वरूप आकलन होण्याची क्षमता, माणसे ओळखण्याची कला आणि आदर्शवादी ध्येयधोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी लागणारे मनोधैर्य आणि निर्धार या गुणांचा समुच्चय गांधींच्या ठायी झाल्यानेच गांधीजी महात्मा पदापर्यंत गेले.

केवळ १५ महिन्यांपूर्वी एक निराश, अपयशी आणि बेकार बॅरिस्टर अशी गांधींची मुंबईत अवस्था झाली होती. आपल्या अशिलाची बाजूही धडपणे हा लाजराबुजरा वकील मांडू शकला नाही. भावाने सांगितले आणि मान डोलावून त्याप्रमाणे वागत या तरुणाने आपल्या आयुष्यात आकार देण्याचा केविलवाणा प्रयोग मुंबई शहरात करून पाहिला. पण कशाने काही साधले नाही. तोच माणूस आज १५ महिन्यानंतर एका अनोळखी, अपरिचित देशात तेथील आपल्या लोकांचे नेतृत्व करून बेदरकारपणे अन्यायाविरुद्ध उठून उभा राहिला होता. त्याच्या स्वाभिमानाला आणि आता निर्माण झालेल्या आत्मविश्वासाला कुटीलशक्ती आव्हान देत असताना आपण एकाकी आहोत असे त्याला वाटू लागले होते. संकटाच्या या कसोटीच्या क्षणी, प्रतिकूल, शत्रुवत परिस्थितीला सामोरे जावे की त्यापासून दूरवर जाण्यासाठी पळ काढावा अशी त्या एकाकी माणसाची मनोवस्था झाली होती. या कसोटीच्या क्षणीच गांधीजींमधील मर्दपुरुष जागा झाला. अग्निपरीक्षेचा त्याआधी त्यांना अनुभव होता आणि त्यातून सोन्याहून अधिक मौल्यवान अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. भयाला त्यांनी दूर पळविले होते. संकटात सापडले असता एकाकीपणे झुंज देऊन त्यांनी आपला कस किती अस्सल आहे ते दाखवून दिले होते.

निर्भय आणि निर्धारी वृत्ती, स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता, अखंडितपणे सेवेला वाहून घेण्याचा पण आणि यापूर्वी कधीही प्रत्ययास न आलेली संघटनाशक्ती या गुणांना जणू आता नवा उभार आला होता. हे परिवर्तन काही अचानक वा

एकाएकी घडून आले नव्हते. एकाएकी साक्षात्कार झाला आणि सर्वांगीण परिवर्तन घडून आले, नवी दृष्टी प्राप्त झाली असे काहीसे समर्थन साधु-बैरागी-महात्म्याच्या बाबतीत करता येईल. येथे तसला काही प्रकार नव्हता. मात्र तरीही गांधीजींच्या बाबतीत बोलताना या परिवर्तनाची बाह्य वा उथळ कारण मीमांसा करणे कठीणच आहे. आपल्या कोशात निद्रिस्त पडलेल्या सुरवंटाचे बाहेर पडताच सुंदर फुलपाखरात रूपांतर व्हावे, वा शिंपल्यातील दवाचे सुंदर मौल्यवान मोत्यात रूपांतर घडून यावे, वा सुप्तशक्ती परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडताच नव्या जोमाने उफाळून याव्या तसे काहीसे येथे घडले होते. तरुण गांधींना उत्तर आयुष्यात महात्म्याच्या पदावर नेणाऱ्या साऱ्या गुणांची आणि स्वभाव वैशिष्ट्यांची अंधुकशी प्रसाद चिन्हे आता प्रगट होऊ लागली होती. त्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव अद्यापी पुरेसा कोणाला जाणवू लागला नव्हता, परंतु शुभारंभ तर झाला होता.

: ७ :
जबाबदारी वाढली

मायदेशी परतण्याचा गांधीजींचा बेत एक महिन्याने लांबला. आता महिना संपत आला तरी द. आफ्रिकेतील भारतीय समाज त्यांना मायदेशी परत जाऊ देण्यास तयार होईना. गांधीजींनी तेथे चालविलेले कार्य सर्वांनी अनुभवलेले होते. तेथे राहून त्यांनी आपले नेतृत्व करावे अशी भारतीय समाजाची इच्छाही होती. गांधींवाचून आपण आपला न्याय्य लढा शेवटास नेऊ शकणार नाही याची सर्वांना कल्पना होती. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत मुक्काम वाढवावा, म्हणून त्याना आर्जवे करण्यात येत. तेथील वास्तव्याचा जो काही खर्च येईल वा तेथील कार्यासाठी जो खर्च येईल तो सर्व भरून देण्याची सर्वांची तयारी होती.

सार्वजनिक सेवेचा मोबदला घेण्याची कल्पना गांधीजींना कधीच सहन झाली नसती. परंतु आता आफ्रिकेत रहायचे म्हटले तर वकिली करून काही उत्पन्न मिळविणे आवश्यक होते. बरं, 'बॅरिस्टरीच्या झोकात दिवस काढायचे म्हणजे सालीना किमान ३०० पौंड प्राप्ती आवश्यक होती. तेथील भारतीय व्यापाऱ्यांच्या दृष्टीने हा आकडा नगण्य होता. आपल्याला कायदेशीर सल्ला देण्यासाठी अनेक व्यापाऱ्यांनी मिळून गांधीजींना आपले वकील नेमले; आणि जागीच ३०० पौंड रक्कम गोळा करून त्यांच्या स्वाधीन केली.

आता तेथे मुक्काम वाढविण्यासाठी उपाय नव्हता. स्वत: अन्यायाला तोंड फोडून गांधींनी तेथे न्याय्य कारणासाठी लढ्याचे नेतृत्व केले होते. आता त्यातून माघार घेणे अशक्य होते. खेरीज त्यांच्यामागोमाग येणाऱ्या तेथील तरुण, उत्साही भारतीयांना अशा चळवळीचा कोठे अनुभव नव्हता. कोठे लढ्याची मानसिक तयारीही नव्हती. लोकांच्या आग्रहाच्या दडपणापुढे त्यांचा निरुपाय झाला होता. हळूहळू नियती त्यांना सार्वजनिक कार्याकडे, लोक नेतृत्वाकडे नेत होती. भावी काळात जी महत्त्वाची भूमिका गांधींना पार पाडावी लागली त्याची जणू रंगीत तालीमच आता सुरू झाली

होती.

तेथे राहण्याचा निश्चय होताच, गांधींनी नाताळच्या सर्वोच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून नोंदणी करण्यासाठी अर्ज केला. तेथील लॉ सोसायटीचे मात्र धाबे दणाणले. एका काळ्या माणसाला सदस्य कसे करून घ्यायचे ? त्यांनी त्यांच्या नोंदणीला विरोध केला. सर्वोच्च न्यायालयाचा ॲडव्होकेट ही आतापर्यंत गोऱ्यांची मिरासदारी होती. एका काळ्या बॅरिस्टरने आता सदस्य होण्याची हिम्मत दाखवावी म्हणजे काय ? सुदैवाने नाताळ सर्वोच्च न्यायालयात, ब्रिटिश कायद्याच्या उदारमतवादी परंपरांची जाण असल्याने या प्रवेशाला विरोध करण्याचे धारिष्ट्य दाखविले नाही. मात्र, गांधींनी कोर्टात फेटा बांधून येऊ नये एवढेच बंधन त्यांच्यावर घालण्यात आले. " मला माझ्या मर्यादांची जाणीव होती. तेथील जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात याआधी फेटा घालण्याचा मी आग्रह धरला होता. परंतु आता सर्वोच्च न्यायालयाचा आदेश मी मानला आणि फेटा घालून न येण्याचे मान्य केले. येथेही मी या आदेशाला आव्हान देऊ शकलो असतो. कोर्टानेही कदाचित आपला आदेश मागे घेतला असता, परंतु यापुढील मोठ्या लढ्यासाठी आपले शक्ति सामर्थ्य राखून ठेवण्याचा मी निर्णय घेतला होता."

योगायोगाने खरोखरच मोठी लढाई नजिकच आली होती. गांधीजींना ती स्पष्ट दिसत होती. आता लढ्याची तयारी आणि स्वयंसेवकांची भरती करणे निकडीचे होते. तेथील भारतीय समाजाची यादृष्टीने तयारी करण्याकडे ते वळले. आपला समाज एकजिनसी झाला पाहिजे, त्यात एकजूट असली पाहिजे, याकडे लक्ष देण्याचे गांधीजींनी ठरविले. "वकिली व्यवसायाला आता माझ्या दृष्टीने दुय्यम महत्त्व होते." भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची देशात स्थापना झालीच होती. आपले आदरणीय नेते दादाभाई नौरोजी त्यावर्षी लाहोर काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष झाले होते. याच संघटनेच्या धर्तीवर आणि तिला मानाचा मुजरा म्हणून दक्षिण आफ्रिकेतल्या आपल्या संघटनेला गांधींनी नाताळ इंडियन काँग्रेस असे नाव दिले.

भारतातील काँग्रेस संघटनेची, गांधींना तोपर्यंत तिच्या नावाखेरीज काहीही माहिती नव्हती. त्यामुळे आपल्या 'नाताळ इंडियन काँग्रेस'ची घटना तयार करताना त्यांनी साधकबाधक विचार करून आणि अगदी स्वतंत्रपणे संघटनेची घटना तयार केली. ही संघटना दैनंदिन व्यवहारात परिणामकारक ठरेल असे, तिचे स्वरूप त्यांनी आखून दिले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसपेक्षाही अधिक परिणामकारक असे नाताळ काँग्रेसला गांधीजींनी स्वरूप दिले. काही वर्षांनंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे गांधींकडे आल्यानंतरच या संघटनेला प्रभावी स्वरूप प्राप्त झाले. त्याचे मूळही

गांधींच्या नाताळ काँग्रेसच्या कार्यात आहे. नाताळ भारतीय काँग्रेसची समिती गठीत करताना गांधींनी दोन अटी घातल्या. कोणालाही उद्देशून बोलताना त्या व्यक्तीच्या नावापुढे मिस्टर उपाधी लावली पाहिजे, आणि कोणाही सदस्याने धूम्रपान करता कामा नये.

नाताळ इंडियन काँग्रेसच्या सदस्यत्वासाठी वर्गणी ठेवली असल्याने प्रारंभी भारतीय धनिक व्यापारी, सुखवस्तू मध्यमवर्गीय लोक आणि नोकऱ्या करणारे भारतीय हेच तिचे प्रामुख्याने सदस्य झाले. आफ्रिकेत त्याकाळी कराराने आलेला कामगारवर्ग फार मोठा होता, परंतु हे लोक या संघटनेच्या बाहेरच राहिले. हे लोक इतके अज्ञ, अशिक्षित आणि गरीब होते की त्यांना ही नवी संघटना काय आहे, याची माहिती वा कल्पनाही नव्हती, त्यांच्या कल्याणाची आणि त्यांचे हितसंबंध जपण्याची निकड आहे, ही जाणीव असल्याने कालावधीनंतर गांधीजींनी या लोकांना नाताळ काँग्रेसमध्ये आणले. ''संघटनेची स्थापना होऊन ३-४ महिने झाले होते. ती अद्यापी प्रथमावस्थेतच होती म्हणाना. याचवेळी फाटके कपडे परिधान केलेला आणि दात तुटल्याने तोंडातून रक्त येत असलेला. एक तमिळ भाषी माणूस भीतीने थरथरत आणि दुःखावेग कसाबसा आवरीत माझ्यापुढे येऊन उभा राहिला. त्याच्या मालकाने त्याला चांगलेच झोडपून काढले होते.'' बालसुब्रह्मण्यमचे प्रकरण यानंतर गांधीजींनी चांगलेच धसास लावले. तेथील करारबद्ध मजुरांच्या कानावर त्याची सारी हकीकत गेली, आणि गांधी आपले खरे मित्र आहेत, आपल्या बाजूने लढणारे खरे लढवय्ये आहेत, याची चांगलीच कल्पना त्या सर्वांना आली. ''नाताळमधील करारबद्ध मजुरांशी प्रस्थापित झालेल्या या माझ्या संबंधाने मला अत्यानंद झाला.''

हातात फेटा घेऊन केविलवाण्या चेहऱ्याने बालसुब्रह्मण्यम ज्यावेळी गांधीजींच्या कार्यालयात आला, त्यावेळी आफ्रिकेत न्यायालयात आपल्यावर हाच मानहानीचा प्रसंग कसा आला होता, त्याची गांधीजींना तीव्रतेनं आठवण झाली. प्रार्थना मंदिरात जाताना गोरे लोक उघड्याबोडक्या डोक्याने तेथे जातात. काळ्या लोकांनीही आपल्यापुढे येताना असेच उघड्या डोक्याने यावे, असा अहंकार त्यामुळे त्यांच्यात निर्माण झाला होता. जणू काय ते आमचे परमेश्वरच होते. आपणही गांधीजींसमोर जाताना त्यांचा मान राखण्यासाठी आपला फेटा काढूनच जावे असा त्यामुळे बालसुब्रह्मण्यमचा समज झाला. परंतु ही गुलामीवृत्ती गांधीजींना पसंत पडणे शक्य नव्हते. आपले मुंडासे डोक्यावर घालण्यास त्यांनी त्याला सांगितले. चाचरतच त्याने तसे केले, परंतु त्याच्या चेहऱ्यावरील आनंद आणि समाधान लपू शकले नाही. या प्रसंगाची आठवण सांगताना गांधीजींनी सखेद म्हटलं की आपल्याच बांधवांची

मानहानी करण्यात काही लोकांना आनंद कसा होतो, आणि अभिमान कसा वाटतो ते समजणे मला कठीण आहे.

वसाहतीच्या परराष्ट्रमंत्र्यांना गांधीजींनी लिहिलेल्या विनंती-अर्जाचा तसा दर्शनी परिणाम झालाच. ब्रिटिश-भारतीय प्रजाजनात वांशिक भेदाभेद करणाऱ्या त्या निवडणूक विधेयकाविरुद्ध ब्रिटिश सरकारने एकाधिकार वापरून ते फेटाळून लावले. परंतु आफ्रिकेतील भारतीयांचा हा आनंद अल्पकाळ टिकला. कारण नाताळ सरकारने या एकाधिकाराला निराळ्यामार्गे फाटा देऊन अखेरीस, भारतीयांचा मताधिकार काढून घेतलाच-फक्त यावेळी वांशिक भेदाभेदाचा विधेयकात कोठे निर्देश नव्हता. गांधीजींच्या नेतृत्वाचा याप्रकरणी कस लागला. त्यांच्या प्रचाराचा हिंदुस्थानातील लोकांवर तर परिणाम झालाच, परंतु इंग्लंडमधील उदारमतवादी लोकमतही त्यामुळे खडबडून जागे झाले.

भारतीयांचा मताधिकार काढून घेऊनच नाताळ सरकार थांबले नाही, तर करारबद्ध मजूर करार संपल्यानंतर मायदेशी न जाता आफ्रिकेतच राहिले तर त्यांच्यावर वार्षिक तीन पौंड निवडणूक कर लावण्यात आला. या मजुरांना पुन्हा करारबद्ध मजूर म्हणून कामे करण्यास भाग पाडण्याचा यामागे उद्देश होता. आधी हा कर २५ पौंड करण्याचा इरादा होता, परंतु त्यास हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयची मान्यता आवश्यक असल्याने अखेरीस तीन पौंडावर तो कायम करण्यात आला. गांधीजींनी पुढे म्हटलं की, ''दक्षिण आफ्रिकेतील भारतीय माणसाचे सरासरी मासिक उत्पन्न १४ शिलिंग असताना, त्याच्या कुटुंबात जर ४ व्यक्ती असतील तर त्याने वर्षाला १२ पौंड कर कसा भरायचा ? इतका जाचक कर जगाच्या पाठीवर कोठे नसेल.''

या राक्षसाविरुद्ध लढाई देणे निकडीचे होते. नाउमेद न होता गांधीजींनी आपली चळवळ जोमाने चालू ठेवली. अर्जामागून अर्ज आणि पत्रांमागून पत्रं लिहिण्यास त्यांनी प्रारंभ केला. यामुळे चळवळीला गती आली. 'लंडन टाइम्स'ने गांधीजींच्या न्याय्य मागणीला पाठिंबा दिला. एखाद्याला कायम करारात गुंतवणे म्हणजे गुलामगिरीच होय, असे या वृत्तपत्राने म्हटले. लढवय्या म्हणून गांधीजींच्या कौशल्याला आता धार चढत होती.

●

: ८ :

श्रद्धा आणि आवडनिवड

प्रतिकूल परिस्थितीत नव्यानेच सुरू केलेला वकिली व्यवसाय म्हणजे एक बिकट चढणाची वाट होती. त्यातच राजकीय प्रचारकार्य, समाजसेवा, धार्मिक चर्चा आणि तत्सम अन्य उपक्रम यात गांधीजी सतत गुंतल्याने त्यांना अन्य काही करण्यास वेळ मिळत असेल, असे कोणाला वाटत नव्हते. परंतु तसे असते तर ते गांधीजी कसले. किती विविध विषयात त्यांना रस होता. त्यात ते जीव तोडून लक्ष घालीत, आणि तो विषय पूर्णपणे समजून घेत. कोणताही विषय त्यांना क्षुल्लक महत्त्वाचा वाटत नसे आणि एखाद्या महत्त्वाच्या विषयात कितीही रस घेतला तरी अन्य विषय आणि बाबींकडे गांधीजींचे कधी दुर्लक्ष होत नसे.

गांधीजी तसे पक्के व्यवहारी होते. त्यांच्याशी देवघेव करणे म्हणजे महा कर्म कठीण, परंतु व्यवहारात इतरांचे हितसंबंधही सांभाळले पाहिजेत हे समजण्याइतका व्यवहारी चाणाक्षपणाही त्यांच्यात होता. आपल्या वैयक्तिक श्रद्धा आणि आवडीनिवडी जपताना एखाद्या बालकासारखी हट्टीपणाची सीमा गाठण्याचाही त्यांचा स्वभावधर्म होता. अनेक विषयांवर आणि विविध समस्यांवर त्यांनी नवनवे प्रयोग केले. त्यात वैज्ञानिक वस्तुनिष्ठ दृष्टीकोन असे, त्याचप्रमाणे श्रद्धाळूपणाही आढळे. प्रिटोरियात असताना त्यांनी 'गाइड टू लंडन' हे पुस्तक प्रकाशित केले होते. लंडनला भेट देण्याऱ्या प्रवाशांना आणि पर्यटकांना मार्गदर्शन व्हावे हा या पुस्तकाचा हेतू नव्हता, तर आपल्या देशातील तरुण विद्यार्थ्यांना लंडनमध्ये स्वस्तात कसे राहता येईल, यावर त्यात त्यांनी मार्गदर्शन केले होते. ज्या भारतीयांना शक्य होईल त्यांनी उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जावे असा त्यांचा त्याकाळी आग्रह असे. इंग्लंडची परंपरा अतिशय उदारमतवादी आणि सुसंस्कृत आहे, असा अनेक वर्षे त्यांचा समज होता.

आहाराबाबत प्रयोग करण्याची गांधीजींना आवड होती. अनेक जण, हे त्यांचे विचित्र फॅड आहे, असं समजत. कच्च्या भाज्या आणि कडधान्य यांसंबंधी त्यांचे प्रयोग चालत. प्रत्येक प्रयोग काळजीपूर्वक आखला जात असे, त्याचे काय परिणाम

होतात त्याचे बारकाईने निरीक्षण करून सर्व माहिती, एखाद्या प्रयोगशाळेत चाललेल्या प्रयोगाप्रमाणे तपशीलवार लिहून ठेवली जात असे. या प्रयोगापासून काय लाभ झाला ते सांगता येणार नाही, मात्र त्यामुळे गांधीजींनी आपल्या दातांना कायमची इजा करून घेतली. गांधींनी दक्षिण आफ्रिका सोडल्यानंतर तीन वर्षांनी त्यांची एक जुनी मैत्रिण श्रीमती मिली ग्रॅहॅम पोलाक त्यांना साबरमती आश्रमात भेटली....तेव्हां गांधीजींचे अनेक दात पडल्याचे पाहून तिला आश्चर्याचा धक्का बसला

''दात पडल्याने गांधीजींच्या चेहऱ्यात चांगलाच फरक पडला होता,'' असं श्रीमती पोलाक यांनी लिहून ठेवलं आहे. गांधीजी तोपर्यंत महात्माजी झाले होते. कच्ची आंबट फळे खाल्ल्यानं आपण आपले दात गमावले, असं त्यांनी श्रीमती पोलाकना सांगितले.

दक्षिण आफ्रिकेत असताना काही वर्षपर्यंत गांधीजींनी लंडन येथील शाकाहार संस्थेशी संबंध चालू ठेवला होता. संस्थेच्या नियतकालिकात ते नियमितपणे लेख लिहीत. एडवर्ड मेटलॅण्ड यांच्या 'दि परफेक्ट वे' या पुस्तकाचा गांधीजींवर चांगलाच प्रभाव पडला होता. गांधीजी ज्या कागदावर पत्रे लिहीत त्याच्या शिरोभागी ''ख्रिश्चन युनियन आणि लंडन शाकाहार संस्थेचे प्रतिनिधी'' असे त्यांनी अभिमानाने छापून घेतले होते. दरबान येथील नियतकालिकात या संस्थांच्या प्रकाशनांच्या जाहिरातीही गांधीजी देत. शाकाहार लोकप्रिय करण्यासाठी आणि त्याचा त्यासाठी प्रचार करण्यासाठी गांधीजींनी अनेक माहितीपूर्ण लेख लिहिले; आणि आपली बाजू जोरदारपणे मांडली. या विषयावर पाश्चात्य देशातील साहित्याचे त्यांनी किती खोलवर वाचन केलं होतं, ते या लेखांवरून सहज लक्षात येईल.

गांधीजींना चांगलीच विनोदी बुद्धी होती. उत्तर आयुष्यात त्यांच्या स्वभावाचे ते एक ठळक वैशिष्ट्यच होते. आफ्रिकेत या गुणांची झलक त्यांनी दाखवायला नुकताच कोठे प्रारंभ केला होता. 'नाताळ मर्क्युरी' या नियतकालिकाच्या संपादकाला एकदा लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले, ''शारीरिकदृष्ट्या अत्यंत सुदृढ असलेल्या शाकाहाऱ्यांची संख्या कितीतरी मोठी आहे. शाकाहार किती शक्तीदायक असतो, तेच यावरून सिद्ध होते. विशेषत: जगातील सुदृढ, कष्टाळू असा मोठा शेतकरीवर्ग तर शाकाहारीच आहे. आपल्याला अत्यंत उपयुक्त असलेला घोडा हा प्राणी कसा सशक्त असतो ? तो शाकाहारी आहे. उलट, अत्यंत हिंस्त्र आणि निरुपयोगी असा सिंह हा पशु मांसभक्षक असतो, हा फरक लक्षात घ्यावा.''

गाधीजींची लढाऊवृत्ती आणि वृत्तपत्रीय लेखन शैलीचा उत्कृष्ट नमुना पहायचा असेल तर आफ्रिकेत असताना त्यांनी नाताळ विधान मंडळाच्या सदस्यांना पाठविलेले अनावृत पत्र वाचावे. भारतीय संस्कृती किती थोर आणि उच्च कोटीची

आहे, याबद्दल पाश्चात्य लेखकांनीच व्यक्त केलेल्या विचारांचा जागोजागी उल्लेख करीत गांधीजींनी म्हटले आहे की या तुलनेत नाताळमधील युरोपीय लोकांचे तेथील भारतीयांशी होणारे घृणास्पद वर्तन बघावे. या वसाहतीत भारतीय लोकांचा किती द्वेष केला जातो, याला पुराव्याची गरज नाही; असं सांगून गांधीजी पुढं म्हणतात की रस्त्यानं जाताना भारतीय नागरिकाकडे तुच्छतेनं पाहिलं जातं, त्याला उगाचच शिव्याशाप दिले जातात, कोठे तर त्याच्या अंगावर थुंकले जाते आणि अनेकदा त्याला ढकलून दिले जाते. इंग्रजी वृत्तपत्रांना तर भारतीयांची बदनामी करताना शब्दसंग्रहातील शब्द कमी पडतात असे वाटते. नमुन्यादाखल काही उदाहरणे देऊ का ? ''समाजजीवनाचे शोषण करणाऱ्या या जळवा आहेत,'' ''हे लोक म्हणजे बांडगुळं होत;'' ''हे कपटी घृणास्पद निम-जंगली आशियाई लोक;'' ''हे हिंदू लोक म्हणजे काळे, किडकिडीत, अस्वच्छ आणि सदा तिरस्कृतच समजावे;'' ''हे खोटारडे, लबाड, घाणेरडे कुली लोक; या हिंदू लोकांचा मी द्वेष करतो.''

भारतीय माणसाला युरोपियनांकडून कोणते शिव्याशाप मिळत होते, त्यांचा पावलोपावली कसा अपमान होत होता याचे वर्णन करताना लेखकाने कोणाबद्दल द्वेष उत्पन्न करण्याचा प्रयत्न केलेला नाही की कटुताही निर्माण होऊ दिली नाही. खरं ते सांगून त्यानं अतिशयोक्तीही टाळली.

: ९ :

ते हिरवे पत्रक

साधु-संन्यासी असो वा उद्योगपती-व्यापारी, आपले काम चांगले पार पडले की कोणाचेही मन समाधानाने भरून जाते. सार्वजनिक कार्यात काय आणि आपल्या व्यावसायिक क्षेत्रात काय, गांधीजी आपला ठसा हळूहळू उमटवीत होते. नाताळमधील भारतीय समाजाला गांधींच्या कार्याचे मोल आता चांगलेच लक्षात येऊ लागले होते. प्रत्येक अडीअडचणीच्या वेळी लोक आता गांधीजींकडे मार्गदर्शनासाठी वळू लागले होते. समाजात गांधीजींचे वजन वाढत असतानाच आतून त्यांचे एकूण व्यक्तिमत्वच अधिकाधिक प्रभावी होत चालले होते. आपले भवितव्य काहीही असो, येता काही कालखंड आपल्याला दक्षिण आफ्रिकेत राहूनच कार्य करायचे आहे, याची गांधीजींना आता पूर्ण कल्पना आली होती.

आपण हाती घेतलेले कार्य आणि सुरू केलेली चळवळ मधूनच सोडून जाता येणार नाही याची गांधीजींना जाणीव होती. त्या देशात, भारतीय समाजाचे ते एकमेव पुढारी वा नेते नसले तरी अनेक ठिकाणी त्यांच्या नेतृत्वानेच गोष्टी घडून येत होत्या. आपण बजावत असलेल्या महत्त्वाच्या भूमिकेबद्दल त्यांना सार्थ अभिमान वाटत होता. परंतु त्यात अहंकाराचा लवलेशही नसे. अद्यापी आपण आपल्या समाजसेवेत उणे पडत आहोत, अशीही भावना त्यांना अस्वस्थ करीत असे. गांधीजींच्या स्वभावधर्माचे हे पैलू पुढे आयुष्यभर तसेच राहीले.

ब्रिटिश शासन आणि प्रजाजन यांना आपली आणि आफ्रिकेतील भारतीयांची भूमिका समजावून सांगण्यासाठी दि. ५ जुलै १८९४ रोजी गांधीजींनी जे पहिले पत्र दादाभाई नौरोजी यांना लिहिले, त्यातच या गुणांचे दर्शन घडते. या पत्रात त्यांनी निवडणूक विधेयकाचा खरा हेतू उघड करून सांगितला. नाताळातील युरोपीयन लोकांचा भारतीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा आहे त्याचे वर्णन करताना गांधीजींनी युरोपीयनांचेच विचार त्यांच्याच शब्दात उद्धृत केले : ''आम्हाला हे

भारतीय लोक यापुढे येथे नको आहेत. आम्हाला कुलींची गरज आहे, हे खरे परंतु त्यांनी येथे गुलाम म्हणूनच राहिले पाहिजे आणि आपले काम आणि करार संपताच ताबडतोब हा देश सोडून हिंदुस्थानात परत गेले पाहिजे. आपल्या देशबांधवांचा एक मुखीया प्रवक्ता म्हणून आपली काय भूमिका आहे हे गांधीजींनी पत्रात स्पष्ट केले. ते म्हणाले : ''आता मी स्वत:विषयी आणि मी काय काम केले त्याविषयी सांगू इच्छितो. मी अद्यापी तरुण आणि अननुभवी आहे. यामुळे माझ्या हातून चुका होणे साहजिक आहे. जी जबाबदारी मी अंगावर घेतली आहे ती माझ्या आवाक्या पलीकडची आहे. याची मला जाणीव आहे. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता हे काम मी करीत आहे. ही जबाबदारी माझ्या आवाक्याबाहेर असताही, येथील भारतीयांचे मोल देऊन माझ्या अनुभवात भर पडावी म्हणून काही हे काम मी अंगावर घेतलेले नाही, हे आपल्या लक्षात येईल. हा प्रश्न हाताळण्यास येथे मी एकटाच उपलब्ध आहे, अशी परिस्थिती आहे. अशावेळी आपण मला मार्गदर्शन कराल आणि आवश्यक त्या सूचना द्याल अशी मी आशा करतो. पित्याने मुलाला मदत आणि मार्गदर्शन केले, असेच मी समजेन.''

आता गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत येऊन तीन वर्षे झाली होती. तेथे घर करायचे तर कुटुंबियांना भारतातून आणणे आवश्यक होते. मायदेशी जाण्यासाठी त्यांनी सहा महिन्यांची रजा घेतली. दक्षिण आफ्रिकेतील लोकांना कोणत्या दिव्यातून जावे लागत आहे, त्याची माहिती देशवासियांना त्यांनी आपल्या मुक्कामात द्यावी, अशी गांधीजींना विनंती करण्यात आली. जून १८९६ मध्ये गांधीजी दरबानहून बोटीत बसले. आपल्या सहकाऱ्यांच्या इच्छेनुसार, प्रवासातच गांधीजींनी ''दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश-भारतीयांची गाऱ्हाणी'' या मथळ्याखाली वस्तुस्थितीचे सविस्तर वर्णन करणारे एक पत्रक लिहून काढले आणि भारतात पोहोचताच ते प्रसिद्ध केले. या पत्रकाच्या पाकिटाचा रंग हिरवा असल्याने 'हिरवे पत्रक' म्हणून ते ओळखले जाऊ लागले. पत्रकाच्या १०,००० प्रती छापण्यात आल्या. पत्रकातील मजकूर अनेक भारतीय वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाला आणि त्यावर अनेकांनी आपले विचार आणि प्रतिक्रिया प्रगट केल्या. पत्रकाची पहिली आवृत्ती संपताच दुसरी काढण्यात आली.

सौम्य भाषेत गांधीजींनी त्या पत्रकात सर्व वस्तुस्थिती कथन केली होती. कोणाच्या द्वेषाचा त्यात लवलेश नव्हता, मजकुरात अतिशयोक्ती नव्हती. याआधी दरबानहून काढलेल्या अनावृत पत्रात तो मजकूर होता, त्याचीच ही पुनरावृत्ती होती. गांधीजींच्या आयुष्यभराच्या राजकीय विचारसरणीचे मूळ नैतिक अधिष्ठान होते : प्रेमाने शत्रूपक्षालाही जिंकणे. या पत्रकात त्यांनी प्रथमत:च या उच्च नैतिक मूल्याचा

उल्लेख केला होता—"दक्षिण आफ्रिकेत आमच्या वाट्यास येणाऱ्या द्वेषालाही प्रेमाने जिंकणे हाच आमचा धर्ममार्ग आहे." दुर्दैवाने 'रूटर' या वृत्तसंस्थेनं या पत्रकातील त्रोटक, संदर्भहीन मजकूर आफ्रिकेत पाठविल्याने, आपली उगाचच नाचक्की करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा युरोपीय लोकांचा गैरसमज झाला. याचा नंतर फार प्रतिकूल परिणाम झाला.

राजकोट या आपल्या गावी गांधीजींनी काही काळ घालविला. या अवधीत ते 'हिरवे पत्रक' प्रसिद्ध करण्यात आलेच, खेरीज अनेकानेक उपक्रम हाती घेण्यास त्यांना भरपूर वेळ मिळाला. त्याकाळी प्लेगची साथ येण्याचा धोका दिसत होता. ताबडतोब गांधीजींनी राजकोट येथील स्वच्छता आणि आरोग्यखात्याला आपली सेवा देऊ केली. प्रत्येक रस्त्यावरील आणि गल्लीबोळातील संडास कसे स्वच्छ ठेवावे, यासंबंधीचा सल्ला त्यांनी आरोग्य खात्याला दिला. स्वच्छतेला गांधीजी फार महत्त्व देत. स्वच्छ संडास म्हणजे स्वच्छ घर असे ते म्हणत. माणसं घरात कशी रहातात आणि ती कितीशी सुसंस्कृत आहेत याची कसोटी म्हणजे संडासाची स्वच्छता. अनेकांना त्यांचे हे विचार म्हणजे 'फॅड' वा नसता उपद्व्याप वाटला. परंतु माणसाचा दृष्टीकोन कितीसा निर्दोष आणि स्वच्छ आहे याचे मूल्यमापन त्यावरून करता यावे.

त्याकाळी गांधीजींच्या बरोबर गावातील अस्पृश्यांच्या घरी जाण्याची त्यांच्या एकाही मित्र-स्नेही वा नातेवाईकांची तयारी नव्हती. आश्चर्य म्हणजे, या तथाकथित अस्पृश्यांची घरे गावातील इतर लोकांच्या घरापेक्षा अधिक स्वच्छ होती, असे गांधीजींना दिसून आले. स्वच्छता समितीचे सदस्यही त्या घरांना भेटी द्यायला राजी नव्हते. गावातील बड्या लोकांचे संडास अधिक अस्वच्छ असल्याचे समितीला आढळून आले, मात्र या ठिकाणीही गांधीजींना अनेक घरातून प्रवेश नाकारण्यात आला. गांधीजींना हेही एक शिक्षणच मिळत होतं. भावी आयुष्यात ते त्यांच्या कामी आले.

महाराणी व्हिक्टोरीया हिचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी यावेळी तयारी चालली होती, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यासाठी नेमलेल्या समितीत गांधीजीही सामील झाले. आपल्या कुटुंबातील मुलांना त्यांनी ब्रिटिश राष्ट्रगीत म्हणण्यासही शिकविले. प्रसंग महान असो की साधा एकदा भाग घ्यायचा म्हटला की गांधीजी त्यात सारख्या उत्साहाने भाग घेत. आयुष्यभर याच वृत्तीने ते वागले.

आफ्रिकेतील आपल्या सहकाऱ्यांच्या आज्ञेनुसार यानंतर गांधीजींनी देशातील अनेक शहरांना भेटी दिल्या, तेथे सार्वजनिक नेत्यांची भेट घेतली, दक्षिण

आफ्रिकेतील भारतीयांच्या स्थितीविषयी त्यांना माहिती दिली, या प्रश्नाविषयी भारतीय वृत्तपत्रांच्या अनेक संपादकांच्या मनात आपुलकी निर्माण केली आणि मुंबई, पुणे, मद्रास येथील सार्वजनिक सभातून ही सर्व परिस्थिती लोकांना तपशिलवार कथन केली. मुंबईचे त्यावेळचे अनभिषिक्त सम्राट सर फेरोजशहा मेहता आणि विद्वान तसेच प्रखर देशभक्त, लोकनेते लोकमान्य टिळक यांच्या भेटीनंतर तर गांधीजी त्यांच्या व्यक्तिमत्वाने चांगलेच प्रभावित झाले. या नेत्यांनी गांधीजींचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि प्राप्त परिस्थितीत काय करावे याचे मार्गदर्शन केले. परंतु गांधीजींचे खरे मन जिंकून घेतले ते मोठ्या मनाच्या आणि प्रेमळ स्वभावाच्या गोपाळ कृष्ण गोखले यांनी. ''ही माझी आणि नामदार गोखले यांची पहिलीच भेट होती, परंतु जणू काही आम्ही जुने स्नेही आहोत असेच वाटत होते. सर फेरोजशहा मला हिमालयासारखे उत्तुंग, लोकमान्य एखाद्या अथांग महासागरासारखे, तर गोखले पवित्र गंगेप्रमाणे भासले. गंगेच्या पवित्र जलात शूचिर्भूत व्हावं तसं मला गोखले यांच्या सहवासात वाटत होतं.''

ईश्वराने ओवाळून टाकलेल्या त्या परकी आफ्रिकी देशात गांधीजींच्या राजकीय कार्याचा शुभारंभ व्हावा आणि तेथेच आयुष्यात अध्यात्मिक आणि नैतिक पेचप्रसंगांना आणि सहनशक्तीची कसोटी पाहणाऱ्या प्रसंगांना तोंड देण्याची वेळ त्यांच्यावर यावी, हाही सुदैवाने एक दैवी योगायोगच म्हटला पाहिजे. कारण त्या परिस्थितीला त्यांना एकट्यानेच तोंड द्यावे लागले. स्वत: निर्णय घ्यावा लागला, परिस्थितीला तोंड देता यावे यासाठी आपल्या आंतरिक शक्तींना साकडे घालावे लागले. अशावेळी, अशा प्रसंगांना तोंड देण्याची पाळी त्यांना भारतात आली असती तर ज्येष्ठ नेत्यांच्या प्रभावाखाली त्यांना आपले धोरण आखावे लागले असते. परंतु आफ्रिकेत स्वत:लाच सारे निर्णय घ्यावे लागल्याने, त्यांच्या आंतरिक गुणांचा खरा कस लागला. गांधीजी खरे घडले ते या पेचप्रसंगातून. म्हणूनच अखेरीस गांधीजी मायदेशी परतले तेव्हा आपल्या पुढील वाटचालीची दिशा कोणती, आपले ध्येयधोरण आणि आयुष्याचे उद्दिष्ट काय याबद्दलचे त्यांचे विचार तोपर्यंत पक्के झाले होते. त्यामुळेच भारतात येताच देशातील राजकीय स्थितीवर आपला पूर्ण प्रभाव टाकणे त्यांना सहज शक्य झाले. इतकेच नव्हे तर त्यांच्या नेतृत्वाला कोणी आव्हान देईल अशीही स्थिती उरली नव्हती. परंतु अद्याप त्याला अवकाश होता.

कलकत्ता येथे एका जाहीर भाषणासाठी गांधीजी गेले असता दरबानहून त्यांना एक तार आली. आपली येथे अत्यंत जरुरी आहे, असे तारेत म्हटले होते. गांधीजी लगेच घाईघाईने मुंबईला रवाना झाले. आणि त्यावर्षीच्या डिसेंबरात पत्नी आणि

मुले यांना घेऊन 'कौर लॅण्ड' या जहाजावर चढले. हे जहाज त्यांचे अशिल दादा अब्दुल्ला यांच्या मालकीचे होते. याचवेळी आणखी एक भारतीय प्रवाशांना घेऊन नाताळ आणि ट्रान्सवाल येथे जाण्यासाठी निघाले. दोन्ही जहाजे डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात दरबानला पोहोचली. या जहाजांना बंदरात लगेच बाजूला काढण्यात आले.

कारण वस्तुस्थिती अशी होती की 'रूटर' या वृत्तसंस्थेने गांधीजींनी काढलेल्या पत्रकाचा त्रोटक असंबद्ध असा वृत्तान्त आफ्रिकेत पाठविल्याने, आपली सर्वत्र नाचक्की करण्याचा आणि प्रतिमा डागळण्याचा हा गांधीजींचा अश्लाघ्य प्रयत्न होय, अशी गोऱ्या लोकांची खात्री झाली होती. त्यातच अशी आवई उठली होती की गांधीजी दोन जहाजे भरून आणखी भारतीयांना आफ्रिकेस घेऊन येत आहेत. या अपप्रचारामुळे चिडलेल्या गोऱ्या लोकांनी सभा घेऊन गांधींना आणि भारतीयांना धमक्या देण्यास सुरुवात केली होती. जर नव्या भारतीयांनी आफ्रिकेत पाऊल टाकले तर त्यांना समुद्रात ढकलून दिले जाईल, अशा धमक्या देण्यात येत होत्या. भारतीय लोकानी जर आल्या पावली परत जाण्याची तयारी दर्शविली ती त्यांचे परतीचे भाडे देण्याची तयारीही दाखविण्यात आली होती.

परंतु धमकी वा लालूच यांचा त्या प्रवाशांवर काही परिणाम होत नव्हता. गांधीजींच्या सहवासाने त्या प्रवाशांच्या उत्साहाला उधाण आले होते, नवा जोम येत होता. आणि त्या जोरावर परिस्थितीला शरण जाण्याची कोणाची तयारी नव्हती. अखेरीस प्रवाशांना नाताळचा दिवस बोटीवरच घालवावा लागला. रात्री बोटीच्या कॅप्टनने दिलेल्या भोजनाच्या वेळी गांधीजींनी पाश्चात्य संस्कृतीवर भाषण केले आणि म्हटले की नाताळातील युरोपीय लोक याच संस्कृतीचे वारस आहेत. २३ दिवसानंतर त्या दोन बोटींना बंदरात प्रवेश करण्याची परवानगी देण्यात आली. कोणताही अनुचित प्रकार न घडता सर्व प्रवासी बंदरावर उतरले.

परंतु गांधींना उतरणे शक्य नव्हते. तेथील ॲटर्नी जनरलने गांधींना कळविले होते की त्यांच्या पत्रकामुळे परिस्थिती स्फोटक झाल्याने त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी रात्र पडल्यावर बंदरावर उतरावे, म्हणजे संरक्षण देऊन त्यांना बाहेर काढता येईल. परंतु हा निरोप मिळतो न मिळतो तोच कंपनीचे सल्लागार मि. लॉटन तेथे आले आणि म्हणाले की गांधींनी एखाद्या चोरट्या सारखे शहरात गुपचूप शिरावे हे योग्यही नव्हे आणि त्याची गरजही नाही. हे ऐकताच सौ. कस्तुरबा गांधी आणि मुले एका गाडीत बसून रुस्तुमजी या एका सुखवस्तु स्नेह्याच्या घरी रवाना झाली. इकडे मि. लॉटन आणि गांधीजी पायीच रुस्तुमजींच्या दोन मैलावरील बंगल्याकडे निघाले. हा निर्णयही धाडसाचाच होता. कारण विरोधकांकडून कसा त्रास दिला जाईल याची

लॉटन यांना पुरेशी कल्पना नसावी. गांधीजी बंदराबाहेर पडले नाही तोच त्यांना ओळखण्यात आले आणि पाहता पाहता मोठा जमाव तेथे जमला. जमावाने गांधीजींना घेरले आणि आरडाओरडा करीत त्यांच्या नावाने त्यांनी शंख करायला सुरुवात केली. मि. लॉटन यांना जमावाने ओढून बाजूला काढले आणि गांधीजींवर दगड-विटा-अंडी यांचा मारा सुरू केला. गांधीजींची पगडी उडविली गेली आणि त्यांना लाठ्याकाठ्यांनी मारणं तसंच लाथाबुक्क्यांनी तुडविणं सुरू झालं. ''मला चक्कर येऊ लागली. नजिकच्च्या एका घराचा कठडा धरून मी कसाबसा उभा राहिलो. आता श्वासोच्छवास करणे कठीण होऊ लागले होते. लाथाबुक्यांनी ते मला सतत तुडवीत होते.''

परिस्थिती हाताबाहेर गेली असती परंतु एका इंग्लिश महिलेनं धाडस करून हस्तक्षेप केला. ती तेथील पोलीस सुपरिंटेंडेंटची पत्नी होती. त्याच वाटेनं ती त्यावेळी चालली होती. ती गांधींजींच्या बाजूस धावली आणि तिने आपली शाल गांधींजींच्या आड धरली. तेवढ्यात पोलिसांच्या कानी गडबड गेली आणि ते धावत आले. गांधीजींना संरक्षण देऊन रुस्तुमजींच्या घरी पोहोचवले. तिथे त्यांच्यावर प्रथमोपचार करण्यात आले.

परंतु अद्याप धोका टळलेला नव्हता. एकदा रक्ताची चटक लागलेली जंगली श्वापदं पुन्हा हल्ला करण्याची शक्यता होती. आपला बळी हातून निसटून गेल्यानंतर या गुंडांनी रुस्तुमजींच्या घरासमोर जमून आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. गांधींना ताब्यात द्या अशी त्यांची मागणी होती. या झुंडशाहीला आवर घालणे आवाक्याबाहेर जाईल असे वाटून पोलिस सुपरिंटेंडेंटने निरोप पाठविला की घरातली माणसं आणि घर वाचवायची असतील तर त्यांनी गुपचूपपणे तिथून निघून दुसरीकडे रहायला जावे. भारतीय शिपायाचा गणवेश चढवून आणि दोन गुप्त पोलिसांच्या मदतीने (तेही छुप्या वेशातच होते) गांधीजी अखेर तेथून बाहेर पडले.

या प्रसंगाची पुढे आठवण सांगताना गांधीजी म्हणाले, ''माझे जीवित धोक्यात आले होते म्हणून, की माझ्या मित्राचे आयुष्य, त्याची मालमत्ता आणि माझ्या बायको-मुलांचे जीवित धोक्यात आले म्हणून मी तसे केले, त्याबद्दल आता कोणी काय सांगणार? पहिल्या प्रसंगाला मी धीरोदात्तपणे तोंड दिले असे सर्व म्हणतात. दुसऱ्या खेपेस वेष पालटून गुपचूपपणे निसटलो, हेही खरे. या दोन्ही प्रसंगी माझा निर्णय योग्यच होता, असे कोण म्हणणार?''

या घटनेला सर्वत्र चांगलीच प्रसिद्धी मिळाली. इंग्लंडमध्ये ती बातमी जाताच, परराष्ट्र मंत्री जोसेफ चेंबरलेन यांनी नाताळच्या अधिकाऱ्यांना तार करून

गुन्हेगाराविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले. परंतु गांधीजींनी आपल्यावर हल्ला करणाऱ्यांना ओळखून काढण्यात नकार दिला. फिर्यादी म्हणून पुढे होण्यासही त्यांनी नकार दिला. आपल्याला हल्ला करणाऱ्यांची चुकीची समजूत करून देण्यात आली होती, आणि त्यांना वस्तुस्थितीची कल्पना येताच त्यांना केलेल्या कृत्याबद्दल वाईट वाटेल असे गांधीजींचे म्हणणे होते. त्यानंतर घडले ते असे : ''मी निरपराध आहे असे वृत्तपत्रांनी म्हटले आणि जमावाच्या कृत्याचा निषेध केला. या प्रकरणाने खरोखरी मला नकळत उपकृतच केले. ज्या कारणासाठी मी झगडत होतो, ते न्याय्य आहे, असा समज पसरत गेला.'' गुलाम देशातील कुली बॅरिस्टरमधील ''महात्मा'' आता आपले खरे स्वरूप हळूहळू प्रकट करू लागला होता.

: १० :
घरसंसार

पत्नी आणि मुले यांना भारतातून घेऊन आल्यानंतर गांधीजींचा आफ्रिकेत घरसंसार सुरू झाला. आयुष्यात स्वतंत्रपणे घरसंसार करण्याची ही त्यांची पहिलीच वेळ होती. स्वत:चा स्वतंत्र संसार सुरू झालेला पाहून पत्नीला खरा आनंद झाला असावा. कारण लग्न झाल्यापासून एकत्र कुटुंबात सून वा वहिनी म्हणून आतापर्यंत वावरण्याची सवय झाली होती. गांधीजींचे या आधी हिंदुस्थानात असताना उत्पन्न तुटपुंजे - त्यामुळे स्वतंत्र घर करून स्वत:चा वेगळा संसार करण्याची कधी वेळ आलीच नव्हती. आता मात्र स्वतंत्र, वेगळ्या संसाराचा आनंद मिळणार होता हिन्दुस्थानातील काय, जगातील कोणत्याही स्त्रीला आपला असा संसार करण्याचा आनंद आणि अभिमान असतोच.

परंतु स्वतंत्र घरसंसारात अनभिषिक्त सम्राज्ञी म्हणून मिरविण्याची कस्तुरबांची इच्छा काही खऱ्या अर्थाने पुरी झाली नाही. बहुसंख्य कुटुंबात नवरोजी घरात फारसे लक्ष घालीत नाहीत. परंतु कस्तुरबांच्या नशिबी ते सुख नव्हते. गांधीजी तसे स्वभावाने व्यवहारी नव्हते. दुसऱ्याच्या मनाला मान देण्याची लोकशाहीवृत्तीही त्यांच्या ठायी होती. परंतु आपल्या माणसांना, मुलाबाळांना मदत करण्याच्या बाबतीत, त्यांच्या सुखासमाधानासाठी ते तसे आग्रही होते. संसार सुखाचा व्हावा म्हणून संसारात कोठे दुर्लक्ष करण्याची त्यांची तयारी नव्हती. वाजवीपेक्षा जास्तच म्हणाना त्यांची घरात लुडबुड चाले. कारण आपल्या माणसांच्या भौतिक, मानसिक आदी सर्व प्रकारच्या सुखासाठी आपण पुढाकार घेतला पाहिजे, धडपडले पाहिजे ही त्यांची भावना तीव्र होती. या प्रयत्नात आपल्या साऱ्या आवडीनिवडी, फॅड्स म्हणा, घरच्या लोकांना पसत पडल्या पाहिजेत, नव्हे त्या पसंत पडतीलच अशी त्यांची खात्री असे. आपण मुलाबाळांच्या भल्यासाठीच सारे करतो आहोत जेव्हा जे काही करू, त्यांनी करायला सांगू, त्याचा त्यांनी आनंदाने स्वीकार करायला नको

का ? अशी होती गांधीजींची विचारसरणी.

आपण बॅरिस्टर आहोत, आपल्या समाजाचे नेते आहोत, ही स्वाभिमानी जाणीव त्यांना होतीच. आपल्या लोकांची बिकट आर्थिक परिस्थिती आणि निकृष्ट साधी राहणी आणि शाकाहार यांचा अवलंब करूनही आपले राहणीमान सर्वसाधारण युरोपीय कुटुंबापेक्षा खालच्या पातळीवर जाणार नाही, याची गांधीजी काळजी घेत होते.

यानुसार, राजकोट सोडण्याआधी आणि प्रवासातही त्यांनी आपल्या पत्नीच्या आणि मुलांच्या पोशाखात काही फेरबदल केला होता. त्यांनी चांगले बूटमोजे घातले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ''लवकरच बायको-मुलांना त्याची सवय झाली. मात्र प्रारंभी नव्या बुटांमुळे पायाला फोड आले, तर मोज्यांमुळे पायाला सतत घाम येई. जेवतांना काटे-चमचे वापरण्यासाठी सराव करुन घेण्यात आला. मात्र त्याचा बराच त्रास झाला. काट्या चमच्याने नीट जेवता येत नाही. अन्न गोड लागत नाही, अशी तक्रार मुलं करीत. परंतु नव्या जगात, नव्या संस्कृतीला साजेसं वर्तन करायचं म्हणजे काही गैरसोयी सहन करायला नकोत का ?''

नाताळच्या एका उपनगरात गांधीजींना एक बऱ्यापैकी जागा रहायला मिळाली. साधे पाश्चात्य धर्तीचे लाकडी फर्निचर आणून घर बऱ्यापैकी सजविण्यात आले. सर्वजण शाकाहारीच होते. घरचे वा दारचे, भारतीय वा युरोपीय पाहुणे येवोत, सर्वांना शाकाहारीच मेजवानी मिळे. पाहुणेही बरेच येत. घरात एक स्वैपाकी आणि नोकर ठेवण्यात आला होता. आपली दोन मुले आणि एक पुतण्या यांच्या घरातील शिकवणीसाठी गांधीजींनी मग एक इंग्रजी शिक्षिका नेमली. एखाद्या युरोपीय शाळेत मुलांना प्रवेश मिळवून देणे कठीण नव्हते. ''परंतु उपकार आणि अपवाद म्हणूनच प्रवेश मिळाला असता. अन्य भारतीय मुलांना तसा प्रवेश दिलाही जात नसे.'' अपवाद वा उपकार म्हणून मुलांचा शाळा-प्रवेश गांधींना मान्य नसल्याने त्यांनी इंग्रजी शिकविण्यासाठी शिक्षिका नेमली आणि स्वत:ही अनेक वेळा ते गुजरातीतून मुलांची शिकवणी घेत.

वकिली व्यवसायातून हळूहळू उत्पन्न वाढत होते, परंतु ही पाश्चात्य राहणी फार काळ टिकू शकली नाही. निरिच्छ आणि साधु वृत्तीच्या गांधीजींना राहणीमान अधिक साधे असावे असे वाटे, तर त्याच वेळी सेवाभावी वृत्ती त्याना आपल्या लोकांच्या सेवेसाठी साद घालीत होती. एक दिवस एक कुष्ठरोगी दारी आला. गांधीजींनी त्याला प्रेमाने घरात घेतले, त्याच्या जखमा धुवून काढल्या, औषध लावले. परंतु त्याला घरात कायम ठेवून घेणे कठीण आहे, हे लक्षात येताच ते अस्वस्थ झाले. त्यांची सद्सद्विवेक बुद्धी त्याना टोचू लागली.

एखाद्या इस्पितळाशी आपला संबंध आला तर आपण तेथील आजारी माणसांची खरी सेवा करू शकू, असे त्याना वाटू लागले. एका छोट्या इस्पितळात त्यांनी दिवसातील काही तास रुग्णांची मोफत सेवा करण्यास प्रारंभ केला. डॉ. बूथ यांनी ही सोय केली. नंतरच्या काळात, बोअर युद्धाच्या वेळी आणि तथाकथित झुलू बंडाच्या वेळी, जखमींची सेवा शुश्रूषा करतांना हा अनुभव उपयोगी पडला. पुस्तके वाचून त्यांनी दाई आणि सुईणीचेही काम शिकून घेतले. आपल्या चौथ्या आणि शेवटच्या मुलाच्या जन्माच्या वेळी हेही ज्ञान त्यांना कामास आले, कारण वेळेवर सुईण वा दाई मिळणे कठीण झाले होते.

आपले केस स्वतःच कापण्याचा आणि आपले कपडे स्वतःच धुवून त्यांना इस्त्री करण्याचा खटाटोप गांधीजींनी सुरू केला होता. त्यामुळे त्यांचे अनेकदा हसे होत असे. ''शर्टाची वेगळी खास कॉलर धुण्याचा मी पहिल्यांदा जेव्हा प्रयत्न केला तेव्हा गंमतच झाली. वाजवीपेक्षा जास्त खळ मी कॉलरला लावली. इस्त्री देखील पुरेशी तापलेली नव्हती. कपडे जळू जये म्हणून फार तापवायची नाही, अशा काळजी घेत कॉलरला इस्त्री केली. शर्टाला कॉलर लावून मी मग जेव्हां कोर्टात गेलो, तो ओली खळ शर्टावर ओघळू लागली आणि माझे सर्वत्र हसे झाले.'' मात्र लवकरच गांधीजींना इस्त्री करण्याचा चांगलाच सराव झाला.

काटकसर म्हणून धुणे आणि इस्त्री करणे ही कामे त्यांनी स्वतः हाती घेतली. मात्र स्वतःचे केस कापण्याचे काम सुरू केले ह्याचे कारण, एकदा एका इंग्रज न्हाव्याने या 'भारतीय कुली'चे केस कापण्याचे नाकारले म्हणून. मात्र हे काम स्वतःला कसे जमणार ? ''मि. गांधी, काय झाले आहे तुमच्या केसांना ? घुशीने ते कुरतडले का ? एकदा कोर्टात वकील मित्रांनी त्यांना छेडले. सर्वजण हसले.'' परंतु गांधीजींना त्याची पर्वा नव्हती. एखादे काम योग्य आहे असे वाटताच, ते करायचे असा त्यांचा पण. मग कोणी काहीही म्हणो. स्वावलंबी होणे हे तर त्यांचे जीवन तत्त्वच होते. आणि आयुष्यभर त्यासाठी ते राबले.

स्वावलंबनाच्या मागे लागून स्वतःचे केस स्वतःच कापण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली, हे ठीक. परंतु मुख्य मुद्दा हा की त्या इंग्रज न्हाव्याने केस कापण्याचे नाकारले म्हणून ते चिडले नाहीत, तर त्याची त्यांनी कींवच केली. त्यांना त्याची दयाच आली म्हणा ना ! ''न्हाव्याने केस कापले नाहीत यात त्याचा काय दोष ? त्याने तसे केले असते तर त्याचे गिऱ्हाईक कमी झाले असते. आपण नाही का अस्पृश्यांचे केस कापायचे नाकारीत ? आफ्रिकेत मग माझ्या सारख्यालाही या मनोवृत्तीचा अनेकदा कटू अनुभव आला. आपल्या पापाबद्दल आपल्याला ती शिक्षा

मिळत आहे, असे वाटून चिडून जाण्याऐवजी मी शांतपणे त्यावर विचार करू शकलो.''

हळूहळू आफ्रिकेतील त्या कुटुंबात माणसांची भर पडत होती. अधिक मुलं झाल्याने नव्हे तर, गांधीजींनी घरात अनेकांना आश्रय देण्यास सुरुवात केल्याने. त्यात त्यांच्या कार्यालयात काम करणारे अनेक कारकूनही होते. आपल्या मुलाबाळांसारखीच गांधीजी त्यांना वागणूक देत, ''नातेवाईक आणि बाहेरचे लोक, देशबांधव आणि परदेशी, गोरे आणि काळे, हिंदू आणि अन्य धर्मीय, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन वा ज्यू यात भेदाभेद करणे मला जमत नाही.'' असं उगाच नाही म्हटलं.

गांधीजींचा तो विशाल मानवतावादी दृष्टीकोन आणि महात्म्याला शोभून दिसावा असा आदर्श स्वभावधर्म याचे कोणीही जरुर कौतुक करील-परंतु घरात पत्नीला अशा स्वभावाच्या परिणामी किती त्रास होत असेल ? ती किती कावत असेल ? त्यामुळे दोघात कधीमधी लहान लहान खटकेही उडत. कस्तुरबा ही अखेरीस एक प्रेमळ, पतिनिष्ठ, व्यवहारी, संसारी भारतीय नारी होती. आदर्श पत्नी आणि माता होती. भारतीय कुटुंब व्यवस्थेतील प्रथा परंपरा, जात पात सांभाळणे तिला आवश्यक होते. पतीची सेवा करून त्याला आनंदात आणि समाधानात ठेवण्यासाठी ती धडपडत होती. परंतु त्याचवेळी घरात राहणाऱ्या परक्या माणसांची मुताची भांडी रिकामी करण्याचे तिच्या जिवावर येई. त्याचा राग ती अनेकांवर काढी.

घरात एक पूर्वाश्रमीची अस्पृश्य पण आता ख्रिश्चन झालेली व्यक्ती रहात होती. या कारकुनाची मुतारीची कुंडी साफ करण्यावरून एकदा पति-पत्नीत भांडण झाले. गांधीजी काही ऐकायला तयार नव्हते. गांधीजींनी ज्यांच्यावर प्रेम आणि माया केली त्यांच्या बाबतीत ते प्रसंगी कठोर होत. या प्रसंगाची आठवण त्यांच्याच शब्दात दिलेली बरी :

''कस्तुरबा त्या दिवशी माझ्यावर फार चिडली होती. संतापाने तिचे डोळे तांबडे लाल झाले होते. हातात मुतारीची कुंडी घेऊन जिना उतरत ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली. तिच्या गालावरून अश्रू ओघळत होते. परंतु मी प्रेमळ पती असलो तरी त्या प्रेमातही कठोरपणा होता. मी स्वतःला तिचा गुरु समजत असे, आणि म्हणून आंधळ्या प्रेमातून तिचा छळ करताना मला काही वावगे वाटत नव्हते. मुतारीची कुंडी साफ करावी लागली तर काय झाले-असे मला वाटे. माणसाने कसे उत्साहाने आणि आनंदाने ते काम करावे. मग मी आवाज चढवून तिला दरडावले की माझ्या

घरात हा तमाशा मी सहन करणार नाही. एखादा तीर जिव्हारी लागावा, तसे तिला झाले. म्हणाली, 'तुमचे घर तुमच्या जवळ ठेवा नि मला सोडून द्या.' ते ऐकले आणि माझे तर आता भानच सुटले. त्या त्या भरात सहानुभूतीचा नि प्रेमाचा आता लवलेश उरला नव्हता. मी धावत जाऊन तिचा हात धरला आणि जिन्यावरून समोरच्या दाराकडे फरफटत नेले अन् तिला घराबाहेर ढकलून देण्यासाठी दरवाजा उघडू लागलो. आता कस्तुरबा खरी हतबल झाली होती. डोळ्यातून घळा घळा अश्रू ओघळत होते. रडतच ती म्हणाली, 'तुम्हाला काही लाजलज्जा ? भानावर आहात का ? मी कोठे जाऊ ? इथं मला आसरा द्यायला माझे आई-बाप वा नातेवाईक मी कोठून आणू ? तुमची बायको झाले म्हणून तुम्ही मला असं वागवणार ? पाया पडते, जरा भानावर या आणि दार लावा पाहू. असा तमाशा करताना कोणी आपल्याला न पाहिलेले बरे !

मी चेहऱ्यावर कसेबसे अवसान आणले. शरमेनं मी अर्धमेला झालो होतो. मी मग दार लावले. माझी पत्नी मला सोडून जाऊ शकत नाही, तर मग मी तरी तिला सोडून कसा जाणार ? आमच्यात तसे वारंवार खटके उडत परंतु अखेर दिलजमाई होई. माझी पत्नी म्हणजे सहनशीलतेची सीमा असल्याने अखेरीस तिचाच शब्द अखेरचा ठरत असे.''

: ११ :

बोअर युद्ध

सन १८९९ मध्ये बोअर युद्ध सुरू झाले. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या बोअर लोकांबद्दल गांधीजींना मनापासून सहानुभूती होती, परंतु त्यांनी भारतीयांना ब्रिटिश सत्तेला पाठिंबा देण्यास सांगितले. आपण ब्रिटिश नागरिक असल्याने ब्रिटिश साम्राज्याची संकटाच्यावेळी बाजू घेणे आपले कर्तव्य आहे, असे गांधीजींचे म्हणणे होते. डॉ. बूथ यांच्या मदतीने त्यांनी एक हजार भारतीय स्वयंसेवकांचे एक वैद्यकीय शुश्रूषा पथक प्रशिक्षण देऊन तयार केले आणि त्यांची सेवा ब्रिटिश लष्करासाठी देऊ करण्याची तयारी दर्शविली.

गांधीजींच्या नेतृत्वाखाली या पथकाने बोअर युद्ध आघाडीवर मोलाची कामगिरी पार पाडली. स्पिऑन कॉप आघाडीवर तर, कोणी सक्ती केली नसताही या पथकाने ऐन रणधुमाळीच्या क्षेत्रात जाऊन सेवा बजावली. स्वयंसेवकांनी यावेळी दररोज २० ते २५ मैल चालत जाऊन जखमी सैनिकांना स्ट्रेचरवर घालून आणले. यात जखमी झालेले जनरल वुडगेट आणि लॉर्ड रॉबर्ट्स यांचा मुलगा यांचाही समावेश होता. जनरल बुल्लर यांनी आपल्या लष्करी पत्रकात या पथकाच्या कामगिरीचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला.

''प्रिटोरिया न्यूज'' या नियतकालिकाच्या संपादकांनी स्पिऑन कॉम आघाडीला ऐन धामधुमीत भेट दिली. ''सार्जंट मेजर गांधी'' असं त्यांनी गांधीजींचं वर्णन केलं. ते म्हणतात : ''त्या रात्रीच्या धुमश्चक्रीनंतर आघाडीवरील भल्याभल्यांचे धैर्य गळले होते. सकाळी मला गांधी भेटले. रस्त्याच्या कडेला बसून ते लष्कराने पुरविलेली साधी बिस्किटं खात होते. जनरल बटलर यांच्या लष्करी तुकडीतील प्रत्येक सैनिक मरगळला होता. सारे काही संपले असेच जणू निराशेचे वातावरण सर्वत्र पसरले होते. फक्त गांधी तेवढे धीरोदात्तपणे वावरत होते. संभाषण करतानाही त्यांचा उत्साह आणि आत्मविश्वास जाणवत होता. प्रेमळपणानं ते सर्वांची विचारपूस

करीत होते. कोणीतरी आमची औपचारिकपणे ओळख करून दिली. परंतु त्याचे तात्काळ मैत्रीत रूपांतर झाले. नाताळच्या आघाडीवर त्यानंतर या माणसाला आणि त्याच्या फारशा शिस्तबद्ध नसलेल्या पथकाला भेटण्याची आणि त्यांची सेवा प्रत्यक्ष पाहण्याची मला वारंवार संधी मिळाली. निगर्वीपणे सेवा करणाऱ्या या धीरोदात्त आणि साहसी पथकातील अनेकांना वीरमरण आल्याने, त्यांनी प्रत्यक्ष युद्धक्षेत्रात प्रवेश करू नये, असा अखेरीस आदेश काढावा लागला.''

ब्रिटिशांच्या युद्ध कैद्यांच्या छावण्यात बोअर जमातीच्या स्त्रियांना जे हाल भोगावे लागले, ते पाहून गांधीजी व्यथित झाले. त्याप्रकरणी ब्रिटिश नागरिकांची झालेली तीव्र प्रतिक्रिया पाहून त्यांना बरे वाटले. ''तेथील छळाच्या आणि गैरसोयीच्या हकीकती इंग्लंडमधील लोकांच्या कानी जाताच त्या लोकांना फार दु:ख झाले.'' ही हकीकत नंतर सांगताना गांधीजी म्हणाले : ''बोअर लोकांचे शौर्य पाहून अनेकांनी त्यांची प्रशंसाच केली. स्वर्गवासी मि. स्टीड यांनी तर प्रार्थना सभा घेऊन, इंग्रजांचा या युद्धात पराभव व्हावा अशी ईश्वराला हाक देण्यास लोकांना सांगितले. ते दृश्यच मोठे हृदयविदारक होते. अन्याय वा होणारे हाल धैर्याने सोसले तर दगडाचेही मन द्रवते. यालाच तपश्चर्या म्हणतात. सत्याग्रहाचे हेच मर्म होय.''

सन १९०१ मध्ये बोअर युद्ध संपले आणि आता आपण एकदा भारताला जाऊन यावे असे गांधीजींना वाटू लागले. मातृभूमी त्याना साद घालत होती. खेरीज बोअर युद्धात भारतीय समाजाने मोलाची कामगिरी बजावल्याने आफ्रिकेतील गोऱ्यांनी भारतीयांवर चालविलेला अन्याय दूर होण्यास त्याची मदत होईल, भारतीयांबद्दलचे पूर्वग्रह कमी होतील अशी आशावादी गांधीजींना खात्री वाटत होती. आता आफ्रिकेत वकिली पेशात त्यांना चांगला पैसा मिळू लागल्याने, आपण यात गुंतून पडलो तर अखेरीस पैशाच्या पाठीमागे लागलेल्या एखाद्या लोभी माणसात आणि आपणात काही फरकच उरणार नाही, अशी गांधीजींना स्वत:चीच भीती वाटू लागली होती.

भारताला निघण्यापूर्वी आपल्या स्नेह्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मन वळविणे तसे कठीणच होते, परंतु अखेरीस, समाजाने हाक दिलीच तर वर्षभरात आपण आफ्रिकेला परतू असं वचन देऊन गांधीजी मातृभूमीला येण्यास निघाले.

निरोप देताना द. आफ्रिकेतील भारतीयांनी गांधीजींवर भेटींचा वर्षाव केला. त्यात सोने, चांदी, हिरे होतेच-खेरीज कस्तुरबासाठी एक सोन्याचा मोठा वजनी हार भेट देण्यात आला होता. ''एक दिवस संध्याकाळी या भेटीच्या वस्तु आम्हाला देण्यात आल्या, आणि रात्री मला झोप येईना. मी माझ्या खोलीत अस्वस्थपणे

फेऱ्या घालीत राहिलो, परंतु काय करावे ते सुचेना. दागदागिने वा अन्य भेटी नाकारणे कठीण आणि घरात बाळगणेही कठीण.''

अखेरीस अलिकडे मिळालेल्या भेटी तसेच १८९६ साली भारताला जाण्यास निघण्यापूर्वी मिळालेल्या भेटी यांचा एक विश्वस्तनिधी करण्याचा निर्णय गांधींनी घेतला या निधीचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी करण्यात यावा, असे ठरले. परंतु तो निर्णय पत्नीला पटवून देणे कठीण होते. आपल्या वाट्याला आलेल्या मोलाच्या भेटी अशा हिरावून घेतल्याबद्दल कस्तुरबानं फार खळखळ केली. आपल्यासाठी नव्हे तर आपल्या भावी सुनांसाठी असलेले हे दागिने काढून घेण्यात तुम्हाला काय सुख मिळतं, असं तिनं गांधीजींना ठणकावून विचारलं.

''पण तुला जो किंमती सोन्याचा हार मिळाला तो तुझ्या सेवेबद्दल की मी केलेल्या सेवेबद्दल ?'' गांधीजींनी विचारले.

''कबूल. पण तुम्ही केलेली लोकांची सेवा मी केल्यासारखीच आहे. मी दिवस-रात्र तुमच्यासाठी घरात राबले, म्हणून तर तुम्ही बाहेर काम करू शकला. ही सेवाच नव्हे ? सर्व प्रकारची कामं नि जबाबदाऱ्या माझ्या अंगावर टाकून तुम्ही मला गुलामासारखं राबवलं नाही ? माझा त्यात काही छळ झालाच नाही ?''

''कस्तुरबाचं म्हणणं खरं होतं. मला ते पटलं. परंतु अशाप्रकारे दागिने समाजाला परत करायचा मी निश्चय केला होता. मी कशीबशी कस्तुरबाची समजूत घातली आणि तिची संमती मिळविली. त्यानंतर कधीही या माझ्या निर्णयाबद्दल मला खेद करण्याची वेळ आली नाही. वर्षे गेली, तसे या निर्णयाचे महत्त्व माझ्या पत्नीच्याही लक्षात आले. भावी काळात अनेक मोहांपासून आम्हाला दूर ठेवले ते याच परधनाच्या भेटींचा लोभ न ठेवण्याच्या वृत्तीमुळे.''

: १२ :
हिंदुस्थानात आगमन

सन १९०१ च्या अखेरीस गांधीजी सहकुटुंब हिंदुस्थानात येऊन पोहोचले. त्याच वेळेस कलकत्ता येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरविण्यात आले होते. गांधीजी त्यास वेळेवर हजर राहू शकले. आफ्रिकेसंबंधीचा त्यांचा ठराव टाळ्यांच्या गजरात अधिवेशनात संमत करण्यात आला, हे पाहून त्यांना समाधान वाटले.

मात्र अधिवेशनात सर्वसाधारण वातावरण पाहून त्यांची निराशा झाली. देशातील राजकारणी बोलतात खूप पण कृतिशून्य असतात, असे त्यांचे मन झाले. उपस्थित प्रतिनिधीत जातीय अहंकार, उच्चनीचतेची भावन चांगलीच आहे, हे पाहून तर त्यांना दुःखच झाले. ''प्रतिनिधी आपआपसात जर अशी जातीय उच्चनीचतेची भावना ठेवून वागू शकतात, तर त्यांच्या मतदार संघातील सर्वसामान्य लोक कसे वागत असतील ? हा विचार मला अस्वस्थ करू लागला.''

अधिवेशनाच्या शिबिराच्या जागेतील अस्वच्छता पाहून तर त्यांना धक्काच बसला. त्याला काही सीमाच नव्हती. तेथील कचरा, घाण, दुर्गंधी पाहून गांधीजींनी तेथील स्वयंसेवकांचे लक्ष जेव्हां त्याकडे वेधले तेव्हां उत्तर मिळाले की ते त्यांचे काम नव्हते, तर भंगी-झाडुवाल्याचे होते. ''मी मग त्या स्वयंसेवकाकडे एक झाडू मागितला. ते लोक माझ्याकडे आश्चर्याने पाहू लागले. मी झाडू घेतला नि संडास साफ केले. पण ते माझ्यापुरते काम झाले. तेथे गर्दी एवढी होती, आणि संडास इतके कमी होते की साफसफाई सतत करण्याची गरज होती. मी तरी कसा त्या कामाला पुरणार ? तेव्हां होईल तेवढी साफसफाई मी केली. परंतु इतरांना तेथील घाणीचं आणि दुर्गंधीचं काही वाटत नसावं, असं मला वाटलं.''

देशाचा नैतिक ऱ्हास होत आहे, आणि सर्वत्र हतबलतेची भावना आहे, त्याची कारणं हुडकून काढण्याकडे गांधीजींचा कल होता. व्यासपीठावर जाऊन जोरजोराने राजकीय भाषणे ठोकणे त्यांना पसंत नव्हते. जनमानसात अद्यापी गांधीजींची प्रतिमा

उतरण्यास प्रारंभ झालेला नव्हता. राजकारणाकडे झुकलेले ते संत आहेत, धार्मिक वृत्तीचे ते राजकारणी आहेत, अशी त्यांची प्रतिमा नंतरच्या काळात जनमानसात निर्माण झाली, परंतु खरोखरी गांधीजी हे सामाजिक सुधारणा प्रत्यक्ष आचरणात आणू पाहणारे समाजसुधारक होते, आपला तथाकथित सुसंस्कृत समाज अनेक बाबतीत किती भ्रष्ट आहे, लाचलुचपतीने किती किडलेला आहे याकडे बारीक लक्ष देणारे ते महाधूर्त निरीक्षक होते.

गोखल्यांचे पाहुणे म्हणून गांधीजींनी कलकत्त्यात एक महिना घालविला. सांस्कृतिक आणि राजकीयदृष्ट्या कलकत्ता हे हिंदुस्थानातील एक मोठे आणि महत्त्वाचे केंद्र गणले जाते. आपल्या मुक्कामात शहर पाहून घ्यावे आणि तेथील मोठ्या लोकांना भेटावे अशी गांधीजींची इच्छा होती. तेथील कालीमातेच्या मंदिराबद्दल त्यांनी खूप ऐकले होते. एकदा ते मंदिर पाहण्यास गेले; परंतु कालीमातेच्या नावाने बकऱ्यांचे बलिदान करण्याचा तेथे रोज चाललेला धार्मिक कार्यक्रम आणि त्यामुळे निर्माण झालेला रक्त-मांसाची दुर्गंधी यांनी त्यांचे डोके उठले.

हा प्रसंग गांधीजी कधी विसरू शकले नाहीत. १९३२ साली येरवडा तुरुंगात, अपले वैयक्तिक चिटणीस श्री. महादेवभाई देसाई यांच्याशी बोलताना ते म्हणाले :

''आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देशात काहीना काही कारणासाठी सत्याग्रह होत राहतील. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर माझी अशी धारणा आहे की आपण कलकत्त्याला जावे, आणि धर्माच्या नावाने तेथे होणारी जनावरांची कत्तल थांबवावी. कालीघाट येथील बकऱ्यांचे जिणे देशातील अस्पृश्यांपेक्षाही भयंकर आहे. हे मुके प्राणी काही आपल्या शिंगांनी संहार करणाऱ्यांवर हल्ला करू शकत नाहीत. त्यांच्यातून काही एखादा डॉ. आंबेडकर उभा होऊ शकणार नाही. या हिंसाचाराची आठवण झाली की माझे रक्त तापते. बकऱ्याऐवजी हे लोक वाघांचा का बळी देत नाहीत ?'' गांधीजी संतापाने उद्गारले.

स्वामी विवेकानंद वा महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर यांना कलकत्त्यात असताना भेटता न आल्याबद्दल गांधीजींना वाईट वाटले. दोघेही त्यावेळी बरेच आजारी होते. त्यामुळे भेट घेणेही अवघड होते. महर्षींचे सुपुत्र रवींद्रनाथ ठाकूर यांची भेट घेता आली असती, असे कोणीही न म्हटल्याबद्दल त्यांना जरा आश्चर्यच वाटले. यानंतर १४ वर्षांनी गांधीजींची इच्छा फलद्रुप झाली आणि ते रवीन्द्रनाथांना भेटले. समकालीन आणि एकाच वयाचे दोघे होते. कालीघाट येथील कत्तल रवींद्रनाथांनाही पसंत नव्हती. त्यावेळी भेट झाली असती तर दोघा समविचारी, नि भावी नेत्यांची

ऐतिहासिक भेट आधीच झाली असती.

सन १८८५ मध्ये, गांधीजी मॅट्रिकच्या परिक्षेला बसण्याच्याही दोन वर्षे आधी, रवींद्रनाथांनी आपली 'राजर्षी' ही कादंबरी लिहायला घेतली होती. मुक्या प्राण्यांच्या बलिदानाविरुद्ध हिंदु समाजाचे मन जागृत करणे, हा त्या कादंबरीचा विषय होता. यानंतर तीन वर्षांनी रवींद्रनाथांनी 'विसर्जन' वा इंग्रजीत 'सॅक्रिफिस' हे नाटक लिहिले. परंतु पुढे आपल्या काव्याच्या जोरावर नोबेल पारितोषिक मिळविणारे रवींद्रनाथ आपल्या निवडक साहित्यिक वर्तुळाबाहेर फारसे कोणाला माहीतही नव्हते. अनेक टीकाकारांना तर त्यांच्या काव्याचे मोलही कळले नव्हते.

गावी राजकोटला जाताना गांधीजींनी वाटेत वाराणशी आणि दुसऱ्या काही गावांना भेटी दिल्या. रेल्वेने ते तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत. या वर्गाने प्रवास करणाऱ्या गरीब प्रवाशांचे काय हाल होतात, ते जाणून घेण्याचाही त्यांचा इरादा असे. रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यातील गैरसोयींना, रेल्वे खात्याची बेपर्वाई जबाबदार आहेच, परंतु आपल्या लोकांच्या घाणेरड्या सवयींमुळे त्या वर्गातून प्रवास करणे जीवावर येते, असे गांधीजींचे मत झाले होते. अज्ञानी, अडाणी लोकांच्या अशा घाणेरड्या सवयी जाव्या, सोयीत सुधारणा व्हावी म्हणून सुशिक्षित, सुखवस्तु प्रवाशांनी तिसऱ्या वर्गातून स्वखुषीने प्रवास करावा, असे त्यांचे म्हणणे होते.

स्वतः पुढे होऊन चांगल्या गोष्टींचा पायंडा पाडा आणि इतरेजनांसाठी झटा, हे गांधीजींच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचे मूळ सूत्र होते त्यामुळे अशा समस्या सुटतील असे ते म्हणत.

राजकोट येथे कायम बिऱ्हाड करून तेथेच वकिली व्यवसाय करण्याचा गांधीजींचा विचार चालला होता. राजकोटपेक्षा मुंबईत व्यवसाय चागला चालेल, खेरीज समाजसेवेचीही संधी मिळेल, असे त्यांना वारंवार सांगण्यात येत असे. या बाबतीत काही पक्का निर्णय घेण्याच्या आत , आणि बिऱ्हाड करून चांगली वकिली चालली नाही तोच, दरबानहून तार आली. आणि त्यांना तेथे ताबडतोब परतण्याची विनंती करण्यात आली...

जोसेफ चेंबरलेन आफ्रिकेला भेट देणार होते. त्यावेळी भारतीय समाजाचे नेतृत्व गांधीजींनी करावे, असे त्यांना तारेत कळविण्यात आले होते. अखेरीस बायको-मुलांना मागे सोडून गांधीजी, नियतीने त्यांच्या नशिबी लिहिलेल्या आफ्रिकेकडे निघाले.

: १३ :

पुन्हा युद्धभूमीकडे

दरबान येथील भारतीयांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्यासाठी गांधीजी लगबगीने आफ्रिकेला परतले, परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. भारतीयांची गाऱ्हाणी ऐकून घेण्यासाठी नव्हे, तर तेथील गोऱ्या प्रजाजनांकडून ३.५ कोटी पौंड देणगी मिळेल या आशेने, ब्रिटिश परराष्ट्र मंत्री आफ्रिकेतील वसाहतींच्या भेटीवर तेथे आले होते. परंतु तेवढ्याने गांधीजी नाउमेद होणारे नव्हते. श्री. चेंबरलेन यांच्यापाठोपाठ ते ट्रान्सवालला गेले. बोअर युद्धानंतर आता ट्रान्सवाल ही ब्रिटिशांची शाही वसाहत झाली होती.

दक्षिण आफ्रिकेत पाऊल टाकल्यानंतर लगेचच एकदा मागे गांधीजींनी ट्रान्सवालला भेट दिली होती. बोअर राजवटीत तेथील भारतीयांचे काय हाल चालले होते ते त्यांनी पाहिले होते. कारण बोअर लोकांचा वांशिक अहंकार चांगलाच होता. नाताळपेक्षाही तेथे भारतीयांच्या हालाला सीमा नव्हती. आता ही वसाहत ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आल्यानंतर भारतीयांचे हाल कमी झाले असतील, अशी गांधीजींना आशा वाटत होती. बोअर युद्धात भारतीय समाजाने केलेली सेवा लक्षात घेऊन नवी राजवट भारतीयांना सहानुभूतीने वागवील, असे त्यांना वाटत होते. परंतु पूर्वीचे निर्बंध कमी होण्याऐवजी ते अधिकाधिक कडक करण्याचा राज्यकर्त्यांचा प्रयत्न आहे, हे पाहून गांधीजींना आश्चर्याचा धक्काच बसला. सध्या ते एकटेच होते. कुटुंबातील सर्वजण अद्याप भारतातच होते. परंतु जसजसे दिवस जाऊ लागले, तसे त्यांच्या लक्षात आले की परिस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत आहे. तसेच झगडण्याचा व्यापही वाढत आहे. वांशिक भेदभाव आता अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करीत असून त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचा स्वाभिमान आणि सुरक्षितता यांना वाढता धोका निर्माण होत असताना आपण लोकांचे नेतृत्व सोडून जायचे कसे ?

गांधीजींनी मग तेथेच राहाण्याचा निर्धार केला. यावेळी जोहान्सबर्ग येथे त्यांनी आपले निवासस्थान आणि कार्यालय ठेवले. तेथील सर्वोच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून त्यांची नोंदणी करण्यात आली. ट्रान्सवाल येथे यावेळी संघर्ष वाढत चालल्याने त्यांना अनेकदा तेथे जावे लागे. लढाईच्या मैदानावर ऐन मध्यभागी उभे राहून लढा देणे गांधीजींना पसंत असे.

त्या शापित भूमीवर अखेर गांधीर्जीचा लढा सुरू झाला. लढ्यांची ही त्यांची तिसरी वेळ होती. या भूमीवर अखेर त्यांना त्यांचा खरा ईश्वर गवसला. आपल्या लोकांची बाजू घेऊन लढणारा खरा नेता अशी त्यांची प्रतिमा आता जनमानसात रुजू लागली होती. त्यासाठी कोणत्या प्रचाराची गरज नव्हती. आपली बाजू नीट समजावून घेऊन लढणारा हा एक कार्यक्षम वकील आणि नेता आहे, याची तेथील भारतीयांना आता खात्री पटली होती. त्यामुळे कोर्टातील कामेही वाढत होती. नवंनवी खटल्याची कामे येत होती, परंतु गांधीर्जीना ती हाती घेण्यास आता वेळही पुरत नव्हता.

दरबानप्रमाणेच जोहान्सबर्ग येथेही गांधीजींनी विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या. आपल्या समाजाची होईल तितकी सेवा करावी हीच त्यामागे भावना होती. लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून द्यावी, पुढील कारवाईसाठी त्यांना संघटित करावे आणि त्यांच्या हतबुद्ध, भयभीत मनात नवा जोश, आत्मविश्वास आणि नवी उमेद निर्माण करांवी यासाठी ते धडपडत होते. व्यवसाय करायचा तो फक्त पोटापुरते चार पैसे मिळविण्यासाठी.

ट्रान्सवाल येथे कार्यालय आणि निवासस्थान असले तरी गांधीजींचे नाताळ येथील, फार मोठ्या संख्येने असलेल्या, भारतीय समाजाकडे दुर्लक्ष झालेले नव्हते. त्यामुळे त्यांच्या सेवाकार्याचा व्याप आणि क्षेत्रविस्तार वाढत चालला होता. गांधीर्जींच्या सभांची संख्याही आता वाढू लागली होती आणि श्रोतृवर्गाचे स्वरूपही ठिकठिकाणी बदलत होते. एकीकडे ब्रिटिश नोकरशाहीबरोबर त्यांना वाटाघाटी कराव्या लागत, तर दुसरीकडे सूडासाठी संधीची वाट पाहणाऱ्या वांशिकदृष्ट्या महा अहंकारी अशा गोऱ्या बोअर लोकांचीही त्यांना समजूत घालावी लागे. इकडे भारतीय समाजाकडे वळावे, तो त्यातही विविध थरातील, विविध भाषी नागरिकांचा विचार करून भाषणे द्यावी लागत. अशा विविध प्रकारच्या समाजघटकांशी सतत संपर्क ठेवणे कसे शक्य व्हावे ?

हा विचार अस्वस्थ करीत असतानाच दरबान येथून एक विविध-भाषी साप्ताहिक सुरू करण्याचा प्रस्ताव पुढे आला. गांधीजींनी या सूचनेचे स्वागत केले. परिणामी

इंग्रजी, गुजराती, हिंदी आणि तमिळ भाषेत 'इंडियन ओपिनियन' हे साप्ताहिक सुरू झाले. औपचारिकरीत्या हे साप्ताहिक त्यांच्या पूर्णतया मालकीचे नव्हते. तरीही त्याची आर्थिक आणि संपादकीय जबाबदारी मुख्यत्वे त्यांच्याच अंगावर पडली.

हाती घेतलेले प्रत्येक कार्य गांधीजी अत्यंत काटेकोरपणे आणि जबाबदारीने पार पाडीत. येथेही अपवाद नव्हता. व्यावसायिक नीतिमत्ता, आणि वृत्तपत्र व्यवसायातील शिस्त, तंत्र आणि आचार संहिता येथेही त्यांनी काटेकोरपणे पाळली, ''इंडियन ओपिनियन' सुरू केले तेव्हा पहिल्याच महिन्यात माझ्या लक्षात आले की वृत्तपत्रव्यवसाय ही सेवा आहे. वृत्तपत्र ही शक्ती आहे. परंतु जोराने वाहणाऱ्या पाण्याच्या अखंड प्रवाहाला योग्य तो बांध घातला नाही, तर फार मोठी हानी होऊ शकते. याबाबतीत संयम मनापासून पाळला नाही, तर तो नियंत्रणाअभावी होणाऱ्या हानीपेक्षाही भयंकर ठरेल-म्हणून हे बंधन आपण विचारपूर्वक स्वत:वरच घातले पाहिजे.''

यानंतर १९०४ मध्ये भारतीयांच्या जोहान्सबर्ग येथील वस्तीत प्लेगचा प्रादुर्भाव झाला. ही वस्ती म्हणजे एक नरकच होता. कारण येथील स्वच्छतेकडे नगरपालिकेचे पार दुर्लक्ष होते. कारण येथे मुख्यत्वे भारतीय मजूर रहात. त्यांना याआधी मालकीच्या जमिनीवरून हाकलून लावल्याने एका मर्यादित क्षेत्रफळाच्या जागेत अनेक बिऱ्हाडे दाटीवाटीने रहात असत. अत्यंत गलिच्छ अशी, आणि नगरपालिकेच्याच मालकीची ही जागा होती. येथील बरेच मजूर नजिकच्या सोन्याच्या खाणीत काम करीत. तेथील निग्रो सहकाऱ्यांकडून त्यांना या रोगाची प्रथम लागण झाली.

ही बातमी कानी येताच एका सायकलवर बसून गांधीजी ज्या वस्तीकडे धावले. एका बंद खोलीत २३ रुग्णांना कोंडण्यात आले होते. त्या खोलीचे कुलूप फोडावे लागले. गांधीजींनी मग त्या रुग्णांचा ताबा घेतला. काही भारतीय सहकारी, दयाळू स्वभावाचे डॉ. गॉडफ्रे यांच्या मदतीने गांधीजींनी धोका पत्करून दिवसरात्र त्या रुग्णांची सेवा केली. या रुग्णांपैकी फक्त दोघे जण वाचले. नगरपालिकेनं पाठविलेली एक गोरी परिचारिकाही या रोगाला बळी पडली.

या सर्व प्रकरणात, नगरपालिकेनं केलेल्या बेपर्वाईचा, गांधीजींनी वृत्तपत्रात पत्र लिहून समाचार घेतला. पत्रातील मुद्यांना आणि आरोपांना उत्तर देणं सोपं नव्हतं. अत्यंत मुद्देसूद आणि निर्भयपणे लिहिलेल्या त्या पत्रातील मजकूर वाचून अनेक गोरे लोकही गांधीजींच्या मताशी सहमत झाले. त्यामुळे, जोहान्सबर्गमधील अनेक गोऱ्या नागरिकांचा पुढे आयुष्यभर गांधीजींना स्नेह लाभला.

यांपैकी एक म्हणजे मि. अलबर्ट वेस्ट होत. एका छापखान्याचे ते भागीदार होते. शाकाहारी असल्याने गांधीजी जात असलेल्या शाकाहारी भोजनालयात उभयतांची भेट होत असे. दोघे फिरायलाही बरोबर जात. जोहान्सबर्गमधील त्या वस्तीतील प्लेगच्या लागणीचे वृत्त कानावर येताच मि. वेस्ट यांनी तेथे सेवा-शुश्रूषा करण्याची गांधीजींपाशी तयारी दर्शविली. परंतु या धोक्यापासून त्यांनी दूर रहावे आणि त्याऐवजी दरबान येथून प्रकाशित होणाऱ्या 'इंडियन ओपिनियन' 'या साप्ताहिकाची जबाबदारी घ्यावी, असे गांधीजींनी सुचविले. मि. वेस्ट तात्काळ कबूल झाले आणि दुसऱ्याच दिवशी दरबानला रवाना झाले. ''त्या दिवसापासून मी आफ्रिकेचा किनारा सोडीपर्यंत श्रीयुत वेस्ट माझ्या आनंदात आणि दुःखात सतत सहभागी होत राहिले.'' असं गांधीजींनी लिहून ठेवले आहे.

: १४ :
व्यक्तिगत शोध

या कालखंडात गांधीजींवरील व्यावसायिक तसेच राजकीय आणि सामाजिक स्वरूपाच्या जबाबदाऱ्या वाढत होत्या. या कार्यासाठी त्यांना फार वेळ द्यावा लागे. परंतु आपली आत्मिक उन्नती साधण्याकडे गांधीजींचे दुर्लक्ष नव्हते. कोणत्याही प्रश्नाचा विचार करताना आपला आतला आवाज काय म्हणतो ते गांधीजी लक्षात घेत. त्याचवेळी आपल्या शरीरधर्माची कशी काळजी घ्यावी त्याकडेही त्यांचे बारीक लक्ष असे. आत्मा आणि शरीर या मानवी जीवनाच्या दोन अविभाज्य बाजू असून नैष्ठिक आचारधर्म आपण पाळला आणि शरीरधर्माची काळजी घेऊन ते उत्तम स्थितीत ठेवले, तर मानवाला सत्य गवसण्याचा मार्ग सापडेल, असे गांधीजी मानीत. धार्मिक श्रद्धा मानवाला सामर्थ्य आणि शक्ती मिळवून देतात, तर नैतिक मूल्ये त्याला आयुष्याच्या वाटचालीत मार्गदर्शन करतात, असे गांधीजी मानीत.

लंडन आणि दरबान येथे असताना गांधीजींनी बायबल आणि गीता आयुष्यात प्रथमच नीट वाचून काढली. ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्त्वाने आणि पर्वतावरील त्याच्या प्रवचनाने ते चांगलेच प्रभावित झाले होते. त्यांना त्यापासून आत्मिक आणि नैतिक प्रेरणा मिळाली होती.

जोहान्सबर्ग येथेही लंडनप्रमाणेच त्यांना काही थिऑसफीच्या उपासकांचा स्नेह लाभला. गांधीजींना त्यांचे सान्निध्य आनंद देई. विशेष म्हणजे या उपासकांना हिंदुंच्या धर्मग्रंथात, विशेषत: गीतेमध्ये विशेष रस असल्याने, आपल्या धर्माकडे वळण्याची आणि त्यापासून नवे सामर्थ्य मिळविण्याची गांधीजींना मोठी प्रेरणा मिळाली. निष्काम कर्मयोगी आणि स्थितप्रज्ञ यांची जी लक्षणे गीतेत वर्णिली आहेत, ती वाचून गांधीजींच्या मनावर फार परिणाम झाला. विकारी मनाच्या मुक्तीसाठी आपणही असेच कर्मयोगी आणि स्थितप्रज्ञ व्हावे, असे गांधीजींना तीव्रतेनं वाटू लागले.

अलिकडेच मुंबईस गेले असताना गांधीजींनी एका अमेरिकन विमा एजंटाकडून १०,००० रुपयांची आयुर्विमा पॉलिसी घेतली होती. त्यांच्या मनात मग विचार आला, ईश्वराच्या करणीवर श्रद्धा असलेल्याने अशाप्रकारे आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेची सोय करून ठेवणे कितपत योग्य होते ? ''जगात किती दरिद्री आणि दुःखी कुटुंबं आहेत. त्यांना कोठे आहे सुरक्षितता ? मग मीच काय म्हणून त्याचा विचार करावा ? मीही त्यांच्यापैकी एक नव्हे काय ?'' एकदा एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवला, ती गोष्ट मनाला पटली की त्याप्रमाणे वागायचे हा गांधीजींचा पणच होता. अर्थात त्यानुसार ती विमापॉलिसी कालांतराने रद्द होईल अशी व्यवस्था केली. यामुळे भावाचा त्यांनी इतका रोष ओढवून घेतला की लवकरच त्यानेही गांधीजींशी सारे संबंध तोडले. गांधीजींच्या पत्नीला फार वाईट वाटले. आपल्या मुलांच्या भवितव्याचा काही विचारच नवरा करीत नाही, अशी तिची खात्री झाली. परंतु गांधीजींनी एकदा मनात आणले की कोणीही त्यांना अडवू शकत नव्हते.

आरोग्याचे नियम पाळायचे म्हणजे निसर्गाशी समतोल सांभाळायचा, असे गांधीजींचे समीकरण होते आणि हा तोल सांभाळण्यासाठी आरोग्याचे अनेक नियम ते पाळीत. हे त्यांचे फॅड आहे, नसते उपद्व्याप आहेत, ते झपाटल्यागत वागत आहेत, असे अनेकजण म्हणत. यानुसार ते शाकाहाराचा पुरस्कार करीत, आहारासंबंधी अनेक प्रयोग करून पहात, अंगाला माती फासून मृत्तिकास्नानाचा प्रयोग करीत आणि मादक द्रव्ये तसेच विलायती औषधे कधी घेत नसत. विकार बरे होण्यासाठी पाण्याचा विविध प्रकारे उपयोग करून घ्यावा, किंवा 'निसर्गाकडे वळावे' याचाच ते पुरस्कार आणि प्रयोग करीत. मुंबईस असताना त्यांचा मुलगा मणिलाल हा टायफॉईड आणि न्युमोनियाने आजारी झाला असता, गार पाण्याचा उपयोग करण्याच्या तंत्राचा त्यांनी यशस्वी अवलंब केला होता.

गांधीजींना आपल्या भारतीयत्वाबद्दल अभिमान असला तरी त्यांच्या नैतिक आणि मानसिक दृष्टिकोनावर पाश्चात्य संपर्काचा बराच परिणाम झाला होता. आरोग्य आणि स्वच्छतेची काटेकोर काळजी घेण्याची गांधीजींची आवड, त्यांच्या आहारविषयक सवयी, त्यासंबंधीचे प्रयोग, वक्तशीरपणाची आवड, आणि प्रत्येक गोष्ट का आणि कशी ते जाणून घेण्याचे कुतूहल या गोष्टी काही परंपरागत हिंदू कुटुंबाचा वारसा सांगणाऱ्या नव्हत्या. त्यांच्या धार्मिक विचारसरणीवर आणि नैतिकदृष्ट्या सावध आचरणावर ख्रिस्त, टॉलस्टॉय, रस्किन आणि थोरो यांच्याप्रमाणेच जैन धर्मातील आणि गीतेतील तत्त्वांचा फार मोठा प्रभाव पडला होता. गांधीजींचे एक गुजराती जवाहिरे स्नेही रायचंदभाई यांच्या उपदेशाचाही गांधींवर फार परिणाम झाला होता. उत्तर आयुष्यात गांधीजी फक्त साध्या कापडाचे

वा खादीचे धोतर नेसू लागले तेव्हा त्यांनी खरा भारतीय बाणा दाखविला, ते खरे भारतीय आहेत, अशी त्यांची अतिशयोक्त प्रशंसा झाली. परंतु या विधानात फारसे तथ्य नव्हते.

दक्षिण अफ्रिकेत असताना अनेक युरोपीय नागरिक गांधीजींचे चांगले स्नेही होते. त्यांचीही आठवण ते विसरू शकत नव्हते. काही जणांची मैत्री तर दीर्घकाळ टिकली. गांधीजींनी त्यांच्यावर प्रभाव टाकलाच, त्याचप्रमाणे अनेक चांगल्या गोष्टी त्यांच्याकडून शिकूनही घेतल्या. जोहान्सबर्ग येथील प्लेगच्या साथीत त्यांना दोन स्नेही लाभले. यांपैकी अल्बर्ट वेस्ट यांचा निर्देश याआधीच केला आहे. त्यांनी 'इंडियन ओपिनियन''च्या संपादकत्वाची धुरा सांभाळली. दुसरे होते हेन्री पोलाक हे एक तरुण इंग्रज गृहस्थ. ते त्यावेळी 'ट्रान्सवाल क्रिटिक' या नियतकालिकाच्या संपादक मंडळात होते.

प्लेगच्या साथीच्या वेळी स्थानिक नगरपालिकेने स्वच्छतेच्या बाबतीत दाखविलेली अनास्था पाहून गांधीजींनी तीव्र सौम्य भाषेत परंतु सुस्पष्टपणे इतकी जोरदार टीका केली की ती वाचून पोलाक यांना गांधीजींची भेट घेण्याची इच्छा झाली. श्री. पोलाक शाकाहारी होते, टॉलस्टायचे भक्त होते आणि 'निसर्गाकडे चला' या तत्वाचे होते, त्यामुळे उभयतांचे स्नेहसंबंध लगेचच जुळून आले. लवकरच श्री. पोलाक यांनी आपले नियतकालिक सोडले आणि ते गांधीजींचे क्लार्क म्हणून रुजू झाले. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असेतो श्री. पोलाक यांनी खाजगी, सार्वजनिक आणि कार्यालयीन क्षेत्रात गांधीजींचे उजवे हात म्हणून सतत कष्ट उपसले. इतकेच नव्हे तर आहाराच्या आवडीनिवडीच्या बाबतीत आणि नैसर्गिक उपचार पद्धतीच्या बाबतही गांधीजींनी चालविलेल्या प्रयोगात ते सतत सहभागी झाले.

श्री. पोलाक यांची वाग्दत्त वधू मिली ग्रॅहॅम इंग्लंडहून आली तेव्हा या जोडप्याच्या विवाहाला 'करवले' (Best man) म्हणून गांधीजीच उपस्थित होते. गोऱ्यांच्या विवाहात एखाद्या काळ्या व्यक्तीने अशाप्रकारे प्रामुख्याने सहभागी होण्याचा दक्षिण आफ्रिकेतील तो पहिलाच प्रसंग असावा. त्याप्रसंगाने गोऱ्या विवाह नोंदणी अधिकाऱ्याला उगाचच अस्वस्थ केले. पोलाक दाम्पत्य नेहमी गांधीजींच्या बिऱ्हाडी येई. त्यांनी लिहिलेल्या आठवणी, गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्याचे आणि दैनंदिन जीवनाचे खरेखुरे दर्शन घडवितात. एक माणूस म्हणून गांधीजी आपल्याला कसे दिसले त्याचे श्रीमती मिली ग्रॅहॅमने चांगले वर्णन केले आहे. तिला माणसं चांगली पारखता येत.

जॉन रस्किन यांच्या 'अन् टू दि लास्ट' या ग्रंथाचा गांधीजींवर फार प्रभाव होता. श्री. हेन्री पोलाक यांनीच हे पुस्तक प्रथम गांधीजींना वाचायला दिले. 'इंडियन ओपीनियन'च्या कामासाठी गांधीजींना अधूनमधून दरबानला जावे लागे. एकदा ते तसे निघाले असता श्री. पोलाक यांनी त्यांना जोहान्सबर्ग स्टेशनपर्यंत सोबत केली. स्टेशनवरच पोलाक यांनी ते पुस्तक गांधीजींना प्रवासात वाचायला म्हणून दिले. ''या पुस्तकाचा किती खोलवर परिणाम होईल याची त्यावेळी मला कल्पनाही आली नाही.'' गांधीजींनी गाडी सुरू होताच पुस्तक उघडले ते संपल्यावरच खाली ठेवले.

आपला सिद्धान्त मांडताना श्री. रस्किन यांनी गांधीजींचेच काही विचार, काही मतं अधिक सुसूत्रपणे, अधिक खोलवर विवेचन करून या पुस्तकात मांडली आहेत, असं त्यांना आढळून आलं. गांधीजींनी आपले विचार आतापर्यंत कोठे नीटपणे मांडले नव्हते. मात्र रस्किनची आणि आपली मतं अन् विचार जुळतात, याची त्यांना खात्री झाली. समाजातील सर्वांचे कल्याण हेच त्या समाजव्यवस्थेचे खरे वैभव होय; असे रस्किन यांनी म्हटले होते. सर्वांचे भले झाले तर व्यक्तीचे त्यात भले आहे; तसेच कोणतेही काम कमी दर्जाचे असू शकत नाही, असे रस्किन यांनी म्हटले होते. वकिलाच्या वा इंजिनिअरच्या कामापेक्षा न्हाव्याचे काम कमी श्रेणीचे आहे, असे मानता येणार नाही; तसेच श्रमाचे काम हलके नी बुद्धीचे काम उच्च असा भेदाभेदही योग्य नव्हे, असा युक्तिवाद श्री. रस्किन यांनी आपल्या सिद्धान्तात केला होता. गांधीजींनी या ग्रंथाचा गुजराती भाषेत अनुवाद केला तेव्हा पुस्तकाला 'सर्वोदय' : सर्वाचे कल्याण सर्वांचे भले असे शीर्षक देण्यात आले. आज भारतात 'सर्वोदय' हा शब्द सर्वत्र लोकप्रिय झाला आहे. सामाजिक-आर्थिक सुधारणाविषयक गांधीवादी विचार म्हणजे सर्वोदय असे हे समीकरण झाले आहे.

गाडी दरबानला पोहोचण्याच्या आत रस्किनचे विचार अंमलात आणण्याचा गांधीजींचा निर्धार झाला होता. गांधीजींनी मग १०० एकराचा एक पडिक शेत-मळा विकत घेतला. त्यात काही फळझाडे आणि एक वाहता झरा होता. आपले स्नेही अल्बर्ट वेस्ट आणि कांही सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी 'इंडियन ओपिनियन' चे कार्यालय आणि छापखाना तेथे हलविला. तेथेच एका पडक्या घरात हा संसार सुरू झाला. या जागेत सर्वत्र गवत माजले होते, आणि सापांचाही सुळसुळाट होता. सर्वांनी मिळून जागा साफ केली आणि त्याचे रूपांतर एका टुमदार वसाहतीत करण्यात आले. येथे प्रत्येक कामगाराला एक भूखंड देण्यात आला. त्याने तेथेच काम करून आपले उत्पन्न काढायचे असे ठरले. प्रारंभी प्रत्येकाला महिना तीन पौंड वेतन ठरले. दरबान- पासून ही वसाहत १४ मैल आणि फिनिक्स स्टेशनपासून

अडीच मैल होती. ''फिनिक्स वसाहत'' म्हणून नंतर ती ओळखली जाऊ लागली. या वसाहतीतील जीवनात आपण कायम सहभागी व्हावे अशी गांधीजींची इच्छा होती, परंतु व्यावसायिक तसेच सार्वजनिक कामासाठी त्यांना सतत जोहान्सबर्गला जावे लागे. नियतीने त्यांना लढवय्याची भूमिका सुपूर्द केली होती, शेतकऱ्याची नव्हे. मात्र भावी काळात जेव्हा केव्हा न्यायालयात त्यांना त्यांचा पेशा विचारला जात असे तेव्हां ते आपण शेतकरी वा विणकर असल्याचे सांगत. असंघटित, दुर्दैवी, हतबल समाजातून लढवय्यांची एक जबरदस्त प्रभावी सेना त्यांना उभी करायची होती. आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठीच नव्हे तर त्याचबरोबर 'इंडियन ओपिनियन' हे साप्ताहिक आणि फिनिक्स वसाहत धडपणे चालविण्यासाठी पैसे उभे करण्याची वाढती जबाबदारी गांधीजींच्यावर आता येऊन पडली होती.

: १५ :

जोहान्सबर्ग येथील घरसंसार

यापुढे आपल्याला दक्षिण अफ्रिकेत अनिश्चित काळपर्यंत रहावे लागणार, हे लक्षात घेऊन गांधीजींनी आपल्या कुटुंबियांना आफ्रिकेत बोलावण्याचा निर्णय घेतला. जोहान्सबर्ग येथे बिऱ्हाड केल्यानंतर श्रीयुत आणि श्रीमती पोलाकही गांधी कुटुंबाबरोबर राहू लागले. दरबानपेक्षा जोहान्सबर्ग येथील बिऱ्हाडाचे अंतरंग वेगळे होते. दरबान येथे बिऱ्हाड असताना, तरुण गांधींनी आपला व्यवसाय आणि प्रतिष्ठा यांना साजेशी घराची सजावट केली होती.

जोहान्सबर्ग येथे बिऱ्हाड केल्यानंतर घरखर्चाला मर्यादा घालण्यात आली. घरातील फर्निचरही साधेसुधेच ठेवण्यात आले. गडीमाणसांनाही फाटा देण्यात आला. ब्रेड घरातच तयार करण्यात येई. त्यासाठी लागणारे पीठ-मैदा वगैरे घरातच दळण्यात येई. रोज सकाळी हे दळणाचे काम चाले आणि त्यास कुटुंबातील सर्व पुरुष मंडळी आळीपाळीनं हातभार लावीत. रहाणी साधीसुधी असली तरी घरात वातावरण प्रसन्न आणि स्नेहपूर्ण असे. ''घरात दळण चालू असताना हास्य-विनोदालाही जोर येत असे.'' अशी आठवण देऊन श्रीमती पोलाक म्हणतात ''त्या दिवसात घर कसे सतत आनंदाने भरलेले असे. अन्य कामे अधूनमधून वाट्याला येत. गांधीजीही कामे करीत.''

त्यांनी आता सकाळच्या न्याहारीला फाटा दिला होता. सकाळ-संध्याकाळ घरापासून कार्यालयापर्यंत आणि परत ते सहा मैल अंतर चालून जात. घरात आता आहाराच्या बाबतीत अनेक प्रयोग चालत. गांधीजी आणि श्रीयुत पोलाक या उभयतांचा याबाबतीतला उत्साह अमर्याद होता; घरातील माणसं या प्रयोगांना अनेकदा हसत. त्याचवेळी हे प्रयोग म्हणजे दोघांच्या बायकांना एक डोकेदुखीच असे. काही महिने तर अन्नपदार्थ मिठावाचून आळणीच शिजविण्यात आले. यानंतर अन्नपदार्थात कोठेही साखर न घालण्याचे प्रयोग सुरू झाले. ''यावर कडी म्हणजे

अन्नपदार्थ गरम करून न शिजवता तसेच ऑलिव्ह तेलात परतून वाढण्यात येऊ लागले.'' विविध अन्नपदार्थांचे गुणधर्म काय आणि मानवी शरीरावर, आणि नैतिक आचरणावरही त्यांचं काय परिणाम होतो, यावर घरात तासन्‌तास चर्चा नि प्रयोग चाले. कांदा रक्तशुद्धीसाठी चांगला म्हणून रोजच्या जेवणात कांद्याच्या फोडी वाढण्यात येऊ लागल्या. ''गांधीजींना स्पॅनिश जातीचा कांदा इतका आवडत असे, की मी त्या कुटुंबात येण्यापूर्वी, गांधीजी आणि त्यांचे काही शाकाहारी मित्र त्यासाठी जोहान्सबर्ग येथील एका शाकाहारी भोजनालयात नेहमी जात. या लोकांनी म्हणे 'कांदा सेवन करणाऱ्या मित्रमंडळाची संस्था' असे स्वत:चे गमतीने वर्णन करण्यास सुरुवात केली होती. मात्र, अखेरीस कांदा फार उत्तेजक असतो या निर्णयास गांधीजी आल्याने त्यांनी कांदा खाणे सोडले. दूधदेखील 'विकारी' असते असे वाटल्याने गांधीजींनी मग दूध घेणेही सोडले.

गांधीजींनी कायद्याची चांगली माहिती असल्याने आणि अत्यंत नि:स्पृहपणे कोर्टात ते कायद्याची बाजू मांडत असल्याने त्यांच्या सहकाऱ्यांना तसेच न्यायालयालाही त्यांच्याविषयी फार आदर वाटत असे. जाणूनबुजून असत्य बाजू ते कधी मांडत नसत, आणि आपले अशिल निरपराध आहे याची स्वत: खात्री करून घेतल्याखेरीज ते कोणाचे वकिलपत्रही घेत नसत. कोर्टात बाजू मांडताना कधी लक्षात आले की आपले अशिल आपली दिशाभूल करीत आहे, खोटे सांगत आहे, तर भर न्यायालयात ते क्षमा मागून मोकळे होत, आपले वकिलपत्र रद्द करीत आणि न्यायालयातून बाहेर पडत, ''प्रत्येक पक्षकाराला याची आधीच कल्पना दिली जात असे आणि त्याच पायावर वकिलपत्र घेतले जात असे.''

श्रीमती पोलाक यांनी यासंबंधीचा एक मजेदार किस्सा कथन केला आहे. एका माणसावर चोरीचा आरोप होता. आपण निरपराध आहोत असं सांगून गांधीजींनी आपली बाजू मांडावी अशी त्याने गळ घातली. परंतु त्याची गांधीजींनी उलटतपासणी करताच त्यानं आपण चोरी केली होती हे कबूल केले. ''तू असं का केलंस ?'' ''असं गांधीजींनी विचारताच तो म्हणाला की, ''जगण्यासाठी मला तसं करावे लागलं.'' ''जगण्यासाठी ?'' गांधीजी उद्‌गारले, ''का ?'' तुम्हाला जर प्रामाणिकपणाने जगताच येत नसेल तर तुम्ही जगावेच का ? असं याबाबतीत गांधीजींचं म्हणणं होतं.

''तेव्हापासून मी या घटनेचा सारखा विचार करते आहे-'' श्रीमती पोलाक म्हणाल्या. ''विशेषत: त्या संवादाच्या अखेरीस गांधीजींनी ''का ?'' असा जो प्रश्न केला तो मला महत्त्वाचा वाटतो. गांधीजींची मनोरचना कशी होती ते यावरून

लक्षात येतं. "तुम्ही का आणि कशासाठी जगावे ? जीवनात तुमची भूमिका काय ? या वाटचालीत तुमचा वाटा कोणता ?" हे प्रश्न सतत गांधीजींसमोर होते.

परंतु अखेरीस, आयुष्यातील, त्यांचे साधे-सोपे शांततापूर्ण प्रयोग अल्पजीवीच ठरले.

: १६ :
झुलू बंड आणि त्यानंतर

सन १९०६ च्या फेब्रुवारी महिन्यात तथाकथित झुलू बंड सुरू झाले. या संघर्षाची गांधीजींना चांगलीच माहिती होती. लष्करी कारवाईच्या नावाखाली येथे मानवसंहाराचे सत्र सुरू झाले होते. गांधीजींची सहानुभूती झुलू लोकांकडे होती. हे लोक स्वभावाने निष्पाप, निरागस होते; परंतु त्यांच्याविषयी गैरसमजच फार पसरविले जात होते. त्यांच्याच देशातून आता त्यांना पिटाळून लावण्यात येत होते. परंतु ''जगाच्या कल्याणासाठी'' तसेच ब्रिटिश नागरिक म्हणून असलेली आपली निष्ठा लक्षात घेऊन गोऱ्या लोकांना पाठिंबा देणे आपले कर्तव्य आहे, असा गांधीजींचा तोपर्यंत समज होता. याच दृष्टिकोनातून त्यांनी याआधी बोअर युद्धात ब्रिटिशांना वैद्यकीय शुश्रूषा पथके पुरवून मदत केली होती. झुलू लोकांविरुद्धच्या कारवाईतही भारतीय वैद्यकीय शुश्रूषा पथक पाठविण्याची त्यांनी तयारी दर्शविली. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी या मदतीचा स्वीकार करण्याची तयारी दर्शविली. त्याचवेळी एका पत्रकाराने ''नाताळ ॲडव्हर्टायझर'' या नियतकालिकात भारतीयांविरुद्ध गरळ ओकण्यास कमी केले नाही. ''रणांगणातून भारतीय पळून जाऊ नयेत म्हणून त्यांना आघाडीवर पाठविण्यात यावे. त्यांची आणि स्थानिक (नेटिव्ह) झुलू लोकांची मग जी काही जुंपेल ती पहायला मजा येईल.'' असा बेताल मजकूर या पत्रकाराने खरडला. त्यास ''इंडियन ओपिनियन''मधून उत्तर देताना गांधीजींनी लिहिलं की, ''असं खरोखरीच आम्हाला आघाडीवर पाठवलं तर दुसरी चांगली गोष्ट नाही. आम्ही भेकड असू तर आमच्या नशिबात असेल ते भोगू, आणि शूर असू तर आघाडीवर सेवा करण्याइतकं भाग्य दुसरे नसेल.''

ब्रिटिश गोरे लोक किती शूर असतात ते प्रत्यक्षच गांधीजींना पहायला मिळाले. आपले वैद्यकीय शुश्रूषा पथक घेऊन ते त्या तथाकथित ''बंडांच्या क्षेत्रात जाऊन पोहोचले. प्रत्यक्षात तेथे कोठेही सशस्त्र प्रतिकार होत नव्हता. झुलू लोकांची ती एक

करविरोधी चळवळ होती, परंतु बंड म्हणून तिचे वर्णन करून ती दडपून टाकण्याचा हा सारा माणुसकीला काळिमा आणणारा खटाटोप होता. त्या आघाडीवरून जखमी ब्रिटिश सैनिकांना वा झुलू बंडखोरांना नव्हे तर पकडून आणलेल्या झुलू लोकांना वाहून नेण्याची कामगिरी भारतीय शुश्रूषा पथकाच्या वाहनांना करावी लागली. झुलू लोकांना तेथे चांगलेच झोडपण्यात येई, अनेक जणांच्या जखमातून सतत रक्तस्राव सुरू असे, परंतु एकही गोरी परिचारिका या जखमी लोकांची सेवा करायला पुढे येत नसे.

या आघाडीवरील आठवणी सांगताना गांधीजींनी पुढं म्हटलं. ''तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यानं आमचं चांगलं स्वागत केलं. त्या निरागस, निष्पाप झुलू लोकांना आमची चांगली मदत होईल, अशी त्याला खात्री होती. त्याने आम्हाला जखमा बांधण्यासाठी कापूस, आयोडिन, बॅण्डेज वगैरे दिली. एका तात्पुरत्या उभारलेल्या इस्पितळात त्याने आम्हाला नेले. आम्हाला पाहून झुलू लोकांना मोठा आनंद झाला. ब्रिटिश सैनिक इस्पितळाबाहेरून खिडक्यातून डोकावून आम्ही चालवलेली झुलू लोकांची शुश्रूषा पाहात, आणि आम्ही त्यांची अशी शुश्रूषा व सेवा करू नये, असे ओरडून सांगत. आम्ही त्यांच्या ओरडण्याकडे लक्ष देत नसल्याने मग हे सैनिक झुलू लोकांना हव्या तशा शिव्या देत असत.

''कधीमधी एका दिवसात अत्यंत दुर्गम, खडबडीत रस्त्यावरून स्ट्रेचर वाहून नेताना, ४० मैलांची मजल मारावी लागे. आमच्या गाड्यांच्या ताफ्यामागे दारूगोळा, तोफा नेणाऱ्या गाड्या असत. आणि या वाटचालीत मागे वळून पाहिले की त्या तोफखान्याच्या मागे दूरवर अधूनमधून झुलू लोकांची छोटी छोटी शांत गावं पसरलेली दिसत. अनेक गावं उद्ध्वस्त झालेली असत. अनेकदा, झुलू लोकांना पकडून त्यांना चाबकाचे फटके लगावीत, कसे ओढीत, फरफटत नेण्यात येत आहे, ते केविलवाणे दृश्य पाहण्याचेही नशिबी येई. अंगावर शहारे आणणारा, संतापजनक असा तो अनुभव असे. परंतु जखमी झुलूंची शुश्रूषा करण्यापुरते आमच्या शुश्रूषा पथकाचे कार्य मर्यादित असल्याने तो अन्याय, अपमान मुकाट्याने गिळावा लागे.''

मानवाने मानवाचा चालविलेला निर्घृण संहार, सर्वत्र अन्याय आणि अत्याचार, दुर्गम भागातून आणि खडबडीत वाटेनं मैलोन्मैल निर्जन प्रदेशातून चाललेला तो खडतर प्रवास हा रोजचा अनुभव होता, आणि त्यानं गांधीजींच्या मनात मोठी खळबळ निर्माण केली, या जीवनाचा अर्थ काय, त्याचा हेतू काय, मानवाचे समाजातील कर्तव्य काय, यावर गेली अनेक वर्षे गांधीजींच्या मनात अनेक विचारांनी गर्दी केली होती. आपल्या लोकांची सेवा कशी करावी आणि जीवन कसे

आदर्शवत जगावे याचा वस्तुपाठ गांधीजींनी आता गिरवला होता. यासंबंधीचे त्यांचे विचारही आता निश्चित झाले होते. मानवी आयुष्यातील विविध दुःखांचे, हालअपेष्टांचे, मानहानीचे रोज प्रत्यक्ष दर्शन घडत होते. अशा परिस्थितीत काय करावे याबाबत गांधीजींच्या मनात आतापर्यंत गोंधळ होता. परंतु आता परिस्थितीनेच त्यांना आता दृढ निर्धारास प्रवृत्त केले होते. निर्धारी बनविले होते.

''शारीरिक इच्छापूर्ती आणि आत्मिक सामर्थ्य आपण एकाचवेळी साध्य करू शकत नाही, याची मला आतां जाणीव झाली होती. आपले जीवन सार्वजनिक कार्याला वहायचे असेल, आत्मिक आनंद मिळवायचा असेल तर आपण शारीरिक भूक भागविण्याच्या मागे न लागता ब्रह्मचर्याचे पालन केले पाहिजे. असे मला आता तीव्रतेनं वाटू लागले. याबाबतीत शपथ घेण्यास मी आतूर झालो होतो. त्या कल्पनेनेच मी रोमांचित झालो.''

ते ''बंड'' शमल्यानंतर भारतीय शुश्रूषा पथक गुंडाळण्यात आले. लगेचच गांधीजी आपल्या फिनिक्स येथील वसाहतीकडे जाण्यास निघाले. त्यांची पत्नी-मुलं तेथेच होती. कस्तुरबाला आणि आपल्या प्रमुख सहकाऱ्यांना मग गांधीजींनी आपल्याला आलेले विविध अनुभव कथन केले आणि आपला निर्णयही सांगितला. सर्वांना विश्वासात घेऊन जाहीर केलेल्या त्या निर्णयानुसार आयुष्यात यापुढे कायम ब्रह्मचर्याचे पालन करण्याचा गांधीजींनी निर्धार केला होता.

: १७ :
आव्हान

युद्धाचे नगारे वाजत आहेत हे आता गांधीजींच्या लक्षात आले आणि त्यास तोंड देण्यासाठी ते सज्ज झाले. झुलू लोकांचे तथाकथित ''बंड'' दडपून टाकल्यानंतर ट्रान्सवालमधील बोअर-ब्रिटिश शासनकर्त्यांनी आपली वक्रनजर भारतीय लोकांकडे वळवली. हे गांधीजींना आव्हानच होते. काळ्या आणि गव्हाळ सावळ्या लोकांना आपण त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे. व्यापार आणि सत्ता यातील गोऱ्यांच्या मक्तेदारीला या लोकांचा अडसर येणार नाही, असा बंदोबस्त केला पाहिजे, असे प्रयत्न आणि डावपेच आता तेथे सुरू झाले होते. ट्रान्सवालमध्ये प्रवेश करणाऱ्या भारतीयावर निर्बंध घालणारा, आणि भारतीय पुरुष, महिला आणि मुले (८ वर्षावरील) यांनी आपल्या अंगठ्याचे आणि बोटांचे ठसे उठवून आपली नोंद करून घेतली पाहिजे असा हुकूम फर्मावणारा एक वटहुकूम १९०६ च्या ऑगस्ट महिन्यात काढण्यात आला. त्यानुसार नोंदणीपत्रक जवळ न बाळगणाऱ्या भारतीयास दंड, कारावास वा हद्दपारीच्या शिक्षेची तरतूद होती. इतकेच नव्हे तर अशा नागरिकांच्या घरात जाऊन तपास करण्याचा किंवा त्यांना रस्त्यात अडवून नोंदणीपत्र तपासण्याचा अधिकारही पोलिसांना देण्यात आला होता.

गांधीजींनी या वटहुकूमाचे ''काळा कायदा''असे वर्णन केले आणि भारतीयांची मानहानी करणारा हा कायदा रद्द व्हावा अशी इच्छा असल्यास त्याविरुद्ध आवाज उठविण्याचे त्यांना आवाहन केले. यानंतर एक सार्वजनिक सभा घेण्यात आली. या कायद्यानुसार ''कुत्र्याचा पट्टा'' गळ्यात अडकवून घेण्याला विरोध करण्याचा निर्धार या सभेत भारतीय नागरिकांनी जाहीर केला. सभेत भाषण करताना गांधीजी म्हणाले : ''या कायद्याला शरण जाण्याऐवजी मी मरण पत्करीन, मग त्यास विरोध करण्यासाठी मला कोणी साथ दिली नाही, तरी मी या अन्यायापुढे वाकणार नाही. एकटा त्यासाठी झगडेन व लढेन.''

या अन्यायास प्रतिकार कसा करायचा याची मात्र कोणाला कल्पना नव्हती.

गांधीजी काही मार्गदर्शन करतील अशी लोकांची अपेक्षा होती, परंतु त्यांनाही त्याची कल्पना नव्हती. एक मार्ग मात्र चोखाळायचे ठरले. भावी आयुष्यात अनेक चळवळींचे नेतृत्व करताना प्रत्येक वेळी गांधीजींनी या उपायाचाच सर्वप्रथम अवलंब केला. हा मार्ग म्हणजे सर्वप्रथम आपल्या विरोधकाशी वाटाघाटी करून सूज्ञपणे-समजूतदारपणाने प्रश्न सोडविण्याची त्याला संधी देणे. या हेतूने त्यांनी ट्रान्सवालच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांशी बोलणी सुरू केली, परंतु वटहुकूमातील महिलांविषयक अट काढून टाकण्याखेरीज कोठेही तडजोड करण्याची त्या मस्तवाल अधिकाऱ्यांची तयारी नव्हती.

ट्रान्सवाल ही अद्यापी 'ब्राऊन कॉलनी' (वा राजेशाही वसाहत) असल्याने त्या काळ्या वटहुकूमाचे कायद्यात रूपांतर करायचे तर त्याला आधी ब्रिटनच्या राजेसाहेबांची संमती मिळविणे जरूर होते. राजेसाहेबांच्या अधिपत्याखालील वसाहतीत राहणाऱ्या ब्रिटिश-भारतीय नागरिकांच्या विरोधी असा आणि ब्रिटिश राजसत्तेला न शोभणारा असा हा वटहुकूम कसा आहे, हे ब्रिटिश सरकारला पटवून देण्यासाठी मग एका प्रतिनिधीसमवेत, ऑक्टोबर महिन्यात गांधीजी लंडनला रवाना झाले. ब्रिटिश राजवट मानवजातीच्या कल्याणासाठी आहे, असा त्यावेळी आणि त्यानंतरही अनेक वर्षं गांधीजींचा प्रामाणिक समज होता.

१८९७ साली भारतातून दरबानला पोहोचल्यानंतर गांधीजींना गोऱ्या लोकांनी चोपून काढले होते. या कटू प्रसंगानंतरही लवकरच, व्हिक्टोरिया राणीच्या हीरक महोत्सवानिमित्त आफ्रिकेतील भारतीय समाजातर्फे गांधीजींनी राणीला शुभेच्छा पाठविल्या होत्या. ''आम्ही आपले प्रजाजन आहोत, हे आमचे केव्हढे तरी भाग्य आहे.'' असे गांधीजींनी या संदेशात म्हटले होते. १९०१ साली राणीचा मृत्यू झाल्यानंतरही त्यांनी शाही कुटुंबाकडे दुखवट्याचा संदेश पाठविला होता. ''सर्वांचे प्रेम आणि आदर मिळविणारी पृथ्वीतलावरील एक महान व्यक्ती आज कायमची निघून गेल्याने ब्रिटिश साम्राज्याचे केवढे तरी नुकसान झाले आहे.'' असे गांधीजींनी या शोकसंदेशात म्हटले होते. बोअर युद्धात ब्रिटिशांचा जय झाल्यानंतर दरबानमधील एका सार्वजनिक सभेत, या युद्धातील ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांचे अभिनंदन करणारा ठराव गांधीजींनी मांडला होता. ''आम्ही भारतीय ब्रिटिश प्रजाजन आहोत, ही खरोखरी आम्हाला किती अभिमानाची बाब आहे.'' असं त्यांनी या सभेत बोलताना म्हटलं होतं.

ब्रिटिश साम्राज्याचे असे गोडवे गाणाऱ्या गांधीजींच्या इंग्लंडच्या भेटीत मात्र केवळ थोड्या शाब्दिक सहानुभूती पलीकडे काहीही पदरात पडले नाही. त्या

विधेयकाला शाही अनुमती देण्याचे काम काही काळ लांबणीवर टाकले जाईल, असे मधाचे बोट, त्यावेळच्या उदारमतवादी पक्षाच्या ब्रिटिश सरकारने लावले. कारण त्यांना कल्पना होती की काही दिवसानंतर ट्रान्सवाल स्वयंशासित स्वतंत्र होताच, तेथील शासनाला विनाविलंब आणि विनाव्यत्यय शाही अनुमती न घेता ते विधेयक सहज मंजूर करता येईल. आणि अखेर झालेही तसेच. ट्रान्सवालची संसद स्थापन होताच, सर्वप्रथम नव्या संसदेत त्या काळ्या वटहुकूमाचे कायद्यात रूपांतर करण्याचे काम आधी हाती घेतले, शाही मंजुरीनंतर मे १९०७ मध्ये तो काळा कायदा प्रत्यक्षात अंमलात आला.

गांधीजींनी सविनय प्रतिकार संघटना स्थापन करून या नव्या कायद्याला आव्हान देण्याचे ठरविले. स्वयंसेवकांना काळ्या कायद्याची माहिती देऊन आणि त्यांना घरोघरी पाठवून प्रचारकार्य हाती घेण्यात आले. भारतीय नागरिकांची नोंदणी करण्यासाठी सरकारने उघडलेल्या कार्यालयासमोर शांततापूर्ण निदर्शने करण्यास प्रारंभ झाला. शहरभर सर्वत्र कायद्याविरुद्ध भित्तीपत्रिका छापून लावण्यात आल्या. ''भारतीयांनो स्वतंत्र व्हा. राजनिष्ठा म्हणजे राजाच्याही राजाला वाहिलेली निष्ठा-म्हणजेच जनतेची खरी प्रतिष्ठा''. अशी भित्तीपत्रके सर्वत्र झळकली. परिणामी, नोंदणी करण्याची मुदत वाढविण्यात येऊनही पाच टक्केही भारतीयांनी आपली नोंदणी करून घेतली नाही.

दंड, व्यापारी परवाने रद्द, अटक, कैद आणि काही जणांची हद्दपारी आदी दडपशाहीचे उपाय झाल्यानंतरही भारतीयांनी नोंदणी करून घेण्यास नकार दिला. या प्रकाराने चिडून जनरल स्मटस् यांनी गांधीजी आणि त्यांचे काही प्रमुख सहकाऱ्यांना अटक करण्याचा हुकूम दिला. ज्या न्यायालयात गांधीजींनी बॅरिस्टर म्हणून वकिली केली त्याच न्यायालयात त्यांना १० जानेवारी १९०८ रोजी गुन्हेगार म्हणून उभे करण्यात आले. आपण गुन्हा केला आहे, आणि संबंधित कायद्याखाली आपल्याला देता येईल तेवढी कडक शिक्षा द्यावी, असं गांधीजींनी मॅजिस्ट्रेटला विनवलं. त्यांना दोन महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आणि जोहान्सबर्ग येथील तुरुंगात ठेवण्यात आले.

'सविनय प्रतिकार' असे आपल्या चळवळीचे वर्णन गांधीजी करीत. यानंतर 'नागरी सविनय कायदेभंग'' या विषयावरील थोरोने आपल्या एका प्रबंधात व्यक्त केलेले विचार गांधीजींच्या वाचनात आले. त्याने ते चांगलेच प्रभावित झाले. या प्रबंधाच्या काही उताऱ्यांचा गुजरातीत अनुवाद करून त्यांनी तो ''इंडियन ओपिनियन'मध्ये प्रसिद्ध केला. आणि आपल्या चळवळीचे वर्णन ते 'सविनय

कायदेभंग' (Civil Disobedience) असे करू लागले. 'सविनय प्रतिकार (Passive Resistance) वा 'सविनय कायदेभंग' या दोन्ही संकल्पना वा शब्द नंतर त्यांना पसंद न पडल्याने त्यांनी 'नागरी प्रतिकार' (Civil Resistance) ही संज्ञा चळवळीचे वर्णन करताना वापरावयास सुरूवात केली.

परंतु या नव्या नव्या संज्ञांनीही गांधीजींचे समाधान होईना. आपल्या कल्पनेतील चळवळीचे नि लढ्याचे यथार्थ स्वरूप या शब्दात प्रकट होत नाही असे त्यांना वाटे. प्रेम आणि सत्य यावर आधारित अशा स्वरूपाचा प्रतिकार त्यांना अभिप्रेत होता. यासाठी मूळ भारतीय असा सुयोग्य शब्द त्यांना हवा होता. कोणीतरी त्यांना 'सदग्रह' (जे योग्य आहे बरोबर आहे त्यास चिकटून रहाण्याचा आग्रह) असा शब्द सुचविताच त्यांनी त्यात बदल करून 'सत्याग्रह' म्हणजे सत्यालाच धरून रहाण्याचा निग्रह हा शब्द सुचविला. आपल्या लढ्याचे आणि प्रतिकाराचे यथार्थ नैतिक स्वरूप या शब्दात निश्चितपणे व्यक्त होत आहे अशी त्यांची मनोमन खात्री झाली.

●

: १८ :
श्रद्धेची कसोटी

गांधीजींच्या अटकेमुळे आणि तसेच कारावासामुळे अन्य भारतीय नागरिकांचे नीतिधैर्य उंचावले आणि त्यामुळे आणखी काही नागरिक त्यांना सामील झाले. आतापर्यंत भित्रेपणानं आणि अगदी नमून वागणारे हे भारतीय ''कुली'' आता सत्तेला आव्हान देऊ लागल्याचे पाहून काही ठिकाणी त्यांचे कौतुक होऊ लागले, आणि त्यांच्या चळवळीबद्दलची सहानुभूतीही वाढू लागली. या अन्यायाचा भारतात तसेच इंग्लंडमध्येही सार्वजनिकरीत्या निषेध होऊ लागला. जनरल स्मटस् या परिस्थितीमुळे अस्वस्थ झाले आणि तीन आठवड्याच्या आत त्यांनी गांधीजींकडे तुरुंगात आपला प्रतिनिधी रवाना केला. गांधीजींशी स्नेहाचे संबंध असेलेले एक इंग्रज पत्रकार श्री. अल्बर्ट कार्टराइट यांना त्यासाठी जनरल स्मटस् यांनी गांधीजींकडे पाठविले. श्री. कार्टराइट यांना भारतीयांच्या मागण्याविषयी सहानुभूती होती.

भारतीयांनी स्वयंस्फूर्तपणे स्वत:ची नोंदणी करून घेतली, तर त्यांचा राग असलेला नोंदणी कायदा रद्द करण्यात येईल, असा जनरल स्मटस् यांचा प्रस्ताव घेऊन श्री. कार्टराइट गांधीजींकडे आले. याआधीच भारतीय समाजातर्फे एका सार्वजनिक सभेत जाहीर करण्यात आले होते की आफ्रिकेत अनधिकृत प्रवेशास वाव मिळू नये म्हणून शासनाला मदत करण्यासाठी स्वयंस्फूर्तपणे नोंदणी करण्यास भारतीयांचा केव्हाही विरोध नव्हता. श्री. कार्टराइट यांनी आणलेला प्रस्ताव योग्य वाटल्याने गांधीजींनी त्यात काही दुरुस्त्या सुचविल्या. त्यावर गांधीजींना प्रिटोरीया येथे जनरल स्मटस् यांनी आपल्या भेटीला बोलावले आणि त्या कराराला मान्यता दिल्याचे सांगितले. गांधीजींच्या जीवनात महत्त्वपूर्ण ठरलेल्या ३० जानेवारी या दिवशीच त्यांची आणि जनरल स्मटस् यांची भेट झाली, तेव्हा कैद्याच्या पोशाखातच गांधीजी होते.

हा समझोता झाला तेव्हां तो उभयतात तोंडातोंडीच झाला. गांधीजींनी आपल्या

विरोधकांवर आयुष्यात नेहमीच विश्वास टाकला. त्यात अनेकवेळा पदरी निराशा आली. परंतु त्यांची श्रद्धा कधी ओसरली नाही. याही वेळी गांधीजींनी स्मटस् यांच्या शब्दावर विश्वास ठेवला. त्याच संध्याकाळी ते जोहान्सबर्गला परतले आणि रात्री एक सभा घेऊन त्यांनी वाटाघाटीची सारी हकीकत कथन केली. '' भारतातून येणाऱ्या अनधिकृत भारतीय लोकांना गुपचूपपणे ट्रान्सवालमध्ये घुसविण्याची आमची बिलकूल इच्छा नाही नि तयारीही नाही, हे दाखवून देण्यासाठी आपण स्वयंस्फूर्तपणे नोंदणी करू या-'' असे सभेत गांधीजींनी आवाहन केले.

याच सभेला वायव्य भारतातील अनेक पठाण श्रोते उपस्थित होते. अंगाने तगडे, उंच आणि अत्यंत प्रामाणिक असे हे लोक. जीवाला जीव देणारे विश्वासू म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती. त्याचबरोबर स्वाभिमान दुखावला गेला किंवा मानहानी झाली तर ताबडतोब जीवावर उठणारे लोक म्हणून त्यांची ख्याती. ''स्वयंस्फूर्तीने'' आणि ''सक्तीने'' या शब्दातील फरक त्यांच्या अशिक्षित मेंदुत जाणे कठीण. कोणत्याही परिस्थितीत शरण न जाता नोंदणी पत्रावर स्वाक्षरी करायची नाही वा अंगठे उठवायचे नाहीत, असे आपल्याला ठासून सांगितले गेले असता आता अंगठे उठवा असे का सांगितले जात आहे, हे त्यांना कळेना. एका पठाणाने तर गांधीजींवर असा आरोप केला की जनरल स्मटस् यांच्या भेटीनंतर आता ते अंगठे उठविण्यास सांगत आहेत, तेव्हां त्यांना भली मोठी लाच मिळाली असावी. त्याने तर पुढे अल्लाची शपथ घेऊन धमकीच दिली की नोंदणीसाठी कोणी अर्ज केल्यास आपण त्याचा खूनच करू.

परंतु खुनाच्या धमकीने गांधीजी थोडेच भयभीत होणार? यावेळी त्यांनी धीरोदात्तपणे जे उत्तर दिले त्याचा त्यांनी पुढील आयुष्यात वेळोवेळी पुनरुच्चार केला. ते म्हणाले : ''बिछान्यावर पडून एखाद्या व्याधीने मरण्यापेक्षा आपल्या भावाच्या हातून मरण आले तर मला आनंदच होईल. मला माझ्या मारेकऱ्याचा राग वा चीड येणार नाही. सूडाची भावना तर मनाला स्पर्शही करणार नाही. माझी खात्री आहे की असे घडले तर ते माझ्या हिताचेच ठरेल. कारण अखेरीस माझ्या मारेकऱ्यालाही पटेल की मी निरपराध आहे.''

परंतु अशा भावनात्मक आवाहनाचा नि खिस्त-बुद्धाच्या प्रेमाच्या तत्त्वज्ञानाचा त्या पठाणांच्या मनावर कसा परिणाम होणार? सरधोपट, सरळमार्गी लोक ते. काही दिवसानंतर गांधीजी आपली नोंदणी करण्यास बाहेर पडले, स्वयंस्फूर्तपणे नोंदणी करून घेण्यात आपण पुढाकार घेऊ असे त्यांनी आधीच जाहीर केले होते. ते त्यासाठी रस्त्याने जात असता मीर आलम या त्यांच्या एका माजी पठाण

अशिलाने आणि त्याच्या सोबत्यांनी त्यांना वाटेत गाठले आणि हल्ला करून चांगलेच जखमी केले. त्या बाजूने जाणारे काही युरोपीय लोक मदतीला धावले नसते तर परिणाम फार गंभीर झाला असता. बेशुद्ध होऊन गांधीजी बाजूच्या पदपथावर पडले होते. जखमातून रक्त वाहत होते. लोकांनी त्यांना उचलले आणि एका नजिकच्या कार्यालयात नेऊन त्यांच्यावर प्रथमोपचार करण्यात आले. सुदैवाने त्यांचे स्नेही बॅप्टिस्ट धर्मगुरु जोसेफ डॉक तेथे येऊन पोहोचले. त्यांनी गांधीजींना आपल्या घरी नेऊन अनेक दिवस त्यांची शुश्रूषा केली.

मात्र त्या दिवशी शुद्धीवर येताच गांधीजींनी, आपल्यावर हल्ला करणारे निरपराध असून त्यांच्यावर कोणताही खटला भरण्यात येऊ नये, असे निवेदन केले. त्यांच्या गालावर आणि वरच्या ओठावर टाके घालण्यात आले होते. डोक्याला बॅण्डेज होते. तरीही त्यांनी, डॉक्टरांचा विश्रांती घेण्याचा आदेश न जुमानता, रजिस्ट्रारना बोलावून घेण्याची विनंती केली. अशाही परिस्थितीत, नोंदणीसाठी आपल्या अंगठे-बोटांचे ठसे देण्याची त्यांची तयारी होती. याबाबतीत आपण पुढाकार घेणार असल्याने काहीही होवो पण विलंब व्हायला नको, असे त्यांचे म्हणणे होते. अखेरीस, सर्वजण चिंताग्रस्त अन् दु:खी असता, गांधीजींच्या समाधानासाठी त्यांच्या अंगठे-बोटांचे ठसे घेण्यात आले. गोऱ्या रजिस्ट्रारचे डोळेही यावेळी पाणावले.

भारतीयांनी चालविलेल्या सविनय प्रतिकाराच्या चळवळीची माहिती वृत्तपत्रात वाचून श्री. डॉक यांना भारतीय समाजाच्या पुढाऱ्याची भेट घेण्याची आणि त्यांची मुलाखत घेण्याची इच्छा झाली. १९०७ साली मग उभयतांची प्रथमत:च भेट झाली. जोहान्सबर्ग येथील भारतीय समाजावर गांधीजींचा असलेला प्रभाव पाहून, भेट होण्या आधी श्री. डॉक यांची कल्पना होती की गांधीजी म्हणजे एखादे उंच, धिप्पाड आणि रुबाबदार व्यक्तिमत्व असेल. परंतु प्रत्यक्षात भेट झाल्यावर सर्वसाधारण उंचीची, कृश, सडपातळ आणि मोहक वा सुंदर चेहरा नसलेली ती व्यक्ती पाहून श्री. डॉक यांना आश्चर्य वाटले. मात्र त्यांचा चेहरा बोलका आणि नजर दुसऱ्याच्या मनाची ठाव घेणारी होती. गांधीजींची अंगकांती सावळी, डोळे काळेभोर होते; मात्र चेहऱ्यावरचं स्मित आणि निर्भय नजर कोणाचेही मन ताबडतोब जिंकून घेई.

यानंतर उभयतांचा स्नेह वाढत गेला. डॉक यांना गांधीजींच्या कार्याचे कौतुक होते. गांधीजींचे चरित्र सर्वप्रथम लिहिण्याचा मान त्यांच्याकडे जातो. गांधीजींचे व्यक्तिमत्व आणि त्याचे तोपर्यंतचे जीवन यांचा उत्कृष्ट आलेख १९०९ साली प्रसिद्ध झालेल्या त्या चरित्रात पहावयास मिळतो. या चरित्रावरूनच टॉलस्टॉय यांना

गांधीजींचे जीवन, तत्त्वज्ञान आणि दक्षिण आफ्रिकेतील कार्य यांची माहिती घेण्यास मदत झाली. आपल्या मृत्युपूर्वी थोडे दिवस आधी, १९१० सालच्या सप्टेंबर महिन्यात वयोवृद्ध टॉलस्टॉय यांनी गांधीजींना एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी म्हटले : ''तुम्ही ट्रान्सवालमध्ये चालविलेल्या कार्याची जी काही माहिती येथे दूरवर आमच्या कानावर पडत आहे ती लक्षात घेतली तर जगात आज जे काही महान कार्य चालले आहे त्यात तुमचे कार्य फारच मोलाचे आहे यात शंका नाही. या कार्यात, ख्रिश्चन धर्मीय देशच नव्हे तर अन्य देशही यापुढे सहभागी होतील, असा मला विश्वास वाटतो.''

यानंतर अनेक वर्षांनी श्री. डॉक यांच्या मुलीला आपल्या घरात राहिलेल्या त्या भारतीय पाहुण्याची वारंवार आठवण येई. त्यावेळी ती वयाने लहान होती. बँडेजमध्ये गुंडाळलेला तो चेहरा तिला सारखा आठवे. गांधीजी तिला ''लीड काइन्डली लाईट'' ही कविता म्हणायला सांगत. एक दिवस तर गंमतच झाली. तिच्या भावाला गांधीजींनी बाहेरच्या बागेतील चांगली माती खणून घेऊन येण्यास सांगितले. कारण डॉक्टरांच्या औषधाला आणि शुश्रूषेला गांधीजी कंटाळले होते. त्यांनी मग ते बॅण्डेज काढून टाकले आणि आपल्या चेहऱ्यावर ती माती चोपडली. ''दुसऱ्या दिवशी गांधीजींचा तो मातीने थापलेला चेहरा पाहून डॉक्टर तर थक्कच झाले,'' मुलीच्या भावाने आता आपली आठवण सांगण्यास आरंभ केला : ''या रोग्याची जबाबदारी आपण यापुढे घेणार नाही, असं त्यांनी तेथेच स्पष्ट सांगून टाकले. परंतु दोन दिवसात गांधीजी बरे होऊन बागेत फिरू लागले. खुर्चीत आरामात बसून फळेही खाऊ लागले. ती खुर्ची आमच्या घरी असून महात्मा गांधींची खुर्ची म्हणूनच ती अद्यापी ओळखली जाते.''

काही दिवसानंतर श्री. पोलाक यांच्या उपनगरातील घरात आपला मुक्काम हलविण्याइतकी गांधीजींची प्रकृती सुधारली. तेथेच श्रीमती पोलाक यांच्या देखरेखी खाली मग त्यांनी विश्रांती घेतली. यावेळी सौ. कस्तुरबा आणि मुले यांना फिनिक्स येथील वसाहतीत रवाना करण्यात आले होते. काम करता करता जागीच थोडावेळ डुलकी घेऊन ताजेतवाने होण्याची, गांधीजींना याचवेळी पोलाक यांच्या घरी मुक्काम असताना सवय लागली, असे श्रीमती पोलाक यांनी म्हटले आहे. ही सवय त्यांना कायमचीच जडली. ''आपल्या चिटणीसाला मजकूर सांगत असताना, मध्येच तो आवाज बंद होई आणि पहावे तो गांधीजी डोळे मिटून केव्हाच डुलकी घेत असल्याचे आमच्या लक्षात येई. मग मी व तो चिटणीस नुसते बसून गंमत पहात असू. थोड्याच वेळात गांधीजी डोळे उघडत आणि जेथे मजकूर सांगण्याचे त्यांनी सोडलेले असे, तेथून विस्मरण न होऊ देता ते पुढचा मजकूर बरोबर सांगत जात.

आपण कुठपर्यंत आलो होतो ? मजकूर किती झाला-कोठपर्यंत झाला होता, असं त्यांनी चिटणीसाला विचारल्याचे मला तरी स्मरत नाही.''

:१९ :

अग्नीपरीक्षा

हल्ल्यातून झालेल्या जखमा भरून येऊन गांधीजी बरे होताच, त्यांच्या दरबान आणि जोहान्सबर्ग येथील सार्वजनिक कार्यात पुन्हा जोर आला. आपल्या लोकांनी स्वयंस्फूर्तपणे नोंदणी करून घ्यावी असे आवाहन सर्वत्र करावयास त्यांनी प्रारंभ केला. परंतु लवकरच निराशा त्यांच्या वाट्यास आली. कारण जनरल स्मटस् यांनी गांधीजींना आधी वचन दिल्याप्रमाणे तो काळा कायदा रद्द न करता, स्वयंस्फूर्त नोंदणीवर शिक्कामोर्तब करणारा आणखी एक कायदा संमत करून घेतला. त्यांना जेव्हा वचनाची आठवण करून दिली तेव्हा असे काही वचन आपण दिलेच नव्हते, असे त्यांनी सांगितले.

दिलेला शब्द प्राणापलीकडे पाळणाऱ्या गांधीजींना हे ऐकून धक्काच बसला. जनरल स्मटस् सारखा एक शूर सेनाधिकारी वचनभंग करण्याइतपत खालच्या थराला जाईल असे त्यांना वाटले नव्हते. परंतु आपल्या प्रतिस्पर्ध्याला शिव्याशाप देणे, त्याला नामोहरण करणे गांधीजींच्या स्वभावात कधीच बसले नसल्याने त्यांनी आपल्या देशबांधवाची एक सार्वजनिक सभा घेतली आणि जीव धोक्यात घालून मिळविलेल्या आपल्या त्या नोंदणीपत्राची जाहीर होळी केली. त्यांचे अनुकरण करून मग शेकडो भारतीयांनी आपली नोंदणीपत्रेही अग्नीच्या स्वाधीन केली. नोंदणीपत्रावरून गांधीजींवर हल्ला करणारा मीर आलम या सभेला हजर होता. गांधीजींनी आवाहन करूनही त्याला कैदेची शिक्षा भोगावी लागली होती. आता तो सुटून आला होता. आपण गांधीजीविषयी उगाचच गैरसमज करून घेतला हे आता त्याला उमगले होत. पठाण लोक जितके संतापी तितकेच स्वभावाने दिलदारही असतात. मीर आलम सभेनंतर गांधीजींकडे आला आणि त्यांच्याशी हस्तांदोलन करून त्याने जवळजवळ माफीच मागितली.

''कुत्र्याच्या पट्ट्यासारख्या'' नोंदणी पत्राची जाहीर होळी झालेली पाहून

गांधीजींच्या मनावरही खोलवर परिणाम झाला असावा. कारण यानंतर दहा वर्षानंतर भारतात त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध सविनय कायदेभंगाची चळवळ प्रथम सुरू केली तेव्हा प्रतिकात्मक निषेध म्हणून परदेशी कापडाची होळी करण्याचाच आदेश त्यांनी दिला. तसेच परवाना न काढता व्यापार करणाऱ्या आपल्या लोकांना तुरुंगात टाकल्याच्या निषेधार्थ गांधीजींनी हरताळाचेही शस्त्र उपसले. भावी काळातील, भारतातील आपल्या अहिंसक सार्वजनिक सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील प्रत्येक अस्त्र त्यांनी आधी दक्षिण आफ्रिकेतील लढ्यात पारखून घेतले होते, हे यावरून दिसून येते. सरकारने त्यावर सूड म्हणून अटक, दंड, मालाची जप्ती; हद्दपारी अशी उपाययोजना करण्यास प्रारंभ केला, परंतु त्यात बहुसंख्य सर्वसाधारण नागरिकच गोवले जात. आपल्या विरुद्ध काही कारवाई होत नाही, हे पाहून गांधीजी अस्वस्थ झाले आणि त्यांनी स्मटस्ना लिहिले :''मला वगळून सर्वसामान्य गरीब भारतीय नागरिकाचा छळ करण्यात तुम्हाला कोणता पराक्रम वाटतो ?'' अखेरीस गांधीजींना अटक करण्यात आली. आणि त्याना दोन महिने सश्रम कारावासाची सजा देण्यात आली. अशा प्रकारे गांधीजींनीच वर्णन केल्याप्रमाणे त्यांना 'शाही हॉटेल' मध्ये ठेवण्यात आले. ''या वेळी ट्रान्सवालमध्ये माझ्या इतका सुखी प्राणी क्वचितच कोणी असेल.''

गांधीजींचे आणि त्यांच्या साऱ्या कार्यकर्त्यांचे अन् अनुयायांचे नीतीधैर्य खचावे यासाठी यावेळी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी कैदेत भारतीय सत्याग्रहींचा चांगलाच छळ केला. एखाद्या गुलामासारखी वागणूक त्यांना देण्यात आली. आपल्या त्या दिवसातील आठवणी आपले चिटणीस महादेवभाई देसाई यांना १९३२ साली येरवडा तुरुंगात सांगताना गांधीजींनी दोन्ही ठिकाणच्या तुरुंगवासाची तुलना केली आणि ते म्हणाले की येथील तुरुंगवास किती सुसह्य आहे. ''आफ्रिकेत आम्ही खरा तुरुंगवास भोगला. आमची पदोपदी मानहानी, अपमान करून आम्हाला मारझोडही केली जात असे. दु:खाची गोष्ट म्हणजे तुरुंगातील अधिकारी नव्हे, तर ज्यांच्या बरोबर आम्हाला तुरुंगात ठेवण्यात आले होते त्या झुलू कैद्यांच्या करवी आम्हाला चोप दिला जात असे. संडासात तेथे आडोसा नसे, आणि ते गलिच्छ तरी किती ठेवले जात ! एकदा तर मी संडासात गेलो असता एक झुलू कैदी तेथे आला आणि त्याने माझ्या मुस्कटातच भडकवले. मी मागे भिंतीला आदळलो. सुदैवाने डोक्याला जखम झाली नाही; नाहीतर मी त्या माराने चांगलाच रक्तबंबाळ झालो असतो. तुरुंगातील माझी खोली किती अरुंद होती. तीनचार फूट रुंद आणि सहा फूट लांब. तेथे प्रकाशही येत नसे वर छताशी एक छोटी खिडकी कशीबशी हवा येण्यासाठी ठेवली होती. तुरुंगातील या खोल्या 'एकांतवासाच्या गुहा' म्हणून ओळखल्या

जात. मोठ्या नि गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या कैद्यांचा मला शेजारवास होता. एका कैद्यावर तर तीस गुन्ह्याचे आरोप होते.''

अधून मधून साक्षीदार म्हणून गांधीजींना न्यायालयात आणले जाई तेव्हाही हातकड्या घालून आणि कैद्याच्या पोशाखातच ! परंतु गांधीजींचा निर्धार नि लढाऊ वृत्ती अशा छळाने कमी होण्या ऐवजी अधिकच वाढत गेली. सुटका झाल्यानंतर लगेचच त्यांनी पुन्हा आपली चळवळ सुरू केली तेव्हा फेब्रुवारी १९०९ मध्ये त्यांना तिसऱ्यांदा अटक करून तुरुंगात टाकण्यात आले आणि कठोर सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. या दोन तुरुंगवासाच्या मधल्या काळात त्यांनी आपला वेळ फिनिक्स येथे पत्नीच्या शुश्रूषेत घालविला. कारण कस्तुरबा या वेळी ॲनिमियाने गंभीर आजारी झाल्या होत्या. डॉक्टरांनी तर आशाच सोडली होती, परंतु गांधीजींनी काळजीपूर्वक केलेली शुश्रूषा, त्यांच्या प्रयोगानुसार दिलेला आहार-आणि जलोपचार यामुळे कस्तुरबांची प्रकृती सुधारली.

''फॉक्सरस्ट'' तुरुंगात असताना पत्नीच्या गंभीर आजाराची वार्ता १९०८ च्या नोव्हेंबरमध्ये, गांधीजींच्या कानी आली. दंड भरून अशावेळी गांधीजींना आपली सुटका करून घेता आली असती, परंतु त्यांच्या सत्याग्रही संहितेत ती गोष्ट बसत नव्हती. सत्याग्रहाची संहिता आपण तयार केली, तिचे अशावेळी आपणच पालन केले नाही तर मग त्यात अर्थ काय ? कस्तुरबांना गुजरातीत लिहिलेल्या पत्रात गांधीजी म्हणतात ; ''प्रिय कस्तुर, तुझ्या आजारासंबंधी श्री. वेस्ट यांनी केलेली तार मला मिळाली. ती वाचून माझे हृदय विदीर्ण झाले. मला तुझी फार काळजी वाटते परंतु तुझी शुश्रूषा करण्यासाठी मी बाहेर येऊ शकत नाही. सत्याग्रही लढ्यासाठी मी माझे सर्वस्व दिले आहे. मी तुझ्याकडे आता लगेच निघून येणे अशक्य आहे. त्यासाठी मला दंड भरावा लागेल, आणि तो भरणे माझ्या मनाला पटणार नाही. तू धीर धर, समतोल आहार घे, म्हणजे बरे वाटेल. माझ्या दुर्दैवाने तुझे काही कमी जास्त झालेच, तर मी म्हणेन की मी हयात असताना तू अशी निघून गेलीस तर त्यात तुझी चूक काहीच नाही, माझे तुझ्यावर इतके प्रेम आहे की मृत्युनंतरही तू हयात आहेस असेच मला वाटत राहील. तुझा आत्मा अविनाशी आणि मृत्युंजय आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की या आजारातून तू उठली नाहीस, तरी मी दुसरा विवाह करणार नाही. मी तुला वारंवार म्हटले आहे की ईश्वरावर श्रद्धा ठेवून तू शांतपणे मृत्युला सामोरी जा. तुला मृत्यू आला तर सत्याग्रहासाठी तू केलेला तो महान त्याग असेल. माझा लढा निव्वळ राजकीय नाही. तो धार्मिक लढा आहे आणि म्हणूनच तो पवित्र लढा आहे.''

: २० :
शिष्टमंडळ लंडनमध्ये

मे महिन्याच्या अखेरीस गांधीजी तुरुंगातून बाहेर येताच त्यांनी एका सदस्याला सोबत घेऊन लंडनला शिष्टमंडळ घेऊन जावे असे त्यांना सांगण्यात आले. दक्षिण आफ्रिकेतील वसाहतीचे एक संघराज्य करण्याचा प्रस्ताव यावेळी ब्रिटिश संसदेपुढे विचारार्थ होता. आणि त्यासाठी जनरल स्मटस् आणि जनरल बोथा लंडनमध्ये वाटाघाटीसाठी जाण्याची शक्यता होती. गांधीजींची ब्रिटिशांच्या न्याय बुद्धीवर अद्याप श्रद्धा होती. दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश-भारतीय प्रजाजनांना इंग्लंड न्याय मिळवून देईल असा त्यांना विश्वास होता. दूरदृष्टी आणि राजकीय व्यवहार चातुर्य याबद्दल ब्रिटिशांची ख्याती असली तरी गांधीजी ब्रिटिशसाम्राज्याचे खरे मित्र व पुरस्कर्ते आहेत, हे त्यांनी ओळखले नाही. गांधीजींना त्यांनी आपले शत्रू केले, आणि अंती याच माणसाने त्यांचे साम्राज्य घालविले.

गांधीजींनी चांगले चार महिने लंडनमध्ये घालविले. या काळात राजकीय मुत्सद्यांना आणि वृत्तपत्रांना भारतीयांची न्याय्य बाजू पटवून देण्याचा त्यांनी अहोरात्र आटोकाट प्रयत्न केला. परंतु यश येईना. काही व्यक्तींची त्यांना सहानुभूती लाभली. परंतु ब्रिटिश सरकारकडून त्यांना निश्चित आश्वासन मिळेना. शब्दच्छल करीत, सचोटीचे नाव घेत न्यायाला डावलीत आणि लोकशाहीचे गोडवे गाताना समानतेला तिलाजली देत ब्रिटिश मुत्सद्यांनी गांधीजींच्या तोंडाला पाने पुसली. स्वयंशासित वसाहतींच्या कारभारात साम्राज्यशाही सरकार कसा हस्तक्षेप करणार ? असे ते उलट विचारीत. आपल्या शत्रुशी-बोअर लोकांशी त्यांनी जुळवून घेतले. आपल्या संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठी गोरे लोक एकत्र येत होते. या साम्राज्यातील आश्रितांना कोण विचारणार ? असे सारे प्रश्न गांधीजींच्या मनाला सतावित होते.

गांधीजींची राजकीय यात्रा विफल ठरली, तरी या काळात लंडनमध्ये असताना, त्यांना चांगलेच बौद्धिक आणि नैतिक सामर्थ्य प्राप्त झाले. त्यांच्या मनात खळबळ

उत्पन्न करणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरं त्यांना गवसली आणि विचाराला धार आली. याचवेळी, ब्रिटनमध्ये, स्त्री-स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्यांचा लढा त्यांनी पाहिला. त्यांना त्यांच्याबद्दल सहानुभूती नि कौतुक वाटे. तसेच हिंसाचाराच्या बाबतीत महिलाही पुरुषांची बरोबरी करू इच्छित असल्याचे पाहून गांधीजींना खेद होई. ब्रिटिशांच्या, कैद्यांसाठी असलेल्या छावण्यात, बोअर युद्धाच्या वेळी महिलावर्गाने तो छळ किती हसत हसत सहन केला होता ते त्यांना आठवे. त्या महिलांबद्दल त्यांना आदर वाटे. आता पुरुषांबरोबर समान हक्कांसाठी झगडणाऱ्या ब्रिटिश महिला वर्गाचा चाललेला लढा पाहून ते स्तिमित झाले.

महिलांपासून आपण सविनय प्रतिकाराचे रहस्य शिकलो, असे ते बिनदिक्कतपणे सांगत. श्रीमती पोलाक यांना ते एकदा म्हणाले : ''कालौघात, जगाच्या व्यवहारात अधिकाअधिक महिला मोलाचा आणि महत्त्वाचा वाटा उचलतील, यात मला तरी शंका वाटत नाही. कोणत्याही चळवळीत त्यांचा वाटा मोलाचा असेल. सविनय प्रतिकाराचे अस्त्र कसे प्रभावी असते ते मी अन्य कोणाकडून नव्हे, तर भारतीय महिलांपासून शिकलो आहे. आपल्याला पसंत नसलेली गोष्ट मी कितीही सक्ती केली तरी ''बा'' च्या गळी उतरवू शकत नाही, हे मी अनुभवले आहे. तिच्या सविनय प्रतिकार शक्तीपुढे मी हतबल झालो आहे.''

श्रीमती पोलाक याचवेळी लंडनमध्ये होत्या. गांधीजींच्या या वेळच्या अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. गांधीजी नंतरच्या काळात महात्माजी म्हणून ओळखले जाऊ लागले. सामाजिक कीर्ती त्यांना लाभली. हा माणूस मनाचा किती मोठा, विचाराने किती उदात्त होता, त्याचा पावलोपावली त्याकाळीही अनुभव येई. ब्रह्मचर्याचे पालन, आणि फिनिक्स येथील वसाहतीतील कठोर परिश्रमाचे जीवन वाट्यास येऊनही गांधीजींना जीवनातील अनेक चांगल्या गोष्टींचीही आवड होती. श्रीमती पोलाक म्हणतात की, गांधीजींना चहाची फार आवड होती. मस्का-पाव त्यांना लागे. लंडनमध्ये असताना वेस्टमिनिस्टर हॉटेलमध्ये गांधीजींचा मुक्काम असे. तेथे भेटीला येणाऱ्या प्रत्येकाला गांधीजी चांगला चहा, टोस्ट आणि फळांचा मुरंबा स्वतः तयार करून देत. त्यावेळी गांधीजी उत्तम दर्जाचा इंग्रजी पोशाख करीत. त्यावेळच्या अद्यावत पोशाखातील बॅरिस्टर गांधी आणि साबरमतीच्या आश्रमात अनेक वर्षानंतर भेट झाली तेव्हा साधा पंचा नेसलेले महात्माजी श्रीमती पोलाक यांना चांगलेच आठवतात. गांधीजींमधील हा बदल कसकसा होत गेला त्याचे बहारदार वर्णन त्यांनी आपल्या आठवणीत केले आहे.

''गांधीजींच्या पोशाखातील हा बदल त्यांच्यात मानसिक बदल कसकसा होत

गेला त्याचेच द्योतक आहे. पोशाखात विविधता आली, क्रांतिकारक फरक पडत गेला. तरी तो पोशाख चढविणाऱ्या त्या थोर माणसाची मनोवृत्ती कोठे पोशाखी नव्हती. पोशाख कसाही असो. त्यांच्यातील माणूस सतत जागृत होता. तेथे ढोंगीपणा नव्हता, चेहऱ्यावर कधी आवरण नव्हते. वेळ आली तर अंगावरचा पोशाख फेकून देऊन ईश्वरापुढे नम्र नि सत्य स्वरूपात जाऊन उभे राहण्याची त्या थोर मनात हिंमत होती.''

''दक्षिण आफ्रिकेत मी जेव्हा गांधीजींना प्रथम पाहिले तेव्हा काळ्या रंगावर फिक्या रंगाची झाक असलेल्या कापडाचा सूट त्यांनी परिधान केला होता. डोक्यावर काळ्या रंगाचाच वकिली फेटा होता. कडक कॉलर अन् टाय त्या व्यक्तिमत्वाला शोभा देत होती. बूट-मोजे तर होतेच. यानंतर लंडनमध्ये मी त्यांना भेटले तेव्हा युद्धपूर्व (पहिले महायुद्ध) कालखंडातील इंग्लिश लोकांसारखा त्यांचा पोशाख होता. रेशमी हॅट, लांब कोट, उत्तम मोजे नि बूट. या कालखंडात त्यांनी वापरलेले अनेक शर्ट त्यानंतर काही वर्षांनी मीच त्यांच्या कपाटातून कायमचे बाहेर काढून टाकले.

''यानंतर दक्षिण आफ्रिकेमध्ये मी त्यांना पाहिले. त्यावेळी लांब ढगळ सूट त्यांनी परिधान केला होता. कपड्यांकडे त्यांचे आता लक्ष नसावे. शर्ट वा कोटाच्या कॉलरला कोठे खळ लागलेली नव्हती. दक्षिण आफ्रिकेतील त्यांच्या वास्तव्याच्या अखेरच्या दिवसात तर ते पौर्वात्य आणि पाश्चात्य असा काहीसा मिश्र पोशाख करीत. एखादी साधी पॅन्ट, ढगळ शर्ट आणि साध्या चपला असा त्यांचा अवतार असे. यानंतर त्यांनी स्वत: विणलेल्या कापडाचे धोतर आणि अंगावर पंचा वा शाल असा पोशाख चढवायला सुरुवात केली.''

याचवेळेस गांधीजींचा लिओ टॉलस्टॉय यांच्याबरोबरचा पत्रव्यवहार सुरू झाला. धर्माचा खरा अर्थ काय यावर टॉलस्टॉय निर्भयपणे आपली मते व्यक्त करीत. तसेच आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचा निषेध करणारे लेखनही टॉलस्टॉय यांनी केले होते. टॉलस्टॉय यांच्या या विचाराबद्दल गांधीजींना त्यांच्याविषयी फार आदर वाटे. त्यांच्या मनाचा गांधीजींवर कायम प्रभाव पडला होता. टॉलस्टॉय यांच्या मृत्युनंतर त्यांच्याविषयी लिहिताना गांधीजींनी म्हटलं होतं, ''स्वर्गवासी काऊंट टॉलस्टॉय यांच्याविषयी काही लिहायचे म्हटले तर ते केवळ त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त करण्यासाठीच. सध्याच्या युगातील ती एक महान व्यक्ती होती. त्यांची शिकवण प्रत्यक्षात आणण्याचा आम्ही आमच्या परीने प्रयत्न करीत आहोत.''

याच काळात गांधीजींवर फार मोठा प्रभाव होता तो त्यावेळी लंडनमध्ये



लंडन येथे कायद्याचा अभ्यास करतांना



दक्षिण आफ्रिकेत पत्नी कस्तुरबासमवेत



जोहान्सबर्ग येथे (१९००)



दक्षिण आफ्रिकेत, तरूणपणी लष्करी वैद्यकीय सेवेत सार्जंट मेजरच्या गणवेशात



दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रही

१९२४ साली नवी दिल्लीत एकविस दिवसांच्या
उपोषणाच्या काळात, शेजारी सहा वर्षांची इंदिरा





पत्रलेखन करताना

एका प्रसन्न क्षणी



सुप्रसिध्द तत्त्वज्ञ आणि लेखक रोमाँ रोला यांच्या सान्निध्यात स्वित्झर्लण्डमध्ये



जवाहरलाल नेहरूंसमवेत



रवींद्रनाथ टागोरांबरोबर १९४० साली शांतीनिकेतन येथे मुक्काम असतांना



लहान बालकाशी खेळताना





१९४७ साली नौखाली यात्रेत एक बांबूचा साकव ओलांडताना



नौखाली पध्दतीची टोपी घालून चरख्यावर सूत कातताना

अंत्यदर्शन



रहाणाऱ्या काही तरुण क्रांतिकारकाचा सशस्त्र क्रांती आणि दहशतवाद यावर धर्मनिष्ठपणे श्रद्धा असलेल्या या क्रांतिकारकांबरोबर अनेकदा गांधीजींनी चर्चा केली होती. त्यांच्याशी गांधीजी सतत संपर्क ठेवून होते. गांधीजींचे लंडनमध्ये आगमन होण्याच्या थोडेच दिवस आधी क्रांतिकारक मदनलाल धिंग्राने सर कर्झन वायलीवर लंडनमध्ये गोळ्या झाडून त्यांचा बळी घेतला होता. कर्झन वायली याने हिंदुस्थानात चाकरी केली होती. यावेळी तो भारत मंत्री लॉर्ड मोर्ले यांचा शरीररक्षक होता. सर वायली यांना भारतीयांच्या एका समारंभप्रसंगी आमंत्रित करण्यात आले होते, त्यावेळी ही घटना घडली. एक पारशी डॉक्टर लालकाका यांनी कर्झन वायलीला वाचविण्याचा प्रयत्न केला असता तेही यावेळी मारले गेले होते.

आपण देशभक्तीने प्रेरित होऊनच हे धर्मकृत्य केले, असे धिंग्रा याने कोर्टात अभिमानाने सांगितले. भारत मातेचे आणि ईश्वराचे स्मरण करीत मदनलाल धिंग्राने आपल्या देशभक्तीपर कृत्याचे अखेरपर्यंत समर्थन केले. त्याच्या बचावाच्या भाषणाचा वृत्तान्त वाचून भारतीय लोक तर रोमांचित झाले. अनेकांची हृदये हेलावली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे वसाहती खात्याचे त्यावेळी अंडर सेक्रेटरी असलेले श्री. विन्स्टन चर्चिल यांनी, ''देशभक्तीच्या नावाने न्यायालयात स्वत:चा बचाव करणारे अत्यंत उत्कृष्ट निवेदन-'' असे त्या भाषणाचे वर्णन केले.

परंतु गांधीजींना धिंग्राचे हे कृत्य अजिबात पसंत पडले नाही. देशभक्तीच्या उन्मादातून केलेले हे एक भ्याड कृत्य आहे, असे म्हणताना, आपले सहकारी आपला कसा उपहास करीत आहेत, याकडे त्यांनी दुर्लक्षच केले. आपण आमंत्रित केलेल्या पाहुण्याला कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा स्वसंरक्षणाची संधी न देता त्याची अशाप्रकारे हत्या करणे म्हणजे निव्वळ भ्याडपणाच होय, असे गांधीजींचे ठाम मत होते.

स्वार्थ वा लोभ याचा विचारही मनात न आणता, आपले जीवित धोक्यात घालून, देशासाठी धाडसीपणाने शौर्यशाली कृत्य करणाऱ्या धिंग्राची सर्वजण सर्वत्र, प्रशंसा करीत असता, एका नशेत केलेले ते अविचारी कृत्य आहे, असे गांधीजींना वाटत होते, ''भांग वा दारूच्या सेवनाने माणसाला नशा चढते असेच नसून मूर्खासारख्या कल्पना आणि विचार यामुळेही माणसाला अविचाराची नशा चढते-'' असे उद्गार गांधीजींनी काढले.

: २१ :

सागरी प्रवासातील संवादलेखन

देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि धर्मनिष्ठा यांच्या नावाने केलेल्या दहशतवादी कृत्यांचा, लंडनमध्ये भेटलेल्या तरुण भारतीय विद्यार्थ्यांनी चालविलेला उदोउदो पाहून गांधीजी चांगलेच अस्वस्थ झाले होते. ''अशा भीषण खुनी कृत्यांनी भारताचे भले होईल असे ज्यांना वाटते ते अज्ञानी आहेत.'' असे त्यांनी 'इंडियन ओपिनियन'ला लंडनहून धाडलेल्या आपल्या वार्तापत्रात म्हटले. ''विश्वासघातकी कृत्याने कोणा देशाचे भले होते, असे समजणे चुकीचे आहे. अशा दहशतवादी चळवळीमुळे उद्या ब्रिटिश लोक भारत सोडून गेले, तर त्यांच्या जागी कोण सत्तेवर येणार? खुनी कृत्यांचे समर्थन करणारे? मग कोण सुखी होईल? काळे असो वा गोरे, खुनी शासनकर्त्यांची राजवट हिंदुस्थानला सुखी करू शकणार नाही.'' आपल्या देशाचे भवितव्य काय, याचा गंभीरपणे विचार करण्यास, गांधीजींना वरील घटनेने प्रवृत्त केले- आपल्या देशातील ग्रामीण भागात बहुसंख्येने रहाणाऱ्या आणि पाश्चात्य संस्कृतीचा वाराही न लागलेल्या सर्वसामान्य लोकांना सुखी नि समाधानी करील अशी कोणती राज्यव्यवस्था असेल? देश स्वतंत्र झाला तर त्याचे राजकीय, वैधानिक, सामाजिक, आर्थिक स्वरूप कसे असावे, याचा विचार आता गांधीजींना सतत अस्वस्थ करू लागला. टॉलस्टॉय आणि रस्किन यांच्या विचारांचा गांधीजींवर अतिशय प्रभाव असल्याने, औद्योगिक संस्कृतीबद्दल त्यांना तिरस्कारच होता. शेतीत आणि कारागिरीत स्वत: श्रम करून धन निर्माण करणारी आणि नैतिक आचार धर्माचे पालन करणारी सामाजिक व्यवस्था आदर्श होय, असे त्यांचे म्हणणे होते. लोकांनी आधुनिक बेगडी संस्कृतीच्या प्रभावापासून स्वत:ला दूर ठेवले आणि आपल्याच बांधवांचे कोणत्याही प्रकारे शोषण केले नाही, तर आपली सद्सद्विवेक बुद्धी नैतिक आचार धर्माच्या पालनाला आपल्याला सतत प्रोत्साहित करील, असा त्यांचा सिद्धान्त होता.

आपले हे विचार गांधीजींनी संवाद रूपाने लंडन ते दरबान या सागरी प्रवासात लिहून काढले. कोणत्याही मार्गाने ब्रिटिश सत्तेचे जोखड फेकून दिले पाहिजे, असे म्हणणाऱ्या लंडनमधील देशभक्त तरुण भारतीय विद्यार्थ्यांशी आपण संवाद-चर्चा करीत आहोत, असे समजून त्यांनी प्रश्नोत्तराच्या स्वरूपात सॉक्रेटीसच्या प्रश्नसंहितेसारखे हे संवाद लिहिले.

कोणत्याही मार्गाने आणि कशाही प्रकारे ब्रिटिशसत्ताधाऱ्यांना भारतातून घालवून दिले म्हणजे भारत स्वतंत्र झालाच म्हणून समजावा, हे त्या तरुण देशभक्तांचे विचार खोडून काढण्याचा या ''संवादामागील'' हेतू होता. त्यांच्या मते, तसे स्वातंत्र्य म्हणजे देशात इंग्रजांवाचून इंग्रजीसत्ता वा ''वाघ नसेन पण वाघाचे गुणधर्म तर आहेत'' असे म्हणण्यासारखे होते. सत्ता संपादन करणे म्हणजे देशभक्ती वा स्वातंत्र्य असा अर्थ नसून लाखो लोकांना स्वयंशासनाचा अधिकार मिळवून देण्यासाठी धडपड करणे ही खरी देशभक्ती होय, असे गांधीजी म्हणत. भारतातील संस्थानिकांनी आपल्या संस्थानांतून चालविलेला अन्याय्य कारभार इंग्रजांनी चालविलेल्या अन्यायापेक्षा वेगळा मानणे चूक आहे. ''देशभक्ती म्हणजे सर्व लोकांचे आणि समाजाचे कल्याण. इंग्रजांच्या हातून मी ते साधू शकलो, तर त्यांच्यापुढे मी मस्तक झुकवेन;'' असे होते गांधीजींचे विचार.

पाश्चात्य देशातील लोकशाही, अशी समाजव्यवस्था निर्माण करू शकत नाही. कारण अशा लोकशाहीत बहुसंख्यांकानी केलेल्या कायद्याचे पालन करणे सर्वांनाच बंधनकारक असते. बहुसंख्यांकांचे कृत्य अल्पसंख्यांकांनी मानले पाहिजे, असे समजणे पाप आहे. अंगी पुरुषार्थ असलेली व्यक्ती फक्त ईश्वराला भिऊन राहील अन्य कोणाला भिणार नाही. ''अन्यायी कायद्यांचे पालन करणे माणसाला अशोभनीय आहे, याची जाणीव झालेल्या कोणत्याही व्यक्तीला बळजबरीने तुम्ही गुलामगिरीत डांबून ठेवू शकणार नाही. यालाच म्हणतात स्वयंशासन वा स्वराज्य.''

ज्या समाजातील सर्व स्त्री-पुरुष नागरिकात अन्यायाला प्रतिकार करण्याची क्षमता आहे, तेथेच खरे स्वातंत्र्य नांदू शकते. ती समाज व्यवस्थाच खऱ्या अर्थाने सुखी, स्वतंत्र आणि जीवन जगण्यास लायक होय, असे थोरोचे विचार गांधीजी नेहमी उद्धृत करीत.

आधुनिक संस्कृतीत आणि नागरी जीवनात, रेल्वेयंत्रणा, न्यायालये, आधुनिक वैद्यकीय सोयी आणि डॉक्टरांची गर्दी, प्रशासनाचा वाढता व्याप, आणि शिक्षण पद्धतीत विज्ञान आणि माहिती यावर असलेला अनाठायी भर गांधीजींना पसंत

नव्हता; याबाबतीत त्यांचे विचार टॉलस्टॉयशी चांगलेच जुळत होते. गांधीजींनी आपले हे सर्व विचार सुस्पष्टपणे, परखडपणे "हिंद स्वराज्य" या छोटेखानी पुस्तकात ग्रंथित केले. गांधीजींची बुद्धी अतिशय कुशाग्र. प्रत्येक प्रश्नाचा ते खोलवर विचार करणार, त्याचे तर्कशुद्ध विवेचन करणार, आणि अखेरीस चर्चा-विचारविनिमय प्रयोगाअंती ठाम निर्णय घेणार. आपली बाजू वा विचार मांडताना एखाद्या कुशल वकिलासारखेच ते मुद्दे मांडीत जात. न्याय-अन्यायाचा विचार करतांना व्यापक मानव जातीच्या हिताच्या दृष्टीनेच गांधीजींनी सतत विचार केला. त्यासाठी न्यायालयातील वकिलीचे मर्यादित क्षेत्र सोडले. मानवजातीलाच न्याय मिळवून देण्यासाठी ते झगडले. आपल्या परीने आपल्या विचारसरणीनुसार त्यांनी सत्याचा शोध आणि पाठपुरावा केला. एखाद्या न्यायाधिशाच्या वस्तुनिष्ठ दृष्टीकोनाप्रमाणे, पुराव्यांची छाननी करीत सत्याचा शोध घेण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही. एखाद्या प्रश्नावर आधी आपला आतला आवाज काय म्हणतो ते पाहून मग त्याचे बुद्धीचातुर्याने ते समर्थन करीत. परंतु या प्रयत्नात कधीकधी एखाद्या प्रश्नाच्या एकाच बाजूवर अनावश्यक रीत्या अधिक भर दिला जात आहे, असेही घडे आणि समर्थन एकांगी, पूर्वग्रहदूषित आहे, असेही प्रत्ययाला येई. याबाबतीत "हिंद स्वराज" मध्ये त्यांनी केलेल्या काही निवेदनाचे उदाहरण घेता येईल. त्यांनी म्हटले :

"इंग्लंडची सध्याची अवस्था दयनीय आहे. भारतावर अशी पाळी कधीही न येवो अशी माझी ईश्वराला प्रार्थना आहे. ब्रिटिश संसदेला तुम्ही जगातील संसदीय पद्धतीची आद्य माता मानता, परंतु माझ्या मते ती एक वांझ स्त्री आणि वेश्या आहे. हे शब्द कठोर आहेत, परंतु ते सत्य आहेत. याच शब्दात या संसदेचे खरे वर्णन करता येईल. या संसदेने आतापर्यंत एकही चांगली गोष्ट केलेली नाही. म्हणून मी तिला वांझ स्त्री म्हणतो. या संसदेची अवस्था अशी आहे की दबाब आणल्याखेरीज तिच्याकडून काही होईल, अशी शक्यता नाही. ती एखाद्या वेश्येसारखी आहे, कारण मंत्र्यांच्या अधिपत्याखाली नि नियमाखाली तिचे काम चालते, आणि हे मंत्री सारखे बदलत असतात."

"हिंदुस्थानात रेल्वेचे जाळे नसते तर मला नाही वाटत इंग्रजांची भारतावर एवढी पकड राहिली असती. या रेल्वे गाड्यांमुळे प्लेगचा प्रादुर्भावही वाढला आहे. लोक रेल्वेने प्रवास करतात आणि आपल्याबरोबर प्लेगची साथही पसरवितात. पूर्वी असे होत नसे. कारण रोगाचा प्रसार दूरवर होण्यास, फारसा वावच नव्हता. वाहनं नव्हती म्हणून साथही जागीच जिरून जात असे. रेल्वेमुळे आता दुष्काळाचे संकट व त्याचे प्रमाणही वाढते आहे. जेथे जास्त भाव मिळेल तेथे रेल्वेने धान्य जाते. परिणामी

धान्य पिकविणाऱ्या भागात कृत्रिम दुष्काळ पडतो. लोकांना पैसा हवा असतो, मग दुष्काळ पडो वा न पडो. रेल्वे माणसातील दुष्प्रवृत्तींना असे हे उत्तेजन देत आहे. रेल्वे प्रवासामुळे आता देशातील पवित्रस्थळेही अपवित्र आणि घाणीची आगरं झाली आहेत.''

''आता पापाचार आणि व्यसनं वाढत आहेत. व्यसनांमुळे रोग मग डॉक्टरला बोलवा. तो रोग बरा करतो, मग मी नशा करायला, पाप करायला पुन्हा मोकळा होतो. आता डॉक्टरच नसते, तर निसर्गशक्तीनेच मला आपोआप बरे केले असते. मी स्वत:वर ताबा ठेवायला शिकलो असतो. नशेच्या आहारी गेलो नसतो. अर्थात मी सुखी झालो असतो. मी तर म्हणेन की इस्पितळामुळे पापकर्मे वाढायला मदत झाली आहे. आता माणसं आपल्या शरीरप्रकृतीची काळजी कमी करू लागली आहेत. आरोग्यासंबंधीची जाणीव नष्ट होत असून बेपर्वाई वाढत आहे. अर्थात त्यामुळे समाजात अनाचार वाढले तर आश्चर्य का वाटावे ?''

''यंत्रविज्ञान हे आधुनिक युगाचे सांकेतिक प्रतीक असून पापाचेच ते प्रतिनिधित्व करते. या यंत्रसामग्रीने युरोपचा ऱ्हास केला असून इंग्लंडची त्यामुळे लवकरच फार मोठी हानी होणार आहे. माझे विचार मूर्खपणाचे वाटतील. परंतु खरं सांगतो की भारतात कापड गिरण्यांची गर्दी करण्याऐवजी आपण मँचेस्टरला पैसे पाठवून तेथून झिरझिरीत कापड आयात करणे आपल्या फायद्याचे आहे. ते कापड विकत घेऊन वापरल्याने आपण फार तर आपला पैसा घालवू, परंतु भारताचे मँचेस्टर उभे करण्याच्या मागे आपण लागलो तर त्याची किंमत आपल्याला आपले रक्तशोषण करूनच द्यावी लागेल.''

असे होते गांधीजींचे विचार. विधाने बेफाट आहेत, परंतु बुद्धिमता आणि सर्वसामान्य दृष्टिकोन यांचा चमत्कारिक संयोग झाल्याचे येथे दिसते. सुदैवाने प्रत्यक्षात गांधीजींचे व्यक्तिमत्व आगळे आणि जीवन महान होते. आयुष्यात त्यांनी फार मोठी उंची गाठली. शब्दात ती सामावणे कठीण. त्या जीवनात उपदेशापेक्षा प्रत्यक्ष कृतीला अधिक मोल होते; तर्कदुष्ट विचारापेक्षा कृतीशीलतेला जीवनात अधिक महत्त्व होते.

मुळात गुजरातीतून लिहिले गेलेले आणि ''हिंद स्वराज्य ''त छापलेले ते विचार पाहून मुंबई सरकारने भारतात या साप्ताहिकाच्या प्रकाशनास व विक्रीवर बंदी घातली. यामुळे हे विचार इंग्रजीतून प्रसिद्ध करावे असे गांधीजींना तीव्रतेनं वाटू लागले. या मजकुराची एक प्रत टॉलस्टॉय यांना पाठविण्यात आली. आपल्याच विचाराचे प्रतिबिंब त्यात उमटल्याचे पाहून तो वृद्ध तपस्वी हेलावून गेला.

गांधीजींनी अखंडितपणे कोठे काही लिहून ठेवले असेल तर ते त्यांचे लंडन ते दरबानपर्यंतच्या सागरी प्रवासात लिहून काढलेले ते संवाद. याआधी आणि नंतरच्या कालखंडातही गांधीजींनी कोणत्याही विषयावर लेखन करताना ते एकाच प्रकरणात न संपविता, क्रमशः आणि खंडशः अधूनमधून लिहून प्रसिद्ध केले. ''संवाद संहितेचे लेखन व प्रकाशन'' हीच त्या चार महिन्यातील त्यांची मोलाची कामगिरी ठरली.

: २२ :

टॉलस्टॉय मळ्यावर

गांधीजींची लंडनवारी आणि तेथील शिष्टाई वायाच गेली. दक्षिण आफ्रिकेतील ''स्वयंशासित वसाहतींच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास आपण असमर्थ आहोत, असेच पालुपद ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींनी लंडनमध्ये सतत आळविले. दक्षिण आफ्रिकेत ते परतताच पुन्हा कसोटीची वेळ येऊन ठेपली. एकूण वातावरण निराशाजनक होते. नागरी सविनय प्रतिकाराच्या चळवळीतील जोम आता ओसरत होता, आणि इकडे तर गोऱ्यांचे शासन परिस्थितीचा फायदा घेत अधिकाधिक जुलूम जबरदस्ती करण्याच्या पवित्र्यात उभे ठाकले होते.

लढा चालू ठेवण्यासाठी, तसेच ''इंडियन ओपिनियन'' चा खर्च भागविण्यासाठी जवळ फारसा पैसा उरला नव्हता. याचवेळी सुदैवाने भारतातील काही हितेच्छु मित्रांनी तसेच टाटा घराण्याने काही निधी आणि भेटी पाठविल्याने आर्थिक ओढाताणीच्या परिस्थितीला काही काळ तोंड देणे शक्य झाले. त्या जोरावर, लढा किती काळ चालू ठेवता येईल, आणि तो किती लांबेल याची कोणाला कल्पना करता येत नव्हती. सार्वजनिक कार्याकडे आता सर्ववेळ लक्ष देणे आवश्यक असल्याने गांधीजींना आपल्या वकिली व्यवसायाकडे दिवसाकाठी थोडा वेळही लक्ष देणे शक्य होत नव्हते. आतापर्यंत वकिलीत त्यांना चांगली प्राप्ती होत असे. परंतु सार्वजनिक सेवेच्या वाढत्या व्यापामुळे आता गांधीजींचे लक्ष व्यवसायावरून पार उडूनही गेले होते. परिस्थिती गुंतागुंतीची होती आणि काही निर्णय घेणे निकडीचे होते.

अशावेळी स्वावलंबी होऊन, स्वतःच्या ताकदीवरच भरवसा ठेवून परिस्थितीतून मार्ग काढणे शक्य होईल असा गांधीजींचा विश्वास होता. कारण त्यांच्या नैतिक-राजकीय विचारसरणीचा तोच मूलभूत पाया होता. संघटनेचा गाभा स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण करणे आता आवश्यक झाले होते. अशावेळी, गांधीजीचे

एक स्नेही, टॉलस्टॉय यांच्या विचारसरणीचे एक पुरस्कर्ते, जर्मन वास्तुशास्त्रज्ञ कालेनबाख त्यांच्या मदतीला धावले. त्यांनी जोहान्सबर्गपासून २२ मैलांवर ११०० एकर क्षेत्रफळाचा एक मळा विकत घेतला होता. काळा कायदा आणि आफ्रिका प्रवेशबंदी याविरुद्ध लढा देणाऱ्या सत्याग्रहींच्या निवासाची आणि चरितार्थाची सोय करण्यासाठी हा मळा गांधीजींच्या ताब्यात देण्याची कालेनबाख यांची तयारी होती. गांधीजींनी त्याला ''टॉलस्टॉय मळा'' असे नाव दिले. टॉलस्टॉय यांना प्रिय असलेल्या तत्त्वांना अनुकूल अशा पद्धतीने मळ्याचा कारभार चालविण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला. टॉलस्टॉय यांची त्यासाठी पूर्वपरवानगी घेऊन त्यांच्या आशीर्वादाने मळ्याचा कारभार सुरू झाला.

दरबानजवळील फिनिक्स येथील मळा, आणि जोहान्सबर्ग नजिकच्या टॉलस्टॉय मळा असं मिळून दोन मळ्यात आश्रम स्थापन करण्यात आले. फिनिक्स येथे ''इंडियन ओपिनियन'' छापण्याची व्यवस्था होती. तसेच गांधीजींची बायको-मुले तेथे रहात, तर टॉलस्टॉय मळ्यावर स्वत: कालेनबाख, गांधीजी आणि आफ्रिकेत बंदीवासात असलेल्या: सत्याग्रहींचे कुटुंबीय राहू लागले. येथील प्रत्येकाचे जीवन शिस्तबद्ध, साधेसुधे कष्टाळू असे.

या मळ्यात स्थापन केलेल्या आश्रमात असताना गांधीजी मोठे आनंदी असत; कष्टातच त्यांना मोठे समाधान नि आनंद मिळे. किमान गरजा भागवून जगण्यातच त्यांना मोठे सुख होई. जमीन खणणे, लाकूड कापणे, भिंती रंगविणे वा त्यांना चुनामाती देणे ही कामे गांधीजी स्वत: करीत; त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद पसरलेला असे. येथे गांधीजींनी एक शाळाही सुरू केली आणि आपले शैक्षणिक प्रयोग प्रथमच घराबाहेर येथे हाती घेण्यास सुरूवात केली. स्मरणशक्तीवर नव्हे तर मनोविकासावर आणि अंक-शब्द यापेक्षा प्रत्यक्ष कष्टावर येथील शिक्षण पद्धतीचा भर होता. सर्पाच्या सान्निध्यात येथे रहावे लागे, परंतु त्यांना न मारण्याचा आनंद गांधीजींना मिळे. एखाद्या धार्मिक मठासारखे कडक शिस्तीचे वातावरण आश्रमात असे, परंतु सर्वजण आनंदाने अभिमानाने ती शिस्त पाळीत आणि त्या कष्टमय सामूहिक जीवनातील आनंदाचा उपभोग घेत.

गांधीजींचा स्वभाव तसा अत्यंत सहिष्णू, परंतु कधी कधी त्यांनाही राग येत असे. आश्रमातील शिस्त आणि प्रेमाचे वातावरणही अनेक मुलांना रुचत नसे. आश्रमातील एका मुलाचा अत्यंत हूडपणा आणि बेशिस्त वागणूक, एकदा गांधीजींना असह्य झाली आणि त्या भरात त्यांनी त्या मुलाला छडीचा प्रसाद दिला. परंतु तेवढ्याने गांधीजी अस्वस्थ झाले. आपण मुलाला मारले ही आठवण ते नंतर

कधी विसरू शकले नाहीत.

मुलामुलींच्या सहशिक्षणात कधी अपघात घडेल ते सांगता येत नाही. कडक शिस्तीच्या आश्रमातील वातावरणातही कोणावर ब्रह्मचर्याची सक्ती करणे कठीण. परंतु एकदा असा अनैतिक प्रकार घडला. गांधीजी ताबडतोब फिनिक्स आश्रमाकडे धावले आणि त्यांनी एक आठवड्याचे उपोषण केले. त्यानंतर एकदा पंधरवडाभर उपोषण केले. गांधीजींनी आपल्या हयातीत एकून १८ वेळा उपोषणं केली. त्यांपैकी पहिले उपोषण केले ते हे आफ्रिकेत.

दुसऱ्यांचे दोष आणि चुका काढण्याआधी आपल्यात काय दोष आहेत ते प्रथम पाहण्याचा गांधींजींचा स्वभावच होता. आयुष्यभर त्यांनी हेच केले. आपल्या विद्यार्थ्यांच्या हातून पाप घडल्याबद्दल त्यांनी स्वत:लाच आधी दोष दिला. ''मी मग सात दिवस उपोषण केले. तसेच स्वत:ला शिक्षा म्हणून साडेचार महिने एकदाच अन्न ग्रहण करण्याची शपथ घेतली. माझ्या या प्रायश्चित घेण्यामुळे अनेकांना वाईट वाटते. परंतु त्यामुळे वातावरण निवळण्यास मदत झाली. असे पाप करणे किती वाईट याची सर्वांनाच जाणीव झाली. त्यामुळे तेथील विद्यार्थी-विद्यार्थिनींना माझ्याविषयी अधिकच आपुलकी वाटू लागली. आम्ही अधिकच निकट आलो.'' आपल्या प्रायश्चितामुळे इतरांचे हृदयपरिवर्तन होते या भ्रमात गांधीजी आयुष्यभर राहिले.

राजकीय आणि व्यापारी स्वरूपाच्या वाटाघाटीत, आणि चर्चेत गांधीजी एखाद्या कुशल वकिलाप्रमाणे वागत. केवळ कोणाच्या शब्दावर विसंबून रहात नसत. परंतु नैतिक जाणीवेचा प्रश्न आला की इतरांच्या शब्दांवर आणि वचनांवर ते खुशाल विश्वास ठेवीत.

●

: २३ :
वादळापूर्वीची शांतता

आश्रमातील जीवनाची घडी बसवीत असतानाचे सविनय कायदेभंगाची चळवळ सुरुच होली. स्वयंसेवक ट्रान्सवाल मध्ये शिरून सत्याग्रह करीत होते. तुरुंगात जात होते. तेथे त्यांना झोडपले जाई किंवा पुन्हा हद्दपार केले जाई. ब्रिटिशसरकारने जाणून बुजून या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याने अत्याचार वाढत आहेत, अशा बातम्या आफ्रिकेतून भारतात जाताच, लोकांचा संताप वाढत होता.याचवेळी गोपाळ कृष्ण गोखल्यांनी आफ्रिकेतील भारतीयांची बाजू घेऊन निवेदन करायला प्रारंभ केलाच होता. या वेळी बादशहा ५वे जॉर्ज यांचा राज्यरोहण समारंभ समीप येत असताना भारतीय लोकांच्या भावना जपण्याचा गोऱ्या अधिकाऱ्यांचा प्रयत्न होता. त्यानुसार दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने १९११ मध्ये जाहीर केलं की भारतीयांना वाशिकदृष्ट्या आशियाई म्हणून वेगळी वागणूक दिली जाणार नाही वा त्यांच्या बाबतीत भेदभावही केला जाणार नाही. शैक्षणिक चाचणी घेऊन ट्रान्सवालमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय घेतला जाईल. इकडे चार वर्षे चालू असलेला सत्याग्रह मागे घेण्यात आला नि परिणामी सर्व सत्याग्रहींची तुरुंगातून सुटका करण्यात आली. परंतु नंतरच्या घटनांनी, ही केवळ वादळापूर्वीची शांतता होती, हेच सिध्द केले.

सन १९१२ मध्ये श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांनी दक्षिण आफ्रिकेला भेट दिली तेव्हा सरकारी पाहुणे म्हणून सर्वत्र त्यांचा मान राखण्यात आला. गोखले हे गांधीर्जीचे राजकीय गुरु आणि आदर्श होते. या शिष्याने पुढे गुरुपेक्षा अधिक उंची गाठली. आपल्या भेटीत गोखल्यांनी आफ्रिकेतील भारतीयांच्या प्रश्नात खोलवर लक्ष घातले. गोखल्यांच्या भेटीनं गांधीजी फार आनंदित झाले. त्यांच्या दौऱ्यात गांधीर्जीनी सतत त्यांची सोबत केली, चिटणीस म्हणून काम केले आणि दाईच्या मायेनं गोखल्यांची दौऱ्यात काळजी घेतली. गोखल्यांना मधुमेहाचा त्रास असल्यान त्यांच्या आहारावर अनेक बंधन होती. गांधीर्जीनी स्वतः लक्ष घालून

गोखल्यांच्या आहाराची काळजी घेतली. यात श्रीमती पोलाक यांनी त्यांना मदत केली. गांधीजी गोखल्यांची किती काळजी घेत, ते पाहून श्रीमती पोलाक भारावल्या. त्यात गंमतही होती. ''आपल्या खांद्यावरील उपरणे नीट नेटके, स्वच्छ असावे नि त्याची घडी देखील कशी व्यवस्थित असावी, याची गोखले फारच काळजी घेत. गांधीजींनीच मग ते उपरणे धुण्याची, त्याला इस्त्री करण्याची, नित्याची नीट घडी घालण्याची जबाबदारी. आपल्या अंगावर घेतली.

दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने अधिकृतरित्या केलेले हार्दिक स्वागत आणि जनरल बोथा अन् जनरल स्मटस् यांनी त्यांना दिलेल्या दिलखुलास आश्वासनांमुळे गोखले प्रभावित झाले. तेथील मंत्र्याबरोबर एका बैठकीत झालेल्या दीर्घ वाटाघाटीनंतर गांधींशी बोलताना गोखले म्हणाले की, आता येथे सर्व सुरळीत असून गांधींनी वर्षभरात भारताला परतावे, ''तो 'काळा कायदा' रद्द केला जाईल. भारतीयांनी दक्षिण आफ्रिकेत प्रवेश करण्याविरुध्दच्या कायद्यातील वांशिक भेदभाव विषयक कलम रद्द होईल. तसेच भारतीयांवरील ३ पौंड कर आकारणीही काढून टाकण्यात येईल.'' परंतु गांधीजींच्या मनात शंका होती अनेक राजकारण्यांपेक्षा ते या बाबतीत अधिक चतुर होते.

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत चालविलेले कार्य आणि त्यांच्या अनुयायांचे नीती धैर्य पाहून गोखले चांगलेच प्रभावित झाले होते. भारतात परततांच, मुंबई येथील एका सभेत बोलताना गोखले म्हणाले : ''श्रीयुत गांधी यांच्या निकट सान्निध्यात येणारी कोणतीही व्यक्ती खरोखरी जाणू शकेल की हा माणूस काय आहे. आदर्श नेत्याचे आणि हुतात्म्यांचे सारे गुण या महान व्यक्तिमत्वात सामावले आहेत. नव्हे; मी तर म्हणेन की सभोवतालच्या सर्व सामान्य माणसातून नवे नेतृत्व आणि हौतात्म्यालाही सामोरे जातील असे अनुयायी उभे करण्याची जबरदस्त ताकद आणि आत्मिक शक्ती त्यांच्या ठायी सामावली आहे.''

दक्षिण आफ्रिकेच्या नेत्यांनी गोखल्यांना दिलेली आश्वासने अल्पजीवीच ठरली. भारतीय कंत्राटी कामगारांवर नि त्यांच्या कुटुंबियांवर दक्षिण आफ्रिकेत लादलेला तीन पौंडाचा कर काढून टाकणे आपल्याला शक्य होणार नाही, असे लवकरच जनरल स्मटस् यांनी जाहीर केले. त्यातच तेथील सर्वोच्च न्यायालयाने आफ्रिकेत येणाऱ्या भारतीयांबाबत एक निवाडा देऊन अन्यायावर कडीच केली. तेथे होणाऱ्या भारतीयांचे विवाहही खिश्चन रीतीरीवाजानुसार झाले नाहीत आणि त्यांची तशी नोंदणी झाली नाही, तर ते विवाह रद्द समजावेत, असा बाई मरियम यांच्या प्रकरणात न्यायालयाने निवाडा दिला. हिंदू, मुस्लिम नि पारशी विवाह बंधनाच्या

पावित्र्याला आव्हान देणाऱ्या या निर्णयाने सर्वत्र चीड निर्माण झाली आणि पुरुषांच्या बरोबरीने महिलाही स्वाभिमान डिवचणाऱ्या या अन्यायास विरोध करण्यासाठी उभ्या ठाकल्या. जुलुमास प्रतिकार करण्यासाठी सिध्द झालेली कंत्राटी कामगार आणि सर्व थरातील महिला यांची एक मोठी फौजच आता तयार झाली.

लढ्याचे हे अखेरचे पर्व १९१३ सालच्या सप्टेंबर महिन्यात सुरु झाले. "आफ्रिकेतील सत्याग्रह" या प्रकाशनात या लढ्याचे गांधीजींनी समग्रवर्णन केले आहे. लढ्याचा प्रारंभ त्यांनी काळजीपूर्वक आणि मर्यादित प्रमाणावर केला. तो त्यांच्या नेहमीच्या डावपेचाचा भाग होता. प्रथम फिनिक्स येथील मळ्यात राहणाऱ्या १६ सत्याग्रहींची एक तुकडी, कायदा मोडून ट्रान्सवाल मध्ये प्रवेश करण्यासाठी उभी करण्यात आली. यात कस्तुरबाचाही समावेश होता. बाहेरून येणाऱ्या भारतीयांना ट्रान्सवालमध्ये प्रवेश करण्यास मनाई होती. तुकडीला अटक करण्यात येऊन सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. यानंतर टॉलस्टॉय आश्रमात राहणाऱ्या केवळ महिलांच्या तुकडीने उत्तर दिशेने ट्रान्सवालमध्ये प्रवेश करावा आणि युकॉल येथे पोहचावे, असे ठरले. या सत्याग्रहामुळे तेथील भारतीय कामगारांनी संप केला. या महिला सत्याग्रहींना अटक होताच संप अधिकच भडकला. तेथील अधिकाऱ्यांनी दडपशाही करुन संपावरील कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या राहत्या जागेतून बाहेर काढले.

हजारो निराश्रित, बेकार नि उपाशी कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबातील लोकांना सांभाळून घेण्याची, त्यांची व्यवस्था करण्याची मोठी जबाबदारी आता गांधीजींवर येऊन पडली. त्यांना एक नामी कल्पना सुचली. या कामगारांचा एक मोठा मोर्चा आयोजित करून त्यानी त्या सर्वांना ट्रान्सवालमध्ये घुसून स्वतःला अटक करुन घेण्यास सांगितले. त्यांना अन्न, पाणी आणि निवारा देण्याची जबाबदारी गोऱ्या अधिकाऱ्यांवर येऊन पडली. मुलांबाळासहित स्त्रीपुरुषांचा मोठा मोर्चा ट्रान्सवालकडे निघाला. वाटेत अनेक अडीअडचणी आल्या, हाल सोसावे लागले, परंतु सर्वांनी त्याला धीराने तोंड दिले. एकदा तर एके ठिकाणी ओढा ओलांडताना एका बाईच्या कडेवरून तिचे मूल निसटले आणि ओढ्यात वाहून गेले. परंतू ती माता खरोखरी धीरोदात्त म्हणावी लागेल. "मेलेले माणूस काही आता माघारी येणार नाही. त्याचे दुःख करीत बसण्याऐवजी जे जिवंत आहेत त्यांच्यासाठी काही केलं तर पुण्य तरी लागेल" असे म्हणून ती मोर्च्यात पुन्हा सामील झाली.

गांधीजी मोर्चाचे नेतृत्व करीत होते. मि. कालेनबाख, मि. पोलाक आणि त्यांची चिटणीस कुमारी इलेसिन या युरोपीय स्नेह्यांची सोबत होतीच. चार दिवसात

गांधीजींना तीन वेळा अटक करण्यात आली आणि अखेरीस ९ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. कालेनबाख आणि पोलाक यांनाही अटक करण्यात आली. नेत्याला अटक केल्यास अनुयायांचे मनोधैर्य खचेल, हा अधिकाऱ्यांचा अंदाज मात्र साफ चुकला.

मोर्चेवाल्यांचा सारा आवेश गळून पडावा म्हणून केलेल्या प्रयत्नांना यश न आल्याने चिडून पोलीसांनी दंडेलीचा अवलंब सुरू केला. खाण कामगारांनी ज्या खाणीत संप केला होता, तेथेच त्या खाणीत संपकरी खाणकामगारांना बळजबरीने नेऊन कोंडण्याचा प्रयत्न करण्यात आला. विरोध करणाऱ्यांना चाबकाने आणि लाठ्याकाठ्यांनी बडविण्यात आले. या दडपशाहीच्या बातम्या भारतात पोहोचताच सर्वत्र संतापाची लाट उसळली. इंग्लंडमध्येही अनेकांना या प्रकाराची चीड आली. हिंदुस्थानचे त्यावेळचे व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांनी तर या अत्याचाराचा निषेध केला. आणि ते म्हणाले की ''स्वत:ला सुसंस्कृत समजणाऱ्या देशाने एक क्षणभरही असा अन्याय आणि अत्याचार सहन करता कामा नये.''

ब्रिटिश सरकारला या सर्व प्रकरणाबद्दल आधीच अपराधीपणाची भावना डाचत होती. जनरल स्मटस् यांच्यावर मग दबाव आणण्यात आला. '' उंदीर खाऊ इच्छिणाऱ्या सापाच्या तोंडात धड तो उंदीर जाऊ नये आणि त्याला तो बाहेरही काढता येऊ नये'' अशी जनरल स्मटसूची अवस्था झाल्याचे गांधीजींनी म्हटले. अशावेळी अडचणीची परिस्थिती नजरे आड करण्याचा मार्ग म्हणजे चौकशी समितीची नेमणूक करणे. त्या आधी गांधीजी आणि त्यांचे सहकारी कालेनबाख अन् पोलाक यांना सोडण्यात आले. त्यावेळी गोखल्यांनी चार्लस् फ्रिअर ॲण्ड्रयूज आणि डब्लु डब्लु पिअर्सन या दोन उदार मतवादी नि मोठ्या मनाच्या इंग्रज गृहस्थांना मध्यस्थीसाठी आफ्रिकेत पाठविले. त्यांच्या आगमनाचा फायदा झाला. आदर्श ख्रिस्तधर्मीय कसा असावा ते या उभयतांकडे पाहून सांगावे. उभयता गांधीजींना भेटावयास आले तेंव्हा त्यांना पाहून असिसीचे संत फ्रान्सिस यांचीच आठवण त्यांना झाली.

चौकशी समितीतील सर्व सदस्य गोरे होते, हे लक्षात येताच गांधीजींनी त्याला विरोध केला. कारण त्यांचा अहवाल पूर्वग्रहाने ग्रासलेला आणि एकतर्फी असणार यात त्यांना शंका नव्हती. सविनय कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू करण्याची त्यांनी धमकी दिली, तोच दक्षिण आफ्रिकेच्या सरकारपुढे नवा पेच प्रसंग उभा राहिला. आफ्रिकेतील रेल्वेतील सर्व गोरे कर्मचारी आपल्या मागण्यासाठी संपावर गेले. लष्करी कायदा पुकारावा अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली. गांधीजी पुन्हा एकदा

मदतीला धावले. प्रतिकूल परिस्थितीचा लाभ उठवून सरकारला-आपल्या प्रतिस्पर्ध्याला आणखी संकटात लोटायची त्यांची तयारी नव्हती. या चांगुलपणाने अनुकूल असाच परिणाम साधला आणि गोऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधाचीही धार बोथट झाली. झगड्याऐवजी समझोत्याने प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न सुरू झाला. स्मटस् यांनीही मग गांधीजींना बोलणी करण्यासाठी निरोप धाडला. लढा लढविण्याचा गांधीजींचा हा आगळा मार्ग पाहून प्रा. गिल्बर्ट मरे यांनी म्हटले, की, ''गांधीजींनी बाजी मारली यात आश्चर्य वाटायचे कारण नाही. त्यांचा लढा देण्याचा मार्गच असा चमत्कारिक आणि आगळा आहे की माणुसकीचा थोडाही लवलेश असलेला कोणीही शत्रू लढ्याला तोंड देऊ शकणार नाही, विरोध करु शकणार नाही.''

या उलट, गांधीजींचा हा लढा संकुचित होता; त्यांनी फक्त भारतीय समाजाचे हित संबंध जपण्यासाठी चळवळ केली; मूळच्या आफ्रिकी नागरिकांच्या हिताकडे फारसे लक्ष दिले नाही, असाही आरोप केला जातो. आर्थिक लाभासाठी बाहेरून आलेल्या भारतीयांपेक्षा मूळ आफ्रिकी लोकांवर अधिक अन्याय होतो, त्यांचा अधिकच अवमान केला जातो, या गोष्टींकडे गांधीजींचे लक्ष नव्हते. त्यासाठी त्यांची बाजू गांधीजींनी कधी घेतली नाही, असे म्हटले जात असे. राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी तर, गोऱ्या कामगारांची न्याय्य बाजू घेण्याऐवजी गांधीजींनी जुलमी राजवटीची बाजू घेण्यास कमी केले नाही, असाही आरोप केला गेला.

क्रांतीच्या परंपरागत कल्पना डोक्यात ठेवून गांधीजींच्या कृतीचा असा अर्थ लावला तर त्यांच्या मनाची खरी ओळख पटणार नाही. या क्षेत्रात गांधीजींना मूळ प्रेरणा कोठून मिळाली, त्यांच्या नैतिक सामर्थ्याची गंगोत्री कोठे आहे, हेही असा चुकीचा विचार मनात आणला, तर कळणे कठीण जाईल. गांधीजींना लेनिन वा माओ व्हायची इच्छा नव्हती. त्यामुळे साम्यवादी दृष्टिकोनातून गांधीजींच्या लढ्याचा विचार करणे जसे चुकीचे ठरेल त्याच प्रमाणे लेनिन आणि माओ यांच्या लढ्याचा गांधीवादी दृष्टीकोनातून विचार करणेही अयोग्य ठरेल.

अखेरीस १९१४ सालच्या जानेवारी महिन्यात जनरल स्मटस् आणि गांधीजी यात एक तात्पुरता करार झाला. त्यानुसार त्या वर्षीच्या जून महिन्यात द. आफ्रिकेच्या कायदेमंडलात एक विधेयक मंजूर करण्यात येऊन भारतीयांवरील ३ पौंडाचा कर रद्द करण्यात आला. भारतीय कायदे आणि प्रथा परंपरानुसार होणाऱ्या विवाहाला मान्यता देण्याचे ठरले. आणि अन्य काही सवलती भारतीयांना देण्यात आल्या. या दोघांपैकी कोणा एकाचा विजय झाला असे म्हणता येणार नाही. कारण एकाचा

विजय झाला असे म्हटले तर दुसऱ्याला पराभवाची नामुष्की पदरात घ्यावी लागते. येथे गांधीजींच्या लढ्याचे वैशिष्ट्य हे की विजयाचा आनंद दोन्ही पक्षांना सारखाच व्हावा. सत्याग्रहाचे हेच मर्म की येथे कोणी कोणाचा पराभव करीत नाही, तर प्रतिस्पर्ध्याचे मन जिंकून घेण्यात येते आणि होणाऱ्या लाभात उभयता आनंदाने सहभागी होतात, असे गांधीजी नेहमी म्हणत. संहारक युध्द करुन मिळविलल्या विजयाचे मोल प्रत्यक्ष मिळालेल्या लाभापेक्षाही अधिक मोजावे लागते. सम्राट अशोकला कलिंग देशाच्या रणभूमीवर हाच अनुभव आला; आणि त्यानंतर २००० वर्षांनी वेलिंग्टनच्या ड्यूकने नेपोलियनचा पराभव करुन हाच कटू अनुभव घेतला. ''लढाईत विजय होवो वा पराजय, वाट्याला येणारे दुःखद अनुभव समसमानच असतात म्हणाना!'' असे वेलिंग्टनने म्हटलेच आहे.

: २४ :
आफ्रिकेचा निरोप

दक्षिण आफ्रिकेतील आपले देशवासीय आणि युरोपीयन स्नेही यांचा निरोप घेताना, लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी, जनरल स्मटस् यांच्याबरोबर झालेल्या कराराचे आणि समेटाचे वर्णन ''दक्षिण आफ्रिकेतील आपल्या स्वातंत्र्याची महान सनद (मॅग्ना चार्टा)'', असे केले आहे. अखेरीस गांधीजी आशावादी होते. इंग्रज माणसाचा सभ्यपणा, त्यांची उदार मतवादी विचार परंपरा, ब्रिटिश राज्य घटनेतील लोकशाही तरतुदी आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीचा क्रियाशील प्रागतिक दृष्टिकोन यावर गांधीजींची अद्यापी अटळ श्रद्धा होती.

''या विधेयकानुसार आम्हाला देण्यात आलेले अधिकार यापूर्वी आम्ही कधी भोगले नव्हते, म्हणून वा त्यातील तरतुदी आगळ्या नि नवीन होत्या म्हणून नव्हे, तर हे अधिकार आणि हक्क फार मोठे मोल देऊन-आठ वर्षे झगडा केल्यानंतर आम्ही हस्तगत केले म्हणूनच मी त्यांचे वर्णन 'महान सनद्' वा आमची 'मॅग्ना चार्टा' असे केले. या विधेयकाने, द. आफ्रिकेच्या सरकारचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनात आणि एकूण धोरणात किती तरी बदल झाला. तसेच आमच्याशी संबंधित बाबींवर निर्णय घेताना प्रथम आमचा सल्ला घेण्याचे आणि आमच्या इच्छांचा मान राखण्याचा अधिकार आम्ही मिळविला, म्हणूनच मी या विधेयकाला आमची ''मॅग्ना चार्टा'' म्हणतो. स्थानिक चालीरितीत कितीही फरक असो, वांशिकदृष्ट्या कोणात भेदभाव करता येणार नाही, हे ब्रिटिश राज्यघटनेचे मूळ तत्त्व आहे, त्याला या विधेयकाने पुष्टी दिली. खेरीज सविनय प्रतिकाराचे नि कायदे भंगाच्या आमच्या चळवळीचे शस्त्र किती प्रभावी आहे, ते या घटनेने सिद्ध केले. एकप्रकारे सरकारकडून त्याला मान्यता प्राप्त झाली. आमच्या समाजाची ताकदही त्यामुळे वाढली. मतदानापेक्षाही सविनय कायदेभंगाचे नि प्रतिकाराचे अस्त्र अधिक प्रभावी होय, असे मला वाटले कारण मतदानाची पद्धती अनेकवेळा

मतदारांच्याच हिताविरुद्ध जाते, असे अनेकदा अनुभवास आले आहे.''

केपटाऊन येथे एका जाहीर सभेत भिन्नवंशांच्या श्रोत्यांपुढे निरोपाचे भाषण करताना गांधीजी म्हणाले, ''सुदैव समजा की दुर्दैव, चांगले समजा वा वाईट, नि योग्य की अयोग्य-भारतीय आणि इंग्रज माणसं एकत्र, एकमेकासमीप तर आली आहेत. आता उभय वंशांनी मिळून असे काही कर्तृत्व दाखवावे की भावी पिढ्यांनाही त्याचा लाभ व्हावा. अनेक साम्राज्ये आली नि गेली, परंतु ब्रिटिश साम्राज्य एक अपवाद आहे, त्याचा पाया भौतिक नव्हे तर अध्यात्मिक आहे, या साम्राज्याचा भर रचनात्मकतेवर आहे असे सिद्ध करून दाखविण्याची मोठी जबाबदारी तुमच्यावर आहे.''

पुढील पाच वर्षात, गांधीजींच्या या श्रद्धेला, अपेक्षांना; आंकाक्षांना तडा जावा, असेच वर्तन ब्रिटिश सरकारकडून घडत गेले; हा या साम्राज्याचा दैवदुर्विलास होय. गांधीजी या साम्राज्यशाहीला जणू देवदूत समजत होते. त्यांचा भ्रमनिरास झाला.

गांधीजींच्या चळवळीवर आणि लढ्याबद्दल बोलताना रोमा रोलाँ एकदा म्हणाले होते, ''दक्षिण आफ्रिकेत त्यांनी २० वर्षे सतत चळवळ केली. लढा दिला आणि तरीही युरोपात कोठे त्यावर प्रतिक्रिया दिसून आली नाही, यावरून आमचे राजकीय मुत्सद्दी, इतिहासकार, विचारवंत आणि धर्मवेत्ते यांची दृष्टी किती अधू आहे, हेच सिद्ध होते. कारण गांधीजींचा लढा हा अखेर तुमचा आत्मा, तुमची सद्सद्विवेक बुद्धी जागृत करण्यासाठी होता. प्रचलित इतिहासात या लढ्याला तोड नाही. लढा किती काळ चालला, त्याची तीव्रता किती होती, त्यासाठी किती जणांनी त्याग केला हे या ठिकाणी महत्त्वाचे नसून या लढ्याने अंती विजय कसा मिळाला ते महत्त्वाचे आहे.''

दि. १८ जुलै १९१४ रोजी गांधीजींनी कस्तुरबा आणि कालेनबाख यांच्यासमवेत फिरून दक्षिण आफ्रिकेचे शेवटचे दर्शन घेतले. याच भूमीने त्यांना नवी दृष्टी दिली, नवा मार्ग दाखविला आणि आपल्या आत्मिक सामर्थ्याची कसोटी घेण्याची संधी मिळवून दिली होती. आजच्या दक्षिण आफ्रिकेविषयी भारतीय नागरिक काहीही म्हणो, त्या देवतास्वरूप माणसाने, आपल्या भूमीवर आपल्या लोकांवर प्रेम करतानाही, कधीही गोऱ्यांविरुद्ध मनात कटुतेची भावना ठेवली नाही. खऱ्या अर्थाने तो विश्वमानव होता. आपल्या निरोपाच्या भाषणात दक्षिण आफ्रिकेविषयी बोलताना गांधीजी म्हणाले, ''माझ्या मातृभूमीनंतर हीच भूमी मला पवित्र नि प्रिय वाटते. मोठ्या जड अंत:करणाने मी हा देश सोडीत आहे. मी या देशाच्या किनाऱ्यापासून दूर जात आहे. असे असले तरी माझे मन या देशाकडे सतत ओढ घेत राहील. या

देशाच्या कल्याणाचा आणि भल्याचा विचार माझ्या मनातून कधी जाणार नाही. येथील माझ्या देशबांधवांनी तसेच अनेक युरोपीय स्नेह्यांनी माझ्यावर अलोट प्रेम केले, मला सांभाळून घेतले माझी सतत काळजी वाहिली त्याच्या आठवणी मी आयुष्यभर माझ्या हृदयात जपून ठेवीन.''

गांधीजींना मायदेशी परतण्याची इकडे घाई झाली असतानाच त्यांना इंग्लंडला जावे लागले. गोपाळ कृष्ण गोखल्यांनी त्यांना तिकडे बोलावून घेतले. गेली तीन वर्षे गांधीजींच्या प्रकृतीवर चांगलाच ताण पडला होता. अलीकडेच त्यांनी दुसऱ्याच्या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून १५ दिवसांचे उपोषणही केले होते. त्यांची प्रकृती तशी सुदृढ नव्हतीच, तरीही बोटीवर तिसऱ्या वर्गाने प्रवास करण्याचा त्यांनी हट्ट धरला. सुदैवाने बोटीवरील अधिकारी वर्गाने त्यांच्या तसेच बरोबरच्या लोकांसाठी बोटीच्या डेकवर खास व्यवस्था केली. त्यांना फलाहार मिळावा म्हणूनही व्यवस्था करण्यात आली. कालेनबाख सोबतीला बरोबर असल्याने प्रवास चांगला चालला होता. भावी योजनांवर स्वस्थपणे चर्चा करण्यात उभयतांचा बराच वेळ निघून जात असे.

गांधीजींशी स्नेहसंबंध ठेवायचे म्हणजे त्याची किंमतही कशी मोजावी लागत असे, त्याची हकीकत स्वत: गांधीजींनीच सांगितली आहे. कालेनबाख यांच्याजवळ चांगल्या एकदोन दुर्बिणी होत्या. आपल्याजवळ दुर्बिणी आहेत याचा त्यांना अभिमानही वाटत असे. परंतु मालकी हक्काच्या कल्पनेवर टीका करणाऱ्या माणसाजवळ अशा गरजेपेक्षा अधिक आणि मोलाच्या वस्तू असणे गांधीजींना कसे रुचावे ? त्यांनी कालेनबाखला तसे सांगितले आणि या विषयावर उगाच पुढे वाद वाढायला नको म्हणून त्या दुर्बिणी समुद्रात फेकून देण्यास कालेनबाखला सांगितले. श्री. कालेनबाख वचनाचे नि शब्दाचे पक्के होते. ''फेकून द्या त्या दुर्बिणी समुद्रात'' ते म्हणाले ''आणि मी त्या दुर्बिणी समुद्रार्पण केल्या. त्या फेकताना मला किती आनंद, समाधान आणि अभिमान वाटला.''

त्यांच्या जहाजाने इंग्लिश खाडीत प्रवेश केला न केला तोच पहिले महायुद्ध सुरू झाल्याची बातमी प्रवाशांच्या कानावर आली. खाडी ओलांडून लंडनला पोहोचेतो दोन दिवस गेले, कारण सुरूंग टाळीत जहाजाचा प्रवास करायचा होता. लंडनला पोहोचताच गांधीजींना कळले की पॅरिसच्या भेटीवर निघालेले गोखले तेथेच अडकून पडले होते.

: २५ :

ब्रिटिश साम्राज्याची सेवा

ब्रिटन युद्धामध्ये गुंतलेले असताना गांधीजींनी काय करावे ? त्यांचे कर्तव्य कोणते ? काहीही न करता स्वस्थ बसावे वा कुंपणावर बसून गंमत पहावी, असा गांधीजींचा स्वभावच नव्हता. बोअर युद्धाच्या आणि झुलू बंडाच्या वेळी आपण काय केले त्याचे त्यांना आता स्मरण झाले. ब्रिटिश साम्राज्यापुढे पेचप्रसंग उभा असता त्यांनी आपली सेवा रुजू करावी का ?

गांधीजींनी आपल्या इंग्लंडमधील सहकाऱ्यांशी सल्लामसलत केली. इंग्लंड अडचणीत असताना भारताने स्वातंत्र्याची आपली मागणी पुढे करण्यास ही सुसंधी आहे, असे अनेकांनी गांधीजींना सांगितले. ज्या समाजाने, सत्ताधाऱ्यांनी नि राजवटीने गुलामी आपल्यावर लादली तिचे संरक्षण करणे हे गुलामांचे कर्तव्य कसे असू शकते, असा युक्तिवाद त्यांनी केला.

परंतु गांधीजींना ते पटणे कठीण होते. ब्रिटन, भारतीय स्वातंत्र्याचे शत्रू आहे, ही गोष्टच त्यावेळी गांधीजींच्या मनाला पटत नव्हती आणि ब्रिटन आपले शत्रू आहे असे समजले तरी तो देश संकटात असतांना त्याला असे खिंडीत गाठून अडचणीत आणणे भलेपणाचे लक्षण नव्हते. तेव्हा गांधीजींनी पुन्हा एकदा ब्रिटिश अधिकाऱ्यांना पत्र लिहून भारतीयांचे शुश्रूषापथक स्थापन करण्याची आपली तयारी असल्याचे कळविले. इंग्लंड आणि आफ्रिकेमध्ये असलेल्या भारतीयांना त्यात सामील होण्याचे कळकळीचे आवाहनही त्यांनी केले.

गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वाला विरोधी अशी ही कृती आहे, अशी तार हेन्री पोलाक यांनी दक्षिण आफ्रिकेतून केली. परंतु कोणत्याही मतप्रणालीला केवळ हट्टीपणाने चिकटून रहाण्याचा, गांधीजींचा तेव्हा तसेच, त्यानंतरही स्वभाव नव्हता. शांतता वादाच्या परंपरागत कल्पनेला ते कधी चिकटून राहिले नाहीत वा अहिंसेचा शब्दशः अर्थ घेऊन त्यांनी कधी त्या तत्त्वाचा वा कल्पनेचा अंधपणाने पुरस्कारही केला नाही. प्रयोगाअंती, स्वतःची पूर्ण खात्री पटली, की परिस्थितीनुरूप आपली

तत्त्वप्रणाली प्रत्यक्षात आणण्यावर गांधीजींचा भर असे. लढाऊ आणि बिगर लढाऊ प्रवृत्तीत त्यानी कधी फरक केला नाही. आपल्यापुढील कार्य गर्हणीय, वाईट असेल, तर कोणत्याही परिस्थितीत त्यात भाग घेऊ नये, असे गांधीजींचे ठाम मत होते. त्याचवेळी, चांगल्या वाईटाचा निर्णय घेता आला नाही, तर जेवढी मदत करता येईल तेवढी करावी, असे ते म्हणत.

आपले पुतणे श्री. मगनभाई यांना लिहिलेल्या एका पत्रात आपली भूमिका गांधीजींनी अधिक स्पष्ट केली आहे. ते म्हणतात : ''कत्तलखान्याला मदत करण्याची ज्यांची इच्छा नाही, त्यांनी कसाबाचे घरही झाडता कामा नये. परंतु मी इथे इंग्लंडमध्ये रहात असताना एकप्रकारे मी या युद्धातही सहभागी झालो आहे. असे मला सारखे वाटते. आज लंडन शहराला जो धान्यपुरवठा होत आहे, तो केवळ ब्रिटिश नौदलाचे संरक्षण आहे म्हणूनच अशाप्रकारे होणाऱ्या धान्यपुरवठ्यातील अन्नही, मग मी ग्रहण का करावे ? युद्धाने रक्तरंजित झालेले नि विटाळलेले हे अन्न मी सेवन करीत असताना, ते मिळविण्यासाठी मी येथे काही सेवा करणे माझे कर्तव्य ठरत नाही का ? या युद्धात सहभागी होणे, आणि देशासाठी प्राण देणे हे आपले कर्तव्य आहे, असे हजारो नव्हे लाखो लोकांना वाटत असताना, मी केवळ बसून राहणे योग्य ठरेल का ? या हाताने कधी बंदूक झाडली जाणार नाही. मग निदान, जखमी झालेल्यांची सेवा-शुश्रुषा तरी करावी म्हणूनच मी हे काम अंगावर घेत आहे.''

गांधीजींनी देऊ केलेली मदत ब्रिटिश सरकारने स्वीकारली आणि त्यांना आणि त्यांच्या पथकात सामील झालेल्यांना प्रशिक्षणासाठी रवाना केले. परंतु प्रशिक्षण पुरे होऊन प्रत्यक्ष आघाडीवर रवाना होण्याच्या आतच गांधीजींना प्लुरसीने गाठले. त्यांना पथकात काम करणे कठीण होते. डॉक्टर, स्नेही मंडळी यांनी त्यांना भारतास परतण्याचा सल्ला दिला. इंग्लंडमधील येता हिवाळा प्रकृतीच्या दृष्टीने त्यांना फार त्रासदायक ठरेल, असा इशाराही गांधीजींना देण्यात आला. सुदैवाने गांधीजींनी सल्ला मानला आणि त्यावर्षीच्या डिसेंबरमध्ये ते सपत्नीक मायदेशी येण्यास निघाले.

मि. कालेनबाख यांनी आपल्याबरोबर भारतात यावे यासाठी त्यांना ब्रिटिश पासपोर्ट मिळवून देण्याचे गांधीजींनी आटोकाट प्रयत्न केले. परंतु कालेनबाख जन्माने जर्मन असल्याने या प्रयत्नांना यश आले नाही. ''श्री. कालेनबाखना निरोप देणे मला फार जड गेले. परंतु माझ्यापेक्षाही त्यांचे दु:ख अधिक होते, याची मला जाणीव होती.'' असे गांधीजींनी लिहून ठेवले होते.

लंडनहून सुरू झालेल्या प्रवासात विशेष काही घडले नाही. मात्र, इंग्रज आणि भारतीय प्रवासी यात 'दूरत्वाची' भावना फार प्रखर होती, असे त्यांना प्रवासात फार जाणवले. वातावरण अपशकुनी आहे, असे त्यांना फार तीव्रतेनं वाटू लागले. आता

आपण लवकर मायदेशी पोहोचलेच पाहिजे, अशी त्यांचे मन घाई करू लागले. तिकडे गोखलेही गांधीजींची आतुरतेने भारतात वाट पहात होते. दहा वर्षांनंतर ते भारतात परतत होते, परंतु प्रत्यक्षात देश सोडून आता २० पेक्षा अधिक वर्षांचा काळ लोटला होता.

: २६ :

मायदेशी आगमन

एप्रिल १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत नशीब काढण्यासाठी जाताना गांधीजी एक साधेसुधे अननुभवी, भिडस्त बॅरिस्टर होते. वीस वर्षानंतर जानेवारी १९१५ मध्ये मायदेशी परतताना, या माणसात केव्हढा कायापालट झाला होता. आता ते पूर्वीचे बॅरिस्टर मोहनदास करमचंद गांधी उरले नव्हते. नशीब काढण्यासाठी गेलेल्या या माणसाने मायदेशी काय आणले ? धनसंपत्ती आणली परंतु तिचे स्वरूप केव्हढे आगळे होते. ''फकिराच्या वेशातील त्या महान आत्म्याने गोळा केलेली पुंजी केव्हढी आगळी होती !'' असे रवींद्रनाथांनी म्हटलेच आहे. सोन्याच्या खाणी असलेल्या त्या देशातून किती वेगळ्या प्रकारची सुवर्णसंपत्ती त्याने आणली होती. कोणी चोर ती चोरू शकणार नाही अशी अमोल !

परंतु त्यावेळी भारतात फारच थोडे लोक गांधीजींचे हे लोकोत्तर गुण जाणून होते. सुदैवाने गोखल्यांचे गांधींकडे लक्ष असल्याने त्यांचे मुंबईला स्वागत मात्र यथोचित झाले. गांधीजींनाही भारताची कितीशी ओळख होती ? आपण वर्षभर देशातील स्थितीचा, कानडोळे उघडे ठेवून आणि तोंड बंद करून अभ्यास करू, असे म्हणूनच त्यांनी आपल्या राजकीय गुरूंना - गोखल्यांना, वचन दिले.

राजकोट आणि पोरबंदर येथे आपल्या कुटुंबियांना भेटून लगेचच गांधीजी कलकत्त्याला शांतिनिकेतनकडे रवाना झाले. फिनिक्स आश्रमातील काही सहकारी आणि विद्यार्थी याआधीच भारतात येऊन पोहोचले होते आणि कविवर्य रवींद्रनाथांनी त्यांची शांतिनिकेतनमध्ये तात्पुरती सोय केली होती.

आधुनिक भारतातील एक राजसंन्यासी आणि एक महान कविवर्य यांना जोडणारा दुवा होते एक इंग्रज सद्गृहस्थ- त्यांचे नाव चार्लस् फ्रिअर ॲण्ड्र्यूज. त्यांचे बाह्य स्वरूप वेगळे असले तरी अंतरंग समानच होते. टागोरांच्या दृष्टीने सौंदर्य हा सत्याचाच एक पैलू होता, तर गांधीजींना सत्यापलिकडे अन्य सौंदर्याची आस्था

नव्हती; मात्र उभयता परस्परांचे विचार आणि गुण जाणून होते. फरक असलाच तर तो मूलभूत नव्हता. गांधीजींचा महात्माजी असाच प्रथम उल्लेख केला तो समकालीन मान्यवरात कविवर्य रवींद्रनाथांनीच. यानंतर जग त्यांना महात्माजी म्हणूनच ओळखू लागले.

गांधीजींचे शांतिनिकेतनमध्ये मोठ्या प्रेमाने, नि आदराने स्वागत झाले. त्या साध्यासुध्या स्वागतातही कलेचा नि सौंदर्याचा आविष्कार होता. गांधीजी आश्रमात फक्त आठवडाभर होते परंतु त्या भेटीचा स्मरणसुगंध आजही तेथे दरवळत आहे. तेथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांची मने त्यांनी ताबडतोब जिंकली. स्वतः कष्ट करावे, स्वतःच्या हातांनी काम उपसावे ही आपली विचारसरणी त्यांनी सर्वांच्या मनावर ठसविली. याचा इतका परिणाम झाला की तेथील पगारी स्वैपाक्यांना रजा देण्यात आली आणि विद्यार्थी आणि शिक्षकांनी स्वतः तेथे स्वयंपाकाचे, नि झाडलोट, कपडे धुलाईचे काम आपल्याकडे घेतले. टागोरांचे एक इंग्रज स्नेही पिअर्सन यांचा याबाबतीतला उत्साह तर उतू जाऊ लागला. अल्पावधीत शांतिनिकेतनचे रुपांतर जणू फिनिक्स येथील आश्रमात झाले. अर्थात शांतिनिकेतनला पूर्णतया फिनिक्सचे स्वरूप येणे अशक्य होते. शांतिनिकेतनचे काही वैशिष्ट्य होते. तेथील एखादी तुकडी भांडी घासण्यास गुंतली तर दुसरा चमू सतारवादन करून तिचे मन रिझवीत असे.

शांतिनिकेतनच्या या संक्रमणावस्थेची वार्ता रवींद्रनाथांच्या कानावर जाताच स्मितहास्य करीत ते म्हणाले, ''या प्रयोगातच तर स्वराज्याची गुरुकिल्ली आहे.'' परंतु गुरुवर्यांच्या स्मितात काहीसे आश्चर्य नि संदेह होता. हा उत्साह असाच टिकेल ? ज्या महात्म्याने शांतिनिकेतनवासीयांना श्रमाच्या महत्तेची दीक्षा दिली तो तेथून गेल्यावर मागे ती नवी व्यवस्था चालू राहील ? आणि तसेच घडले. गांधीजी तेथून गेल्यावर स्वैपाकी नि अन्य सेवकमंडळी परत आश्रमात कामावर रुजू झाली. मात्र, गांधीजींच्या स्मृतीला आदर म्हणून आजही गांधीजयंतीच्या दिवशी, सेवकांना रजा देऊन, सर्व आश्रमवासीय स्वतः सर्व कामे करतात.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मृत्युच्या बातमीने गांधीजींनी शांतिनिकेतनातील आपला मुक्काम हलवला. ते ताबडतोब पुण्याला रवाना झाले. गोखल्यांनी स्थापन केलेल्या 'भारत सेवक समाजात' (सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी) सामील होण्याचीही त्यांची इच्छा होतीच. परंतु गांधीजींचे क्रांतिकारी विचार आणि राजकीय चळवळी चालविण्याचा त्यांचा आगळा मार्ग याबद्दल समाजाच्या सदस्यांच्या मनात अनेक संदेह आणि पूर्वग्रह होते. समाजाला अडचण

होऊ नये म्हणून मग त्यांनी आपला सदस्यत्वाचा अर्ज मागे घेतला. ''अर्ज मागे घेऊन मी समाजाचा खरा सदस्य असल्याचे सिद्ध केले,'' असे मार्मिक उद्गार त्यांनी काढले.

नामदार गोखल्यांना वचन दिल्याप्रमाणे मग गांधीजींनी वर्षभर डोळे नि कान उघडे ठेवून देशातील विविध भागात भेटी देण्यासाठी प्रवास सुरू केला. सर्वत्र चांगले निरीक्षण केले. हरद्वार येथील कुंभमेळ्यालाही ते गेले. येथे येणारे यात्रेकरू श्रद्धाळू परंतु किती अज्ञानी, अंधश्रद्ध आणि काही तर किती ढोंगी असतात याची त्यांना चांगलीच कल्पना आली. धर्माच्या नावाने तेथे चालणारे अनाचार, फसवणूक पाहून गांधीजींचे मन व्यथित झाले. इतरांनी केलेल्या पापाचे आपल्याकडून कसे क्षालन होईल, याचा त्यांनी रात्रभर बसून विचार केला. आपल्यावर काही बंधनं लादून घेण्याचा त्यांनी विचार केला. दिवसातील आपल्या आहारात पाचापेक्षा अधिक पदार्थ नसतील, असे बंधन त्यांनी स्वत:वर लादून घेतले. अगदी, एखाद दिवशी कोठे औषध सेवन करावे लागले तर धरून उर्वरित पदार्थ पाचच होतील, याचीही दक्षता घेतली. तसेच सूर्यास्तानंतर कधी जेवण करायचे नाही असाही पण केला.

भावी काळात आपल्या पाहुणचारासाठी कोठे यजमानांना त्रास होऊ नये, असाही हेतू यामागे होता. अलिकडेच त्यांनी कलकत्त्याला भेट दिली तेव्हा नारळ सोलण्यासाठी आणि ताजा फलाहार तयार करण्यासाठी तेथील महिलांना रात्रभर जागावे लागले होते, याची त्यांना बोचरी जाणीव होती.

वर्षभर भ्रमंती केल्यानंतर, फिनिक्स आश्रमाच्या धर्तीवर कोठे कायम निवासस्थान उभे करण्याच्या विचारात गांधीजी होते. त्यांनी मग अहमदाबादजवळ कोचरब येथे प्रथम आणि नंतर साबरमती नदीच्या काठी आश्रम सुरू केला. त्यास ते सत्याग्रह आश्रम म्हणत. प्रारंभी या आश्रमात सर्व वयाचे स्त्री-पुरुष मिळून २५ जण रहावयास आले. सत्य, ब्रह्मचर्य, अहिंसा यांचे पालन करण्याची आणि चोरी, शिंदळकी, जिव्हालौल्य, लोभीपणा, मालकीची भावना यापासून दूर राहून लोकसेवा करण्याची प्रत्येकाने शपथ घेतली. जगात देशभक्तीचा आश्रम वा मठ कोठे असेल तर तो तेथे उभा होता.

अहमदाबाद कापड गिरण्याचे देशातील एक महत्वाचे केंद्र होते. येथील नागरिक चांगले श्रीमंत व सुखवस्तु होते. गांधीजींनी तेथे आश्रम उघडावा म्हणून त्यांचे मन वळविण्याचे अहमदाबादच्या नागरिकांचे सतत प्रयत्न चालू होते. आश्रमाचा खर्च चालविण्यासाठी मोठ्या देणग्या देण्याचीही त्यांची तयारी होती. यांत्रिक कापड गिरण्यांच्या या केंद्रात बसूनच खादी आणि सूतकताईची मोहीम हाती घेण्याचा

गांधीजींचा संकल्प होता. परंतु गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या आश्रमाला लगेचच कसोटीला तोंड द्यावे लागले, आश्रमात त्यांनी एक ''अस्पृश्य'' कुटुंबाला राहण्यासाठी प्रवेश देताच, निषेधाचे आवाज उठले. देणग्याही थांबल्या.

गांधीजींच्या दृष्टीने खेदाची बाब म्हणजे काही आश्रमवासीयांनीच ''अस्पृश्यांच्या'' प्रवेशाला तेथे विरोध सुरू केला. अगदी कस्तुरबाही ''अस्पृश्य'' कुटुंबाच्या प्रवेशाला विरोध करण्यासाठी उभ्या ठाकल्या. परंतु गांधीजी ठाम होते. त्यांनी या विरोधकांना एकत्र बोलावले आणि सांगितले की मनाला येईल तेथे त्यांनी जावे. तेथील एखाद्या झोपडपट्टीत ''अस्पृश्यांच्या'' सेवेसाठी आपण स्वत: जाऊ आणि तेथेच त्यांच्यासोबत राहू असे गांधीजींनी जाहीर केले. यामुळे वादळ शमले.

फेब्रुवारी १९१६ मध्ये बनारस हिंदू विश्वविद्यालयाची स्थापना झाली. या उद्घाटन समारंभप्रसंगी गांधीजींचे भारतातील सार्वजनिक सभेतील पहिले भाषण झाले. या शानदार समारंभाला व्हॉईसरॉय, अनेक संस्थानिक आणि मान्यवर मंडळी हजर होती. इंग्रजीत भाषण करताना, प्रारंभीच गांधीजी म्हणाले की, ''माझ्या देशवासीयांना समजत नसलेल्या परक्या भाषेत बोलण्याची माझ्यावर येथे पाळी आल्याने मला ते अपमानास्पद वाटत आहे. ही माझी मानहानी आहे असंच मी म्हणेन.'' या उद्गारांनी तेथे उपस्थित असलेले उच्चभ्रू संतापले असतानाच तेथे उपस्थित असलेल्या नि जडजवाहिरांनी मढलेल्या संस्थानिकांकडे वळून गांधीजी म्हणाले की, ''तुम्ही तुमच्या अंगावर जे सोन्याचे नि मोत्यांचे अलंकार चढविले आहेत ती आपल्या देशबांधवांची संपत्ती आहे असे समजा. तुमच्याकडे ठेव म्हणून ठेवलेली ही संपत्ती दूर केल्याखेरीज आपल्या देशाची खरी मुक्तता होणार नाही.'' आगीच्या लोळासारखे गांधीजींचे ते उद्गार कानी पडताच अनेक संस्थानिक संतापून तेथून उठून गेले.

वर्षभर देशात भ्रमंती केल्यानंतर गांधीजींनी मौन सोडले होते. आता आपले स्फोटक विचार व्यक्त करण्यास ते मोकळे होते. आणि त्यांनी तोफ डागलीही होती.

: २७ :

भारतातील रंगीत तालीम

नेतृत्वासाठी वा लढाई लढण्यासाठी गांधीजी कधी आसुसले नव्हते. तेव्हांही त्यांचा असा मनसुबा नव्हता आणि त्यानंतरच्या काळातही त्यांनी कधी त्यासाठी धडपड केली नाही. परंतु २० वर्षांपूर्वी दक्षिण आफ्रिकेत आणि आता भारतात नेतृत्व आणि लढा या गोष्टी नियतीनेच त्यांच्या भाग्यातच लिहून ठेवलेल्या असाव्यात. त्यापासून आता त्यांची सुटका नव्हती.

गांधीजी अद्यापि देशातील स्थितीचे सूक्ष्म अवलोकन करीत होते, राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्याचे कार्य चालू होते, खेरीज आश्रमाचा कारभार नीट चालविण्याची जबाबदारीही अंगावर होती. परंतु परिस्थिती त्यांना स्वस्थ बसू देण्यास तयार नव्हती. देशातील पहिला सत्याग्रह हाती घेण्याची तेवढ्यात वेळ येऊन ठेपली. आफ्रिकेतील लढ्याची ही रंगीत तालीमच होती.

बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यात या लढ्याचे पहिले रणशिंग फुंकले गेले. त्या भागातील एका शेतकऱ्याने गांधीजींना, चंपारण्यातील नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या हलाखीच्या स्थितीची स्वत: पाहणी आणि माहिती करून घेण्यासाठी त्या भागात भेट देण्याची आग्रहाची विनंती केली होती. तेथील युरोपीय मळेवाले शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरील ठराविक क्षेत्रफळात नीळीची लागवड करण्याची सक्ती करीत आणि येणारे पीक शेतकऱ्यांना नव्हे तर आपल्याला परवडेल नि पसंत पडेल त्याच भावात घेत. १९१७ साली गांधीजींचे चंपारण्य जिल्ह्याला भेट दिली. कायद्याची सक्ती आणि दंडुक्याची दडपशाही शेतकऱ्यांना आता असह्य झाली होती.

गांधीजींना तोपर्यंत चंपारण्याची माहिती नव्हती की नीळ पिकविणाऱ्या मळेवाल्यांची. परंतु एकदा शेतकऱ्यांकडून सर्व हकीकत कळल्यानंतर आणि सारी परिस्थिती डोळ्याखालून घातल्यानंतर गांधीजींची खात्री झाली की आपण

शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिल्याखेरीज तरणोपाय नाही.

चंपारण्यातील शेतकऱ्यांवरील अन्यायाची चौकशी करण्यासाठी महात्माजी आले आहेत, ही वार्ता सर्वत्र पसरताच, त्यांच्या भेटीसाठी, दर्शनासाठी आणि आपल्या हलाखीच्या परिस्थितीची आणि आपल्यावरील अन्यायाची हकीकत त्यांच्या कानावर घालण्यासाठी हजारो-लाखो शेतकऱ्यांनी गांधीजी जेथे उतरले होते तेथे ही गर्दी केली. हितसंबंधी यामुळे सावध झाले. पोलीस सुपरिंटेंडंटने गांधीजींकडे येऊन चंपारण्य जिल्हा सोडून जाण्यास सांगितले. गांधीजींनी त्यास नकार देताच, त्यांना दुसऱ्या दिवशी कोर्टासमोर हजर रहाण्याचा हुकूम निघाला. त्याप्रमाणे गांधीजी कोर्टाकडे जायला निघाले असता हजारो शेतकरी त्यांच्यामागून चालत कोर्टापर्यंत गेले. लोकांचा जमाव पाहून मॅजिस्ट्रेट गोंधळला आणि त्याने खटला पुढे ढकलला. तसेच जामीन न घेता गांधीजींची सुटका केली, कारण आधीच गांधीजींनी जामीन देण्यास नकारच दिला होता. ही केस नंतर मागे घेण्यात आली. गांधीजींनी मग चौकशीस प्रारंभ केला. शेतकऱ्यांच्या त्यासाठी जाब-जबान्या आणि मुलाखती घेता घेताच, गांधीजींनी त्यांना सत्याग्रहाचे मर्म समजावून देण्यास सुरुवात केली. निर्भय समाज हाच स्वातंत्र्य युद्धाचा मजबूत आधार होय एवढ्याच साठी आधी निर्भय व्हा असे गांधीजी त्यांना सांगत. आरोग्य आणि स्वच्छतेचे साधेसुधे नियम अशिक्षित शेतकऱ्यांनी कसे पाळावेत त्याची ही शिकवण देण्यासाठी त्यांनी स्वयंसेवकांचे एक पथक उभारले. तसेच आपल्या मुलींना शिक्षण मिळवून देण्यासाठी खेडेगावातून शाळा सुरू करण्याची विनंतीही त्यांनी शेतकऱ्यांना केली. यात गांधीजींचा दुहेरी हेतू होता. परकीयांनी चालविलेल्या अन्यायाविरुद्ध लोकांची फळी उभारणे आणि त्याचवेळी देशातील अज्ञान, दारिद्र आणि असहाय्यतेची भावना दूर करण्यासाठी विधायक कार्यक्रम हाती घेणे. स्वतंत्र होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी प्रथम स्वतःच्या पायावर उभे राहण्यास शिकले पाहिजे. आपल्या हक्कांसाठी झगडताना आपले कर्तव्यही काय आहे याची शिकवण गांधीजींनी लोकांना देण्यास प्रारंभ केला.

गांधीजींनी चंपारण्यात जनतेत फिरून काम करण्यास प्रारंभ करताच इंग्रज सरकार अस्वस्थ झाले. अखेरीस साऱ्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमण्यात आला. गांधीजींना आयोगाचे सदस्य म्हणून घेण्यात आले. आयोगाचा एकमताचा अहवाल शेतकरी कुळांना अनुकूलच ठरला. गांधीजी आपल्या प्रतिस्पर्ध्यांची अडचण जाणून होते. त्यांच्याही काही हितसंबंधाचा विचार झाला पाहिजे, इतकी त्यांची उदारमतवादी न्यायबुद्धी असल्याने मळेवाल्यांनाही काही सवलती मिळवून देण्यास त्यांनी आडकाठी केली नाही. गांधीजींचा हा विशाल दृष्टिकोन पाहून आयोगाचे एक सदस्य जॉर्ज रेनी इतके प्रभावित झाले की

गांधीजींची त्यांनी संत पॉल याच्याशीच तुलना केली.

चंपारण्यामधील प्रश्न सुटतो न सुटतो तोच गांधीजींना त्वरेनं साबरमती आश्रमाकडे धावावे लागले. कारण, अहमदाबादमधील कापड गिरण्या आणि त्यांचे कामगार यामधील तंटा आता विकोपास गेला होता. कामगारांची बाजू न्याय्य असल्याची गांधीजींना खात्री पटली. तंटा लवादाकडे सोपविण्यास मालकवर्ग नाखूष आहे आणि ते अयोग्य आहे, याची खात्री पटताच गांधीजींनी कामगारांना शांततेने आणि हिंसाचाराचा अवलंब न करता संपावर जाण्याची हाक दिली. कामगारांनी अट मान्य केली.

परंतु आठवडा-दोन आठवडे जातात न जातात तोच संपावरील कामगारांचा धीर खचू लागला. उपासमारीने अनेकजण अस्वस्थ झाले. संप फुटणार वा कामगार हिंसाचार करणार असे वाटू लागताच, गांधीजींनी या तंट्यात समेट होईतो, प्राणांतिक उपोषण सुरू केले.

या घटनेने कामगार वर्ग आश्चर्यचकित झाला. ''तुम्ही नव्हे तर आम्ही उपोषण करतो-'' असे ते गांधीजींना विनवू लागले. परंतु गांधीजींनी त्यांना उपोषणाची मनाई केली. ''तुम्ही हिंसाचार करणार नाही, इतकीच आश्वासन द्या. माझे त्याने समाधान होईल.'' असे कामगारांना त्यांनी पुन्हा आवाहन केले. गिरणी मालकही अस्वस्थ झाले. कामगारांचा अहिंसक लढा आणि गांधीजींचे उपोषण याचा त्यांच्यावर नैतिक दबाव येऊ लागला. अखेरीस तीन दिवसानंतर उभयपक्षी तडजोड होऊन तंटा लवादाकडे सोपविण्यात आला. सर्वत्र आनंदी आनंद पसरला.

उपोषणामुळे गांधीजींची नैतिक पेचप्रसंगातून सुटका होत असे. असहाय्यतेची भावना त्यांना सहन होत नसे. उपोषणामुळे होणारे आत्मक्लेश गांधीजींनी अध्यात्मिक नि आत्मिक समाधान मिळवून देत. त्याचवेळी प्रतिस्पर्ध्यावर उपोषणाचा नैतिक दबाव येई. उपोषणामुळे अनेकांचे हृदय द्रवत असे. दुसऱ्यासाठी आत्मक्लेश सहन करणाऱ्याबद्दल आपुलकी नि प्रेम वाटू लागणे साहजिक आहे. त्याचवेळी या कृतीने इतरांचा अनाठाई छळ होतो अशीही भावना असे. अत्याचार करून छळ केला म्हणजे तो छळ होतो आणि प्रेमाने छळ केला तर तो छळ नव्हे, असे कसे म्हणता येईल ?

यानंतर गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील शेतकरी आंदोलनाच्या वार्ता कानावर येऊ लागल्या. ''मला श्वास घेण्यास फुरसत मिळत नव्हती-'' असे यावर गांधीजींनी म्हटले. ह्या भागात पिके बुडाल्याने शेतकरी उपासमारीने हैराण झाला असता जमीन-महसूल गोळा करण्याचे काम सरकारने कोठे थांबवले नव्हते.

शेतसारा भरण्याची त्यांची ऐपत उरली नव्हती, त्यांना सारा माफी जाहीर होईस्तो, श्रीमंत, सुखवस्तु, मध्यम आणि गरीब अशा सर्व शेतकऱ्यांनी सारा न भरण्याचे आंदोलन व सत्याग्रह सुरू करावे अशी गांधीजींनी हाक दिली.

सारा-भरणा बंद आंदोलन चार महिने चालल्यानंतर सरकारने गरीब शेतकऱ्यांना सारा-माफी जाहीर केली. या समेटात तडजोड होती. परंतु गांधीजींनी या आंदोलनातून लोकांना दाखवून दिले की त्यांची मुक्तता आणि त्यांचे भले त्यांच्या कर्तृत्वावर, त्यागावर आणि प्रसंगी छळ सोसण्याच्या सहनशीलतेवरच अखेरीस अवलंबून आहे.

मध्यंतरीच्या काळात युरोपात जागतिक युद्धही जोरात चालू होते. सर्वत्र पेचप्रसंग उभे होते. अशावेळी एका घटनेचं पाश्चात्य देशातील शांततावाद्यांना अद्यापि कोडं पडलं आहे. १९१८ सालच्या प्रारंभी, जर्मनी आक्रमक पवित्रा घेऊन जोरदार मुसंडी मारणार अशा बातम्या येत होत्या. अशावेळी १९१८ सालच्या प्रारंभी व्हॉईसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांनी, हिंदुस्थानात लष्करी भरती करण्याच्या कार्यात भारतीय नेत्यांचा पाठिंबा मिळावा या हेतूने, दिल्लीला एक युद्ध परिषद बोलावली होती. गांधीजींनाही या परिषदेचे आमंत्रण होते. चम्पारण्य आणि खेडा जिल्ह्यात काही कटू अनुभव येऊनही, इंग्रजी राजवट चांगली, ब्रिटिश साम्राज्य भारताचे हितच साधेल, भारताशी चांगले संबंध ठेवणे अंती ब्रिटिशांनाच फायदेशीर ठरेल, यावर गांधीजींचा अद्यापि विश्वास होता. म्हणून त्यांनी आमंत्रण तर स्वीकारलेच, खेरीज ब्रिटिश साम्राज्याला अशावेळी मदतीचा हात देणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे, या ठरावाला अनुमोदन दिले. त्याचे जोरदार समर्थन केले. इतकेच नव्हे तर लष्कर भरतीसाठी स्वत: होऊन प्रचार मोहीम हाती घेतली.

या आधी आफ्रिकेतील युद्धभूमीवर त्यांनी भारतीयांचे वैद्यकीय शुश्रूषा पथक उभारले होते. यावेळी मात्र, ब्रिटिशांच्या वतीने लढण्यासाठी आणि बलिदान करण्यासाठी, लष्करात सामील व्हा-असे भारतीयांना सांगण्याची जबाबदारी स्वत:कडे घेतली. आपल्या प्रचाराला फारसा प्रतिसाद मिळणार नाही, याची त्यांना कल्पना आली होती. अगदी खेडा येथे अलिकडेच साराविरोधी आंदोलन हाती घेऊन त्यांनी मोठी कीर्ती संपादन केली होती, त्या जिल्ह्यातही ''लष्करी भरती सार्जण्ट'' म्हणून पुन्हा भेट दिली तेव्हां त्यांच्या सभेला फारसे कोणी फिरकलेही नाही. परंतु लोकांना पसंत नाही, म्हणून आपली विचारधारा वा कार्यक्रम सोडणारे गांधीजी नव्हते. कारण एखादा कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय आपण गुणानुसार नि विचारपूर्वकच घेतो, असे गांधीजी नेहमी म्हणत.

आपले देशवासीय आता शांतताप्रेमी आहेत ते त्यांची अहिंसेवर निर्धारपूर्वक श्रद्धा आहे म्हणून नव्हे, तर लढण्याची त्यांची हिंमतच नष्ट झाली आहे. ते स्वभावाने भीरू झाले आहेत म्हणून, असं गांधीजींचं मत होतं. आपले जुने स्नेही श्री. पोलाक यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटलं : ''रंगरूट भरतीची मोहीम मी हाती घेतली आहे, त्याबद्दल तुमचं काय मत आहे ? हे कार्य मला एखाद्या पवित्र धार्मिक कार्यासारखं वाटतं. माझा पवित्र अहिंसेच्या तत्त्वाला पूरक असंच हे काम आहे. भारताचे लढण्याचे सामर्थ्यच पार नष्ट झाले आहे, असे मला वाटू लागले आहे. याचा अर्थ लढण्याची प्रवृत्ती वा कल नष्ट झाला आहे, असे नव्हे. या देशाने ते सामर्थ्य पुन्हा मिळवावे, आणि नंतरच युद्धाच्या छायेत आणि संकटात सदा वावरणाऱ्या या भीतीग्रस्त जगाला अहिंसेचे तत्त्वज्ञान शिकवावे, असे मला वाटते. भारताने जगाला स्वसामर्थ्याच्या जोरावर काही चांगले द्यावे—दुबळेपणातून नव्हे. हा देश असे काही करू शकेल अशा मन:स्थितीत आहे, असे मला वाटत नाही. अशा स्थितीत तो स्वत:चे अस्तित्व पुसून टाकील, व्यक्तिमत्व आणि वैशिष्ट्य घालवून बसेल. याचा एकच दुष्परिणाम होईल. अन्य अनेक देशांप्रमाणे दडपशाही आणि अत्याचार यांची तो पूजा करू लागेल. आतापर्यंत मी अनेक जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या परंतु रंगरूट भरतीचे हे काम मला महाकर्मकठीण वाटते.''

आणि खरोखरीच तसे घडले. या कामाच्या ताणाने त्यांची प्रकृती इतकी खालावली, की आजारी पडून ते अगदी मरणाच्या घरी जाऊन आले. एकदा तर त्यांना असं निश्चितपणे वाटू लागलं की आपण जगत नाही. सभोवताली जमलेल्या आप्तस्वकीयांना उद्देशून निराशेनं गांधीजींनी म्हटलं की आयुष्यात त्यांनी अनेक जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या नि अर्धवटच सोडल्या-आता या परिस्थितीत दैवाची जर इच्छाच असेल तर मृत्युवाचून त्यांना गत्यंतर नव्हते.

या मोठ्या आजारात त्यांच्या पत्नीनं बकरीचं दूध पिण्यासाठी त्यांचं मन वळवलं. जनावरांपासून मिळणारा कोणताही पदार्थ मानवाला योग्य असा आहार होऊ शकतो, यावर गांधीजींचा फारसा विश्वास नव्हता. खेरीज, गाई-म्हशींचे दूध काढताना गवळी लोक विविध प्रकारे त्यांचे कसे हाल करतात, यासंबंधी काही जणांनी सांगितलेले अनुभव कानावर आल्यापासून त्यांनी दूध पिण्याचं सोडलंच होतं. आजारीपणात आता त्यांनी दूध घ्यावं असा डॉक्टरांनी सल्ला देताच, आपण केलेला प्रण त्यांनी सांगितला. तेव्हां कस्तुरबा म्हणाल्या की गाई-म्हशींच्या दुधाबाबत त्यांनी पण केला होता. बकरीच्या दुधाला काही हरकत नव्हती. आजारी असले तरी गांधीजींचे मनोबल जागृत होते. दोन्ही दुधातला फरक काय ते त्यांना चांगलेच माहीत होते; तरीही आता वाद नको म्हणून त्यांनी बकरीचे दूध घेण्यास

संमती दिली. ''सत्यावरील निष्ठेपेक्षा जगण्याची इच्छा अधिक प्रबळ ठरली आणि अखेरीस सत्याच्या त्या पुजाऱ्याने आपल्या तत्त्वाला मुरड घालून सत्याग्रही लढ्यासाठी अधिक जोमाने प्रयत्न करण्याचा निर्धार केला.''

: २८ :
वादळाशी सामना

घोडा मैदान आता जवळ आले होते. युद्धाच्या तुताऱ्याही आता ऐकू येत होत्या. महायुद्धात ब्रिटनचा विजय झाल्याने भारतातील ब्रिटिश राजवटीच्या स्वरूपात काही उदारमतवादी फेरबदल होतील अशी आशा वाटत होती. याच आशेने गांधीजींनी लोकांना युद्धकार्यात सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. ''भविष्यकाळात आम्हाला अधिक चांगले जीवन जगता येईल, अशी आम्ही आशा बाळगून आहोत.'' असे त्यांनी १९१८ साली व्हॉईसरॉयला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते. परंतु पदरात रौलट कायदा पडला. या कायद्याने नागरी स्वातंत्र्याच्या अनेक तरतुदींना कात्री लावली—आणि आधी खटला न भरता लोकांना अटक करण्याचे नि त्यांना तुरुंगात टाकण्याचे बरेच अधिकार सनदी अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या आव्हानाने एक प्रकारे चांगला परिणाम साधला. अन्यायाविरुद्ध उभे राहण्यास नवी चेतना मिळाली. आशेवर अवलंबून गांधीजी आतापर्यंत स्वस्थ बसले होते, ते खडबडून जागे झाले. अद्यापी त्यांची प्रकृती पूर्ववत सुधारली नव्हती तरी स्वभावानुसार त्यांनी लढ्यासाठी स्वत:ला त्यात झोकून दिले.

गांधीजी दिल्लीला गेले आणि कायदेमंडळातील या विधेयकावरील भाषणे त्यांनी स्वत: तेथे जाऊन लक्षपूर्वक ऐकली. कायदे मंडळाला त्यांची ती आयुष्यातली पहिलीच भेट होती. तो जुलमी कायदा मागे घ्यावा, अशी विनंती करणारी भाषणे भारतीय नेत्यांनी केली. जनतेच्या प्रतिनिधींचा विरोध दूर सारून कायदेमंडळाने विधेयक संमत केल्यास त्याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम होईल, असा इशारा या नेत्यांनी व्हॉईसरॉयला दिला. भारतीय नेत्यांची ती कायदेमंडळातील भाषणे स्वत: व्हॉईसरॉयनी अत्यंत लक्षपूर्वक ऐकली. गांधीजींचे त्यांच्याकडे लक्ष होते. भाषणे ऐकून व्हॉईसरॉय साहेब अस्वस्थ झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. विधेयक मागे घेतले जाईल, असे त्यांना वाटू लागले. परंतु ''झोपेत असलेल्या माणसाला उठवता

येते, परंतु झोपेचे सोंग घेतलेल्याला कसे जागे करणार ?'' हे ब्रिटिशांच्या बाबतीत गांधीजींना नंतर चांगलेच पटले.

रौलट कायद्याने गांधीजींना देशातील राजकीय घडामोडींच्या अग्रस्थानी नेऊन ठेवले. १९१९ सालापासून थेट स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत आणि १९४८ साली मृत्यू येईपर्यंत गांधींचे भारतीय राजकारणातील हे अग्रगण्यस्थान अढळ राहिले. देशातील राजकीय परिस्थितीचा तोंडवळाच त्यांनी बदलून टाकला. स्वत: गांधीजीत मात्र कोणताही बदल झाला नाही. त्यांचे राजकीय महत्त्व दिवसेंदिवस वाढत गेले, आणि व्यक्तिमत्वाला उठाव मिळाला. राजकीय लढ्याच्या त्या रणधुमाळीत गांधीजी गांधीजीच राहिले; एखाद्या देवतेसमान-शांत, पवित्र, दृढनिश्चयी.

रौलट कायदा साऱ्या देशाला लागू होणार असल्याने लढा राष्ट्रीय पातळीवर सुरू करणे जरुरीचे होते. या लढ्याचे स्वरूप कसे असावे, यावर गांधीजींनी खूप विचार केला. याआधी गांधींनी सत्याग्रह सभेची स्थापना केली होती, आणि प्रत्येक सभासदाकडून अहिंसेची शपथ घेतली होती. सदस्याला त्यासाठी एका शपथ पत्रिकेवर स्वाक्षरी करावी लागे. परंतु ते पुरेसे नव्हते. देशातील सर्व लोकांना या अन्यायाविरुद्ध जागृत करायचे आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडून हिंसाचार घडणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घ्यायची, ही एक मोठीच जबाबदारी होती. अशी जागृतीची मोहीम केवळ मुंबई-दिल्ली या शहरांपुरती मर्यादित ठेवूनही चालण्यासारखे नव्हते. आफ्रिकेतून परतल्यापासून त्यांनी उत्तर हिंदुस्थानात सर्वत्र दौरा केला होता. आता गांधीजी दक्षिणेच्या दौऱ्यावर निघाले.

याच दौऱ्यात गांधीजींची राजगोपालाचारी यांच्याशी गाठ पडली. राष्ट्रीय लढ्यात गांधीजींचे ते नंतर सच्चे अनुयायी झाले. राजाजींबरोबर ते रहात असताना सत्याग्रही लढा कसा द्यावा यासंबंधी त्यांच्या डोक्यात विचारचक्र चालूच होते. रात्री, गादीवर पडल्या पडल्या जणू स्वप्न पडावे तसा झटकन् त्यांना साक्षात्कार झाला की लढ्याची पहिली पायरी म्हणून देशात सर्वत्र हरताळ पाळण्याची हाक द्यावी. उपवास आणि प्रार्थनेचा म्हणून तो दिवस पाळावा.

त्यानुसार दि. ३० मार्च १९१९ या दिवशी हरताळ पाळण्याची हाक देण्यात आली. या तारखेत नंतर बदल करण्यात येऊन ६ एप्रिलचा दिवस ठरविण्यात आला. यात थोडा गोंधळ उडाल्याने दिल्लीत ३० मार्च रोजी तर देशाच्या अन्य भागात ६ एप्रिलला हरताळ पाळण्यात आला. परंतु सुदैवाने दोन्ही ठिकाणी लोकांनी उत्साहाने संपूर्ण हरताळ पाळल्याने गांधीजींनाही आश्चर्यच वाटले. आपल्या नेतृत्वाचा भारतीय जनमानसावर प्रभाव वाढत आहे, याची त्यांना तोपर्यंत फारशी

कल्पना आली नव्हती. सरकार याबाबतीत बेसावध होते; परंतु हरताळाच्या यशाने शासनही चक्रावले. ''साम्राज्याच्या एका माजी रिक्रुटिंग एजंटाचे रुपांतर आता एका बंडखोरात झाल्याचे पाहून '' सरकार धास्तावले.

हरताळाच्या दिवशी गांधीजी मुंबईत होते. त्यांनीच सर्व कार्यक्रमाचे सूत्रचालन केले. त्याच दिवशी बंदीहुकूम मोडून त्यांनी लिहिलेल्या आणि याआधी बंदी असलेल्या दोन गुजराती भाषेतील पुस्तकांची विक्री शहरात करण्यात आली. यापैकी ''हिंद स्वराज'' हे पुस्तक होते तर दुसरे रस्किनच्या ''अन् टू दि लास्ट'' या पुस्तकाचा गुजराती अनुवाद होता. पुस्तकाच्या विक्रीत सरकारने सुदैवाने हस्तक्षेप केला नाही. मूळ पुस्तकांवर बंदी होती, त्यांच्या पुनर्मुद्रणावर नव्हे, असा सोयीस्कर युक्तिवाद शासनातर्फे करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी गांधीजी दिल्लीस जाण्यास निघाले. तेथे ३० मार्च रोजी झालेल्या हरताळाच्या वेळी निघालेल्या प्रभात फेरीवर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला होता. गांधीजी दिल्लीला पोहोचण्याच्या आधीच अलिकडच्या एका स्टेशनवर त्यांच्यावर, त्यांनी पुढे प्रवास न करण्याची नोटीस बजावण्यात आली. त्यांनी त्यास नकार देताच त्यांना अटक करून परत मुंबईस नेण्यात आले; आणि त्यांची सुटका करण्यात आली. त्यांच्या अटकेचे वृत्त सर्वत्र पसरताच अनेक ठिकाणी लोक संतप्त झाले आणि काही ठिकाणी तर हिंसाचाराच्याही घटना घडल्या.

हिंसाचाराच्या हकीकती गांधीजींच्या कानावर जाताच त्यांना धक्का बसला. ''माझ्या शरीरात एखादा बाण रुतून बसला असता तरी मला येवढ्या वेदना झाल्या नसत्या-'' असे उद्गार त्यांनी काढले. लोकांच्या मनाची, अहिंसक सत्याग्रहाची तयारी झाली नसताना आपण तसे धरून चाललो हीच आपली मुळात मोठी चूक झाली, असे त्यांनी जाहीरपणे म्हटले; आणि हिंसाचाराबद्दल प्रायश्चित म्हणून तीन दिवसांचे उपोषण करण्याची घोषणा करून सत्याग्रह मागे घेतला.

दि. १३ एप्रिल १९१९ रोजी गांधीजी हिंसाचाराबद्दल पश्चातापाने उपोषणाची घोषणा करीत असतानाच, तिकडे पंजाबात अमृतसर येथील जालीयनवाला बागेत वैशाखीच्या दिवशी जमलेल्या निरपराध स्त्री-पुरुषांवर जनरल डायरच्या सैनिकांनी निर्घृणपणे गोळीबार करून शेकडो नागरिकांना ठार केले. या बागेतून बाहेर पडण्यासाठी एकच फाटक होते. तेथे शस्त्रसज्ज सैनिकांनी रस्ता अडवला. बागेच्या भिंती इतक्या उंच होत्या की जीव वाचविण्यासाठी त्यावर चढून निसटणे कठीण. पिंजऱ्यात अडकलेल्या उंदराला गोळी घालण्यासारखा हा निंद्य हिंसाचार होता. सरकारनेच म्हटल्याप्रमाणे येथे ४०० माणसे ठार आणि १००० ते २००० जखमी

झाले. मात्र, गांधीजींनी केलेल्या सार्वजनिक चौकशीतून, १२०० लोक ठार आणि ३६०० जखमी झाल्याचे उघडकीस आले.

नि:शस्त्र, निरपराध नागरिकांची कत्तल केल्यानंतर पंजाबात लष्करी कायदा पुकारण्यात आला. त्यानंतर विनाचौकशी अटक, तुरुंगवास, लाठीमार; छळ आदी दहपशाही सुरू झाली. यावर कडी म्हणजे अमृतसरमधील एका रस्त्यातून जाताना नागरिकांनी ढोपरावर चालत वा रांगत जाण्याचा मानव जातीला काळीमा फासणारा हुकूम काढण्यात आला. त्या दिवशीच्या या हत्येचे वर्णन करताना ''ब्रिटिश-भारताच्या इतिहासातील काळाकुट्ट दिवस'' असे सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी म्हटले. या घटनेने भारत आणि ब्रिटन यामधील संबंधांना नवे वळण दिले. ब्रिटिश राजवटीला त्याने पहिला तडा दिला. ब्रिटिश साम्राज्य तोपर्यंत ज्या दिमाखाने उभे होते तो सारा आविर्भाव आता उतरला. ब्रिटनच्या नैतिक प्रतिष्ठेला या हत्याकांडाने एकदा जो तडाखा दिला त्यापासून ते कधी त्यानंतर सावरलेच नाही. उभय देशांच्या संबंधांना आणि ब्रिटनच्या प्रतिष्ठेला नवा उजाळा मिळाला तो २८ वर्षानंतर भारत स्वतंत्र झाला तेव्हा.

पंजाबमधील हत्याकांडाचे दु:ख करीत असतानाच तुर्कस्तानच्या सुलतानाचा पराभव झाल्याबद्दल मुस्लिम जनतेच्या दु:खातही ते सहभागी झाले. तुर्कस्तानचे सुलतान हे इस्लामचे खलिफाही होते. प्रमुख इस्लामी धर्मगुरुचा असा अवमान झाल्याबद्दल गांधीजींनी देशातील हिंदू-मुस्लिम बांधवांना ब्रिटिश सरकारबरोबर असहकार करण्याचे सर्वप्रथम आवाहन केले.

अन्यायी रौलट कायदा आणि पंजाबातली दडपशाही आणि अत्याचार हे प्रश्न तुर्की साम्राज्याच्या विभाजनापेक्षा वेगळे असताही, हे सर्व प्रश्न एकत्र आणून त्याविरुद्ध राष्ट्रीय आंदोलन छेडण्याचा गांधीजींना नैतिक अधिकार काय अशी त्याकाळीही त्यांच्या अनेक अनुयायांनी पृच्छा केली होती. तुर्कस्तानचा सुलतान धर्मप्रमुख असेलही परंतु तो एका ऱ्हासाला लागलेल्या जुलमी साम्राज्याचा प्रतिगामी प्रमुख होता हे विसरता येणार नाही, अशी काहींची भावना होती. अरबांची त्याच्या जुलमातून सुटका झाल्याबद्दल अनेकांना आनंदच झाला होता. परंतु गांधीजींचा या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यांच्या मते, कसोटीच्या वेळी आपल्या मुस्लिम बांधवांच्या भावना जाणून घेऊन हिंदुंनी त्यांच्या बाजूने उभे राहणे यावेळी महत्वाचे होते. ''त्यांचे दु:ख ते आपले दु:ख होय'' असे त्यांनी ठासून प्रतिपादन केले.

: २९ :

महान उठाव

देशातील संतापजनक घटनांनंतरही, ब्रिटिशांच्या सद्हेतुवरील गांधीजींची श्रद्धा अद्यापि कायमची नष्ट झालेली नव्हती. ब्रिटनच्या राजेसाहेबांनी सुधारणा कायद्यांना मंजुरी देण्याची घोषणा करताच, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या नव्या घटनात्मक प्रयोगाला, शासनाशी मनापासून सहकार्य करण्याच्या इच्छेने, एक संधी देऊन पहावी असे आवाहन त्यांनी केले ते १९१९ सालच्या अखेरीस. ब्रिटिशांनी अमृतसरमध्ये केलेल्या हत्याकांडामुळे तेथे जमलेले काँग्रेसचे प्रतिनिधी आधीच संतप्त झालेले होते; त्यांच्यापुढे भाषण करताना गांधीजींनी त्यांना भावनेच्या आहारी न जाण्याचे आवाहन केले. ''वेडाचाराला वेड़ाचाराने उत्तर देणे योग्य नव्हे. समजूतदारपणा दाखवूनच आपण परिस्थितीवर मात करू शकू. त्यानेच परिस्थितीत सुधारणा घडून येईल आणि ती तुम्हाला अनुकूल ठरेल,'' असे त्यांनी जरा खडसावूनच प्रतिनिधींना सांगितले.

परंतु त्यांच्या विश्वासाला हळूहळू सुरूंग लागत होता. पंजाबातील अत्याचारी राजवटीत सुधारणा करण्याऐवजी तेथील गुन्हेगारी कृत्यास जबाबदार असलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या कृत्यावर पांघरुण घालण्याचे सरकारचे चाललेले प्रयत्न, खटल्यात जनरल डायरचा खर्च भागविण्यासाठी ब्रिटिश जनतेनं इंग्लंडात मोठा निधी जमवून डायरला दिलेली थैली, हे प्रकार पाहून गांधीजींचा ब्रिटिश लोकांच्या आणि राजवटीच्या उदारमतवादी आणि न्यायी स्वभावावरील विश्वास उडू लागला. ब्रिटिश राजवट हिन्दुस्थानला फायद्याची ठरेल अशी त्यांची आजपर्यंतची श्रद्धा होती; परंतु, ब्रिटिशांचे हिंदुस्थानातील कुटील डावपेच आणि अत्याचारी वर्तन पाहून आता त्यांचा भ्रमनिरास होत चालला होता. अशा सैतानी राजवटीला सहकार्य न करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य होय असं गांधीजींना आता प्रकर्षानं जाणवू लागलं होतं.

माणसांप्रमाणेच राष्ट्रदेखील आपल्या दुर्बलतेमुळे आपले स्वातंत्र्य गमावते, असे गांधीजींचे सुरुवातीपासूनचे मत होते. १९०९ साली 'हिंदू स्वराज्या'तील आपल्या लेखात त्यांनी म्हटलं होतं की, ''इंग्रजांनी भारत जिंकून घेतलेला नाही. आम्ही तो

त्यांना गमावला. इंग्रज आज भारतावर राज्य करीत आहेत ते त्यांच्या सामर्थ्यामुळे नव्हे, तर आम्ही त्यांना येथे राज्य करू देत आहोत म्हणून.'' भारतीयांनी आतापर्यंत ब्रिटिशांनी स्वयंस्फूर्तपणे जे सहकार्य केले आहे, ते काढून घेतले तर ही राजवट निश्चितपणे कोसळेल, असा गांधीजींचा अंदाज होता.

भारतातील ब्रिटिश राजवटीविरुद्ध, अहिंसक असहकाराचा आपला कार्यक्रम खिलाफत समितीने तसेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने स्वीकारावा यासाठी त्यांनी उभयतांचे मन वळविण्याचे प्रयत्न सुरू केले. परदेशी राजवट पूर्णतया वाईट असल्याने तिने आतापर्यंत देशात सुरू केलेल्या विविध संस्थाही त्याच लायकीच्या होत्या. निषेधपूर्वक त्यांच्यावर बहिष्कार टाकणे म्हणूनच आवश्यक होते. यासाठी, सरकारी नोकरांनी आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा, वकिलांनी न्यायालयावर बहिष्कार टाकावा, विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालये सोडावी, प्रत्येकाने परदेशी वस्तूचा वापर करण्याचे टाळावे, विशेषत: परदेशी कापड वापरण्याचे सोडावे, आणि प्रत्येकाने जनतेचा सेवाभावी सेवक होऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसक सैनिक म्हणून पुढे व्हावे, अशी हाक या कार्यक्रमाने दिली. हा कार्यक्रम बराच आदर्शवादी असल्यामुळे त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणं कठीण जाईल, असे विचार अनेक मवाळ आणि अनुभवी राजकीय नेत्यांनी व्यक्त केले. अनेकांनी तर त्याचा उपहासच केला. परंतु गांधीजींनी दिलेल्या हाकेने एखाद्या जादूच्या कांडीसारखा परिणाम होऊन लोक उत्तेजित होऊन उठले. चारच वर्षांपूर्वी लखनौ येथील कॉंग्रेस अधिवेशनाला गांधीजी उपस्थित होते ते एखाद्या निरिक्षकासारखे. ते कोणत्याही कार्यक्रमात सहभागी झाले नव्हते. ''गांधीजी मला त्यावेळी फार वेगळे वाटले. राजकारणाशी जणू त्यांचा काही संबंधच नव्हता. अधिवेशनाच्या वातावरणापासून जणू ते अलिप्तच होते.'' असे जवाहरलाल नेहरूंनी म्हटले आहे. आता मात्र देशातील राजकीय परिस्थितीवर त्यांचाच प्रभाव जाणवू लागला होता. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे स्वरूपच त्यांनी पालटून टाकण्यास प्रारंभ केला होता. बोलघेवड्या राजकारणी लोकांचे रुपांतर सैनिकात आणि इंग्रजांच्या प्रभावाखाली एकेकाळी वावरणाऱ्या पुढाऱ्यांचा कायापालट जनतेच्या सेवकात करण्याची किमया त्यांनी साधली होती. पाश्चात्य पोशाखात मिरविणाऱ्या अनेक पुढाऱ्यांना आता त्यांनी खादीचा पोशाख परिधान करावयास लावले होते.

देशातील बुद्धिमंत आणि सर्वसामान्य जनता यामधली दरी बुजविण्याचे गांधीजींचे प्रयत्न आता सुरू झाले होते. सर्व प्रकारचे सामाजिक आणि नैतिक पुनरूत्थान म्हणजे स्वराज्य अशी व्यापक व्याख्या त्यांनी केली. दडपलेल्या, मरगळलेल्या, मुक्या लोकशक्तीला चेतना देऊन गांधीजींनी स्वातंत्र्यलढ्यासाठी कसे सिद्ध केले आणि देशाला स्वातंत्र कसे मिळवून दिले याची कथा म्हणजे गांधीजींची जीवन कहाणी होय यात नवल ते काय? महात्मा म्हणून त्यांचा झालेला उदय

आणि निर्विवाद लोकनेते म्हणून त्यांनी जनमानसात मिळविलेले स्थान, येथेच गांधींच्या आत्मचरित्राची अखेर होते. यानंतरचे गांधीजींचे जीवन म्हणजे खुला ग्रंथ होय. त्यांच्या प्रत्येक उक्तीला नि कृतीला यानंतर जनसागराची साक्ष होती. इंग्रजीत 'यंग इंडिया' आणि गुजरातीत 'नवजीवन' या दोन साप्ताहिकातून आपले सर्व विचार गांधीजींनी मांडले आणि लोकांना त्या विचारांशी सामावून घेतले.

नेहमीच्या त्यांच्या प्रथेप्रमाणे आधी सरकारला नोटीस देऊन त्यांनी आपली मोहीम सुरू केली. आफ्रिकेतील सेवेबद्दल त्यांना मिळालेली पदके आणि प्रशस्तीपत्रं त्यांनी सरकारला परत केली. यासंबधी व्हॉईसरॉयना लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी म्हटले : ''आपल्या अनैतिक, अन्यायी कृत्याचे समर्थन करण्यासाठी सरकार एकामागून एक चुकीची पावले टाकीत आहे. अशा राजवटीबद्दल मला आदर नाही की आपुलकी नाही.'' अनेक भारतीयांनी आपल्याला ब्रिटिश सरकारकडून मिळालेले मानमरातब आणि पदव्या परत केल्या. जालीयनवाला बाग हत्याकांडानंतर रवींद्रनाथ टागोरांनी ताबडतोब आपली 'नाईट' पदवी परत केली होती. अनेक वकिलांनी आपला व्यवसाय सोडला, तर खेड्यापाड्यांतून, ''सैतानी'' सरकारविरूद्ध अहिंसक असहकाराचे लोण पोहोचविण्यासाठी अनेक शहरवासीयांनी खेड्याकडे आपली पावले वळवली.

आपण माणसं आहोत आणि आपली प्रतिष्ठा आपण टिकविली पाहिजे, जपली पाहिजे या नव्या जाणीवेनं भारतीय जनता आता, शतकानुशतकाच्या निद्रेनंतर, खडबडून जागी झाली. धैर्य आणि त्याग यांच्या जोरावर आपली गमावलेली प्रतिष्ठा परत मिळविण्यासाठी एक नवा लढा सुरू झाला. रस्तोरस्ती आणि शहरातील, गावातील, खेड्यापाड्यातील चौकाचौकातून परदेशी कापडाच्या होळ्या पेटू लागल्या. आणि अनेक घराघरातून यज्ञाच्या पवित्र मंत्राप्रमाणे चरख्याचे गुंजन कानी येऊ लागले. शतकानुशतके घराच्या चार भिंतींच्या आड कोंडली गेलेली भारतीय स्त्री आता पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून अन्याय विरोधी मोर्चात सामील होऊ लागली. युगानुयुगाच्या परंपरेच्या बेड्यातून तिनं स्वत:ची सुटका करून घेण्यास आरंभ केला.

एका वर्षात स्वराज्य मिळविता येईल, या गांधीजींनी दिलेल्या आश्वासनाची अनेक जण टिंगल-टवाळी करीत, परंतु भीरुतेपासून मुक्तता याचाच अर्थ स्वराज्य या गांधीजींच्या संकल्पनेची त्यांना पुरेशी माहिती नव्हती आणि खरोखरी एका वर्षातच असे स्वराज्य गांधीजींनी देशाला मिळवून दिले होते. देशभर झंझावाती दौऱ्यातून, भाषणामागे भाषणे करून आणि आपल्या दोन साप्ताहिकातील अनेक लेखातून गांधीजींनी आपले परखड, ज्वलंत विचार अत्यंत रसाळ, प्रभावी नि ओघवत्या भाषेत लोकांपुढे मांडून त्यांच्यात नवचैतन्य आणि नवा आत्मविश्वास

जागृत केला होता. मधमाशांनी फुलांकडे वा पतंगाने ज्योतीकडे झेपावे तशी लाखो माणसे गांधीजींच्या सभेत जमत होती. त्यांच्या विचाराने प्रभावीत झालेले हजारो देशभक्त कायदेभंग करून तुरुंगात जात होते आणि एक महान सन्मान म्हणून, लाखो जणांची स्वत:ला अटक करून घेण्यासाठी धडपड चालली होती.

दि. २८ डिसेंबर १९२१ रोजी अहमदाबाद येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात बोलताना गांधीजी म्हणाले की, ''मी शांतताप्रेमी माणूस आहे. माझी शांततेवर श्रद्धा आहे. परंतु वाटेल ती किंमत देऊन मला शांतता नको आहे. अपार्थिव, अचेतन दगडाची शांतता मला नको आहे. तसेच स्मशानातील शांतताही मला नको आहे.'' गांधीजींनी दिलेल्या लढ्याच्या हाकेला ओ देताना लोकांचा उत्साह आणि धैर्य असे काही ओसंडत होते की ते पाहून, नुकतेच भारतात परतलेले डब्लु. डब्लु. पिअर्सन उद्‌गारले: ''तुमच्या कष्टाला फळ आले आहे. कारण आता भारत खरोखरी स्वतंत्र झाला आहे-'' त्यावर गांधीजी म्हणाले– ''स्वातंत्र्याचे मोल देण्याची आमची सिद्धता झाली की आम्ही स्वतंत्र झालोच म्हणून समजावे.''

अहिंसक क्रांतीच्या लाटेवर आरुढ होऊन गांधीजींचा सर्वत्र संचार होत असतानाच, त्यांनी दिलेल्या सहकाराच्या हाकेबद्दल आणि त्याच्या परिणामाबद्दल त्यांचा आणि कविवर्य टागोरांचा जाहीर वाद झाला. रोमारोलाँ यांनी लिहिलेल्या गांधीजींच्या चरित्रात या चर्चेचे सखोल आणि विस्तृत विवेचन करण्यात आले आहे. या चर्चेच्या वेळी कविवर्य रवींद्रनाथांनी गांधीजींमधील कविमनाला जागृत केले. आपल्या श्रद्धाविषयीचे सुंदर विवेचन करताना गांधीजींनी कविवर्यांना अत्यंत कळकळीने आपले तत्वज्ञान समजावून सांगितले. चर्चा कशी व्हावी याचा तो सुरेख नमुना होता. हा वादविवाद, त्याला वादविषय म्हणायचे असेल तर, इतक्या थराला गेला तरीही आधुनिक काळातील या दोन थोर महापुरुषांच्या विचारांचा कसा सुंदर मेळ होत होता, ते त्यांच्या अनेक अनुयायांच्या राजकीय आकलनापलीकडे होते. गांधीजींचा देशाच्या राजकीय व्यासपीठावर प्रवेश होण्यापूर्वी कितीतरी आधी रवींद्रनाथांनी आपल्या कितीएक कवितातून आणि नाटकातून गांधीसारख्या अवताराच्या आगमनाची कल्पना मांडली होती. आणि त्याचे स्वागतही केले होते. जालीयनवाला बागच्या हत्याकांडाच्या एक दिवस आधी, दि. १२ एप्रिल १९१९ रोजी एक अनावृत पत्रातून रवींद्रनाथांनी गांधीजींचा ''महात्माजी'' असा सर्वप्रथम आदरार्थी उल्लेख केला होता. लोक संकटात असताना अगदी वेळेवर ''हा लोकनेता'' त्यांच्या मदतीला धावून आला, असे पत्रात पुढे म्हटले होते. ते अमेरिकेस गेले असताना एका अमेरिकन पत्रकाराशी असहकार आंदोलनावर चर्चा करताना टागोरांनी म्हटले : ''गांधीजींसारखा एक संतपुरुष या आंदोलनाचे नेतृत्व करीत आहे, ती खरोखरी भाग्याची गोष्ट आहे. आमच्या देशात त्यांना सर्वत्र किती मान दिला जातो, किती मानले जाते. गांधीजींच्या नेतृत्वाखाली आमच्या देशाची

वाटचाल चालू असताना, हे जहाज इच्छित किनाऱ्यावर पोहोचेल याबद्दल मला जराही शंका वाटत नाही.''

: ३० :

लंबकाची दोलायमान स्थिती

असहकारिता आंदोलनाच्या यशामुळे गांधीजींचा उत्साह आणि आनंद द्विगुणीत होत होता. हे आंदोलन देशात चमत्कार घडवून आणील असा त्यांचा विश्वास होता, आणि तसे थोडेफार घडतही होते. तोच लंबक उलट्या दिशेने फिरला. फेब्रुवारी १९२२ मध्ये उत्तर प्रदेशातील चौरीचौरा येथे या आंदोलनातून हिंसाचार उसळला. संतप्त जमावाने तेथील पोलीस स्टेशनला घेराव घालून ते पेटवून दिले. आत अडकून पडलेले अनेक पोलीस शिपाई त्यामुळे भाजून मृत्युमुखी पडले. गांधीजींना धक्का बसला. अनेक सहकाऱ्यांनी विनवणी केल्यानंतरही त्यांनी त्यांचे न जुमानता असहकार आंदोलन मागे घेतले. ''अत्यंत सुनियोजित असा हा आंदोलनाचा कार्यक्रम एकाएकी मागे घेणे राजकीयदृष्ट्या मूर्खपणाचे असेल, परंतु याबाबतीत अत्यंत नम्रपणे आपली चूक कबूल करणे देशाच्या दृष्टीने योग्य आणि फायदेशीर ठरेल-'' असे गांधीजींनी म्हटले.

ऐनभरात आलेले आंदोलन एकाएकी मध्येच मागे घेतल्याने कोणता फायदा झाला ते कळणे कठीण, परंतु ब्रिटिश सरकारला त्याचा फायदा मिळाला हे खरे. लढा मागे घेतल्याने लोकांच्या उत्साहाला ओहोटी लागली आणि आपल्या नेत्यांच्या राजकीय सुज्ञपणावरील त्यांच्या विश्वासाला नि श्रद्धेला तडा गेला. परंतु गांधीजी त्याने नाउमेद झाले नाही. सत्य आणि अहिंसा या दोन गुणांनाच मी पूज्य मानतो. माझ्यात अतिमानवी शक्ती आहे, असा मी दावा करीत नाही. मला ती नकोही आहे. सर्व सामान्य माणसांप्रमाणेच मी हाडामांसाचा पुतळा आहे; त्यामुळे माझ्या हातून चुका होणे साहजिकच आहे-' असे त्यांनी म्हटले.

रोमा रोलाँ यांनी या घटनेवर जे भाष्य केले ते या फ्रेंच आदर्शवादी तत्वज्ञानाच्या विचारांची ओळख करून देते. ते म्हणाले :''मानवजातीच्या इतिहासात नैतिक नि आध्यात्मिक दृष्ट्या मानवाने जी प्रगती साध्य केली, त्यात या घटनेचा खास उल्लेख

करावा लागेल. या घटनेचे नैतिक मूल्य केवळ असाधारण आहे. राजकीयदृष्ट्या मात्र ही चाल अनाकलनीय म्हणावी लागेल.''

खरोखरीच गांधीजींचा तो निर्णय अकालनीयच म्हणावा लागेल. सरकारला त्याने सुवर्णसंधी मिळवून दिली. दि. १० मार्च १९२२ रोजी रात्री १० वाजता गांधीजींना अहमदाबाद येथे अटक करण्यात आली. स्वत: गांधीजींना मात्र या अटकेचा खरा आनंद झाला.

न्यायालयात खटला सुरू झाला तेव्हां त्यांनी नेहमीच्या प्रथेप्रमाणे आपल्यावरील राजद्रोहाचा आरोप मान्य केला. मात्र यावेळी त्यांनी न्यायालयात जे उत्कृष्ट निवेदन केले त्याला तोड नाही. आपण ब्रिटिश सम्राज्याच्या चांगुलपणावर नि भलेपणावर विश्वास ठेवला, परंतु त्यानंतर आपला कसा भ्रमनिरास होत गेला त्याचं त्यांनी ब्रिटिश न्यायाधीश श्री. आर. एस्. ब्रुमफिल्ड यांच्यापुढे निवेदन करताना उत्कृष्टपणे आढावा घेतला. गांधीजी म्हणाले :

ब्रिटिश राजवटीमुळे राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या भारतवर्ष कधी नव्हे इतका दुर्बल झाला आहे, असा अत्यंत खेदाने मला निष्कर्ष काढावा लागत आहे. कोणत्याही आक्रमणाविरुद्ध उभे ठाकण्याची ताकद आता या नि:शस्त्र देशात उरलेली नाही. हा देश आता इतका दरिद्री झाला आहे की दुष्काळांविरुद्ध काही उपाययोजना करण्याचीही क्षमता त्याच्यात उरलेली नाही. लाखो अर्धपोटी उपाशी लोकांचे जीवन हळूहळू कसे लयास जात आहे, याची बऱ्याच शहरवासीयांना कल्पना करता येणार नाही. आपल्याच लोकांचे शोषण करण्याऱ्या परदेशी राजवटीची सेवा करून दलालीच्या रूपाने त्यांच्या पदरात थोडाफार पै-पैसा पडतो आणि काही थोड्या सुखसोयी त्यांना मिळतात. परंतु त्या कशा मिळतात याची या मध्यमवर्गीय शहरवासीयांना कल्पनाही येत नाही. ब्रिटिश-भारतात कायद्याने स्थापन झालेले हे सरकारच आपणा सर्वांचे शोषण करीत आहे. हा विचारही त्या बिचाऱ्यांना कधी शिवत नाही. आज खेड्यापाड्यातून सर्वत्र हाडाचे सापळे दिसतात. लोकांची ही अवस्था कशी झाली त्याचे काही तुम्हाला समर्थन करता येईल ? या गुन्ह्यात इंग्लंड तसेच भारतातील शहरवासीय जबाबदार आहेत, याबद्दल माझी खात्री झाली आहे; आणि ईश्वर असलाच तर या गुन्ह्याबद्दल त्याच्यापुढे जाऊन या लोकांना त्यास जाब द्यावा लागेल.''

जगातील ज्या काही थोड्या देशात उत्कृष्ट राज्यकारभार चालविला जात आहे, त्यात भारताचा सामावेश करावा लागेल. परंतु त्याबद्दलचे श्रेय गांधीजींनी काही मोजक्या ब्रिटिश आणि भारतीय सनदी अधिकाऱ्यांना दिले. ''कोणाही एका

प्रशासकाविरुद्ध मी नाही, आणि मी त्यांचे वाईटही चिंतत नाही. ब्रिटनच्या राजेसाहेबांबद्दल तर काही गैर चिंतणे माझ्या स्वभावातच बसत नाही.'' असे सांगून गांधीजी म्हणाले की यापूर्वी कोणत्याही राजवटीत झाली नाही इतकी भारताची हानी सध्याच्या राजवटीने नि सरकारने केली आहे. '' म्हणूनच या सरकारविषयी मला आपुलकी नाही, हे ठासून सांगणे मी माझे कर्तव्य समजतो. कायद्यानुसार याबद्दल जी काही शिक्षा तुम्हाला द्यायची असेल ती द्यावी, परंतु एक नागरिक म्हणून मला जे काही सांगायचे होते ते मी स्पष्टपणे सांगून माझे कर्तव्य बजावले, हेच माझे समाधान आहे.''

न्यायाधिशांनी गांधीजींना सहा वर्षांच्या साध्या कारावासाची शिक्षा फर्मावली, परंतु आपला निर्णय देताना त्यांनी गांधीजींविषयीचा आपला आदर व्यक्त करताना म्हटले : ''देशातील परिस्थिती लक्षात घेऊन आपली शिक्षेची मुदत कमी करणे, वा आपली सुटका करणे सरकारला शक्य झाले तर माझ्या इतका आनंद क्वचितच कोणाला होईल.''

गांधीजींना तुरुंगवास म्हणजे एक शिक्षा वाटण्याऐवजी सक्तीची विश्रांती वाटत असे. '' अखेरीस मला इथे जरा निवांतपणा मिळाला आहे-'' त्यांनी सी. एफ्. ॲण्डऱ्यूजना लिहिताना म्हटले. ''येथे मी माझ्या स्वराज्यगृहात मजेत रहात आहे-'' असे त्यांनी दुसऱ्या एका स्नेह्याच्या पत्रात म्हटले. प्रार्थना, अभ्यास आणि सूतकताई याकडे अधिक वेळ लक्ष देणे आता त्यांना तुरुंगातच शक्य होते. परंतु ''अशी विश्रांती नि चिरशांतता'' त्यांच्या नशिबात फार काळ नव्हती.

१९२४ सालच्या जानेवारी महिन्यात गांधीजींना पुण्यातील एका इस्पितळात आंत्रपुच्छावरील शस्त्रक्रियेसाठी तातडीने हलवावे लागले. एक ब्रिटिश सर्जन कर्नल मेडॉक यांनी ही शस्त्रक्रिया केली. या शल्यचिकित्सकावर आपला पूर्ण भरवसा आहे, असे गांधीजींनी आपले सहकारी आणि देशातील एक मान्यवर नेते-श्रीनिवासशास्त्री यांच्या उपस्थितीत लिहून दिले. श्रीनिवासशास्त्री, गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनानंतर भारत सेवक समाजाचे अध्यक्ष झाले होते. शास्त्रीजींशी बोलताना गांधीजी म्हणाले की सरकारशी माझा झगडा असला तरी इंग्रज माणसावर माझे प्रेम आहे. अनेक इंग्रज माझे चांगले स्नेही आहेत.

शल्यचिकित्सागृहात शस्त्रक्रियेची तयारी चालू असता गांधीजींना एकटे पाहून शास्त्रीजी त्यांना म्हणाले की त्यांनी देशवासीयांना आपला संदेश द्यावा. परंतु गांधीजींनी त्याला नकार दिला. म्हणाले : ''अहो, मी अद्यापि सरकारी पाहुणा आहे. कैद्यांसाठी असलेले नियम मी काटेकोरपणे पाळणे आवश्यक नाही का ?''

हा संवाद पुरा होईतो गांधीजींना शल्यचिकित्सागृहात नेण्यात आले. शास्त्रीजी बाहेर एकटेच बसले होते. त्यांच्या मनात विचार आला,“ केवढी मनाची थोरवी, क्षमाशीलवृत्ती, दुसऱ्याविषयी अनासक्त प्रेम, माया नि आपुलकी या माणसात आज आपल्याला पहायला मिळाली. दृष्टा, मनाचा मोठा, इतरांचा मान राखणारा आणि प्रतिष्ठा जपणारा नेता असहकार आंदोलनाचे नेतृत्व करीत आहे हे खरोखरीच त्या चळवळीचे भाग्यच म्हणायला हवे.''

शस्त्रक्रियेनंतर विश्रांती घेत असतानाच सरकारने गांधीजींची सुटका केली. परंतु बाहेर येताच देशातील परिस्थिती पाहून त्यांना दु:ख झाले. दोनच वर्षांपूर्वी देशात देशभक्तीची किती मोठी लाट उसळली होती. कधी नव्हे ते हिंदू आणि मुसलमान बांधव एकत्र आले होते. आता तो देशभक्तीचा उत्साह कोठे होता, कोठे लुप्त झाली होती ती एकीची नि एकजुटीची भावना ? त्याऐवजी आता देशात सर्वत्र गोंधळ आणि निराशेचे वातावरण पसरले होते. पराभूत मनोवृत्ती सर्वत्र जाणवत होती. हिंदू आणि मुसलमान आता विभक्त झाले होते. कारण मधल्या काळात कमाल अतातुर्कच्या नेतृत्वाखाली तुर्की लोकांनी खिलाफत चळवळीच्या विरुद्ध भूमिका घेतल्याने, खिलाफत टिकविण्याच्या हिंदुस्थानातील मुसलमानांच्या आवेशाला चांगलाच सुरूंग लागला होता. आता मुसलमानांना हिंदुंच्या पाठिंब्याची गरज नव्हती. इंग्रजांच्या विरुद्धची त्यांची चीड आता बोथट झाली होती. राज्यकर्त्यांनी मोठ्या कुटीलपणे उभय जमातीत एकमेकांविरुद्ध गैरसमज पसरवून कलहाचे बीज रोवले होते; आणि आता देशात ठिकठिकाणी दंगे पेटले होते.

निराशेचे हे ढग दूर कसे करावे या चिंतेने गांधीजींना ग्रासले असतानाच इतरांनी केलेल्या पापाबद्दल आपणच प्रायश्चित्त घ्यावे यासाठी गांधीजींनी २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. ''सर्व भक्तांनी आपल्या मनाच्या सिंहासनावरून ईश्वरालाच कायमचे दूर लोटून दिले असावे, असे वाटू लागले आहे-'' असे उद्‌गार त्यांनी उपोषण जाहीर करताना काढले. ''ईश्वराला आपण परत आपल्या हृदयात स्थान देऊया...'' असे गांधीजींनी आवाहन केले. या आधी एकदा आपले उपोषण सोडताना त्यांनी म्हटले होते. ''इतरांच्या दु:खाने माझ्या मनावर आघात होतो. ते दु:ख मी दूर करू शकलो नाही तर मृत्युला एखाद्या मित्राप्रमाणे मिठी मारावी, असे मला तीव्रतेने वाटू लागते.''

नेहमीप्रमाणे उपोषणाचा परिणाम झालाच: आपण काय चालवले आहे, असे दोन्ही जमातीचे लोक स्वत:ला विचारू लागले... आणि उपोषण समाप्त होण्याच्या आत, दोन्ही जमातींच्या नेत्यांकडून गांधीजींना समेटाची आश्वासने देण्यात येऊ लागली. दिल्ली येथे एकात्मता परिषद आयोजित करण्यात आली आणि तेथे उभय

जमातीत समझोता घडवून आणणारे अनेक ठराव संमत करण्यात आले. परंतु भावनेच्या भरात व्यक्त केलेल्या सदिच्छा अल्पजीवी ठरतात—आणि तसेच झाले. पुन्हा एकदा गांधीजी त्यावर गंभीरपणे विचार करू लागले.

: ३१ :

पक्षाची घडण

अनुयायांना नि कार्यकर्त्यांना नेत्यांच्या विचारसरणीची पुरेशी कल्पना नसली आणि त्यांनी घालून दिलेल्या कार्यक्रमाची कशी अंमलबजावणी करावी याबाबतीत त्यांच्या मनात गोंधळ असला तर परिस्थिती कशी आटोक्याबाहेर जाते, याचा गांधीजींना आतापर्यंत कटू अनुभव आला होता. शस्त्रधारी सैनिकापेक्षाही अहिंसक लढ्यात उतरलेल्या सैनिकात अधिक शिस्तबद्धता असावी लागते. त्यांना प्रशिक्षण देण्याची आणि त्यांचे प्रबोधन करण्याची गरज असते. आपल्या लढ्यातील आणि चळवळीतील बेशिस्त लक्षात येताच गांधीजींनी आपल्या काही निवडक कार्यकर्त्यांना आणि अनुयायांना देशातील ७ लाख खेड्यात जाऊन काम करण्यासाठी तयार करण्याकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला. खेडेगावातील सर्वसामान्य जनतेवर स्थानिक वजनदार गटांकडून तसेच परकीय सरकारच्या हस्तकांकडून नि अधिकाऱ्यांकडून राजकीय, सामाजिक वा आर्थिक अन्याय आणि अत्याचार सतत होत होते. त्यांचे शोषण होत होते. याविरुद्ध मजबूत फळी उभारण्याची जबाबदारी या कार्यकर्त्यांवर गांधीजींनी सोपविली. विधायक कार्याचा असा पाया घालून हळूहळू पक्षाची घडण घडविण्याकडे त्यांनी लक्ष केंद्रित करण्यास प्रारंभ केला.

यादृष्टीने पुढील पाच वर्षात चळवळीचा मार्ग त्यांनी जवळ जवळ सोडला. स्वातंत्र्याचा पाया भक्कमपणे उभा करायचा असेल तर आधी आपली मूलभूत राष्ट्रीय निकड काय ते निश्चित केले पाहिजे, सुनियोजित विचारसरणीचा तिला आधार दिला पाहिजे, आणि विचारांचे लोण दूरवर खेड्यापाड्यात जावे यासाठी कठोर परिश्रम आणि प्रचार केला पाहिजे, हे गांधीजींच्या लक्षात आले. यासाठी हिंदू-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यतेचे उच्चाटन, महिलांना समान हक्क आणि हातमाग, हस्तोद्योग यांवर भर देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला पुन्हा ऊर्जितावस्था आणली पाहिजे; त्यायोगे खेडेगावातून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून दिला

पाहिजे, असा प्रचार गांधीजींनी सुरू केला. ''भारताची ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तता व्हावी येवढेच मर्यादित उद्दिष्ट माझ्यापुढे नाही. सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून आणि शोषणापासून या देशाची मुक्तता मला हवी आहे.'' राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक नि आर्थिक हक्कांसाठी होणाऱ्या चळवळींनी हातात हात घालून मार्गक्रमण केले पाहिजे, असे गांधीजींचे मत होते.

काँग्रेस पक्षातही या कार्यक्रमावरून आता फूट पडली होती. राज्य घटनेला अनुसरून, नव्या सुधारणा कायद्यान्वये स्थापन झालेल्या कायदे मंडळातून, आपण आपले अधिकार प्राप्त करून घेतले पाहिजेत, असे श्री. मोतीलाल नेहरु आणि श्री. सी. आर. दास या नव्या स्वराज्य पक्षाच्या नेत्यांचे प्रतिपादन होते; तर नाफेरवादी असंख्य कार्यकर्ते गांधीजी नेतील त्या मार्गाने कोठेही जावयास आणि कोणतीही चळवल करण्यास सिद्ध झाले होते. काँग्रेस पक्षात कायम फूट पडू नये आणि स्वराज्य पक्षीयांच्या आड आपण येऊ नये, या सद्‌हेतूने गांधीजींनी क्रियाशील राजकारणापासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. देशाच्या राजकीय व्यासपीठावर आता अनेक वाद आणि प्रतिवाद सुरू झाले होते. राजकीय युक्तिवादाला अंत राहिला नव्हता. परंतु वैधानिक पोपटपंचीत आणि वादविवादात गांधीजींना स्वारस्य नव्हते. १९०९ साली त्यांनी ''हिंद स्वराज्य''मध्ये जे विचार मांडले होते ते आता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी त्यांना आता थोडा निवांतपणा हवाच होता. त्यावेळी, चरखा कसा असतो याची स्वतःला काहीही कल्पना नसताना त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठ्या उत्साहाने अखंड बडबड केली होती; भाषणे झोडली होती. हे त्यांनी स्वतःच नंतर कबूल केले.

आपले विचार त्यांनी त्यावेळी घाईघाईने व्यक्त केले असले, तरी आधुनिक औद्योगिक संस्कृतीने समाजात कोणत्या गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत, याची त्यांना जी जाण होती ती अगदी अचूकच म्हणावी लागेल. विज्ञान आणि यंत्र मानवाला शाप आहेत ते त्यांच्या दुःखाचे मूळ आहे, असे प्रभावी प्रतिपादन त्यांनी यापूर्वीच केले होते. संसदीय लोकशाहीचा उपहास करून, ब्रिटिश संसदेची,त्यांनी एकेकाळी ''वांझ स्त्री'' आणि ''वेश्येशी'' तुलना केली होती. काही वर्षानंतर या विषयी बोलताना गांधीजींनी ठासून म्हटलं की आपण केलेले ते विधान अगदी हवा तर एखादा शब्द (बहुधा तो शब्द 'वेश्या' हा असावा) आपण मागे घेऊ परंतु ते वर्णन अगदी अचूक होतं, असं त्यावेळी जरी म्हटलं तरी आपल्या त्या अविचारी भूमिकेपासून गांधीजी आता बरेच दूर गेले होते, त्याचप्रमाणे ब्रिटिश सर्जनकडून शस्त्रक्रिया करून घेताना नव्या वैज्ञानिक संशोधनाचेही स्वागत केले होते. वेळ नि श्रम वाचविणारे 'सिंगर'चे शिवणयंत्र हे शिवणकाम करणाऱ्या महिलांना वरदान

आहे, असेही त्यांनी एकदा म्हटले.

अखेरीस गांधीजी हे निष्णात वकील होते. कोणत्याही मुद्याचे नि बाजूचे त्यावेळेपुरतं प्रभावी समर्थन करणे त्यांना सहज शक्य होत असे. ''तुम्ही यंत्राच्या विरोधी आहात का?'' असा प्रश्न त्यांना १९२४ साली कोणी केला असता, गांधीजी म्हणाले, '' मी यंत्राचा विरोधक कसा असेन ? आपले हे नाजूक शरीर हेही एक यंत्रच आहे की ! मी यंत्राचा विरोधी नाही, केवळ वाटेल तिथे यंत्राचा वापर करण्याच्या विरोधात आहे. आपण यंत्रांमागे वेडे होता कामा नये. श्रम वाचविणाऱ्या यंत्रांचा कोठेही वापर सुरू झाला तर हजारो- लाखो श्रमजीवी रस्त्यावर फेकले जातील, उपाशी पोटी मरतील. श्रम आणि वेळ वाचवायचा तो काही थोड्या लोकांच्या फायद्यासाठी नव्हे तर साऱ्या मानवजातीसाठी. त्यामुळे काही थोड्यांच्या हाती संपत्ती गोळा होते. तसे होऊ न देता सर्वांना तिचा लाभ व्हावा. आज यंत्राच्या जोरावर काही मूठभर लोक लाखोंच्या पाठीवर स्वार झाले आहेत.''

मानवतावादी दृष्टिकोनातून या समस्येचा विचार करण्याऱ्या गांधीजींचा वरील मुद्दा कसा खोडून काढणार ? ईश्वर हेच सत्य आहे, असे प्रतिपादन करणं जेव्हा त्यांना गैरसोयीचे वाटू लागले तेव्हा सत्य हाच ईश्वर आहे असे गांधीजी म्हणू लागले. नास्तिक, निरीश्वरवादीही या मताला आव्हान देऊ शकणार नाहीत. विधायक दृष्टिकोन हा गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा भौतिक पैलू होता. हे व्यक्तित्व काळाबरोबर फुलत होते, नवनवे पैलू त्याला पडत होते. त्या प्रभावी, संपन्न व्यक्तिमत्वाचे वलय आता अधिकाअधिक प्रकाशमान होत दशदिशा उजळीत निघाले होते. संकुचित विचाराच्या चार भिंतींच्या आड कोंडून घेण्याची त्या महामानवाची आता तयारी नव्हती.

राजकारणाच्या बजबजपुरीतून स्वत:ला चांगली चारपाच वर्षं दूर ठेवून गांधीजींनी त्याकाळात भरपूर विचारमंथन केले आणि देशापुढील विधायक कार्यक्रमाची रुपरेषा आखली.

: ३२ :
विधायक दृष्टिकोन

एखादे काम छोटे असो वा मोठे, आपले सारे लक्ष त्यावर केंद्रित करण्याची, आणि जीव तोडून काम करण्याची किमया गांधीजींना सहज साधली होती. सरकारी यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी राष्ट्रीय मोहीम सुरू करण्याचा प्रश्न असो वा शेणाचा उत्तम खत म्हणून कसा उपयोग होऊ शकेल त्याचा प्रयोग असो, गांधीजींच्या दृष्टीने दोन्हींचेही महत्त्व सारखेच. दोन्ही गोष्टीत ते सारख्याच उत्साहाने लक्ष घालणार. गेली काही वर्षे गांधीजींचे जीवन शांतपणे आणि स्वस्थतेनं चालले असले तरी ते निष्क्रिय नव्हते. गाजावाजा न करता शांतपणे त्यांचे काही ना काही कार्य चालूच होते. देशाच्या उपयोगी पडेल, असेच ते कार्य होते. कुदळ-फावडी घेऊन शेतीचे काम हाती घेतलेले असो वा लढाऊ कार्यक्रम असो. गांधीजींच्या कार्याला काही ना काही क्रांतिकारी अशी बाजू असणारच.

गांधीजींचा मूलभूत दृष्टिकोन आणि श्रद्धा या कालावधीत बदलत गेली, असे घडले नाही. मध्ये बराच काळ गेल्याने नि नवनवा अनुभव मिळाल्याने कोठे त्यात असलेला खडबडीतपणा आणि कंगोरे तेव्हढे आता निघून गेले होते. माणसाचे खरे मोल यांत्रिक कार्यक्षमतेत नसून त्याच्या नैतिक पुनरुत्थानातच आहे, यावर गांधीजींचा अखेरपर्यंत भर होता. आदर्शवादी नैतिक जीवनाने यांत्रिक व्यवहार वादावर नियंत्रण ठेवले नाही, तर अंती माणूस नष्ट होईल; खरी संस्कृती शत्रुत्व, दु:स्वास, हेवेदावे आणि हिंसाचार नव्हे तर प्रेम, सहिष्णुता आणि सामंजस्य यांच्या पायावर उभी असते; आणि दुसऱ्याचे लुबाडून स्वत: त्याचा उपयोग घेणे हा दरोडेखोरीचाच प्रकार होय, असे गांधीजी नेहमी म्हणत.

शासकीय अधिकार, शासन व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांचे स्वयंपूर्ण अशा ग्रामीण भागात, खेड्यातून वा छोट्या प्रजासत्ताकातून विकेंद्रीकरण झाले; सर्व स्त्री-पुरुष स्वत: आपल्या जमिनीवर वा आपल्या हस्तकला व्यवसायात स्वहस्ते कष्ट

उपसू लागले तर आदर्श राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था निर्माण होईल, असे गांधीजींचे मत होते. दक्षिण आफ्रिकेत वा हिंदुस्थानात जेथे कोठे त्यांनी आश्रम वा वसाहती स्थापन केल्या तेथे अशी व्यवस्था लावून देण्याचा त्यांनी प्रयोग केला. तसेच दुःख आणि दारिद्र्य यांनी ग्रासलेल्या खेड्यापाड्यातून हा विचार सर्वत्र जावा यासाठी कार्यकर्त्यांची पथकं प्रशिक्षण देऊन तयार करण्याचे गांधीजींनी अविरत प्रयत्न केले.

गांधीजींच्या मृत्युनंतर एके ठिकाणी लिहिताना आल्डस् हक्सले यांनी म्हटले की एक ना एक दिवस गांधीजींचे हे स्वप्न प्रत्यक्षात येईल याबद्दल शंका नाही.'' या स्वप्नाळू महात्म्याच्या स्वप्नाला वास्तवतेचा भक्कम आधार होता कारण हा आदर्शवादी तसा पक्का वास्तववादी होता. मानवी स्वभाव आणि मानवाचे विश्वातील स्थान याचा वास्तववादी दृष्टीकोनातून त्यांनी विचार केला होता. त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक कल्पनांना म्हणूनच या वास्तवता वादाचा भक्कम आधार लाभला होता. जगातील विविध संस्था, संघटनांचा उदय आणि प्रगती, तसेच आधुनिक तंत्रज्ञानातील प्रगती मानवाच्या मूलभूत स्वरूपात मोठा बदल घडवून आणू शकणार नाही, कारण अखेरीस मानव हाही एक छोटासा प्राणीच आहे आणि त्याची शक्तीही मर्यादित आहे, याची त्यांना एकीकडे जाणीव होती. त्याचवेळी, मर्यादित शारीरिक आणि बौद्धिक क्षमता असलेला मानव प्राणी फार मोठी आध्यात्मिक आणि आत्मिक उंची गाठू शकतो यावर गांधीजींची श्रद्धा होती.''

''चयनशक्ती आणि आध्यात्मिक चेतनाशक्ती एकत्र वास करीत असलेल्या या मानव प्राण्यासाठी कोणती सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्था सुयोग्य ठरेल ? यास गांधीजींनी अत्यंत साधे परंतु कोणालाही पटावे असे मार्मिक उत्तर दिले आहे: लोकांनी आधी आपली शारीरिक आणि नैतिक क्षमता लक्षात घ्यावी. आणि त्या जोरावर आपल्याला चांगले स्वयंशासन आणि व्यवस्थापन करता येईल इतक्या आकाराचे छोटे सामूहिक, सामाजिक गट स्थापन करावे; तेथेच रहावे, जीवन जगावे आणि सारे कष्ट उपसावे. या छोट्या सामाजिक गटांचे (Communities) मोठ्या घटक राज्यात अशा प्रकारे सामिलीकरण करावे की त्यामुळे सत्तेचा अधिक्षेप करण्याची कधीही वेळ येणार नाही. लोकशाही राज्याचा व्याप वाढत गेला की जनतेची सत्ता नावापुरतीच उरते, त्यांच्या आवाजाची फारशी कोठे दखल घेतली जात नाही, आणि स्थानिक गटांना आपले भवितव्य ठरविण्यास वावही फारसा उरत नाही; असे त्यांचे प्रतिपादन असे.''

अर्थव्यवस्थेतील आणि राजकारणातील विकेंद्रीकरण एकाच वेळी झाले पाहिजे.

व्यक्ती, कुटुंब आणि छोटे सहकारी गट यांच्याकडे, त्यांच्या चरितार्थासाठी आवश्यक इतक्याच जमिनीची आणि शेतीच्या अवजारांची मालकी असावी स्थानिक बाजारपेठेत त्यांनी आपला शेतीमाल पुरवावा. अवजारात हातानं चालविता येतील अशीच असावी, असे गांधीजींचे मत होते.

काहीही न करता गांधीजींनी हा काळ निष्क्रियपणे घालविला, असे कोणाला वाटेल. परंतु तसे नव्हते. त्यांच्या आयुष्यात हा काळ फार महत्त्वाचा आणि देशाला लाभदायक ठरला. याच कालखंडात गांधीजींनी ''माझे सत्याचे प्रयोग'' हे आत्मचरित्र लिहिण्यास प्रारंभ केला. मूळ गुजरातीतून क्रमश: दर आठवड्याला ते प्रसिद्ध होई. त्यांचे चिटणीस महादेवभाई देसाई आणि त्यांचे सहकारी त्याचा इंग्रजी अनुवाद करीत. याच कालखंडात गांधीजींच्या इंग्रज शिष्या मॅडलिन स्लॅड ऊर्फ मीराबेन यांचे साबरमती आश्रमात आगमन झाले. ''मी त्या आश्रमातील त्यांच्या खोलीत प्रवेश करताच गव्हाळी वर्णाची ती कृश मूर्ती उठून माझ्याकडे आली. दिव्यप्रकाश माझ्या दिशेने येत आहे येवढीच जाणीव मला उरली होती. मी गुडघे टेकले. हळुवार हातांनी त्यांनी मला आधार देऊन उभे केले, आणि म्हटले: 'तू माझी प्रिय कन्या आहेस' हळूहळू मी भानावर आले आणि सभोवतालच्या जगाची मला जाणीव होऊ लागली. प्रेमाने भरलेल्या नजरेनं एक चेहरा स्मितहास्य करीत माझ्याकडे पहात असलेला मला दिसला. त्या नजरेत मिस्किलपणाची काही छटा होती. होय, हेच ते महात्मा गांधी. मी त्यांच्याकडे आले होते.''

अनेक गुंतागुंतीच्या समस्या या कालखंडात निर्माण झाल्या, त्यावर उपाययोजना काय करावी यासंबंधी अनेक मोलाचे विचार गांधीजींनी याचवेळी व्यक्त केले. लूत भरलेल्या भटक्या कुत्र्यांचा अहमदाबादेत त्यावेळी सुळसुळाट झाला होता. त्यांच्यापासून नागरिकांना मोठा उपद्रव होत असतानाही, लोकाच्या पुराणमतवादी, भूतदयावादी विचारांमुळे या कुत्र्यांचा नायनाट करण्याची शहर नगरपालिकेची तयारी नव्हती. अखेरीस काही लोक गांधीजींकडे आले आणि त्यांना यावर काही उपाय सुचविण्यास सांगितले. या रोगी कुत्र्यांना गोळ्या घालून त्यांना त्या व्याधीपासून कायमचे मुक्त करावे असा सल्ला गांधीजींनी दिला. त्यानुसार अनेक कुत्र्यांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. त्यावर अनेक नागरिकांनी आक्षेप घेतला. परंतु गांधीजींनी त्यांना आपल्या पद्धतीने बरोबर समजावले.

असेच एक गंभीर प्रकरण आश्रमात निर्माण झाले. ते एका कालवडीचे. आश्रमातील ही कालवड आजारी झाली. तिला फार वेदना होत होत्या. एका कुशीहून दुसऱ्या कुशीवर वळणेही तिला जमत नव्हते. त्यामुळे अंगावर जखमा वाढत होत्या. कालवड बरी होणे कठीण आहे, असे पशुवैद्याने सांगितले. चारा,

पाणी घेणेही तिला जड जात होते. जखमांवर माशा भणाणत होत्या. अखेरीस ती गोमाता होती. गाईच्या हत्येला गांधीजींचाही विरोध होता. परंतु इथं नाईलाज होता. कालवडीला ठार मारणे आणि तिची हालातून सुटका करणे आवश्यकच होतं. तिची त्या हालातून सुटका करण्यातच अहिंसा होती, असं गांधीजींना वाटू लागलं, आणि त्यांनी त्या कालवडीची कायमची सुटका करण्यास परवानगी दिली. ती कालवड मेली. बापूंनी एक स्वच्छ चादर तिच्या अंगावर टाकली आणि ते शांतपणे तेथून निघून गेले.

याच कालखंडात त्यांनी देशभर सर्वत्र दौरा काढला. ब्रिटिश राजवटीविरुद्ध नव्हे तर दारिद्य, अज्ञान, अस्पृश्यता याविरुद्ध लढा द्या, बंडाचा उठाव करा, असा संदेश देत ते फिरले. एकदा एका सभेत भाषण देत असताना, त्यांच्या लक्षात आले की काही अस्पृश्य श्रोते दूरवर एका बाजूला बसून भाषण ऐकत आहेत. गांधीजी व्यासपीठावरून खाली उतरले, त्या लोकांकडे गेले आणि त्यांच्या शेजारी उभे राहून त्यांनी आपले भाषण सुरू केले. पुराणमताभिमानी, नि समाजातील तथाकथित उच्चभ्रू लोकांना धडा शिकविण्याचा हा प्रयत्न होता.

: ३३ :
दांडी यात्रा सुरू

हळूहळू देशातील एकूण वातावरणात क्रांतिकारक बदल होत गेला. आधीचे निराशेचे वातावरण जाऊन आक्रमक पवित्रा घेण्याकडे लोकांचा कल वाढू लागला. युवक चळवळीचा उदय, शेतकी क्षेत्रात पसरलेला असंतोष, सशस्त्र क्रांतिकारकांनी बंगाल आणि पंजाबात ठिकठिकाणी केलेले उठाव, काही ठिकाणी मार्क्सवादी विचारसरणीचा वाढत चाललेला प्रभाव आणि स्वराज्य पक्षाला घटनात्मक चळवळीत आलेले अपयश, या साऱ्या घटकांचा सम्यक परिणाम बदलत्या वातावरणाला चांगलाच पोषक ठरला. देशात राजकीय वातावरण आता चांगलेच तापू लागले होते.

याचवेळी १९१९ मधील सुधारणा कायद्यांचा आढावा घेण्यासाठी ब्रिटिश सरकारने सायमन कमिशन नेमले परंतु त्यावर भारतीय सदस्य न घेतल्याने सार्वत्रिक आंदोलने आणि निषेध सभांना सर्वत्र जोर आला. १९२२ साली भरलेल्या खटल्यात गांधीजींना सहा वर्षाच्या कारावासाची शिक्षा सांगण्यात आली होती. चार वर्ष आधीच त्यांची विनाअट सुटका करण्यात आली असली तरी, आपल्या आजारीपणामुळे मिळालेल्या या सवलतीचा नि सुटकेचा राजकारणासाठी उपयोग करून घेणे गांधीजींना नैतिकदृष्ट्या योग्य वाटत नव्हते.

सन १९२२ पर्यंत कॉंग्रेसमधील विविध गट पुन्हा एकत्र आले होते. देशात, आंदोलनात्मक चळवळीचे नेतृत्व पुन्हा एकदा गांधीजींनी करावे, अशी सर्वांचीच अपेक्षा होती. त्या वर्षीच्या अगदी अखेरच्या दिवशी गांधीजींनी कॉंग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा ठराव मांडला तेव्हाच सर्वांची खात्री झाली की ब्रिटिश राजवटीला आव्हान देणाऱ्या लढ्याचे नेतृत्व करण्यासाठी गांधीजी आता पुन्हा सिद्ध झाले आहेत. गांधीजींनी स्वत: पूर्ण स्वराज्याच्या शपथेचा मसुदा लिहून काढला, आणि देशातील कोट्यवधी लोकांनी देशाला संपूर्ण स्वराज्य प्राप्त व्हावे

यासाठी झटण्याची शपथ घेतली. २६ जानेवारी १९३० या दिवशी शपथ घेण्याचा कार्यक्रम देशभर पार पडला. म्हणूनच आजही २६ जानेवारीचे देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील महत्त्व आजही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कायम ठेवण्यात आले आहे. आता देशाचे लक्ष साबरमती आश्रमाकडे लागले होते. अहिंसेचा तो उद्‌गाता आता कोणता पवित्रा घेणार होता ?

आणि गांधीजींनी १२ मार्च १९३० रोजी लढ्याचे रणशिंगच जणू फुंकले. आपल्या लोकांना समुद्रातून मीठ तयार करण्याचा पूर्ण अधिकार आहे, त्या अधिकाराला पायबंद घालण्याचा परकी सरकारला कोणताही अधिकार नाही, हे सिद्ध करण्यासाठी गांधीर्जीनी आपल्या आश्रमातील ७८ स्त्री-पुरुषांसह २४ दिवसांची ऐतिहासिक दांडी पदयात्रा सुरू केली. सरकारचा मिठाचा कायदा तोडण्यासाठी ही पदयात्रा होती. गांधीर्जीनी आधीच आपल्या पदयात्रेची व्हॉईसरॉयना कल्पना दिली होती. त्यांना या यात्रेचे हसूच आले असावे. २४ दिवस पायी चालत दांडीला समुद्रासाठी जायचे आणि तेथे मूठभर मीठ तयार करायचे, हा सारा प्रकार पोकळ शौर्याचा नि बालीशपणाचा आहे, असेच सरकार दरबारी सर्वत्र वाटत होते, परंतु या छोट्या प्रसंगाचे महत्त्व काय, त्यातून देशाला केव्हढा महत्त्वाचा संदेश नि संकेत दिला जात आहे, याची कल्पना इतरांना नसली तरी, साधा धोतरपंचा नेसून उघड्या अंगाने आता फिरणाऱ्या त्या फकिराला, देशातील दीनदलितांचे दु:ख जाणणाऱ्या त्या महात्म्याला, त्या साध्या मिठाच्या सत्याग्रहातील सुप्त सामर्थ्याची चांगलीच कल्पना होती. दांडी यात्रा चालू असताना, सभोवतालच्या परिसरातील लाखो शेतकरी धावत येत आणि नि:शस्त्र लढा देणाऱ्या त्या महात्म्याच्या पाया पडत. लोकांना या सत्याग्रहाचा मथितार्थ कळला होता. यात्रा दांडीला पोहोचेपर्यंत देशात सर्वत्र उत्साहाचे नवे वारे संचारले.

दि. ६ एप्रिलच्या पहाटे, नेहमीची प्रार्थनासभा आटोपताच गांधीजी दांडीच्या समुद्र किनाऱ्याकडे चालत गेले आणि त्यांनी तयार झालेले चिमूटभर मीठ उचलले. कायदेभंग करण्याऱ्या या साध्या सांकेतिक प्रसंगानंतर परकी सरकारच्या कायद्यांना आव्हान देण्याची हिंमत लोकात संचारली. कायदे मोडण्यासाठी आणि स्वत:ला अटक करून घेण्यासाठी यानंतर समाजाच्या विविध थरातील लाखो लोकांनी सर्वत्र आंदोलनं सुरू केली. त्यासाठी लाठीमार, आणि प्रसंगी गोळीबारही सहन केला गांधीर्जीनाही ४ मे रोजी अटक करण्यात आली. आठवडाभरात लाखावर लोक त्यांच्या मागे तुरुंगात गेले. परकी ब्रिटिश शासन यंत्रणा या दबावाखाली खिळखिळी होऊ लागली.

भारताची भावी घटनात्मक घडण कशी असावी यावर चर्चा करण्यासाठी नोव्हेंबर १९३० मध्ये लंडनला पहिली गोलमेज परिषद भरली असता, भारताचे खरे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा एकही प्रतिनिधी परिषदेस हजर नव्हता, त्यामुळे त्यावेळच्या मजूरपक्षीय सरकारपुढे मोठा पेच निर्माण झाला. विविध हितसंबंधियांचे प्रतिनिधित्व करणारे काही गट परिषदेत हजर असले तरी हिंदुस्थानातील लोकांच्या न्याय्य आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे तेथे उपस्थित नव्हते. या परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे सरकारला कठीण होते. परिषदेचा समारोप करताना दि. १९ जानेवारी १९३१ रोजी केलेल्या भाषणात पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड म्हणाले की दुसऱ्या गोलमेज परिषदेला आपला प्रतिनिधी पाठविणे काँग्रेसला शक्य होईल, अशी मी आशा करतो. यानुसार, त्यावर्षी, संपूर्ण स्वराज्याचा ठराव पास झाल्यानंतर बरोबर एक वर्षाने, दि. २६ जानेवारी १९३१ रोजी गांधीजी आणि त्यांच्या काही मान्यवर, प्रमुख सहकाऱ्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली.

यानंतर लवकरच व्हॉईसरॉय लॉर्ड इर्विन यांनी गांधीजींना चर्चेसाठी पाचारण केले. चर्चा व्हॉईसरॉय यांच्या नवी दिल्लीतील प्रासादातच व्हायची होती. परंतु या बातमीने तिकडे विन्स्टन चर्चिल मात्र अस्वस्थ झाले. ''कमरेला कसलं तरी पंचेवजा धोतर गुंडाळणारा आणि उघड्या अंगानं फिरणारा हा एकेकाळचा साधा वकिल नि ब्रिटिश साम्राज्याचा शत्रू, व्हॉईसरॉय प्रासादाच्या पायऱ्या चढणार आणि बरोबरीच्या नात्याने ब्रिटिश बादशहांच्या प्रतिनिधीशी बोलणी करणार'' हे दृश्यच चर्चिल यांना कल्पनेतही सहन होत नव्हते.

परंतु लॉर्ड इर्विन यांना तसे काही वाटत नव्हते. २५ वर्षानंतर या प्रसंगाची आठवण करताना, आता लॉर्ड हॅलिफॅक्स झालेले, व्हॉईसरॉय इर्विन म्हणाले की ''गांधीजींच्या विषयी मला अतिशय आदर आहे. या थोर माणसाचे कार्यच तसे मोठे होते.''

गांधीजींच्या दृष्टीने लहानथोर सर्व सारखेच. याविषयी मीराबेन यांनी या चर्चेच्या वेळची एक मनोरंजक हकीकत कथन केली आहे. ''एक दिवस उभयतांमधील चर्चा संध्याकाळपर्यंत लांबली. बापूंचा जेवणाचा डबा घेऊन मी व्हॉईसरॉय यांच्या प्रासादाकडे जावे, असा मला निरोप आला. त्यावेळी बापूंचा आहार म्हणजे दूध आणि खजूर. हे पदार्थही भरले होते ते ॲल्युमिनियमच्या डब्यात. गांधीजी येरवडा येथील तुरुंगात असताना जेवणासाठी त्यांना हा डबा मिळाला होता, आणि त्याची आठवण म्हणून तो ते वापरीत असत. मी ते दोन पदार्थ डब्यात भरले आणि

व्हॉईसरॉय प्रासादाकडे निघाले. जेवणाच्या वेळी गांधीजी आपला डबा उघडीत असताना लॉर्ड इर्विन यांचे त्याकडे बारीक लक्ष होते. कुतूहलाने बघत त्यांनी गांधीजींना विचारले की जेवणासाठी त्यांनी काय पदार्थ आणले आहेत. डब्यातील पदार्थात चमचा ढवळीत गांधीजी म्हणाले, ''हा प्रेषिताचा आहार आहे.''

व्हॉईसरॉय आपल्या जागेवरून उठले आणि गांधीजींच्या डब्यात त्यांनी डोकावून पाहिले; तसं '....आणि हा माझा तुरुंगातील जेवणाचा डबा' डब्यावर चमच्याने टकटक आवाज करीत आणि हसत गांधीजी लॉर्ड इर्विनना म्हणाले.''

: ३४ :

लंडन-पॅरिस येथील भेटीगाठी

सन १९३१ च्या मार्च महिन्यात गांधी-इर्विन करारावर सह्या झाल्या आणि काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहण्यासाठी ऑगस्ट महिन्यात गांधीजी लंडनला रवाना झाले. मधल्या काळात बरीच अनिश्चितता आणि तणाव निर्माण झाले. कारण लॉर्ड इर्विन यांच्या जागी आलेले व्हॉईसरॉय लॉर्ड विलिंग्डन हाडाचे हुजूरपक्षीय (tory) होते. लॉर्ड इर्विन यांचा धोरणी, कल्पक स्वभाव आणि प्रामाणिकपणा यांचा लवलेशही त्यांच्या ठायी नव्हता. ''मी रिक्त हस्ते परत येईन की काय!'' असे उद्गार गांधीजींनी बोटीवर चढताना काढले.

लंडनमध्ये असताना ईस्ट एण्ड भागातील किंग्जले हॉल येथे श्री. म्युरिएल लेस्टर यांचे पाहुणे म्हणून ते राहिले. लंडनच्या गरीब वस्तीतील त्या समाजकल्याण केंद्रात मुक्काम असताना गांधीजींना घरच्या सारखेच वाटले. सभोवताली राहणाऱ्या अनेक गरीब श्रमिक कुटुंबांची मने त्यांनी लगेच जिंकली. गांधीजींच्या साध्या-सरळ, प्रेमळ आणि मिळून मिसळून वागण्याच्या स्वभावामुळे राष्ट्रीय आणि वांशिक भेदभाव नि पूर्वग्रह तेथे केव्हाच गळून पडले. गांधीजींच्या विलक्षण पेहरावाची भीडही मग चेपली. आपण असा साधासुधा धोतर-उपरण्याचा पोशाख का करता असे विचारले असता ते मार्मिकपणे म्हणाले, ''तुम्ही लोक भाराभर एकावर एक चार कपडे चढविता नि मी चार कपडे कमी वापरतो, हाच काय तो फरक!'' युरोपात किमान कपडे वापरण्याची फॅशन तोपर्यंत प्रचारात आली नव्हती, नाहीतर, आपणच ती फॅशन प्रथम प्रचारात आणली याचे श्रेय, गांधीजींनी हसत हसत आपल्याकडेच घेतले असते.

लँकेशायर परगण्याला भेट देण्याची गांधीजींची फार तीव्र इच्छा होती. परंतु ब्रिटिश अधिकाऱ्यांना ती गोष्ट पसंत नव्हती. परदेशी कापडाची होळी करण्याचे

देशबांधवांना आवाहन केल्यापासून, लँकेशायरमधील कापड गिरण्यात बरीच बेरोजगारी निर्माण झाली होती, हेही या विरोधाचे कारण होतेच. तरीही गांधीजी लँकेशायरला गेलेच. तेथील बेकार गिरणी कामगारांनी केलेले गाऱ्हाणे त्यांनी शांतपणे ऐकून घेतले. मग त्यांना उद्देशून बोलताना गांधीजी म्हणाले, ''तुमच्या येथे ३ कोटी लोक बेकार आहेत, असे तुम्ही म्हणता. परंतु माझ्या देशात ३० कोटी बेकार आहेत. आणखी कितीतरी लोकांना वर्षातील सहा महिने कामच नसते. तुम्हाला मिळणारा सरासरी बेरोजगारी भत्ता ७० शिलिंग आहे, तर माझ्या देशात लोकांचे मासिक उत्पन्नच सरासरी केवळ सात-साडेसात शिलिंगापेक्षा अधिक नाही. आता तुम्हीच विचार करा, या ३० कोटी बेकार लोकांची काय अवस्था असेल ? काहीही नोकरीधंदा नसल्याने लाखो कोटी लोक आज निराशेने ग्रासले आहेत, त्यांना त्यामुळे कोठे प्रतिष्ठा नाही, आणि या हलाखीच्या स्थितीत ईश्वरावर श्रद्धा उरलेली नाही. त्यांच्यापुढे बोलताना ईश्वराचा कोणता संदेश मी त्यांना देऊ ? त्यांना काम मिळवून देण्याचे आश्वासन मी देऊ शकलो तरच त्यांना तो ईश्वराचा कौल नि संदेश वाटेल. भरपेट न्याहारी आणि त्यानंतर तृप्त भोजनाचा आनंद उपभोगल्यावर ईश्वराचे नामस्मरण करणे सोपे आहे. परंतु ज्या लोकांना दोनवेळ पुरेश्या भोजनाची शाश्वती नाही, त्यांच्यापुढे जाऊन मी ईश्वराचे नाव कसे घेऊ ? या कोट्यवधी लोकांना भाजी-भाकरीचे दर्शन हेच देवदर्शनासारखे वाटेल.''

गांधीजींचे विचार ऐकल्यानंतर एक बेकार तरुण त्यांना म्हणाला, ''मी सध्या बेकार आहे, परंतु जर मी भारतात असतो तर गांधीजी म्हणतात तसेच म्हणालो असतो.'' त्यांच्याबरोबर इंग्लंडला गेलेल्या मीराबेन यांनी आपल्या आठवणीत म्हटले की, ''जागोजागी गांधीजींभोवती लोकांचा मोठा जमाव जमे. मोठ्या उत्साहाने, आनंदाने आणि अगदी मनापासून त्यांचे सर्वत्र स्वागत होई.''

मात्र, राजकीयदृष्ट्या, गांधीजींनी आधीच भाकित केल्याप्रमाणे, त्यांची लंडनवारी फुकटच गेली. रिक्त हस्ताने त्यांनी इंग्लंडचा किनारा सोडला. या भेटीत त्यांनी अनेकांशी चांगले वैचारिक संबंध जोडल्याने त्याचा मात्र फायदाच झाला. याआधी तरुणपणी श्री. गांधींनी चारवेळा इंग्लंडला भेट दिली होती. परंतु कोट, पॅन्ट, टाय, जॅकेट अशा अद्ययावत पोशाखात तेथे त्यावेळी हिंडलेल्या गांधींची आता कोणाला आठवण राहिलेली नव्हती. ''अर्धनग्न फकिरा''च्या त्या विचित्र वेषातील महात्म्याबद्दल लोकांना कुतूहल होते. त्यांच्याविषयीच्या अनेक खऱ्या, खोट्या, काल्पनिक हकीकती एकमेकांना सांगितल्या जात होत्या. गांधीजींचे प्रभावी व्यक्तिमत्व, विश्वातील साऱ्या प्राणीमात्रांवर प्रेम करणारे त्यांचे विशाल मन, विनोद बुद्धी आणि कोणाचेही मन जिंकून घेणारे हास्य कसे होते ते जवळून पाहण्याची संधी

सर्वसामान्य इंग्लिश नागरिकाला आता मिळाली होती.

श्री. विन्स्टन चर्चिल यांची पुतणी श्रीमती क्लेअर शेरीडन आणि एक अमेरिकन जो डेव्हिडसन या दोन नामवंत शिल्पकारांनी गांधीजी लंडनमध्ये असताना त्यांचा अर्धपुतळा तयार केला. गांधीजी नाईटस् ब्रिज हाऊसमध्ये लोकांशी बोलत वा चरखा चालवीत बसले असताना त्यांनी त्यांच्या डोक्याचा आणि शिरोभागाच्या ठेवणीचा अभ्यास केला होता. सेंट जेम्स राजवाड्यात गोलमेज परिषदेच्या बैठका चालू असताना अधलामधला वेळ गांधीजी येथेच घालवीत. श्रीमती शेरीडनने १९२० साली लेनिन यांचा अर्ध पुतळा तयार केला होता. आपआपल्या देशातील इतिहासाला ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने वेगळी कलाटणी दिली अशा तिघांबद्दल श्रीमती शेरीडन यांचे काय मत झाले होते ते तेथे जाणून घेणे मजेशीर होईल. या तिघांचेही अर्धपुतळे तिने तयार केले होते. ती म्हणते:

''लेनिन आणि विन्स्टन चर्चिल यांच्या डोक्याच्या ठेवणीत एक विलक्षण साम्य होते. घुमटासारख्या मोठ्या डोक्यात त्यांचे मेंदु सामावले असावेत. डोक्यावी मागची बाजू मात्र सपाट होती. आधुनिक काळातील थोर नेत्यांत गांधीजींना मी अग्रस्थानी मानते. त्यांच्या डोक्याची ठेवण काहीशी लेनिन यांच्यासारखी होती. मात्र, गांधीजींचा मोठेपणा त्यांच्या आध्यात्मिक विचारात आणि दृष्टिकोनात होता.

''प्रामाणिकपणा आणि सत्य यांचे खरे प्रतीक म्हणजे गांधीजी आणि लेनिन असे माझे मत आहे. हे दोघेही आपल्या आदर्शापासून ढळण्याची कदापी शक्यता नव्हती. दोघेही आपले विचार परखड शब्दात व्यक्त करीत, त्याचा काय परिणाम होईल याची त्यांनी कधी क्षिती बाळगली नाही. सत्यापुढे त्यांना कशाची पर्वा नव्हती.

''गांधीजींचे मोठेपण त्यांच्या आध्यात्मिक दृष्टिकोनात होते आणि म्हणूनच आधुनिक जगातील अनेक नामवंत आणि कर्तृत्वसंपन्न नेत्यात गांधीजी अधिकच थोर होते, असे मला वाटते. जग आता ज्या दुष्ट चक्रात सापडले आहे, त्यातून बाहेर पडण्यासाठी मानवाने गांधीजींच्या मानवता धर्माचा मार्ग अवलंबिला पाहिजे.

''माझे स्नेही आणि व्यावसायिक प्रतिस्पर्धी अमेरिकन शिल्पकार जो डेव्हिडसन माझ्या मताशी सहमत आहेत. ते मला एकदा म्हणाले की मोठ्या माणसांच्या सान्निध्यात जाण्याची व्यवसायपरत्वे संधी मिळते, त्यावेळी अनेकदा वाटते की ही थोर माणसे तशी किती लहान आहेत. अपवाद होता फक्त गांधीजींच्या बाबतीत. त्यांच्या समीप गेल्यावर वाटले की खरोखरच आपण आज एका महान विभूतीच्या सान्निध्यात आहोत.''

आपल्या परतीच्या प्रवासात पॅरिस येथे एक रात्र मुक्काम करून आणि सार्वजनिक सभेतील भाषणानंतर गांधीजी व्हिलेनो येथे रवाना झाले. रोमां रोलाँ यांचे पाहुणे म्हणून त्यांनी तेथे पाच दिवस मुक्काम केला. रोमां रोलाँ गांधीजींचे दुसरे युरोपीय चरित्रकार होत. जोसेफ डॉक आणि रोलाँ या दोघांनीही गांधीजींच्या अंतर्मनाचा ठाव घेत चरित्रलेखन केले. परंतु श्री. डॉक यांना जोहान्सबर्ग येथे जसा गांधीजींना जवळून पाहण्याचा योग आला होता, तसे रोमां रोलाँ यांच्याबाबतीत नव्हते. या फ्रेंच लेखकाने चरित्रलेखनाच्या आधी कोठे गांधीजींना पाहिलेही नव्हते की भारतालाही कधी भेट दिली नव्हती. आणि तरीही गांधीजींच्या व्यक्तिमत्वाची किती खोलवर ओळख त्यांना होती, तेच त्या छोट्या ग्रंथावरून अनुभवास येते. रोमां रोलाँ यांना टॉलस्टॉय यांच्याविषयी अत्यंत आदर होता. ''गांधीजी हे दुसरे टॉलस्टॉयच आहेत म्हणा ना ! मात्र टॉलस्टॉय यांच्यापेक्षा अधिक हळुवार, प्रेमळ आणि खरेखुरे ते खिस्ताचे अनुयायी आहेत. टॉलस्टॉय खिश्चन धर्मीय जरूर होते, परंतु मनाने नव्हे तर केवळ इच्छाशक्तीच्या बळामुळे.''

आता गांधीजी आणि रोमां रोलाँ यांची प्रथमत:च भेट झाली परंतु ती अखेरचीच ठरली. त्या महान फ्रेंच लेखकाने एकाच भेटीत गांधीजींचे आपुलकीने तसेच विनोदी शैलीत केलेले वर्णन आपल्या अमेरिकेतील एका स्नेह्याला लिहून कळविले. हे वर्णन वाचण्यासारखे आहे. ''चष्मिस्ट, दंतहीन अशा या लहानखोऱ्या माणसानं पांढरी सफेद चादर स्वत:भोवती गुंडाळली होती. शहामृगासारखे त्यांचे बारीक पाय उघडेच होते. डोक्याचा त्यांनी पार चमनगोटा केला होता. केसाचे काही खुंट तेव्हढे दिसत होते. डोके उघडेबोडके होते आणि पावसाचे पाणी त्यावर चमकत होते. हसत हसत त्यांनी माझ्या खोलीत प्रवेश केला तेव्हा धापा टाकल्यासारखा त्यांचा जबडा उघडाच होता. एक हात माझ्याभोवती टाकत त्यांनी मला जवळ घेतले तेव्हा त्यांचे डोके माझ्या गालाला घासत होते. मला तर वाटले, संत डॉमिनिक आणि संत फ्रान्सिस यांचीच ही गळाभेट होती.''

गांधीजींच्या आपल्याकडील मुक्कामाचे वर्णन करताना रोमां रोलाँ पुढे लिहितात, ''किती लोकांनी माझ्या निवास-स्थानावर गर्दी केली ते सांगणे कठीण. लोकांचा भेटीचा अखंड प्रवाह चालूच होता. टेलिफोनला विश्रांती नव्हती; आणि छायाचित्रकार तर जरा इकडे तिकडे हलू देत नव्हते. आमच्या लेमाँ येथील गवळ्याच्या संघानं तर मला कळविलं की ''भारताच्या बादशहांचा'' तेथे मुक्काम असेतो त्यांच्या आहाराची सारी व्यवस्था तेच करतील. आम्हाला यावेळी पत्रंही आली ती ''देवपुत्रांकडून'' काही इटालीयनांनी तर महात्माजींना पत्र लिहून, आगामी लॉटरी कोणत्या क्रमांकाला लागेल ते कळविण्याचीही विनंती केली. माझ्या

बहिणीनं तर या साऱ्याचा धसकाच घेतला. ती आता झुरीच येथील एका आरोग्यधामात १० दिवस विश्रांतीसाठी गेली आहे. माझं म्हणाल, तर मी आता माझी झोप घालवून बसलो आहे. ती तुम्हाला कुठे हाती लागली तर रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून द्यावी ही विनंती.''

तेथे असताना गांधीजींना थकवा आला तरी तो त्यांनी कधी चेहऱ्यावर दिसू दिला नाही. नेहमीप्रमाणेच उत्साही नि हसतमुख राहून त्यांनी सारे कार्यक्रम पार पाडले. ''हा लहानखोर माणूस शरीरानं फाटका असला तरी थकवा हा शब्द त्याच्या शब्दकोशात नसावा, असं वाटतं.'' रोमां रोलाँनी म्हटलं. याच मुक्कामात, लुसान येथे एका संमेलनात बोलताना गांधीजी म्हणाले की, ''यापूर्वी आपण 'ईश्वर हे सत्य आहे' असे म्हणत असू, परंतु आता 'सत्य हेच ईश्वर आहे', असे आपले मत झाले आहे, कारण अगदी निरीश्वरवादीदेखील सत्याच्या सामर्थ्याला आव्हान देत नाहीत. सत्याच्या शोधात असताना ईश्वराचे अस्तित्व नाकारण्यास ते जराही कचरत नाहीत. त्यांच्या दृष्टीने ते बरोबरच असतात.''

रोमच्या मुक्कामात गांधीजी पोपना भेटू शकले नाहीत, परंतु मुसोलिनी यांनी त्यांचे यथोचित स्वागत केले. त्याआधी लंडनमध्ये असताना विन्स्टन चर्चिल यांनी त्यांना भेटण्यास नकार दिला परंतु त्याचे गांधीजींना काहीही वाटले नाही. मान, सन्मान वा अवमान याचा आनंद वा खंत करीत बसायचं नाही अशी त्यांची अलिप्त वृत्ती होती. त्यांनी व्हॅटिकनला (रोमन कॅथॉलिक धर्मगुरूंचे निवासस्थान) भेट दिली तेव्हा तेथे ख्रिस्ताची सुळावरील एक पूर्णाकृती पाहून ते भारावून गेले. मीराबेन म्हणतात की, ''ती मूर्ती पाहताच गांधीजी लगबगीने तिकडे गेले आणि भक्तिभावाने तेथे बराच वेळ स्तब्ध उभे राहिले. त्यानंतर इकडे तिकडे फिरून विविध कोनातून त्यांनी त्या आकृतीचे निरीक्षण केले. त्या मूर्तीच्या मागे जाऊन ते बराच वेळ अगदी स्तब्ध उभे राहिले. तो परिसर सोडेपर्यंत गांधीजी एकही शब्द बोलले नाहीत. बाहेर पडल्यानंतर जणू समाधीतून जागे झाल्याप्रमाणे ते म्हणाले,''ख्रिस्ताची ती सुळावरील मूर्ती किती सुंदर होती नाही ?'' त्यानंतर पुन्हा स्तब्धता.''

मुसोलिनीबरोबर त्यांची भेट कशी झाली आणि इटलीच्या त्या हुकूमशहाविषयी त्यांना काय वाटले ? मुसोलिनीच्या भेटीनंतर टागोर काही काळ प्रभावित झाले होते, परंतु गांधीजींनी आपले डोके थंड ठेवले. आपल्या राजवटीबद्दल गांधीजींचे काय मत होते, असे मुसोलिनीने विचारताच, शब्दच्छल न करता गांधीजी म्हणाले की पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे मुसोलिनी आपली राज्यव्यवस्था उभी करत होते. यानंतर येरवडा तुरुंगात असताना गांधीजींना मुसोलिनीची आठवण झाली असता ते म्हणाले

की त्या भेटीच्या वेळी त्यांना मुसोलिनी एखाद्या फाशी देणाऱ्या मांगासारखा भासला. ''बंदुकीच्या जोरावर उभारलेली राजवट किती काळ टिकणार ?''

: ३५ :
नाताळची भेट

नाताळच्या सणानंतर तीन दिवसांनी, मुंबईला पोहोचताच गांधीजी म्हणाले: ''माझ्या तीन महिन्यांच्या इंग्लंड आणि युरोपातील वास्तव्यात मला कोठेही असा अनुभव आला नाही की पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम, आणि उभय गोलार्धातील लोक एकमेकांसमीप कधीही येऊ शकणार नाहीत. उलट, माझी तर आता खात्रीच झाली आहे की मानव सर्वत्र सारखाच असून मानवी स्वभावही सर्वत्र सारखाच आहे. तुम्ही लोकांजवळ विश्वासाने गेलात आणि त्यांचे प्रेम संपादन करण्याचा प्रयत्न केला, तर माझ्या अनुभवाप्रमाणे, दसपट प्रेम मिळते. मग माणू कोठेही जन्मलेला असो, आणि कोणत्याही हवामानात रहात असो.''

परतु परदेशांच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर लगेचच देशात आलेला अनुभव गांधीजींच्या आशावादाला सुरूंग लावणाराच होता. इंग्लंडमध्ये राहणाऱ्या इंग्रज माणसापेक्षा दक्षिण आफ्रिकेत नि हिंदुस्थानात राहणारा इंग्रज माणूस अगदी वेगळा होता, याचा खेदजनक अनुभव गांधीजींना आता काही पहिल्यांदाच येत नव्हता. हिंदुस्थानात त्यांचे पुनरागमन होण्याआधीच गांधी-इर्विन कराराला, लॉर्ड इर्विनची जागा घेणाऱ्या व्हॉईसरॉयने, आपल्या दडपशाही कारभाराने, पार सुरुंग लावायला प्रारंभ केला होता. लॉर्ड विलिंग्डनच्या राजवटीत आता वटहुकूम, गोळीबार, लाठीमार, अटक, तुरुंगवास यांना नुसता जोर आला होता.

गांधीजींचे मुंबईच्या किनाऱ्यावर स्वागत करण्यासाठी निघालेल्या श्री. जवाहरलाल नेहरुंना वाटेतच अटक करण्यात आली. ''आमचे ख्रिश्चन धर्मीय व्हॉईसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांची ही नाताळ भेट आहे, असे मी समजतो''- अशी टिप्पणी त्यावर गांधीजींनी केली. एक आठवड्यानंतर, कोणताही खटला वगैरे न भरता गांधीजींना अटक करून येरवड्याच्या तुरुंगात टाकण्यात आले. यावेळी मात्र तुरुंगात आल्याबद्दल ''त्यांना मागल्याप्रमाणे सुटकेचा आनंद नव्हता''; कारण

''अल्पसंख्यांकां''च्या हिताच्या नावाने ब्रिटिश सरकार वेगळे मतदारसंघ स्थापन करण्याचा डाव रचीत आहे, याची गांधीजींना कल्पना आली होती. हा कुटिल डाव देशात फुटीरपणाला उत्तेजन देईल याची त्यांना खात्री होती. ब्रिटनमधील मजूर पक्षाच्या पंतप्रधानांची हिंदुस्थानबद्दल सहानुभूतीची भावना असतानाही, तेथील कट्टर साम्राज्यवादी आपले डावपेच बरोबर चालवत होते.

गांधीजींबरोबर त्यांचे चिटणीस महादेवभाई देसाई तुरुंगात असल्याने त्यांचे गांधीजींबरोबर रोज होणारे संवाद, तसेच गांधीजींचा पत्रव्यवहार त्यांनी अगदी तपशिलवार टिपून ठेवला होता. गांधीजींच्या सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनात नि विचारात या कालखंडात कसकसा बदल होत गेला ते त्यावरून लक्षात येते. त्यातील काही नोंदी अशा :

''गांधीजींचे ज्येष्ठ चिरंजीव हिरालाल आयुष्यात आतापर्यंत चांगलेच भरकटत गेले होते. त्यांची कन्या मनू हिने बापूंना कळविले की बाबलीबेन मावशीने वडिलांच्या थोबाडीत लगावून दिली होती. बापूंनी मनुला कळविले की मावशीने योग्य तेच केले होते. आपुलकीतून नि प्रेमातून केलेल्या त्या कृतीला हिंसाचार म्हणता येणार नाही.''

''बापू आपल्या पत्रव्यवहारावर तारीख न घालता हिंदू पंचांगानुसार असेल ती तिथीच घालीत. इंग्रजी कॅलेंडरानुसार कोणी तारीख लिहिली तर त्यांना वाईट वाटत असे. परंतु आता त्यांनी तिथी लिहिणे सोडले आहे. ते म्हणतात, साऱ्या जगाने पाश्चात्य पद्धतीच्या दिनमानाचा स्वीकार केला असताना, आपण त्याचा तिरस्कार करणे योग्य नव्हे.''

आपल्या आयुष्याचा आपल्याला भार वाटू लागला आणि जीवन क्लेशकारक झाले तर जीव देण्याचा माणसाला अधिकार आहे काय, असे कुष्ठरोगानं पिडलेल्या परचुरेशास्त्रींनी एका पत्रात विचारले असता त्यांना लिहिलेल्या उत्तरात, बापूजींनी म्हटलं : ''एखादा माणूस असाध्य रोगानं ग्रस्त असेल आणि केवळ इतरांनी केलेल्या मदतीवरून जगून समाजाच्या उपयोगी पडू शकत नसेल तर त्याला आपले जीवन संपविण्याचा अधिकार आहे. यासाठी कोठे विहिरीत जीव देण्याऐवजी त्याने आमरण उपोषण करावे. त्यामुळे त्याच्या निग्रही स्वभावाची कसोटी लागेल आणि प्रसंगी त्याचे मनही पुढे बदलेल.''

मीराबेन यांना अन्य एका तुरुंगात गुन्हेगारांच्या सोबत ठेवले होते. तेथून त्यांनी पाठविलेल्या पत्राला उत्तर देतांना गांधीजींनी म्हटले : ''अनेक गुन्हेगारांची आपल्याला तेथे सोबत आहे, असे तू पत्रात लिहिले आहेस. परंतु गुन्हेगार हा शब्द

आपण कोठे वापरता कामा नये. किंवा, असं म्हणू या की आपण सारेच तसे गुन्हेगार आहोत. 'तुमच्यापैकी ज्या कोणी कधी पाप केले नसेल त्याने पहिला दगड मारावा, असे प्रभु येशूने म्हटले, परंतु कोणीही त्या स्त्रीवर दगड मारायला पुढे आले नाही. एका तुरुंगाधिकाऱ्याने एकदा म्हटले की 'सारेच गुन्हेगार असतात, परंतु अनेकांचे गुन्हे गुप्त रहातात.' सहजगत्या व्यक्त झालेल्या या उद्गारात फार मोठा अर्थ भरला आहे बरं!'' तसेच एकदा त्यांनी म्हटलं : ''माझा एखादा मुद्दा तुला पटला नाही, किंवा माझ्याशी काही बाबतीत मतभेद झालाच तर, तुझी माझ्यावर श्रद्धा नाही, किंवा माझ्या बुद्धिमत्तेवर तुझा विश्वास उरला नाही, असं म्हणून तू स्वत:ला उगाच कसलाही बोल वा दोष लावून घेऊ नकोस-कारण अखेरीस मी माणूस आहे. म्हणूनच मी परिपूर्ण नाही. मी चुका केल्या तर त्या तू का म्हणून सहन कराव्या ? तसं सहन करणं अंधश्रद्धा ठरेल.''

असे दिवस चालले होते. अखेरीस गांधीजींचीच भीती व कुशंका खरी ठरली. १९३२ सालच्या ऑगस्ट महिन्यात जातीय निवाडा जाहीर करण्यात येऊन 'अस्पृश्यांना' वेगळा मतदार संघ देण्यात आला. गांधीजींनी ताबडतोब ब्रिटिश पंतप्रधानांना पत्र लिहून आठवण करून दिली की गोलमेज परिषदेच्या वेळी आपण (गांधीजींनी) आधीच सांगून टाकले होते की ''अस्पृश्य कायमचे अस्पृश्य रहावेत'' अशा स्वरूपाचा कोणताही निर्णय घेण्यात आल्यास आपण त्यास प्राणपणाने विरोध करू. आता हा जातीय निवाड्याचा निर्णय मागे न घेतल्यास आपण आमरण उपोषण करू, असे गांधीजींनी जाहीर केले.

दि. २० सप्टेंबर रोजी उपोषणास प्रारंभ होणार होता. त्याच दिवशी पहाटेस गांधीजींनी रवीन्द्रनाथांना पत्र लिहिण्यास घेतले; ''आज मंगळवार, पहाटेचे तीन वाजले आहेत. दुपारी मी माझ्या निर्धारानुसार उपोषणास प्रारंभ करीन. तुम्ही मला आशीर्वाद द्यावेत. मला ते हवे आहेत. तुम्ही माझे स्पष्ट वक्ते मित्र आहात म्हणूनच मी तुम्हाला माझा सच्चा मित्र मानतो.'' हे पत्र पोस्टात पडण्याच्या आतच कविवर्यांची तार आली : ''देशाच्या एकात्मतेसाठी आणि सामाजिक समतेसाठी आपला मोलाचा जीव कारणी लावणे योग्यच आहे. मात्र, तुमचा हा महान त्याग आम्हा सर्वांची हृदये विदीर्ण करीत आहे. केव्हढे कठीण व्रत तुम्ही घेतले आहे. व्रताची यशस्वी सांगता होवो, आपल्याविषयीचा आदर आणि आपुलकीच्या आमच्या भावना कसोटीच्या या क्षणी आपली अखंड सोबत करतील.''

साऱ्या देशाच्या भावनाच टागोरांनी बोलून दाखविल्या. गांधीजींच्या कठीण व्रताने हिंदु समाजाच्या हृदयालाच हात घातला. अनेकांची सद्सद्विवेक बुद्धी त्याने

जागी केली. लाखो लोकांना वाटू लागले की अस्पृश्यतेचे पालन करण्याच्या पापात तेही वाटेकरी आहेत. जर का या उपोषणात गांधीजींचे काही बरेवाईट झाले तर, तर त्याचे पाप आपल्याही डोक्यावर येईल, असे देशातील लाखो हिंदूंना वाटू लागले. सुदैवाने पाच दिवसानंतर सवर्णांचे पुढारी आणि तथाकथित अस्पृश्यांचे पुढारी यात करार होऊन, वेगळ्या मतदार संघाची कल्पना सोडून देण्यात आली. त्याऐवजी ''अस्पृश्यांना'', म्हणजे गांधीजी म्हणत त्याप्रमाणे, हरिजनांना, राखीव जागात अधिक प्रतिनिधित्व मिळवून देण्याचे ठरले. गांधीजींना करार मान्य होता. दुसऱ्या दिवशी उपोषणामुळे गांधीजींची प्रकृती चांगलीच खालावली असताना बातमी आली की ब्रिटिश सरकारने, करारातील नवी व्यवस्था स्वीकारली आहे. त्याच दिवशी अनेक स्नेही-सोबती-कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत गांधीजींनी उपोषण सोडले. विशेष म्हणजे त्यावेळी कविवर्य रवींद्रनाथ खास उपस्थित होते. गांधीजींच्या प्रकृतीचे वृत्त मिळताच, घाईघाईने ते शांतिनिकेतन सोडून आले होते. उपोषण सोडताना त्यांनी गीतांजलीमधील काही रचनाही म्हणून दाखविल्या.

संत, कवी, समाजसुधारक यांनी शतकानुशतके हिंदू धर्मातील अस्पृश्यतेचा निषेध केला आहे, परंतु त्याचे खरे कंबरडे प्रथम कोणी मोडले असेल तर ते या उपोषणाने. उपोषण सुटण्याआधीच, देशात अनेक ठिकाणी सवर्ण हिंदु आणि हरिजन यांत मनोमिलन होण्यास सुरुवात झाली; आणि परिणामी अनेक गावातून हिंदू मंदिरे हरिजनांना खुली करण्यात आली.

उपोषण सुरू होण्यापूर्वी त्यांना भेटण्यास आलेल्या पत्रकारांशी बोलतांना गांधीजींनी म्हटलं की, ''आपण जन्माने सवर्ण स्पृश्य असलो तरी आता आपला समावेश तथाकथित अस्पृश्यांमधील अगदी हलक्यातल्या हलक्या जाती जमातीत व्हावा अशी आपली इच्छा आहे. हिंदू समाजात जातीभेद आहेत ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे. मी तर यापुढे हलक्यात हलक्या समजल्या जाणाऱ्या या लोकांचेच प्रतिनिधित्व करीन. आपल्या शिवाशिवीच्या कल्पनेमुळे या लोकांनी किती अवमान सोसला त्याचे वर्णन करणे कठीण आहे. मलबार आणि ओरिसात या लोकांचे हाल मी पाहिले आहेत. केवळ राखीव जागा देऊन या लोकांचे कल्याण होणार नाही, तर त्यासाठी तथाकथित स्पृश्यांनी या लोकात जाऊन सामाजिक उत्थापनाचे काम केले पाहिजे. वेगळ्या मतदार संघामुळे समाज सुधारणेच्या, अस्पृश्यता नष्ट करण्याच्या आमच्या प्रयत्नांना चांगलाच खो बसला असता. समाज सुधारणा घडवून आणण्याच्या माझ्या आशा-आकांक्षांचाही चुराडा झाला असता. या कराराचे वेगळ्या मतदार संघाची कल्पना मागे पडली असती तरी त्याने माझे पूर्ण समाधान होणार नाही. स्पृश्य आणि अस्पृश्यमधील भेद असे कराराने नष्ट होत

नाहीत. मुळापासून हा भेदभाव कायमचा नष्ट झाला पाहिजे. त्यासाठी आयुष्यात मी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन.''

: ३६ :

पुणे करार आणि हरिजन

पुणे येथे झालेल्या या कराराचा उल्लेख करून गांधीजी एकदा म्हणाले की, ''पुणे कराराच्या परिपूर्तीसाठी आपण आयुष्य वेचू आणि आपल्या हरिजन बांधवांना दिलेल्या वचनाची पूर्तता करू.'' अद्यापि कैदेत असतानाही यादृष्टीने त्यांनी प्रयत्नास प्रारंभ केला.

गांधीजींच्या मनात एखादा विचार रुजला की त्याचे निश्चयात परिवर्तन होत असे, आणि निश्चयाला मग कृतीची जोड मिळे. आणि जे काही करायचे ते धार्मिक निष्ठेने, मन लावून करायचे हा गांधीजींचा मनोधर्मच होता. काही महिन्यांपूर्वी एका पत्रकाराने त्यांना सूचना केली होती की, त्यांनी सक्रिय राजकारणाचा त्याग करावा आणि त्याऐवजी इस्लाम, खिस्तीधर्म आणि बौद्धधर्म यातील समान तत्त्वांची लोकांना शिकवण देत फिरावे. त्यास उत्तर देतांना गांधीजी म्हणाले की,''मानवाच्या अनेक कार्यापैकी धर्म हे एक कार्य आहे, असे मी मानीत नाही, एखादे कार्य पवित्र धर्मकृत्याच्या निष्ठेने करता येईल आणि त्यावाचूनही करता येईल. त्यामुळे धर्मासाठी राजकारणाचा त्याग करावा असे मला वाटत नाही. कारण अखेरीस मी हाती घेतलेले कोणतेही लहानमोठे कार्य हे धर्मकृत्यच आहे, असे समजून मी ते हाती घेऊन पुढे करतो.''

गांधीजींच्या एका चरित्रकारानेच एका ठिकाणी म्हटले आहे की, समाजसुधारणेची जगाच्या इतिहासातील एक प्रचंड मोहिम अशाप्रकारे एका कैद्याने तुरुंगात सुरू केली. प्रारंभी जेलच्या अधिकाऱ्यांनी त्यांना कैदेतूनच ही मोहिम सुरू करण्यास परवानगी दिली. कारण त्यामुळे राजकीय चळवळीऐवजी समाज सुधारणांकडे लोकांचे लक्ष वेधले जाईल. हरिजनांच्या सेवेसाठी एक खास वेगळी संघटना उभारण्यात आली. गांधीजींच्या संपादकत्वाखाली ''हरिजन'' हे साप्ताहिक सुरू करण्यात आले. आधीच्या ''यंग इंडिया'' या साप्ताहिकाचे प्रकाशन केव्हांच

बंद पडले होते. खेरीज साबरमती आश्रमाकडेही गांधीजींचे लक्ष नव्हते. मिठाच्या सत्याग्रहासाठी १२ मार्च १९३० रोजी गांधीजी या आश्रमातून बाहेर पडले ते नंतर तिकडे फिरकलेच नाहीत. परकीयांच्या दास्यातून देशाची सुटका होईपर्यंत आपण या आश्रमात परतायचे नाही, असा त्यांनी मनाशी पणच केला होता. म्हणून मग तो आश्रम हरिजन सेवक संघाकडे सोपविण्यात आला. हरिजनांच्या कल्याणासाठीच या संघाची स्थापना करण्यात आली होती.

हिंदू समाज मनात अस्पृश्यतेची मुळं प्राचीन काळापासून इतकी खोलवर रुजली होती की सार्वजनिक सदिच्छेच्या जोरावर अल्पावधीत त्याचे समाजातून समूळ उच्चाटन करणे केवळ अशक्य होते. खेरीज तुरुंगात गांधीजींना प्रचारासाठी सोयी-सवलती तरी किती मिळणार ? परंतु येव्हढी मोठी समस्या एकदा हाती घेतल्यानंतर तिची व्यवस्थित सोडवणूक करण्यास गांधीजी अधीर झाले होते. इकडे सरकारची मात्र, गांधीजींना काही मर्यादेपलीकडे, यासाठी सोयी सवलती मिळवून देण्याची तयारी नव्हती. कारण अखेरीस ते कैदी होते. कैदेत असतानाही असे विधायक काम करून यांचे उलट अधिकच कोठे नाव व्हायचे ! ते परवडण्यासारखे नव्हते.

अशा रीतीने, गांधीजींनीच म्हटल्याप्रमाणे त्या दिवसात ''उंदिर-मांजराचा जीवघेणा खेळ'' सुरू झाला. गांधीजी उपोषण सुरू करण्याची अधूनमधून धमकी देत वा उपोषण सुरू करीत, आणि सरकार त्यांची सुटका करी. मग पुन्हा अटक, पुन्हा सुटका असा प्रकार सुरू झाला. काय करावे म्हणजे संकट दूर पळेल, असे सरकारला झाले होते. अखेरीस १९३३ च्या ऑगस्ट महिन्यात गांधीजींची विनाअट सुटका करण्यात आली. याआधी थोडेच दिवस त्यांना एक वर्षाची कैद सुनावण्यात आलीच होती. मात्र आता बाहेर पडताच गांधीजींनीही उदार मनाने, सरकारचा त्रास नको म्हणून, वर्षभर कोणतीही चळवळ वा मोहीम हाती न घेण्याचा निर्बंध स्वत:वर घालून घेतला.

याचवेळी गांधीजींनी आपला मुक्काम आणि मुख्य कार्यालय, अहमदाबादेहून वर्ध्याला हलविले. परंतु विश्रांतीची गरज असताही, वर्ध्याला फार वेळ न थांबता त्यांनी देशभर दौरा करण्यास सुरुवात केली. आपले विचार लोकांना सांगावे आणि प्रचार कार्यासाठी निधी गोळा करावा, हा यामागे उद्देश होता. मीराबेन यावेळी गांधीजींच्या सोबत करीत होत्या. ''देशाच्या विविध भागात दौऱ्यामागून दौरे चालले होते. प्रचंड सभा, लोकांची ही गर्दी, अनेकांच्या भेटीगाठी. सर्वांचा उत्साह जणू उतू चालला होता. लोकांना गांधीजींविषयी किती प्रेम वाटत होते. फार दिवस

आपण लोकांपासून दूर राहिलो असं त्यांना वाटत होतं. आता मात्र लोकांचं आपल्यावरील प्रेम पाहून गांधीजींना नवा जोम आला होता. दौऱ्याचा ताप, आणि दिवसभराचा शिणवटा त्यांना आता जाणवतही नव्हता. ओरिसात तर काही वेळा पायी फार चालावे लागले.''

बिहारमध्ये याचवेळी झालेल्या भूकंपाने प्रचंड हानी झाल्याने गांधीजींना दौरा अर्धवट टाकून तिकडे धावावे लागले. यावेळी त्यांच्या डोक्यात सतत अस्पृश्यतेचा प्रश्न असल्यानं, हा भूकंप म्हणजे अस्पृश्यतेच्या पापाबद्दल आम्हाला शिक्षा देणारा दैवी प्रकोप होय, असंच गांधीजी म्हणू लागले. दैवी आपत्तीचा अशाप्रकारे विचित्र अर्थ लावल्याने रवींद्रनाथांनी गांधीजींचा उघड निषेध केला. एखाद्या कुडमुड्या ज्योतिषाप्रमाणे या आपत्तीचा असा विचित्र अर्थ लावणे महात्माजींसारख्यांना शोभत नाही, अशी टीका कविवर्यांनी केली. अशाप्रकारे तर्कहीन, चुकीचे निवेदन केल्याने आपले शत्रू त्याचा उलट फायदा घेतील असा इशाराही कविवर्यांनी दिला.

परंतु कधी कधी काही मुद्यांवर गांधीजी हट्टीपणाची सीमा गाठीत. एकदा ते अशा मुद्याला चिकटून बसले की तेथे तर्कसंगत विचार आणि सारासार विवेक बुद्धीला स्थान नसे. इतक्या मनस्वीपणे आपला मुद्दा जे पुढे रेटीत आणि तळमळीने आपल्या श्रद्धेचं समर्थन करीत की तेथे मुद्देसूद बाजू मांडण्याला काहीच अर्थ उरत नसे. ''निसर्गाचे नियम मला कोठे माहीत आहेत ? मी अज्ञ आहे.'' 'हरिजन'मध्ये लिहिताना त्यांनी पुढं म्हटलं : ''माझी ईश्वरावर श्रद्धा आहे. आता मी ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करू शकत नाही ही गोष्ट खरी. परंतु अस्पृश्यतेचे पाप आणि बिहारमधील भूकंप यांचा संबंध मी सिद्ध करू शकत नसलो तरी माझा आतला आवाज म्हणतो तसा या दोघांत अन्योन्य संबंध असलाच पाहिजे. आता माझी ही समजूत निराधार आहे, असं सिद्ध झालं तर मला आणि माझ्या विचारात सहभागी झालेल्यांमा आनंदच होईल. त्याने उलट अस्पृश्यतेविरुद्ध कार्य करण्यात आम्हाला अधिकच जोर येईल. अस्पृश्यता हे अखेरीस पापच आहे आणि पापक्षालनासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करण्यास आम्हाला हुरुपच येईल.''

या समर्थनामागील तर्कशास्त्र काहीही असो, त्या भावनेमागील तळमळीला नावे कशी ठेवणार ?

त्यानंतर काही वर्षे गांधीजींनी वर्ध्याजवळील एका आश्रमातील झोपडीत आपला मुक्काम हलविला आणि हरिजनांच्या उद्धारासाठी तसेच शिक्षण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसंबंधीचे आपले विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी, आणि त्याच्या प्रसारासाठी आपली सारी शक्ती नि बुद्धी एकवटली. ''भारत शहरात नसून

खेडेगावात आहे. या ग्रामीण भागाची दारिद्रयाच्या विळख्यातून मी सुटका करीन त्यादिवशी स्वराज्य आले, असे मी म्हणेन.'' स्वावलंबन हा गांधीजींच्या साऱ्या विचाराचा पाया होता. ते म्हणत की लोकांनी नि समाजाने आपल्या हाती असलेल्या साधन संपत्तीतून आवश्यक ती शक्ती उभी केली तर त्यांचा खराखुरा विकास होऊ शकेल.

याचवेळी गांधीजींनी आपल्या काँग्रेसच्या सदस्यत्त्वाचा औपचारिकरित्या राजीनामा दिला होता. आपण काँग्रेस पक्षाचे चार आण्याचेही साधे सभासद नाही, असे ते नेहमी म्हणत. परंतु त्यांना असं एकाकी सोडणं काँग्रेस पक्षाला परवडण्यासारखे नव्हते. दहा वर्षांपूर्वी असेच एकदा गांधीजी सक्रिय राजकारणापासून आणि ते नेतृत्त्वापासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत असताना १९२५ साली त्यांना पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी गळ घालण्यात आली होती. काँग्रेस पक्षाचा सर्वसामान्य लोकांशी अधिक घनिष्ठ संबंध यावा, आणि लोकसेवेचे साधन म्हणून पक्षाला नवे स्वरूप देता यावे या हेतूने त्यांनी अध्यक्षपद स्वीकारले. याआधी साबरमती आश्रमाला गांधीजींच्या सान्निध्याने मोठे महत्त्व आले होते. ते स्थान आता वर्ध्याजवळील सेवाग्रामला प्राप्त झाले. कारण गांधीजी आता सेवाग्रामात येऊन राहिले होते. देशातील राजकीय कार्याचे ते आता मध्यवर्ती केंद्र झाले. हजारो लोक येथे गांधीजींचा सल्ला घेण्यासाठी येत, आणि गांधीजी आनंदाने लोकांना मार्गदर्शन करीत.

सक्रिय राजकारणापासून वर वर दूर राहण्याचे गांधीजींचे घोरण त्यांच्या डावपेचाच भाग होता. आपल्या विचाराच्या आणि आपल्या आदेशानुसार कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी राखीव फळी शिकवून तयार करण्यासाठी या निवान्त वेळेचा उपयोग करून घेण्याकडे त्यांचे सारे लक्ष लागले होते. देशातील प्रत्येक खेडेगाव हे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे आणि तेथील लोकांची नैतिक हिम्मत वाढावी हेच गांधीजींचे ध्येय होते. गाव आणि तेथील लोकवस्ती यांची अशी सिद्धता करायची की परकी वा देशी कोणतेही शासन असो वा येवो, ते लोकेच्छेच्या विरुद्ध गेल्यास आपोआप खिळखिळे व्हावे, हा यामागील खरा उद्देश होता. पूर्वीच्या वसाहती देशातून, आजकाल विध्वंसक, दहशतवादी, छुप्या कारवायांची मोठी प्रशंसा केली जाते. गांधीजींच्या ''डावपेचा''च्या अगदी विरुद्ध असे हे टोक. गांधीजींच्या घोरणाला यश येण्याची काही काळ कळ सोसण्याची मनाची सिद्धता हवी, सोशिकपणा हवा, त्या कार्यावर श्रद्धा हवी आणि मनोधैर्य हवे. दुर्दैवाने लोकांच्यात तेवढा धीर नव्हता. त्यामुळे त्या घोरणांना आणि सक्रिय कार्याला कितीसे यश आले ते पुरेसे कधी कोणाला उमगलेच नाही. कोणाला त्याचा पुरेसा

अनुभवही आला नाही. गांधीजींचा मार्ग हा अखेर, स्वप्नवत ठरला. आजही ते एक स्वप्नच मानले जाते, आणि यापुढेही ते स्वप्नच समजले जाईल, असे वाटते.

: ३७ :

पुन्हा एकदा राजकीय धुमश्चक्रीत

१९३९ सालच्या सप्टेंबर महिन्यात दुसरे महायुद्ध सुरू होताच गांधीजी पुन्हा एकदा सक्रिय राजकारणात ओढले गेले. आपल्या लोकांपुढे धोका आणि संकटे वाढून ठेवली असताना आणि सर्वत्र पेचप्रसंग उभे असताना गांधीजी स्वस्थ बसणे शक्य नव्हते. मंदिर, मशीद वा चर्चमध्ये देव नसून तो झोपडीत, रस्त्यावर आणि युद्धभूमीवर झगडत आहे, असे गांधीजी नेहमीच म्हणत. जगभर युद्धाच्या ज्वाळा भडकत असताना आपण काय करावे ? ही आग विझविण्याचा प्रयत्न करावा की कविवर्य टागोरांनी आपल्या एका कवितेत म्हटल्याप्रमाणे त्यात तेल ओतावे, म्हणजे ज्यांनी ही आग लावली, ते तसेच जगातील सारे हिणकस, त्याज्य आणि अप्रिय असे सर्व काही त्या आगीत नष्ट होतील ! खरोखर मन:स्थिती द्विधा करणारा पेचप्रसंग समोर उभा होता.

या आधी, आफ्रिकेत बोअर युद्धात बोअर लोकांबद्दल सहानुभूती असतानाही त्यांनी अगदी प्रामाणिकपणे ब्रिटिशांना त्या युद्धात सहकार्याचा हात दिला होता. परंतु आता त्यांच्या दृष्टीकोनात फार मोठा बदल झाला होता. ब्रिटिश नागरिकांबद्दल, लोकांबद्दल आपुलकी असतानाही ब्रिटिश साम्राज्याबद्दलची त्यांची चीड आता वाढली होती. कोणत्याही कारणासाठी असो युद्धाबद्दल त्यांना आता तिरस्कार निर्माण झाला होता. युद्धात परस्परांचा संहार करून मानवजात अंती काही साध्य करू शकेल यावर त्यांचा विश्वासच नव्हता. ''दोस्तांबद्दल मला सहानुभूती असली तरी कोणतेही युद्ध एकंदरीत वाईटच या निष्कर्षाला मी आलो आहे.'' असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले.

हत्या न करता मरण पत्करणे हे सर्वात मोठे शौर्य होय, असे गांधीजी नेहमी म्हणत. अहिंसेवर श्रद्धा असताही यापूर्वी पहिल्या महायुद्धाच्या वेळी त्यांनी रंगरूट भरती एजंट म्हणून कामही केले होते. गांधीजींच्या विचारात लवचीकपणा होता.

मात्र कोणी त्यावर मानसिक गोंधळ म्हणून टीकाही करीत. त्यामुळे काही वेळा अनेक प्रश्नांवर ते परस्पर विरोधी वाटावेत असे विचार व्यक्त करीत, हेही खरे. अहिंसेचा सतत घोष आणि प्रचार करतानाही, त्यांनी वेळोवेळी असंही म्हटलं आहे की भित्रेपणा आणि हिंसा यातून निवड करायची झाल्यास हिंसाचार परवडला, असे मी बिनदिक्कत म्हणेन.

लढाऊ जमात म्हणून प्रसिद्ध असलेले हिंदुस्तानच्या वायव्य सरहद्द प्रांतातील पठाण लोकही आता खान अब्दुल गफारखान यांच्या नेतृत्वाखाली अहिंसक लढ्यास सिद्ध झाल्याचे पाहून गांधीजींना फार आनंद झाला होता. अहिंसक चळवळीत सहभागी झाल्याने गफारखान हे सरहद्द गांधी म्हणून ओळखले जात होते. सरहद्द प्रांताला १९३८ साली दिलेल्या भेटीत पठाणांना उद्देशून भाषण करताना गांधीजी म्हणाले होते, की अहिंसेची खरी ताकद त्यांना जाणवली तर शस्त्रे टाकून दिल्यानंतरही आपले नीतीधैर्य आणि सामर्थ्य वाढल्याचेच त्यांच्या लक्षात येईल. मात्र, अहिंसा धर्माचा स्वीकार केल्यानंतर आपली शक्ती क्षीण होत आहे, सामर्थ्य लोपले आहे, असे त्यांना वाटल्यास त्यांनी खुशाल अहिंसेचा त्याग करावा.

आता, ब्रिटन संकटात असताना उठाव करणे हिंदुस्थानच्या हिताचे आहे, असे काँग्रेसमधील तसेच बाहेरीलही अनेकांचे मत होते. शत्रुची अडचण ती आपली सोय असे जगात सर्वत्रच सुज्ञ माणसे म्हणतात, असा युक्तिवाद केला जात होता. परंतु हे काँग्रेसच्या ध्येय-धोरणाच्या विरुद्ध आहे, अनैतिक आहे, असे गांधीजींचे म्हणणे होते. ''ब्रिटनच्या ऱ्हासातून आणि त्याच्यापुढील संकटातून आम्हाला आमचे स्वातंत्र्य मिळवायची इच्छा नाही. हा अहिंसेचा मार्ग नव्हे, असे गांधीजी प्रतिपादन करीत. लोकशाही आणि स्वातंत्र्याची हिंदुस्थानात पायमल्ली करीत असताना, युरोपात मात्र त्यासाठी लढाई करण्यास ब्रिटन सिद्ध झाले होते. यातील विरोधाभासाची आणि ब्रिटनपुढील नैतिक पेचप्रसंगाची गांधीजींना पुरेपूर जाणीव होती.

युरोपात चाललेल्या युद्धातील संहारामुळे गांधीजी व्यथित झाले होते. फ्रान्सच्या पतनामुळे त्या देशाबद्दल त्यांना अनुकंपा वाटत होती. भिंतीला पाठ लावून करीत असलेल्या चिवट प्रतिकाराबद्दल त्यांना ब्रिटिश फौजांचे कौतुक वाटत होते; त्याच—वेळी हिंदुस्थानातील लोकांच्या आशा-आकांक्षा पायदळी तुडविल्याबद्दल लोकांची ब्रिटिश राजवटीबद्दलची चीड किती वाढत चालली होती, याचीही त्यांना जाणीव होती. गांधीजींची मन:स्थिती यावेळी दोलायमान झाली होती. काय करावे ? ''आपण फार उदासिन आणि चिंताग्रस्त झालो आहोत'' असं त्यांनी

अनेकांजवळ कबूल केलं. "ही अशी बिकट परिस्थिती निर्माण केल्याबद्दल माझं मन सारखं ईश्वराला जाब विचारीत आहे, त्याच्याशी भांडत आहे."

ब्रिटनने भारताला समान भागीदार म्हणून वागवलं तर युद्ध प्रयत्नात त्यास सहकार्य करण्याची बहुसंख्य काँग्रेस जनांची तयारी होती. तशी मदत देऊनही करण्यात आली होती. काँग्रेसमधील आपले सहकारी देशभक्त-राजकारणी आहेत, साधु नव्हेत. त्यामुळे हिंसाचाराचा पूर्णतया त्याग करण्याच्या धोरणाला सर्वांचाच मनापासून पाठिंबा मिळू शकणार नाही, आपली ते साथ करू शकणार नाहीत, याची गांधीजींना पूर्ण कल्पना होती. खेरीज सशर्त अहिंसेवर त्यांचा विश्वासही नव्हता. आपले नेतृत्व हवे असेल तर आपल्या धोरणाला संपूर्णतया पाठिंबा दिला पाहिजे, असा गांधीजींचा आग्रह नव्हता. मात्र, या कसोटीच्या क्षणी आपल्या नेतृत्वाखेरीज पक्षाचे चालणार नाही, आणि आपण जर काही अटी घातल्या तर त्या मान्य करण्याखेरीज सहकाऱ्यांना तरणोपाय नाही, याचीही गांधीजींना कल्पना होती. परंतु त्यांनी, भारताचा स्वयंशासनाचा अधिकार ब्रिटनने विनाअट मान्य केला आणि बरोबरीच्या नात्याने भारताला वागविले तर युद्ध प्रयत्नात दोस्त राष्ट्रांना सहकार्य करण्याचा काँग्रेसचा मूळ ठराव संमत करण्यात यावा येवढेच सुज्ञपणे आवाहन केले.

त्याचवेळी, ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नांना श्रम वा निधी रुपाने मदत करणे चुकीचे आहे. सर्व प्रकारच्या युद्धांना अहिंसक मार्गानि विरोध केला गेला पाहिजे, असा देशभर सर्वत्र प्रचार करण्यासाठी गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला आणि काही निवडक सत्याग्रहींची त्यासाठी निवडही केली. गांधीजींचे हे धोरण दुटप्पीपणाचे आहे, त्यात कोठे एकवाक्यता नसते. परिस्थितीनुसार कोलांट्या उड्या मारल्या जातात. असा आरोपही अनेकांनी यावेळी केला. "एखाद्या प्रश्नावर मी आधी केलेल्या निवेदनाशी सुसंगत असे माझे विधान आहे का हे पाहणे माझे ध्येय नसून, परिस्थितीच्या संदर्भात सत्याशी ते कितीसे सुसंगत आहे, प्रमाणिक आहे, यावर माझा भर असतो," असं गांधीजींनी वारंवार स्पष्टपणे म्हटलं आहे. यामुळे, सत्याकडून सत्याकडेच आपली वाटचाल नेहमी होत राहिली आहे, असा त्यांचा दावा होता.

गांधीजींची वाटचाल तशी सत्याकडून सत्याकडे होत असताना इकडे देशाची वाटचाल हालापासून अधिक हालाकडे आणि दुःखापासून दुःखापर्यंत चालली होती. तर तिकडे ब्रिटन अधिकाधिक खोल संकटात बुडत होते. आग्नेय आशियात जपानच्या मुसंडीला आवर घालणे ब्रिटिशांना कठीण झाले होते. त्याचवेळी अमेरिकेची सहानुभूती घालवून बसणे ब्रिटनला परवडण्यासारखे नव्हते. अशा

परिस्थितीत, ब्रिटनच्या युद्धप्रयत्नांना सुसंगत अशा रीतीने हिंदुस्थानातील लोकांच्या राष्ट्रीय आशा-आकांक्षांना काहीसा प्रतिसाद देण्याच्या हेतूने आपल्या युद्धकालीन मंत्रीमंडळातील समाजवादी सहकारी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना ''जाहीरनाम्याचा एक मसुदा'' घेऊन भारताकडे पाठविणे विन्स्टन चर्चिल यांना भाग पडले होते.

या शिष्टमंडळाचे नेतृत्व सर क्रिप्स यांच्याकडे असल्याने भारताच्या दृष्टीने तो सुखद योग होता. कारण, क्रिप्स स्वत: साम्राज्य विरोधी होते, तसेच भारतीयांच्या आशा-आकांक्षांबद्दल त्यांना सुरूवातीपासून सहानुभूती होती. 'समाजवादी विचारांच्या श्री. क्रिप्स यांच्या मुत्सद्देगिरीची या आधी रशियात चांगलीच कसोटी लागली होती. नेहरूसहित अनेक भारतीय नेत्यांशी त्यांचे चांगले वैयक्तिक संबंध होते. वकिली व्यवसायात ते जिनांचे सहकारी होते. श्रद्धाळू, शाकाहारी आणि उमद्या स्वभावाच्या श्री. क्रिप्स यांचे गांधीजींशी चांगलेच जुळले तर नवल नव्हे. एक कुशल मुत्सद्दी, स्वभावाने प्रेमळ आणि समजूतदार असे सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना आपल्यावरील नाजूक जबाबदारीची पुरेपूर जाणीव होती. आपल्याला आपल्या कार्यात यश मिळेल असा त्यांना विश्वास होता.

दुर्दैवाने आपल्यापुढील अनेक अडीअडचणींची त्यांना पुरेशी कल्पना नव्हती. परस्परांविषयीचा संशय आणि कटुता यांनी भारलेल्या वातावरणात कॉंग्रेसचे ध्येय धोरण, आणि मुस्लिम लीगची मागणी यात समझोता घडवून आणणे कठीण होते. त्याचवेळी संस्थानिकांचे हितसंबंधही सांभाळायचे होते. हे सर्व साधतानाच, ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नांना पोषक ठरेल अशाप्रकारे एकूण समझोता घडवून आणणे यावेळी महाकर्म कठीण होते.

क्रिप्स शिष्टाईच्या एकूण स्वरूपातच त्याच्या अपयशाचीही बिजे होती. कारण, वाटाघाटी चालू असतानाही हिंदुस्थान म्हणजे जणू ब्रिटनच्या मालकीचा एक विस्तारित भूभाग, असे समजून बोलणी करण्यात येत होती. राज्यकर्त्यांना हिंदुस्थानचे खरे हितसंबंध कोठे दिसतच नव्हते. सारे काही ब्रिटनचे हितसंबंध सांभाळण्यासाठी होते. युद्ध चालू ठेवणे ब्रिटनला भाग होते, त्यात ब्रिटिशांचे हितसंबंध सांभाळण्यासाठी हिंदुस्थानला गोवण्याचा चर्चिल यांचा प्रयत्न चालू होता. हिंदुस्थानने त्यासाठी रक्त सांडावे असा कुटिल डाव यामागे होता. त्यानंतर, हिंदुस्थानचे भवितव्य काय, यावर मात्र ब्रिटिश सरकारने कोणताही विचार केलेला नव्हता. विचार करण्याची सत्ताधीशांच्या मनाची तयारीही नव्हती. कुंपणावर बसून गंमत पहाण्याचा हा प्रकार होता. युरोपात युद्धाचे ढग जमत असताना माजी पंतप्रधान चेंबरलेन यांनी कधी दूरदृष्टीने विचार केला नाही की काही उपाययोजना करून संकट

दूर करण्याचेही प्रयत्न केले नाही. आता हिंदुस्थानच्या बाबतीत त्यांचे वारसदार चर्चिल तेच करीत होते.

क्रिप्स यांच्या शिष्टाईला एकूणच वातावरण अनुकूल नव्हते. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा हा सारा प्रयत्न मैत्रीच्या वा सदिच्छेच्या भावनेतून नसून जपानचे वाढते संकट कसे दूर करावे, अशा भयग्रस्त भावनेतून चालला होता, असे काँग्रेस पुढाऱ्यांचे मत होते, तर इकडे देशातील इंग्रज सत्ताधारी कोणत्याही परिस्थितीत सत्ताबदल करण्यास तयार नव्हते. खेरीज चर्चिल यांच्या सारख्या पंतप्रधानाकडून भारतीयांना काही लाभ होण्याची सुतराम शक्यता नव्हती. गांधीजी आणि काँग्रेस पक्ष यांच्याविषयीचे त्यांचे मत जगजाहीर होते. ‘‘ब्रिटिश साम्राज्य निकालात काढण्यासाठी काही मी पंतप्रधान झालेलो नाही.’’ असे मुजोरपणे त्यांनी म्हटलेच होते त्यामुळे क्रिप्स शिष्टाई यशस्वी व्हावी, असे त्यांना कसे वाटणार? पंतप्रधानपदाच्या शर्यतीत आपल्या एका भावी प्रतिस्पर्ध्याचे महत्त्व अपयशाने आपोआप कमी व्हावे या अंतस्थ हेतूने चर्चिल यांनी क्रिप्सना शिष्टाईसाठी मुद्दाम पाठविले, असे म्हणणारे टीकाकार काही कमी नव्हते. तर इकडे, भारतीय पुढारी किती अविचारी, अवास्तववादी आणि बिनभरवशाचे आहेत, हे आपल्या इंग्लिश आणि अमेरिकन टीकाकारांना पटवून देण्यासाठी चर्चिलचा हा सारा डावपेच होता, यात शंका नाही. मात्र चर्चिलच्या मनात खरे काय होते, आणि क्रिप्स शिष्टाई अखेर अयशस्वी का झाली, त्यास अनेक प्रकारे उत्तरं देता येतील.

ते काहीही असो, या साऱ्या दुर्दैवी प्रकरणाने आणि भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांनी निर्माण केलेल्या गोंधळाच्या परिस्थितीमुळे एकूणच वातावरण बिघडत गेले. ब्रिटिशांची नैतिक आणि लष्करी प्रतिष्ठाही यावेळी रसातळास गेली होती. सर्वत्र अविश्वासाचे आणि भीतीचे वातावरण पसरले होते. आपल्या प्रतिस्पर्ध्यावरही विश्वास टाकण्याची गांधीजींच्या मनाची धारणा होती. कोठे प्रश्न सुटत असेल तर परिस्थिती बिघडू न देता सर्व प्रकारे मदत आणि सहकार्य करण्याची त्यांची सदिच्छा असे. परंतु क्रिप्स यांना एकदाच भेटून त्यांच्याशी बोलल्यानंतर गांधीजींनी त्यांना मिळेल त्या विमानाने ताबडतोब घरी परतण्याचा सल्ला दिला.

श्री. क्रिप्स यांनी आपला फारच अपेक्षाभंग केला अशी भारतीय नेत्यांची तक्रार तर भारतीय नेत्यांविषयी अशीच भावना क्रिप्स यांनी व्यक्त केली. कोणी कोणाचा अपेक्षाभंग केला तेही सांगणे तसे कठीणच. परिस्थितीने सर्वांना तोंडघशी पाडले हे मात्र खरे.

: ३८ :
छोडो भारत चळवळ

क्रिप्स शिष्टाई अयशस्वी झाल्याने देशात सर्वत्र नैराश्य पसरले. परिस्थिती अधिकाधिक बिघडत गेली. तिकडे जपान्यांनी देशाची सीमा ओलांडून भारतापुढे मोठा धोका उभा केला होता. देशाच्या पूर्वभागात राहणाऱ्या लाखो लोकांना मात्र जपानचे सीमोल्लंघन म्हणजे आपल्या लाडक्या सुभाषबाबूंनी भारत स्वतंत्र करण्यासाठी चालविलेल्या प्रयत्नांची विजयी नांदी होय, असे वाटत होते. मधल्या काळात, श्री. महमद अली जिना आणि त्यांची मुस्लिम लीग यांना स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची मागणी करण्यास अधिकच जोर आला. अशावेळी, हिंदुस्थानावरील आपली मगरमिठी सोडून ब्रिटिश लोक देश सोडून गेले तरच देश अंतर्बाह्य धोक्याला आत्मविश्वासाने तोंड देऊ शकेल, अन्यथा देशात निव्वळ गोंधळ आणि अस्थिरता माजेल, याबद्दल गांधीजींची दिवसेंदिवस खात्री पटत चालली होती. भवितव्याविषयीची निराशा, आपआपसातील कटुता आणि एकूणच हतबलतेची भावना यामुळे देशाचे मनोधैर्य खचत चालले नसते, तरच नवल ! या मनस्तापाला आणि अस्वस्थतेला शिस्तबद्ध सत्याग्रहाच्या रूपाने आणि अहिंसक मार्गाने काही निश्चित वाट आणि गती मिळवून दिली नाही तर अनिर्बंध हिंसाचारात त्याचा अखेर शेवट होईल, सर्वत्र बेशिस्त माजेल अशी त्यांना भीती वाटत होतीच.

यासंबंधी लुई फिशर या नामवंत पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीत गांधीजी म्हणाले की ब्रिटिशांना येथून निघून जाण्यास सांगण्याची कल्पना मला तशी एकाएकी सुचली. क्रिप्स यांच्या अपयशाने तसे घडले. क्रिप्स माघारी जाताच या कल्पनेने माझा ताबा घेतला. हीच 'भारत छोडो'ची मूळ कल्पना मग गांधीजींनी 'लाईफ' आणि 'टाइम' साप्ताहिकाचे प्रतिनिधी श्री. बेल्डन यानाही समजावून सांगितली. ते म्हणाले की, ''जपान्यांचे आगमन होण्या आधीपासून हिंदुस्थानची धूळधाण करण्यात येत असून पदोपदी देशाची मानहानी होत आहे. हे कोणाच्या

संरक्षणासाठी, सुरक्षेसाठी केले जात आहे ते मला माहीत नाही. भारताच्या हितासाठी नव्हेच नव्हे. आणि म्हणून एके दिवशी सकाळी माझ्या मनात विचार आला, की भारताच्या स्वातंत्र्यासाठी 'चले जाव'ची मागणी का नको? कृपा करून हिंदुस्थान आता सोडा. आम्हाला स्वातंत्र्याची, मुक्ततेची मोकळी हवा घेऊ द्या. कारण गुलाम स्वतंत्र झाला की त्याला त्या मुक्ततेचाही त्रास होऊ लागतो. स्वातंत्र्यामुळे आमचाही काही काळ कोंडमारा होईल. परंतु सध्याचा सारा गोंधळ आणि माझ्या देशाची अनुकंपनीय स्थिती एकदाची संपावी अशी माझी तीव्र इच्छा आहे.'' पुढे बोलताना गांधीजींनी स्पष्ट केले की, ''ब्रिटिशांनी जाताना काँग्रेसला किंवा हिंदुना सत्ता सोपवून जावी अशी मी मागणी करत नाही. त्यांनी पाहिजे तर ईश्वराच्या हाती, वा आधुनिक भाषेत, अराजकाच्या हाती सारा देश सोपवावा. मग सारे पक्ष कुत्र्यासारखे परस्परांशी भांडतील, वा परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येताच, जबाबदारीची जाणीव ठेवून काही तरी चांगला समझोता करतील. या गोंधळातून, अराजकातून अहिंसेचा खरा उदय होईल, अशी मला आशा आहे.''

अशाप्रकारे अखिल भारतीय काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनात दि. ७ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजींनी 'चले जाव'चा तो ऐतिहासिक ठराव मांडला. मनापासून आपण केलेल्या मागणीचे स्वरूप स्पष्ट करताना ते म्हणाले : ''ब्रिटिश साम्राज्यशाही आणि ब्रिटिशलोक यात आपले लोक फरक करावयास तयार नाहीत. त्यांच्यामते दोघेही सारखेच. लोकांचा ब्रिटिशांविरुद्धचा राग आता येवढ्या थरापर्यंत गेला आहे की ते जपान्यांचे स्वागत करण्यासही तयार होतील. यात फार मोठा धोका आहे. याचाच अर्थ एका गुलामगिरीच्या बदल्यात ते दुसरी गुलामगिरी स्वीकारण्यास तयार आहेत. आपण लोकांची ही भावना दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपले भांडण ब्रिटिश लोकांशी नसून साम्राज्यशाहीशी आहे. ब्रिटिशसत्ता भारतातून जावी हा प्रस्ताव काही आम्ही चिडून मांडलेला नाही. सध्याच्या पेचप्रसंगात आणि अडचणीत भारताला आपली भूमिका प्रभावीपणे बनवता यावी, या हेतूने हा प्रस्ताव आहे. आम्ही जोपर्यंत स्वतंत्र नाही, हे युद्ध आमच्यासाठी लढले जात आहे, अशी आमच्या मनाची खात्री पटत नाही, तोपर्यंत त्यासाठी शूरपणे लढण्याचे वा त्यागाची परिसीमा गाठण्याचे आवाहन आम्ही कसे करू शकतो?''

या पुढील आपल्या कार्याचे व भूमिकेचे स्वरूप काय राहील याची अद्यापी गांधीजींच्या मनातही रूपरेषा स्पष्ट नव्हती. काही प्रभावी स्वरूपाचा कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी व्हॉईसरॉयची भेट व्हावी आणि त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीला आवाहन करावे असे गांधीजींना वाटत होते. परंतु त्यांनी असा काही पुढाकार घेण्याआधीच ९ ऑगस्ट १९४२ रोजी पहाटे त्यांना आणि अन्य अनेक नेत्यांना अटक करण्यात

आली. अत्यंत गुप्ततेच्या वातावरणात पुढाऱ्यांना देशातील विविध तुरुंगात बंदिस्त करण्यात आले. सरकारचा हा कट बराच आधी शिजला असावा. कोणत्याही संधीची वाट न पाहता, वेगाने जबरदस्त प्रहार करण्याचा सरकारने निर्धारच केला होता.

अचानक घडलेल्या या अनपेक्षित घटनांनी लोक काही काळ स्तंभित झाले, परंतु नंतर त्यांची प्रतिक्रिया जबरदस्त होती. देशाच्या विविध भागात एकच गोंधळ उडाला. गांधीजींच्या नेतृत्वाने आतापर्यंत लोकांना फार मोठे प्रोत्साहन मिळाले होते. लोकांच्या अनिर्बंध भावनांना त्यांनी वेळीच लगामही घातला होता. आता ते नेतृत्व गजाआड जाताच, शासकीय आणि दळणवळण यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी लोकांनी कायदा हाती घेतला आणि जे काही करता येईल ते केले. देशातील युद्धजन्य परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारची आधीच सिद्धता होती. आता सरकारने हिंसाचाराला अधिक मोठ्या प्रमाणात हिंसाचार करून दडपशाही करण्याचा विडाच उचलला. हिंदुस्थानला व्याप्त प्रदेशातील युद्ध छावणीचे रुप आले.

गांधीजींना पुणे येथील आगाखान प्रासादात स्थानबद्ध करण्यात आले. सरोजिनी नायडू, मीराबेन आणि महादेवभाई देसाई यांनाही त्यांच्या सोबत तेथे स्थानबद्ध करण्यात आले. प्रासादावर कडक पहारा ठेवण्यात आला. तीन दिवसानंतर कस्तुरबा गांधी आणि सुशिला नायर यांनाही तेथे आणण्यात आले.

गांधीजींनी आपल्या आयुष्यात अनेक वेळा तुरुंगवास भोगला. परंतु जीवनातील हा अखेरचा तुरुंगवास त्यांना फार कठीण गेला. शारीरिकदृष्ट्या, त्यांना कोठे त्रास झाला नाही. उलट, यापेक्षा कमी सवलती असलेल्या तुरुंगात रहायचे गांधीजींनी पसंत केले असते. आपल्याला या प्रासादात ठेवण्यासाठी सरकारला किती मोठा खर्च येतो, अखेरीस हा पैसा गरीब लोकांकडून सरकार गोळा करते, हा विचार मनात येऊन गांधीजी अस्वस्थ होत.

देशातील हिंसक घटनांच्या बातम्या, आणि त्यास आपणच जबाबदार आहोत, असा सरकारने चालविलेला प्रचार आणि आरोप गांधीजींचे मन व्यथित करी. व्हॉईसरॉयने तर त्यांची भेट घेण्यास नकार देऊन, देशातील वातावरण निवळण्यास मदत करण्याऐवजी आगीत तेल ओतण्याचे प्रयत्न चालविल्याबद्दल गांधीजींना फार वाईट वाटले.

मनाच्या या निराश आणि हतबल अवस्थेत महादेवभाई देसाई यांच्या आकस्मिक मृत्युने गांधीजींना धक्का बसला. अटक झाल्यानंतर सहा दिवसातच महादेवभाई देसाई हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मृत्यू पावले. २५ वर्षं त्यांनी

गांधीजींचे वैयक्तिक चिटणीस म्हणून सेवा केली. प्रासादाच्या आवारात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या जागेवर गांधीजींनी एक मोठा सपाट दगड उभा केला, त्यावर माती थापण्यास मीराबेनना सांगितले, नंतर वरच्या बाजूला ॐ तर खालच्या बाजूस क्रुसाची आकृती काढण्यास त्यांनी मीराबेनना सांगितले. या क्रुसाच्या आकृतीजवळ गांधीजी नेहमी फुले वाहत. मीराबेननी आठवणी सांगताना म्हटले आहे की महात्माजी फुले वाहत असताना मला रोममधील क्रुसावरील ख्रिस्ताची मूर्ती आणि तेथे खिळून उभे राहिलेले गांधीजी आठवत. मानवजातीसाठी केलेल्या महान त्यागाचे ते प्रतीक हीच आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता होय, आपला जीवनधर्म होय, असे गांधीजींना सारखे वाटत असावे-असे मला वाटे. याच सुमारास ख्रिश्चन धर्मियांच्या 'लीड काइन्डली लाईट' या गीताऐवजी 'व्हेन आय सर्व्हे दि वंडरस क्रॉस' या गीताकडे त्यांचे मन वेधले गेले. खास प्रसंगी ते आता हे दुसरे गीत गाणे पसंत करीत.

देशातील गोंधळाची परिस्थिती हिंसाचारी, स्फोटक घटना, सार्वजनिक मालमत्तेचे चाललेलं नुकसान याबद्दल आपल्यालाच दोषी ठरविण्याचा सरकारने अश्लाघ्य प्रयत्न चालविल्याबद्दल, गांधीजी फार अस्वस्थ झाले होते. हे आरोप खोडून काढण्यासाठी त्यांनी व्हॉईसरॉय आणि त्यांचे सल्लागार यांच्याबरोबर दीर्घ पत्रव्यवहार सुरू केला. ब्रिटन आणि अमेरिकेत महात्माजींविरुद्ध चाललेला गलिच्छ प्रचार वाचून फिल्ड मार्शल स्मटस् तर इतके क्रुद्ध झाले की एका पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले : ''महात्मा गांधीजींना पंचमस्तंभीय म्हणणे ही मूर्खपणाची सीमा आहे. ते फार महान आहेत. जगातील महापुरुषांतच त्यांची गणना करावी लागेल. चर्चिल आणि व्हॉईसरॉय लिनलिथगो या उभयतांना गांधीजी काय आहेत, याची पुरी जाणीव होती. परंतु, आता युद्धात अमेरिका मदतीस आल्याने आणि युद्धाचे पारडे आपल्याकडे झुकणार याची खात्री वाटू लागल्याने ''त्या अर्धनग्न फकिरा''च्या होणाऱ्या तळतळाटाची गंमत पहात बसण्यात मिळणारा आनंद चर्चिल यांच्या डावपेचास आणि स्वभावास अनुरुप असाच होता.

सरकारकडून कोणत्याही प्रकारे समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने गांधीजींपुढे आता एकच पर्याय उरला होता. आपल्यावरील नैतिक अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी प्राणांतिक उपोषण करणे. या आधीच व्हॉईसरॉयला लिहिलेल्या पत्रात त्यांनी स्पष्टच म्हटले होते की सत्याग्रहींपुढे अशावेळी एकच उपाय असतो अन् तोच मी अनुसरणार आहे. त्यांनी २१ दिवसांचे उपोषण जाहीर केले. लिनलिथगोंना त्याचे काही वाटले नाही. उपोषणाबद्दल खेद व्यक्त करीत त्यांनी गांधीजींच्या दुःखावर डागण्या देणारे निवेदन केले ; ''राजकारणासाठी उपोषणाचे हत्यार उपसणे

हा राजकीय धमकीचाच प्रकार आहे. त्यास कोणतेही नैतिक समर्थन नाही.''

त्यास उत्तर देतांना गांधीजींनी म्हटलं : ''आपल्या देशाची आणि त्याद्वारे मानवजातीची सेवा करू इच्छिणारा मी एक साधा माणूस आहे. तर आपण सर्व शक्तिमान अशा सरकारचे एक प्रतिनिधी आहात. आपणा दोघांपैकी कोण बरोबर ते भावी पिढ्याच ठरवतील.''

दि. १० फेब्रुवारी १९४३ रोजी उपोषणास प्रारंभ झाला. काही दिवसातच गांधीजींची प्रकृती चांगलीच खालावू लागली. देशभर लोकांची चिंता वाढू लागली. या प्रश्नावर सरकारची अनास्था पाहून व्हॉईसरॉयच्या कौन्सिलातील तीन भारतीय सदस्यांनी राजीनामे दिले. परंतु सरकार हट्टी होते. सुदैवाने गांधीजी या पेचप्रसंगातून सुखरूप बाहेर पडले.

यातच आणखी एक वैयक्तिक शोकांतिका घडली. डिसेंबर १९४३ मध्ये कस्तुरबा आजारी पडल्या आणि फेब्रुवारी १९४४ मध्ये त्यांचे निधन झाले. मृत्युसमयी गांधीजींनी बांचे मस्तक मांडीवर घेतले. महात्माजींनी स्वहस्ते विणलेली खादीची साडी कस्तुरबांच्या अंगावर होती. ती त्यांची अखेरची इच्छा होती. प्रासादाच्या आवारात महादेवभाई देसाईंच्या समाधीशेजारी कस्तुरबांवर अंत्यसंस्कार करण्यात आले त्या जागी एक स्मृतीचिन्ह उभारण्यात आले. गांधीजींच्या सहवासातील ६२ वर्षांचे वैवाहिक जीवन आणि संसार संपला होता. या वाटचालीत किती दु:ख, अवमान, आयुष्यातील चढउतार उभयतांच्या वाट्याला आले होते. त्या खडतर वाटचालीतील सहवासाने उभयतातील प्रेम अधिकाधिक दृढ होत गेले होते. नवे व्हॉईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्या दुखवट्याच्या संदेशाला उत्तर देताना महात्माजींनी म्हटलं : ''शारीरिक वेदनांतून सुटका होण्यासाठी तिच्या म्हणण्याप्रमाणे मी तिच्या मृत्युचे स्वागत केले. परंतु आता मला वाटत होते त्यापेक्षा ही हानी सोसणे मला कठीण जात आहे.''

सर्व सामान्यांपेक्षा आमचं जोडपं वेगळं होतं, असं त्यांनी पुढे म्हटलं.

आणखी काही आठवड्यानंतर गांधीजींच्या प्रकृतीनेच सर्वत्र चिंता निर्माण केली. थंडीताप आणि पोटात आमांशाचा विकार जडल्याचे वैद्यकीय तपासणीत आढळून आले. गांधीजींचा अशक्तपणा वाढताच, त्यांच्या सुटकेची सर्वत्र मागणी होऊ लागली. दि. ६ मे रोजी व्हॉईसरॉयनी गांधीजींची बिनशर्त सुटका करण्याचा आदेश दिला. गांधीजी आता इतके अशक्त झाले होते की गेलेली शक्ती भरून काढण्यासाठी त्यांना बराच काळ मौन पाळणे भाग पडले.

: ३९ :

अंधारातील चाचपड

देशातील परिस्थिती अधिकाधिक बिघडत चालली असताना, अशक्त असो वा सशक्त, काहीही न करता मुकाट बसणे, गांधीजींना शक्य नव्हते. प्रकृतीच्या कारणावरून आपली सुटका करण्यात आल्याचेही त्यांना आवडले नाही. अर्थात सुटका म्हणजे एका तुरुंगातून दुसऱ्या मोठ्या तुरूंगात जाण्यासारखे होते. कारण आता सारा देशच एक मोठा कैदखाना झाला होता.

पुण्यात कॉंग्रेस कार्यकर्त्यांपुढे बोलताना महात्माजी म्हणाले की, ''सत्याग्रहीने आजारी पडणे ही लाजीरवाणी गोष्ट आहे. तुमच्या माझ्यावरील विश्वासाने मी भारावून गेलो आहे अचानक माझी सुटका झाल्याने देशाच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. परंतु, तुमच्या विश्वासास मी पात्र आहे का, याबद्दल माझी मलाच शंका आहे. परंतु एक गोष्ट मात्र खरी की आज माझ्यात जे सामर्थ्य आणि मनोधैर्य आहे ते केवळ मी सत्य आणि अहिंसेचा उपासक आहे म्हणूनच. काही मित्र नेहमी म्हणतात की व्यवहारात आणि राजकारणात सत्य आणि अहिंसेला काहीही स्थान नाही. परंतु मी त्यांच्याशी सहमत होऊ शकत नाही. वैयक्तिक मुक्तीसाठी काही मी या तत्त्वांचा अवलंब करीत नाही. आपल्या दैनंदिन जीवनात सर्वत्र सत्य आणि अहिंसेचा वास असावा, यासाठीच मी आयुष्यभर प्रयोग करीत आलो आहे.''

व्हॉईसरॉयची भेट व्हावी यासाठी त्यांनी निरोप पाठविले. परंतु प्रतिसाद मिळत नव्हता. याचवेळी, हिंदू आणि मुसलमान कायम फूट पडावी म्हणून ब्रिटिश सरकार मुस्लिम लीगच्या मागण्यांना उत्तेजन देत आहे, याची त्यांना कल्पना येऊन चुकली होती. हिंदुस्थानवरील आपला वसाहतवादी अंमल चालू रहावा, यासाठी उभय जमातीतील वितुष्टाचा बाऊ करणे त्यामुळे सोयीस्कर होते. आयुष्यभर गांधीजी हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी धडपडले. १९१९ साली तर खिलाफत चळवळीला पाठिंबा देण्यापर्यंत त्यांनी प्रयत्न केले. हेतू हा की मुसलमानांच्या भावना जपण्याने हिंदू

मुसलमानांचे ऐक्य होण्यास मदत व्हावी. जातीय सलोख्यासाठी त्यांनी अनेकदा उपोषणही केले. परंतु मुसलमान नेत्यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न गांधीजींकडून सतत होऊ लागताच त्यांच्या अवास्तव मागण्याही अव्वाच्या सव्वा वाढू लागल्या.

हा प्रश्न सोडविण्यासाठी गांधीजींनी जे काही प्रयत्न केले त्यात काही दोष तर नसावा, अशी शंका येते. कारण दिलजमाई घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेल्या उपाययोजनांना अपयशच येत गेले. आफ्रिकेत त्यांनी तेथील वसाहतवादी राज्यकर्त्यांचे मन जिंकले; भारतातून ब्रिटिशांना जावयास भाग पाडले, परंतु आपल्याच देशबांधवांचे मन काही ते जिंकून घेऊ शकले नाहीत. याला काय म्हणावे ? प्रेम आणि अहिंसेचा हा महान उपासक देशातील बहुसंख्य मुसलमानांचे हृदय जिंकू शकला नाही, याचा इतिहासकारांनी, तसेच समाज मन जाणणाऱ्या मानसशास्त्रज्ञांनी शोध घेण्याची खरोखरी गरज आहे. त्यातही दैवदुर्विलास म्हणजे मुसलमानांची मने तर ते जिंकू शकले नाहीतच, परंतु या प्रयत्नात अनेक हिंदुंची मनेही ते दुखावून बसले.

यात दोष व्यक्तीचा नसून पद्धतीचा होता. प्रश्न सोडविताना डावपेच चुकले होते. मात्र, गांधीजींना अपयश माहीत नव्हते. हयात असताना साधू शकले नाहीत ते गांधीजींनी आपल्या मृत्युतून, हौतात्म्यातून साध्य केले.

त्या अपयशाने त्या कालखंडात सर्वत्र निराशेचे वातावरण पसरले, त्याला शोकात्मतेची कळा आली. परंतु ते अपयश पुढे कशी वाकडी वाट करणार आहे ते अद्यापी अंधारातच होते. प्रखर आशावादी गांधीजी मात्र आपले प्रयत्न सोडावयास तयार नव्हते. व्हॉईसरॉयने भेट घेण्याचे नाकारताच त्यांनी जिनांची मनधरणी करावयास प्रारंभ केला. १९४४ सालच्या सप्टेंबर महिन्यात गांधीजींनी ''प्रिय बंधु जिना'' यांची त्यांच्या निवासस्थानी अनेक वेळा स्वत:हून भेट घेतली. आपला अहंकार जपण्यासाठी जिनांना अशा भेटी हव्याच होत्या. आपली भेट घेण्यासाठी, मनधरणी करण्यासाठी गांधीजी कसे धडपडत आहेत ते त्यांना जगाला दाखवायचे होते.

'राजाजी-योजने'च्या आधारे उभयतांच्या वाटाघाटी होत. चाणाक्ष, हुशार राजाजींनी ही योजना तयार केली होती; म्हणून ती 'राजाजी-योजना' म्हणून ओळखली जाई. भारतीय मुसलमान वेगळे आहेत, त्यांचे राष्ट्रीयत्व वेगळे आहे, हे मान्य करण्यात आले होते. मात्र, या योजनेनुसार त्यांचे वेगळे राष्ट्र करण्याच्या कोठेही उल्लेख नव्हता. परंतु अशा योजनेत अनंत अडथळे आणण्यात जिनांचा हात कोणी धरू शकत नव्हता. एकदा मुसलमान हे वेगळे राष्ट्र आहे असे कबूल करून

घेतल्यानंतर त्यांनी अनेक प्रश्न निर्माण करून वाटाघाटीत आडसर आणला आणि अखेरीस त्या मोडल्या. महात्माजी आणि राजाजी यांच्यापेक्षा जिना अधिक हुशार आणि चाणाक्ष ठरले. कावेबाजपणाची तर त्यांनी परमावधी गाठली.

या समस्येवर परिस्थिती अधिकाधिक बिकट होत गेली. वाटाघाटी थंडावल्या आणि सर्वत्र गडद अंधःकार पसरला. निराशेतून कटुता निर्माण होऊ लागली. कधीतरी आमंत्रण येईल म्हणून व्हॉईसरॉयच्या तोंडाकडे पाहणाऱ्या गांधीजींबद्दल काँग्रेस कार्यकर्त्यांनाही चीड येऊ लागली, तर जिनांचा अहंकार चेतविण्याचा त्यांनी प्रयत्न चालविल्याबद्दल हिंदू राष्ट्रवाद्यांचा राग गांधीजींनी ओढवून घेतला. आपली यात मानहानी आहे, असे अनेक लोकांना वाटू लागले. व्हॉईसरॉयने सतत भेट नाकारल्याने गांधीजीही दुखावले गेले, परंतु त्यात मानहानी आहे, असे त्यांना वाटत नव्हते. जो माणूस वैयक्तिक लाभासाठी काही करत नाही, आणि आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून समाजासाठी काही भले करू इच्छितो, त्याने अशा गोष्टीला महत्त्व देऊन मानापमानाचा क्षुद्र विचार करू नये, असे गांधीजींचे म्हणणे होते. आपल्या पदाला न शोभेसा मनाचा मोठेपणा व्हॉईसरॉय दाखवीत होते, तर अहंकार आणि उद्धटपणाचे प्रदर्शन करून जिना आपलीच किंमत कमी करत होते, असे गांधीजींना वाटत होते.

सर्वत्र गांधीजींचा उपहास चालला होता, परंतु त्याचा त्यांच्या मनावर परिणाम होणे शक्य नव्हते. दुसऱ्या माणसातील चांगुलपणाला सतत आवाहन करावे, त्याच्याविषयी मनात कोणताही पूर्वग्रह ठेवू नये, असा होता गांधीजींचा उमदा स्वभाव. याच सुमारास श्री. चर्चिल यांना लिहिलेल्या पत्रात त्याचे मनोहारी दर्शन घडले. गांधीजींनी लिहिले होते :

"प्रिय पंतप्रधान,

'नम्र फकीर' म्हणून तुम्ही माझे वर्णन केले असून मला चिरडून टाकण्याची तुमची इच्छा असल्याचे कळले. भणंग फकीर होण्याचा माझा प्रयत्न चालू आहेच. परंतु नम्र होणे कठीण कर्म आहे. तुमच्या मनात नसेल, परंतु या वर्णनातून आपण माझा एकप्रकारे गौरवच केला आहे.

एक फकीर म्हणून माझी तुम्हाला नम्र विनंती आहे की तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवावा, आणि तुमच्या तसेच माझ्या लोकांच्या हितासाठी तसेच विश्वकल्याणासाठी माझा उपयोग करून घ्यावा म्हणून मी आपल्यापुढे झोळी पसरीत आहे."

आपला,
एम्. के. गांधी.

: ४० :

आघाडीवरील समर प्रसंग

गांधीजी एकाचवेळी अनेक आघाड्यांवर लढणारे लढवय्ये होते. कोठल्यातरी युद्ध क्षेत्रावर लढल्याखेरीज त्यांना चैन पडत नव्हते. राजकीय युद्धक्षेत्र थंड असेल तर अन्य काही क्षेत्रावर ते फळी उभारणारच. आता त्यांच्या प्रकृतीतही झपाट्याने सुधारणा होऊ लागल्याने राष्ट्र उभारणीच्या अनेक विधायक कार्यक्रमांकडे लक्ष देणे त्यांना शक्य होते. देशात परिस्थिती गंभीर असताही विधायक कार्याचे मोल महात्माजींना राजकारणापेक्षा अधिक होते. हरिजन कल्याण, ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुनर्रचना, मूलोद्योग शिक्षण, राष्ट्रीय भाषा म्हणून हिंदी-हिंदुस्थानीचा प्रचार, निसर्गोपचार, ग्रामीण भागात मुख्यत्वे स्त्रिया आणि मुले यांच्या खास शिक्षणाची आणि कल्याणाची, 'कस्तुरबा स्मारक योजना' आदींचा यात समावेश होता.

ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांसमोर बोलताना एकदा गांधीजी म्हणाले की "स्वातंत्र्य तर येणारच आहे. देश लवकर स्वतंत्र होईलही—परंतु केवळ राजकीय स्वातंत्र्याने माझे समाधान होणार नाही. अशा केवळ स्वातंत्र्य प्राप्तीने देशाचे समाधान होणार असेल, आणि त्यानंतर मला काही चांगले काम करायचे येथे उरणारच नसेल तर मग मी खुशाल हिमालयात निघून जाईन. कोणाला माझे काही ऐकायचे असेल तर त्याला तेथेच यावे लागेल."

ही अर्थात पोकळ धमकी होती. महात्माजींचा ईश्वर सामान्य माणसात होता. हिमालयातील एकांतवासात ते काय जाणार होते! मॉरिस फ्रिडमन यांच्याशी बोलताना एकदा ते म्हणाले की, "माझ्या माणसातच माझा देव आहे. तो एकाकी राहणारा असता तर मला त्याच्या शोधासाठी हिमालयात जावे लागले असते. आता शोध पुरा झाला असून मला त्याच्यासाठी लोकांच्या खांद्याला खांदा लावूनच काम करायला हवे." गांधीजी नेहमी एकटे चालत जात, पण त्यांचे मन गर्दीत, लोकसमुहात असे. लोकांचा विचार करीत ते चालत. "तुझ्यासोबत कोणी आले

नाही, तर तू एकटा चालत रहा.'' हे रवींद्रनाथांचे गीत त्यांचे अत्यंत आवडते होते.

१९४५ साल उजाडले आणि दुसऱ्या महायुद्धाचे अखेरचे पर्व सुरू झाले. दोस्तांचा विजयाचा क्षण जवळ येऊ लागला. युद्धग्रस्त दु:खी जगाच्या भवितव्याची चर्चा करण्यासाठी लवकरच सॅन फ्रान्सिस्को येथे एक परिषद आयोजित करण्यात आली होती. विजयोन्मादात डोके ठिकाणावर राहण्याची शक्यता कमी असते हे लक्षात घेऊन गांधीजींनी दोस्तांना काही सल्ला देण्याचा प्रयत्न केला, परंतु विजयी दोस्त राष्ट्रांचे नेते काही ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत थोडेच असणार ? ''युद्धोत्तर शांतता प्रस्थापित करताना न्याय्य दृष्टीकोन सोडू नका. शांतीच्या पुरस्कर्त्यांनी कधीही सूडाच्या भावनेने वागता कामा नये. जर्मनी आणि जपान यांची मानहानी करण्याचे कृपया टाळा. विजयी नि शक्तिशाली घटकांनी सूडाची भावना जपता कामा नये. शांततेची फळे सर्वांना समान उपभोगू द्या''- असे गांधीजींनी म्हटले. त्यांनी दोस्त राष्ट्रांना स्मरण करून दिले की ''भारताला स्वातंत्र्य मिळताच, जगातील शोषित मानव जातीलाही, आपण लवकरच असे स्वतंत्र होऊ असा विश्वास वाटू लागेल. यापुढे आपले कोणाकडूनही शोषण होणार नाही, अशी आशा वाटू लागेल.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होताच, जगभर खरोखरी असेच घडले. मात्र तत्पूर्वी, पहाटेपूर्वीच्या काळोखातून, खाचखळगे, संकटाच्या खाई आणि डोंगर टाळीत, देशाला चाचपडत, ठेचाळत मार्गक्रमण करावे लागले. दोस्तांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. हिंदुस्थानात ब्रिटिश सरकारचाच वरचष्मा होता. अजूनही असंख्य लोकनेते तुरुंगात होते. भूमिगत झालेल्या काही थोड्या नेत्यांचा नि कार्यकर्त्यांचा आशावाद सोडल्यास, देश चैतन्यहीन झाला होता. सर्वत्र भयग्रस्त शांतता पसरली होती. यामुळे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना मोठी हिंमत आली होती. महात्माजींनी काही दबाव आणलाच तर जिनांना उस्कावून काँग्रेसवाल्यांचा नक्षा उतरविता येईल, अशी सत्ताधाऱ्यांना पक्की खात्री होती. काँग्रेसपक्षाबरोबरच परस्पर वाटाघाटी करण्याच्या धोरणाला सुरूंग लावण्याचे प्रयत्न चालूच होते. अखेरीस सिमला येथील वाटाघाटीच्या वेळी व्हॉईसरॉयनी काँग्रेसबरोबर लीगलाही सामावून घेतले.

विधायक कार्य हाती घेऊन आणि स्वावलंबनाच्या जोरावर लोकांच्या क्रियाशीलतेला गती नि मार्ग मिळवून देण्याचा प्रयत्न करणे आणि अशा प्रकारे त्यांचे मनोधैर्य अबाधित ठेवणे, याखेरीज अन्य काही गांधीजी आता करू शकत नव्हते. दीर्घकाळाने का होईना या मार्गानेच देशातील ग्रामीण भागात विधायक कार्याचे लोणी पोहोचेल आणि देशाला खरेखुरे स्वराज्य प्राप्त होईल, असे गांधीजींचे ठाम मत होतेच. खेडेगावातील अर्धनग्न, अशिक्षित, अर्धपोटी जनतेला स्वयंशासनाची

संधी ज्या दिवशी मिळेल, आणि स्वत:च्या पायावर उभे राहून ग्रामीण भारतातील जनता स्वत:चे पोषण करू लागेल त्याचदिवशी हा देश खरा स्वतंत्र झाला, असे मी मानीन, असे गांधीजी नेहमीच म्हणत. त्यांचे अनेक सहकारी आणि पक्षकार्यकर्तेही या त्यांच्या भूमिकेची चेष्टाच करीत. हा आजीबाईसारखा मागासलेला विचार झाला, याने का स्वराज्य मिळणार आहे, असा त्यांचा दावा होता. परंतु गांधीजींची आपल्या ध्येयावर आणि विचारसरणीवर पूर्ण श्रद्धा होती. खेडेगावात खरी मुक्ती आहे, शहरात नव्हे असे त्यांचे प्रतिपादन होते. याही वातावरणात सत्य आणि अहिंसेची कास गांधीजींनी कधी सोडली नव्हती. या मार्गाने आपण हिंदुस्थानच्या भल्यासाठी झटू आणि जगालाही विनाशापासून वाचविण्याचा प्रयत्न करू, अशी गांधीजींची निष्ठा होती.

युद्ध समाप्तीचे सूर वातावरणात निनादत असतानाच देशात जातीय वैमनस्याचे धुत्कार ऐकू येऊ लागले होते. ती वादळापूर्वीची शांतता होती. द्वेष आणि हिंसाचाराने हळूहळू सर्वत्र वातावरण काळवंडू लागले. युद्धात रक्ताने न्हाऊन निघालेला युरोपखंड शांततेसाठी आसुसलेला असताना, सौख्य, शांतता आणि बंधुभावाची पवित्र भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आशिया खंडातील अनेक देश वेगाने उलट दिशेला निघाले होते. लोकांच्या भावना भडकविण्यात येऊन त्यांना सूडासाठी प्रवृत्त केले जात होते.

आधीच अर्धविकसित आणि मागास अशी भारताची अर्थव्यवस्था युद्धाच्या तडाख्याने पार खिळखिळी झाली होती. बंगालमध्ये तर याआधी दोन वर्षांपूर्वी दुष्काळाने हजारोंचा बळी घेतला होता. टंचाई आणि तुटवड्याची अमंगल सावली आता देशभर सर्वत्र पसरली होती. युद्धकाळात काही मुठभरांनी आपल्या तुंबड्या चांगल्याच भरून घेतल्या होत्या. तर गरीब अधिकच गरिबीच्या खाईत लोटले गेले होते. युद्धकाळात हितसंबंधीयांचा पाठिंबा मिळावा म्हणून सरकारने काहीही करावयास शिल्लक ठेवले नव्हते, त्यामुळे सामान्य माणसांच्या हिताबद्दल शासनात बेपर्वाई वाढली होती. आपला अंमल किती काळ या देशावर आता चालतो, याचाही इंग्रजांना भरवसा राहिला नव्हता, सर्वत्र अनास्था, अनागोंदी होती. काळ्या बाजाराला, साठेबाजीला ऊत आला होता. ब्रिटनमध्ये अशा कृत्याबद्दल देशद्रोह्यांना देण्यात येणारी शिक्षा दिली गेली असती, परंतु हिंदुस्थानात आनंदी आनंदच होता ! सर्वसामान्य माणसे हतबल झाल्यासारखी साऱ्या परिस्थितीकडे पहात होती. सर्वत्र निराशेचा सूर होता.

गांधीजींना परिस्थितीची पूर्ण कल्पना होती. भेसूर भविष्याची चाहूल त्यांना

लागली होती. तेही हतबल आणि दु:खी झाले होते. परंतु अल्पकाळातच, खचून जाणे त्यांना मान्य नव्हते. परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी सारे बळ एकवटले आणि ते पूर्व आणि दक्षिण भारताच्या दौऱ्यावर निघाले. आपले भवितव्य आपल्या हाताने घडविण्यासाठी, लोकांचे मनोबल तयार करण्यासाठी त्यांनी झंजावाती प्रचार सुरू केला. स्वत:ला स्वतंत्र माना, तुमचे भवितव्य तुमच्या हाती आहे; असा प्रचार सुरू झाला.

बंगालमधील शांतिनिकेतनला त्यांनी पुन्हा एकदा भेट दिली. रवींद्रनाथ आणि मित्रवर्य चार्लस् फ्रिअर ॲण्ड्र्यूज ऊर्फ दीनबंधु यांच्या पवित्र स्मृती तेथे निगडीत होत्या. उभयतांचे देहावसान होऊन चार वर्ष झाली होती. गांधीजी म्हणत की, 'रवींद्रनाथ म्हणजे अखंड तेवणारा मंगलदीप', कविवर्यांच्या इच्छेनुसार गांधीजींनी शांतिनिकेतनमधील शैक्षणिक संस्थांच्या कार्यात विशेष रस घेण्यास सुरुवात केली होती. संकल्पित 'दीनबंधु स्मारक इस्पितळांची पायाभरणी यावेळी गांधीजींच्या हस्ते पार पडली.' अत्यंत गरीब, दयनीय आणि सर्वस्व गमावलेल्यांचे हे वस्तीस्थान आहे. ''येथे क्षणभर उभा रहा, आणि पहा, हीच तर तुझी कर्मभूमी आहे'' या रवींद्र गीताचे सूर त्यावेळी घूमत होते.

: ४१ :
रक्तलांच्छित उषा
पहाटेपूर्वीचा काळोख

हिंदुस्थानातील अशुभ संकटाची चाहूल गांधीजींप्रमाणे ब्रिटिशांनाही लागली होती. ब्रिटिश लोक तसे सुज्ञच. इतरांपेक्षा थोडा अधिकच समजूतदारपणा त्यांच्यात होता. अन्यथा जगाच्या इतिहासातील भूमिका त्यांनी वठवली तशी ती वठवलीच नसती. युद्धाने चांगलेच पोळलेल्या पण विजयी इंग्रजांना आता कळून चुकले होते की हिंदुस्थानावरील आपली राजवट आपण जितक्या लवकर सोडू तितके ते गौरवपूर्णच ठरेल.

हिंदुस्थान आता मौजमजा करण्याचे, शिकार करण्याचे, अनभिषिक्त सत्ता उपभोगण्याचे स्थान राहिले नव्हते. तो आता बोजा झाला होता. पावलोपावली संकटे पुढे येत होती. सत्तेला आव्हान दिले जात होते. ब्रिटिश राजघराण्याच्या राजमुकुटातील दैदिप्यमान हिरा आता काटेरी मुकुट झाला होता. त्यातही, उत्कृष्ट युद्धनेतृत्व केल्यानंतरही ब्रिटिश जनतेने आता महायुद्धानंतरच्या शांततेच्या कालखंडात चर्चिल यांना ठोकरून इंग्लंडची सत्ता मजूर पक्षाकडे दिली होती. चर्चिल यांचे इंग्लंडवरील ऋण त्यांना मान्य होते, परंतु जगातील बदललेल्या परिस्थितीत चर्चिल यांचे नेतृत्व योग्य ठरणार नाही, असा कौल ब्रिटिश जनतेनेच दिला होता. ''हिंदुस्थानला स्वयंशासन लवकरात लवकर'' मिळवून देण्याची घोषणा नवे मजूर पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी अधिकारावर येताच ताबडतोब केली.

भारतीयांच्या हातात पद्धतशीरपणे आणि सुरळीतपणे सत्ता कशी सोपविता येईल, आणि हिंदुस्थानची भावी राज्यघटना कशी असावी, यावर भारतीय पुढारी आणि व्हॉईसरॉय यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी ब्रिटनच्या मंत्रीमंडळातील तीन सदस्यांचे एक उच्चाधिकार शिष्टमंडळ मार्च १९४६ मध्ये देशात येऊन दाखल झाले. यावेळी घटना अशा वेगाने घडत होत्या की नागरिकच नव्हे तर नेतेही आश्चर्यचकित झाले होते. प्रारंभी तर कोणाचा यावर विश्वासच बसेना. हिंदुस्थानवरील आपली सत्ता

सोडून जाण्याचा आणि हिंदुस्थानवासीयांच्या हाती ती सोपविण्याचा ब्रिटनचा खरोखरी विचार आहे, यावर विश्वास ठेवणे कठीण होते.

बहुसंख्य भारतीय ब्रिटिशांच्या हेतूबद्दल साशंकच होते. या चालीत त्यांचा काहीतरी कुटिल डावपेच आहे, असाच बहुतेकांचा ग्रह होता. तीन वर्षांपूर्वी गांधीजींनीच ब्रिटिशांना 'चले जाव' चा आदेश दिला होता, परंतु आता तेही या अनपेक्षित चालीने काहीसे साशंकच झाले होते. एका इंग्रज मित्रापाशी बोलताना ते म्हणालेही 'काहीतरी खरोखरी करण्याचा सत्ताधाऱ्यांचा बेत दिसतो. परंतु घोषणा त्यांनी किती अनपेक्षितपणे केली. भारताला खरोखरी स्वराज्याची प्राप्ती होणार आहे का ? खवळलेल्या समुद्रात चाललेल्या एखाद्या जहाजाच्या डेकवरील प्रवाशाला कोणीतरी अलगद वर उचलून घ्यावे, आणि त्याला त्याचे पायही खाली टेकता येऊ नये, असे काहीसे मला वाटत आहे.''

त्रिमंत्री शिष्टमंडळाने गांधीजींना भेटीचे आमंत्रण देताच सल्लामसलतीसाठी ते लगेच दिल्लीत येऊन दाखल झाले. आमंत्रण आले तेव्हा गांधीजी पुण्यानजीकच्या एका खेडेगावात निसर्गोपचार केंद्र उघडण्याच्या व्यापात गुंतले होते. निसर्गोपचार हे त्यांचे जुने वेड होते. आता अनेक वर्षानंतर त्या वेडाला उजाळा देण्याचा त्यांचा खटाटोप चालला होता. दिल्लीत येताच त्यांनी भंगीकॉलनीतील एका झोपडीत आपला मुक्काम ठोकला. लवकरच या स्थळाला पवित्र तीर्थस्थानाचे स्वरूप आले. लहानथोर सर्वजण गांधीजींच्या निवासाकडे धावू लागले.

श्रीयुत क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स आणि सर अलेक्झांडर हे या शिष्टमंडळातील तीन ब्रिटिश मंत्री नामवंत राजकीय मुत्सद्दी होते. हिंदुस्थानच्या आशा-आकांक्षांची त्यांना जाण होती. सारी सदिच्छा होती, परंतु जिना आणि काँग्रेस यांच्यात काही ते समझोता घडवून आणू शकले नाहीत. यावेळी मौलाना अबुल कलम आझाद काँग्रेसचे अध्यक्ष होते. इस्लामी धर्मशास्त्राचे गाढे विद्वान आणि ज्वलंत देशभक्त म्हणून त्यांची ख्याती होती. धर्माभिमानी मुसलमान म्हणून जिनांशी त्यांची तुलनाच होऊ शकत नव्हती. कारण जिनांना साधे कुराण वाचता येत नव्हते ! या विरोधाभासाची बोचरी जाणीव जिनांना असल्यामुळेच बहुधा त्यांच्यात अधिक धार्मिक कडवेपणा उतरला असावा. हिंदुस्थान हे एक राष्ट्र आहे, असे समजणारा मुसलमान हिंदुंचा लाळघोट्याच समजला पाहिजे, असा प्रचार जिनांनी केव्हाच सुरू केला होता.

अशा विचित्र परिस्थितीत, गांधीजींनी शिष्टमंडळाला सांगितलं की त्यांनीच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची एखादी योजना तयार करावी आणि चर्चेसाठी देशातील विविध राजकीय पक्षांपुढे आणि गटांपुढे मांडावी. हिंदू मुसलमान आणि इतर

जातीं-जमातीत कोणतेही वितुष्ट नाही. वितुष्ट असले तर ब्रिटिशच त्यास जबाबदार आहेत, असे प्रतिपादन गांधीजी नेहमी करीत. आता देशातील विविध धर्मियात आणि जातीजमातीत काही समझोता घडवून आणण्यासाठी गांधीजींना ब्रिटिशांनाच विनवावे लागले, हे त्यांना फार लागले.

त्रिमंत्री शिष्टमंडळाने १६ मे रोजी एक योजना देशापुढे ठेवली. परिस्थिती लक्षात घेता चांगली तडजोड घडवून आणण्याची त्यात तरतूद होती. ''मुस्लिम लीगचे समर्थक वगळता, देशाची एकी टिकावी, अशी बहुसंख्य नागरिकांची सार्वत्रिक भावना,'' आणि देशात बहुसंख्य असलेल्या हिंदुंच्या वर्चस्वाखाली सतत रहावे लागत असल्याने, ''मुस्लिम नागरिकात निर्माण झालेली चिंतेची भावना'' या दोन्हींचा विचार करून त्यांच्यात तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीने योजनेचा मसुदा आखण्यात आला होता. विविध प्रांतांतून निवडणुका घेऊन तेथून निवडून आलेल्या सदस्यांची 'राष्ट्रीय घटना समिती' स्थापन करण्यात यावी आणि तिने देशाची घटना तयार करावी. तत्पूर्वी व्हॉईसरॉयने हंगामी मंत्रिमंडळ बनवावे, अशीही योजनेत तरतूद होती.

देशात तडजोड घडवून आणण्याचा अन्य योजनांप्रमाणेच याही योजनेचे यश अखेरीस दोन प्रमुख पक्षांवर अवलंबून होते. गांधीजींनी या योजनेच्या मसुद्याचा चार दिवसपर्यंत तपशीलवार अभ्यास केला आणि सद्यःस्थितीत ब्रिटिश सरकारने एक चांगली योजना तयार केली असे म्हटले. जिनांनी मात्र, योजनेत ''नेहमीचाच ठराविक युक्तिवाद आहे'' असे म्हटले आणि स्वतंत्र पाकिस्तानखेरीज पर्याय नाही, असा आग्रह चालू ठेवला.

नंतर मात्र, कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग या उभयतांनी या योजनेचा स्वीकार केला, मात्र दोघेही त्याबाबतीत पूर्ण समाधानी नव्हते. दुर्दैवाने मंत्रीमंडळाच्या रचनेबाबत एकमत होईना. जिनांचा आडमुठेपणा पाहून व्हॉईसरॉयही त्रस्त झाले. त्यांनी अखेरीस श्री. जवाहरलाल नेहरूंनाच १२ ऑगस्टला बोलावून मंत्रीमंडळ बनविण्यास सांगितले. जिनांनी संतापून १६ ऑगस्ट हा 'परस्पर कारवाईचा दिवस' म्हणून जाहीर केला.

भारतीय स्वातंत्र्याचा उषःकाल होता होताच देशाचे क्षितिज रक्तलांच्छित होऊ लागले. पूर्व भारतात हिंसाचाराने नंगा नाच घातला. बंगालमध्ये यावेळी मुस्लिम लीगचे मंत्रिमंडळ असल्याने जात्यंध मुसलमान दंगेखोरांना दंगे घडवून आणण्यास अधिकृत परवानाच मिळाला. या हिंसाचाऱ्यांना शस्त्रे पुरविण्याची व्यवस्था आधीच करण्यात आली होती. खून, लुटमार, जाळपोळ आणि हिंदू स्त्रियांवर बलात्कार करण्यासाठी नुसती इशाऱ्याचीच ते वाट पहात होत. ''परस्पर कारवाई''ची जिनांची

हाक येताच, हिंसाचाराचा नंगा नाच सर्वत्र सुरू झाला. कलकत्त्यात तर हिंसक कृत्यांनी इतकी परिसीमा गाठली की 'स्टेट्समन' या त्यावेळच्या कॉंग्रेसविरोधी आणि ब्रिटिश मालकीच्या वृत्तपत्राने आपल्या संपादकीयात म्हटले की, 'याला साधा दंगा म्हणता येणार नाही, या संहारक कृत्यांचे वर्णन करण्यासाठी मध्य युगीन इतिहासातच योग्य तो शब्द सापडू शकेल.' जिम ख्रिश्चन या लेखकाने याच वृत्तपत्रात लिहितांना म्हटले की, 'युद्धक्षेत्रावरील इस्पितळातील अनुभव घेऊन आता माझे मन घट्ट झाले आहे. युद्धातील संहारातही लाजवणारे हे हिंसाचार आता बस्स झाले.'

आपल्या बायकामुलांवरील अत्याचाराने क्षुब्ध झालेल्या कलकत्त्यातील हिंदुंनी प्रारंभीच्या धक्क्यातून सावध होताच इतका जबरदस्त प्रतिकार सुरू केला की कलकत्ता शहर या टोकापासून त्या टोकापर्यंत उभय जमातींच्या संतापाच्या वणव्यात पुरते भाजून निघाले. मुस्लिम लीग सरकारचा पाठिंबा असताही, मुसलमान गुंडांना हिंदुंचा प्रतिकार करणे कलकत्त्यात कठीण जाऊ लागल्याने त्यांनी आपली बहुसंख्या असलेल्या नौखाली जिल्ह्यात हिंदुंची कत्तल करण्यास सुरुवात केली. स्त्रियांवर अत्याचार केले, आणि लूटमार नि जाळपोळ किती झाली त्याचे वर्णन करणे तर केवळ कठीणच म्हटलं पाहिजे. याची प्रतिक्रिया देशाच्या अन्य भागात होऊन पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत सर्वत्र हिंसाचाराने थैमान घातले. दुसऱ्या महायुद्धात हिंदुस्थानवासीयांना कोठे फारशी झळ लागली नव्हती ती आता या दंगलीतून पूर्णतया भरून निघाली. मात्र या युद्धाचे स्वरूप किळसवाणे होते. येथे नि:शस्त्र लोकांवर हल्ला होत होता. निरपराध बायकामुलं हकनाक बळी पडत होती. या युद्धात कोठे धैर्य, शौर्य, त्याग, बलिदान या उच्च गुणांना स्थान नव्हते. अहिंसेच्या अभिमानाने येथे केव्हांच लज्जेनं मान खाली घातली होती; शहाणपणाचा सल्ला घुबडांच्या घुत्कारात कोठेच ऐकू येत नव्हता. स्वातंत्र्य प्राप्तीचे फळ चांगले पक्व होण्याआधीच त्याला कीड लागली. भारताच्या इतिहासातील या अमंगळ कालखंडाचे कसे क्षालन करावे ?

मध्यंतरीच्या काळात, मुस्लिम लीगने हंगामी सरकारात सामील व्हावे यासाठी व्हॉईसरॉयनी जिनांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. लीग सरकारात सामील झाली परंतु आतून ते उद्ध्वस्त करण्यासाठी आणि ''दोन भिन्न राष्ट्रां''चा कारभार ''एक राष्ट्रीय'' सरकार कसे चालवू शकते हे दडपण्याच्या जोरावर सिद्ध करण्यासाठी.

: ४२ :

दंगलीमुळे प्रायश्चित : पापक्षालन कोणासाठी ?

कलकत्त्यातील भीषण कत्तलीच्या बातम्या येऊ लागल्या त्यावेळी गांधीजी वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात होते. त्यांची प्रतिक्रिया महात्म्याला शोभेशीच होती. सर्वसामान्य माणसाच्या पचनी पडेल अशी ती नसल्याने साहजिकच देशातील हिंदुसमाज हळूहळू गांधींच्या विचारापासून दूर जाऊ लागला याचीच दुर्दैवी परिणती त्यांच्या हौतात्म्यात झाली. ''धीरोदात्तपणे हिंदुसमाज मृत्युला सामोरा गेला असता तर त्यामुळे हिंदुधर्माची प्रतिष्ठा उंचावली असती आणि या देशातील इस्लामचेही शुद्धीकरण झाले असते.'' थोडक्यात मुसलमानांच्या पापाचे प्रायश्चित गांधीजी हिंदुंना घ्यावयास सांगत होते. आपल्या पापाचे प्रायश्चित घेण्यास काही त्यांनी मुसलमानांना सांगितले नाही.

मुसलमानांनी तर त्यांची उघडपणे थट्टाच चालवली होती. खाजगीत बोलताना हिंदू समाजातील लोक गांधीजींच्या विचाराला विरोधच करीत, परंतु सभेत, निदान ते विचार आदरपूर्वक ऐकून घेण्याइतके सौजन्य आणि चांगुलपणा त्यांच्यांत होता. मुकाटपणे आपली मान छाटण्यासाठी त्यांनी मुसलमानांच्या हातात द्यावी, अशी कोणी अपेक्षा करणेही चूक होते. कोण ते करणार ? अखेरीस हिंदू आणि मुसलमान या उभयतांच्या पापाबद्दल प्रायश्चित घेण्याचा निर्णय गांधीजींनी घेतला.

नौखालीमधील कत्तलीच्या बातम्या विलंबाने आल्या. त्यावेळी गांधीजी दिल्लीत होते. हिंदुंच्या कत्तलींच्या बातम्या बाहेर येऊ नयेत म्हणून बंगालच्या सरकारने वृत्तपत्रांवर बंधने आणण्याचे कितीएक प्रयत्न केले. कत्तलीपेक्षाही, स्त्रियांवरील अत्याचार, त्यांचा विनयभंग आणि बलात्कार यांच्या बातम्या ऐकून गांधीजींचे हृदय विदीर्ण झाले. ताबडतोब बंगालकडे जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. ''मी तेथे जाऊन काय करू शकेन त्याची मला कल्पना नाही, परंतु तेथे गेल्याखेरीज माझे मन शांत होणार नाही'' - असं त्यांनी कळवळून म्हटलं.

नौखालीच्या वाटेवर कलकत्त्याला काही दिवस त्यांनी घालवले. तेथील

परिस्थिती पहावी आणि मुस्लिम लीगचे पंतप्रधान सुऱ्हावर्दी यांची सदिच्छा मिळवावी, हाही त्यामागे हेतू होता. मुस्लिम लीग मंत्रिमंडळाविरुद्ध पुरावा गोळा करण्यासाठी वा दंगलीबद्दल कोण्या एका जमातीला दोष देण्यासाठी आपण बंगालला आलेलो नाही, असा खुलासा गांधीजींनी प्रारंभीच केला. ते म्हणाले की हिंदुंच्या मनाला धीर यावा आणि या दोन्ही जमातींनी सहिष्णुता दाखवावी, म्हणजे उभय जमाती गुण्यागोविंदाने एकत्र राहू शकतील, असे प्रयत्न करण्यासाठी आपला हा दौरा आहे.

हत्याकांड, नुकसान आणि जाळपोळ याची अद्यापी कलकत्त्याच्या रस्त्यावर दुर्गंधी येत होती. माणूस किती पशुवत वर्तन करू शकतो ते पाहून त्यांचे मन चांगलेच खचले. आपले सहानुभूतीचे आणि अनुकंपेचे शब्द उभय जमातीमधील द्वेष आणि धर्मांधता दूर करू शकतील, अशी गांधीजींना आशा वाटत होती कारण मानवतेच्या चांगुलपणावर त्या महात्म्याची श्रद्धा होती. सर्वत्र संहार, अत्याचार चालू असताना, कोणतेही संरक्षण न घेता निर्भयपणे वावरण्याची आपली हिंमत आहे, हृदयात सर्वांविषयी प्रेम आणि आपुलकीच आहे त्या जोरावर आपण मुसलमानांबरोबर बंगालात राहून त्यांना पटवून देऊ की देशातील अन्यधर्मीय नागरिकांचे, तसेच त्यांचेही आपण मित्र आणि हितचिंतकच आहोत, अशी गांधीजींना आशा होती. आपल्या तेथील भेटीने भयग्रस्त आणि हतबल झालेल्या हिंदू नागरिकांना धीर येईल आणि मागे सोडून आलेल्या आपल्या घरांकडे ते परत फिरतील, असा गांधीजींना विश्वास होता.

सर्वत्र भीती, द्वेष आणि अविचारीपणा माजला असता त्यावर शहाणपणाचे धीराचे दोन शब्द सांगून, परस्पर विश्वास, प्रेम आणि अनुकंपा निर्माण करण्याचा हा प्रयत्न धाडसाचाच होता. अमंगलाला तिलांजली देण्याच्या हिंदुधर्मीयांच्या परंपरागत श्रद्धेला आणि धर्मकांडाला अनुरूप अशीच ही कृती होती. तो उदात्त आणि सुंदर विचार आणि कृतसंकल्प होता गांधीजींचा ! परंतु तो प्रत्यक्षात आणण्यास देवाधिदेव तेथे उतरायला हवे होते !!

कारण, गांधीजी कलकत्त्याहून नौखालीकडे निघाले नाही तोच तिकडे बिहारमधील संतप्त हिंदुंनी नौखाली आणि कलकत्त्यामधील मुसलमानांच्या अत्याचाराचा पुरा सूड घेण्यास सुरुवात केली होती. हे वृत्त कानी येताच गांधीजींना जबरदस्त धक्का बसला. देशातील आपला पहिला सत्याग्रह गांधीजींनी बिहारमध्ये हाती घेतला होता. बिहारबद्दल त्यांना केव्हढा आणि अभिमान आणि प्रेम. त्यांनी तावडतोब प्रायश्चित म्हणून उपोषणाची घोषणा केली. प्रारंभी किमान आहार आपण घेऊ आणि बिहारच्या लोकांनी दंगली चालूच ठेवल्या तर आमरण उपोषण करू,

असे त्यांनी जाहीर केले.

आपल्या सार्वजनिक जीवनात गांधीजींनी अनेक वेळा उपोषण केले परंतु ते उपोषण एकतर आपल्या लोकांविरुद्ध, (आश्रमवासीय वा प्रामुख्याने हिंदुंच्या आचरणाविरुद्ध) किंवा ब्रिटिशांविरुद्ध असे. गांधीजींनी कधी मुसलमानांच्या अयोग्य कृतीविरुद्ध उपोषण केले नाही. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे गांधीजींची स्वप्ने आणि आशा-आकांक्षा यांचा चुराडा कोणी केला असेल तर तो मुसलमानांनी हे कटू सत्य आहे.

अत्यंत व्यथित मन:स्थितीत, शरीराचे हाल करीत गांधीजी नौखालीकडे निघाले. ही यात्रा एकट्याने वा शरीर संरक्षकाशिवाय सुरू झाली, असे म्हणता येणार नाही. सोबत नेहमीचे सहकारी होतेच, खेरीज बंगालचे एक मंत्री, आणि दोन संसदीय चिटणीसही होते. त्यांनी एकट्याने प्रवास करणे तसे कठीणच होते. सांकेतिक दृष्ट्या ते ''एकटे-एकाकी'' चालले होते येव्हढेच फार तर म्हणता येईल. वाटेवर, जागोजागी त्यांच्या दर्शनासाठी लोकांची इतकी गर्दी होत असे की गांधीजींना संरक्षण नसते तर त्या गर्दीच्या रेट्यात ते चिरडून ठार झाले असते.

पूर्व बंगालात (आताचा बांगला देश) जागोजागी वाटेत नद्या, तळी आणि कालवे आड येत असल्याने प्रवासात रेल्वे, मोटारी, तसेच होड्यांचाही वापर करावा लागे. वाटेत जळालेल्या घरांचे नि झोपड्यांचे अवशेष तसेच अर्धवट जळालेली प्रेतेही गांधीजींनी पाहिली. बलात्कार, अत्त्याचार झालेल्या अनेक महिलांची जिवंत कलेवरं पाहून तर त्या महात्म्याचे हृदय तर शतश: विदीर्ण झाले. भयग्रस्त हिंदुंना धीर यावा आणि अत्त्याचारी मुसलमानांना आपल्या कृत्याची लाज वाटावी यासाठी गांधीजींनी मग आपले सहकारी, कार्यकर्ते आदींना आजुबाजूच्या खेड्यात जाऊन तेथे राहण्यास सांगितले.

एका खेडेगावात हिंदुंची सर्व घरे जाळून टाकण्यात आली होती, आणि सर्वांचीच कत्तल करण्यात आली होती. या गावातून जाताना एक स्पॅनियल जातीचा कुत्रा गांधीजींकडे धावत आला. बेचिराख झालेल्या त्या वस्तीत तो कुत्रा अनाथासारखा भटकत होता. गांधीजींना कोठेतरी नेण्यासाठी तो हळूहळू गुरगुरत काही तरी सुचवत होता. गांधीजी त्याच्यामागे गेले. कुत्रा एके ठिकाणी जाऊन उभा राहिला, तेथे ३-४ माणसांचे अर्धवट जळालेले हाडांचे सापळे पडले होते. बहुधा त्या कुत्र्याच्या धन्याच्या कुटुंबातील ते असावेत. ते भीषण दृश्य महात्म्याचे हृदय चिरीत गेले. आपली मुले, पती, भाऊ अन्य नातेवाईक गमावलेल्या किंवा आपल्या मुलींची विटंबना झालेल्यां माता-भगिनींना पाहून गांधीजींच्या डोळ्यात अश्रू उभे रहात. कसे त्यांचे सांत्वन करावे ? गांधीजींना त्याची पूर्ण कल्पना होती. ''मी सांत्वन करू

शकत नाही. दिला तर मी थोडा धीर देऊ शकतो.'' तेथील श्रीरामपूर या खेडेगावात गांधीजींनी मुक्कामच ठोकला. तेथील २०० हिंदू कुटुंबांपैकी फक्त तीन कुटुंबं शिल्लक राहिली होती. त्यांचे बंगाली भाषिक चिटणीस आणि अनुवादक दुभाषे श्री. निर्मलकुमार बोस आणि टंक व लघुलिपी लेखक श्री. परशुराम यांना त्यांनी आपल्याजवळ ठेवून घेतले होते. नंतर त्यांच्या भावाची नात मनू गांधी त्यांना येऊन सामील झाली. गांधीजी तिला आपली नातच समजत.

गांधीजींचा मुक्काम श्रीरामपूरला सहा आठवडे होता. या कालात रोज दिवसा ते आसपासच्या गावांना भेटी देत आणि दुःखितांचे सांत्वन करीत, त्यांना धीर देत; तर मुसलमानांना आपल्या कृत्याची शरम वाटेल अशा रीतीने त्यांच्याशी बोलत. वाईट गोष्टीला चांगल्या गोष्टी करून उत्तर देणे, असत् ला सत्‌ने उत्तर देणे हाच सूड घेण्याचा मानवाचा खरा धर्म आहे, असे ते सांगत. रात्री उशिरापर्यंत गांधीजी काम करीत बसत. मोठा पत्रव्यवहार असे. त्या पत्रांना उत्तरे पाठवावी लागत. खेरीज त्या दुर्गम प्रदेशात भेटीला येणाऱ्या लोकांचा ओघ अखंड वाहतच होता.

याचवेळी दिल्लीतील राजकीय वातावरण गढूळ झाले होते. सर्वत्र गैरसमज आणि गैरविश्वासाचेच अधिराज्य होते अशा वातावरणात गांधीजींचा सल्ला मिळावा म्हणून सतत प्रयत्न चालू असत. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पंडित जवाहरलाल नेहरु, त्यावेळचे कॉंग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यांच्यासमवेत सल्लामसलतीसाठी तेथे येऊन दाखल झाले. कॉंग्रेस, मुस्लिम लीग, आणि ब्रिटिश सरकार यामध्येच केवळ गरमागरमी नव्हती तर वरिष्ठ कॉंग्रेस वर्तुळातही गैरसमज, हेवेदावे आणि परस्परांविरुद्ध टीका सुरू झाली होती. गांधीजींबरोबर बंगालच्या दौऱ्यात सामील झालेले एकनिष्ठ कार्यकर्तेही यातून सुटले नव्हते. महात्माजींना ते सारे मुकाट्याने सहन करावे लागत होते.

गांधीजी त्यामुळे अस्वस्थ आणि दुःखी झाले होते. गीतेत वर्णन केल्याप्रमाणे स्थितप्रज्ञ होण्याचा गांधीजींचा प्रयत्न असे. ''दुःख आणि सुख या एकाच नाण्याच्या दोन्ही बाजू असल्याने त्यांचा माझ्यावर परिणाम होत नाही, ईश्वराच्या इच्छेनुसार मी अद्यापी तग धरून आहे. माझ्यातच काही दोष असावा. असे मला वाटते. त्यामुळेच तर हे सारे घडत असावे. सभोवाली गडद अंधार पसरला आहे. ईश्वर मला या अंधारातून कधी बाहेर काढील आणि आपल्या प्रकाशवलयात मला सामावून घेईल ?''

त्याचदिवशी संध्याकाळी श्रीरामपूर येथील मुक्काम हलविण्यात आला आणि खेड्योपाडी जाण्यासाठी गांधीजी पायी निघाले. प्रायश्चित म्हणून त्यांनी आपली पादत्राणेही काढून टाकली होती. आपण अनवाणीच चालले पाहिजे, केवळ

सांकेतिकदृष्ट्या नव्हे तर अक्षरशः प्रत्यक्षात. ''अनवाणी निघालेला एकाकी यात्री'' असे या प्रसंगाचे वर्णन त्यानंतर अनेक चरित्रकारांनी केले आहे.

यात्रा ही पवित्र धार्मिक स्थळाचीच करावयाची असते. कत्तलखान्याकडे जाताना कोणी त्याचे वर्णन यात्रा असे करीत नाही. परंतु एका प्रार्थनोत्तर सभेत बोलतांना गांधीजींनीच आपल्या दौऱ्याचे वर्णन यात्रा असेच केले. आत्मशुद्धी करणे हा यात्रेचा मुख्य हेतू असतो, असे सांगून गांधीजी म्हणाले की या यात्रेत मी तोच हेतू मनात धरून प्रत्येक पाऊल टाकीत आहे. सरोजिनी नायडू यावेळी शांतिनिकेतनमध्ये होत्या. त्यांनी तेथून लिहिले, ''हे प्रिय पांथस्था, तू प्रेमाचा नि आशेचा वसा घेऊन निघालेला यात्रेकरु आहेस. ईश्वराचे सान्निध्य तुला आहेच.''

श्रीरामपूर मुक्काम सकाळी हलला, आणि त्यांनी रवींद्रनाथांचे आपल्याला अत्यंत प्रिय असलेले 'एकला चालो रे' हे गीत आळवायला सांगितले. ''तुझ्या हाकेला कोणी ओ दिली नाही तरी तू एकटा चालत रहा. भीतीमुळे कोणी बोलू शकले नाही तर एकटाच बोलत रहा, सर्वांनी पाठ फिरविली तरी तू चालत रहा एकटा, एकाकी.''

: ४३ :
एकला चालो रे ?

जलाशयांनी भरलेल्या त्या त्रिभुज प्रदेशात चालायला धड रस्तेही नव्हते. चांगल्या पायवाटाही नव्हत्या. बांबू वापरून साकवावरून मोठ्या कष्टानं चालत जाऊन अनेक तळी, ओढे पार करावे लागत. कधीकधी तर हे साकव इतके अरुंद असत की एकावेळी एकाच बाजूनं पलिकडे जाता येत असे. पलिकडून येणाऱ्यांना तोपर्यंत थांबून रहाणे भाग पडायचे.

गांधीजींच्या पदयात्रेमुळे भरपूर लूटमार, बलात्कार आणि जाळपोळ करणे मुसलमान दंगेखोरांना कठीण झाले होते. त्यामुळे चिडून त्यांनी त्यांच्या सभांवर तर बहिष्कार घातलाच खेरीज यात्रेत अनेक अडथळे निर्माण करून त्रास देण्याचाही प्रयत्न केला. गांधीजींच्या जाण्याच्या मार्गावर विष्ठा पसरून ठेवण्यासही त्यांनी कमी केले नाही. झाडाची वाळली पानं हाती घेऊन गांधीजी ती घाण दूर करीत पुढं जात. सभोवतालच्या खेड्यातील मुसलमान नागरिक बाजूला उभे राहून ही 'गम्मत' पहात.

खरोखरीच ती एक महान यात्रा होती. यात्रेकरूंची सहनशीलता आणि श्रद्धा यांची कठोर परीक्षा पाहणारी.

गांधीजींच्या जीवनावरील महान ग्रंथात नौखाली यात्रेचे हे प्रकरण सर्वाधिक महान ठरावे.

दीर्घकाळ ज्या स्वातंत्र्याची देश आतुरतेनं अपेक्षा करीत होता, ते हाताशी आले असताना, आणि सारी प्रशासकीय यंत्रणा त्यांच्या सेवेसाठी आता तत्पर असताना, त्याकडे पाठ फिरवून महात्माजी संकटे आणि मानहानीला तोंड देत प्रेमाचा संदेश घेऊन एका महान यात्रेवर निघाले होते. आणि निघाले तेही अशा प्रदेशातून की जो लवकरच परकीय भूभाग ठरणार होता. द्वेष, हेटाळणी, अत्याचार, अविश्वास

यांचेच आज जेथे उदंड पीक आले होते अशा त्या भीषण रानटी जंगलात, सहिष्णुता, स्नेह, धैर्य आणि अनुकंपा यांचे बीजारोपण करण्यासाठी तो महात्मा निघाला होता. गांधीजींचे वय आता ७७ होते. गात्रं तशी शिणली होती, प्रकृती यथातथाच होती. पुरेसा आहारही घेतला जात नव्हता. तरी त्या प्रदेशातून शांततेच्या महायज्ञाच्या पूर्ततेसाठी ती बिकट वाट तुडवित गांधीजी निघाले होते.

दिवसांमागून दिवस, विविध प्रकारे आर्त स्वरात एकच हाक देत होते : ''माझ्या हिंदू आणि मुसलमान बांधवांनो, ईश्वराच्या आणि अल्लाच्या नावे परस्परांशी प्रेमळ भावासारखे वागा. त्या जगन्नियंत्याची तीच एकमेव इच्छा आहे. वेळ आली तर प्राणत्याग करा परंतु कोणाला जीवे मारू नका. मानहानीपेक्षा मृत्यू परवडला.

परंतु महात्माजींच्या जीवनातील ही महान गाथा तितकीच हृदयविदारक ठरली. आयुष्यात अनेक समरप्रसंगांना त्यांनी तोंड दिले, परंतु जीवनातील अत्यंत शौर्यशाली अशा या महान संग्रामात त्यांना फारसे यश लाभले नाही. सहिष्णुतेची आणि त्यामागची परिसीमा गाठून गांधीजींनी आपल्या गौरवशाली जीवनसंग्रामाच्या इतिहासातील परमोच्च कर्तृत्वाची नोंद तर केली, परंतु ज्यांच्या हृदय परिवर्तनासाठी त्या महात्म्याने जीवाची बाजी लावली, त्यांच्या अधम कृत्यांचे पारिपत्य व्हावे म्हणून स्वत: प्रायश्चित्त घेतले. त्यांचे मतपरिवर्तन काही गांधीजी करू शकले नाहीत.

काही अपवाद वगळता मुसलमानांना आपल्या कृत्यांबद्दल कसलाही पश्चाताप वाटला नाही. उलट अनेक ठिकाणी उद्धटपणा दाखवून, गांधीजींना त्यांनी माघारी फिरण्यास सांगितले. ''आपण आधी बिहारला जा, तेथे तुमची अधिक गरज आहे'' —असे ऐकवण्यासही काही जण धजले.

गांधींजींचे सहकारी निर्मलकुमार बोस यांनी यासंबंधीची एक मोठी विलक्षण कहाणी कथन केली आहे. १० जानेवारी १९४७ रोजी जगनपूर येथील महिलांच्या सभेत गांधीजींचे भाषण झाले. सभेनंतर गांधीजींनी बोस यांना सांगितले की बलात्कार झालेल्या आणि पळवून नेलेल्या काही स्त्रियांची निवेदने त्यांनी लिहून घ्यावी. भयभीत, लज्जित स्त्रिया आपल्या जीवनातील तो लाजिरवाणा प्रसंग कसा वर्णन करून सांगणार ? परंतु एक धाडसी तरुणी पुढे आली. आपली सारी दुर्दैवी कहाणी तिनं बोसना कथन केली. दुसऱ्या दिवशी श्री. बोस त्या तरुणीच्या आईला भेटायला गेले. त्या कुटुंबाचे घर जाळून टाकण्यात आल्याने मायलेकी आता एका शेजारच्या घरात निवाऱ्यासाठी गेल्या होत्या. त्या शेजारी कुटंबातील तरुणाचे त्या मुलीवर प्रेमही होते आणि तिच्याशी लग्न करण्याची तिची तयारी होती. श्री. बोस

पुढे सांगतात :

''त्या तरुणीला घेऊन मग मी तिच्या जळालेल्या घराकडे गेलो. घर पार जळून गेले होते. जळालेली लाकडं इतस्ततः पसरली होती. घराच्या लोखंडी तुळ्या वगैरे लुटारूंनी केव्हांच लुटून नेल्या होत्या. तिच्या दोन भावांचा खून करून त्यांना त्या जळत्या घरात फेकून देण्यात आले होते. पूर्ण जळालेले त्यांचे मृतदेह तेथेच बाजूला पडले होते. त्यांच्या काही अस्थी मी तेथून उचलल्या. हल्लेखोर कसे आले, त्यांनी काय केले वगैरे सर्व वर्णन त्या मुलीनं केलं. मी तिला विचारले: या ठिकाणी झालेला हा भीषण प्रकार अनुभवल्यानंतर तू पुन्हा या इथे येऊन राहू शकशील काय ? ती तरुणी काही काळ अवाक् होऊन गप्प बसली. एखाद्या मुकस्तंभागत; नंतर दूरवर शून्य नजरेनं पहात ती शांतपणे म्हणाली: होय, मी परत इथं येऊन राहीन. आता माझं ते आणखी काय वाकडं करू शकणार आहेत ? त्यांना करता येईल तेव्हढं अधम कृत्य त्यांनी केलेच आहे. आणि ते पुन्हा आलेच तर मृत्युला मिठी मारून स्वत:चा जीव कसा वाचवावा, ते मला आता कळले आहे.

दोन महिने, दिवसांमागून दिवस, खेड्यापाड्यातून अनवाणी पायी फिरल्यानंतर गांधीजी बिहारकडे वळले. हिंदुंनी तेथे मुसलमानांवर उगवलेला सूड आणि त्यांची आर्त हाक महात्माजींचे हृदय चिरीत गेली होती. हिंसाचार, अत्याचार थांबले नाहीत तर आमरण उपोषण करण्याची गांधीजींनी दिलेली धमकी, नेहरुंची त्या प्रांताला भेट आणि तेथील परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यासाठी योजण्यात आलेले उपाय याचा बराचसा चांगला परिणाम झाला होता, तरी तेथे त्याआधी चांगलाच हाहा:कार उडाला होता. नुकसान फार मोठ्या प्रमाणावर झाले होते. अद्यापि दंगलग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची आणि त्यांना धीर देण्याची समस्या आ वासून पुढे उभी होतीच.

गांधीजी नौखालीला गेले तेव्हा परिस्थिती अत्यंत धोकादायक नि स्फोटक होती. अनेक अडचणीतून नि धोक्यातून त्यांना मार्गक्रमण करावे लागत होते. मुसलमानात अविश्वास होता. त्यांचा पवित्रा आक्रमक होता. त्यांना दोष दिला तर परिस्थिती चिघळण्याची भीती होती. कोण दोषी, कोण निरपराधी ते ठरविण्यासाठी आपण आलेलो नाही, हे मुसलमानांना पटवून देण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालला होता. हिंदू तर भीतीने अर्धमेलेच झाले होते. स्पष्ट वा मोठ्याने काही बोलण्याची त्यांना चोरी झाली होती. धीराने वागा, भिऊ नका, ईश्वरावर श्रद्धा ठेवा, झाले गेले विसरून जा, या पलिकडे ते त्यांना काही सांगू शकले नाहीत.

बिहारात परिस्थिती मुसलमानांच्यावर उलटली होती. मुसलमानांविषयी सहानुभूती व्यक्त करताना येथे मात्र गांधीजींनी काही म्हणायचे शिल्लक ठेवले नाही. बहुसंख्यांकांविषयी आणि तेथील कॉंग्रेस पक्षीय मंत्र्यांविरुद्ध आपला संताप त्यांनी कोठे लपवून ठेवला नाही. आपल्या लोकांची कानउघाडणी करणे त्यांचे कर्तव्यच होते. केलेल्या चुका कबूल करून लोकांनी त्या दुरुस्त कराव्या. असे त्यांनी कळकळीचे आवाहन केले. नौखालीत सभोवताली शत्रुवत वातावरण होते. बिहारमध्ये याउलट लोकांनी महात्माजींच्या दर्शनासाठी गर्दी केली. त्यांचे स्वागत करताना, निराधार, बेघर निर्वासीतांसाठी जागोजागी लोकांनी त्यांच्यापुढे पैशांच्या राशि ओतल्या. आपल्या मुसलमान भगिनींच्या मदतीसाठी अनेक हिंदू भगिनींनी आपले दागिने काढून दिले. परंतु या चांगुलपणाचा मुसलमानांवर काहीही परिणाम झाला नाही. नौखालीशी तुलना करता बिहारमधील हिंदुंच्या वर्तनाने त्यांच्या हृदयात कोठे पाझर फुटला नाही. निर्लज्जपणे त्यांच्या मागण्या त्यांनी चालूच ठेवल्या. असहिष्णुतेची त्यांनी परिसीमाच गाठली. त्यामुळे गांधीजींच्या सहनशीलतेचीही कसोटी लागली. एकदा तर ते उसळून म्हणाले की, ''बिहारमधील हिंदुंच्या पापाबद्दल मी त्यांना सतत दोष देत रहावा आणि नौखालीमधील मुसलमानांच्या गैरकृत्यांबद्दल मी गप्प बसावे, अशी मुसलमानांची अपेक्षा आहे का ? मी जर तसे केले तर मी नेभळट ठरेन. मुसलमानांची तसेच बिहारमधील हिंदुंची पापं मला सारखीच दोषास्पद आणि गंभीर वाटतात. मी त्याबद्दल उभय जमातींचा सारखाच निषेध करणार. दोघांनाही दोष देणार.''

पंजाबातून आणि रावळपिंडीत हिंदुंचा कसा संहार चालला आहे त्याच्या हृदयद्रावक बातम्या सतत येत होत्या. महात्माजी नसते तर संतापलेल्या बिहारी लोकांनी आपली सूडाची यात्रा संपवली नसती. ''आता जर तुम्ही पुन्हा असा माथेफिरूपणा करणार असाल तर आधी प्रथम माझा बळी घ्या—'' असा इशारा त्यांनी बिहारला दिला.

दुर्दैवाने अखेरीस ती वेळ आलीच मात्र, पिस्तुलाच्या चापावरील हात एखाद्या बिहारी माणसाचा नव्हता. या घटनेची दुश्चिन्हे आधीच दिसू लागली होती, याआधी अनेक वेळा प्रभावी ठरलेले गांधीजींचे विचार, तत्वज्ञान आणि उपदेश आता निष्प्रभ ठरत होते. मुसलमानांची मनं तर ते जिंकू शकतच नव्हते, परंतु आता हिंदुमनही त्यापासून दूर जात चालले होते.

मुसलमानांचा अनुनय करण्यासाठी गांधीजी कोणत्या थरापर्यंत जात होते, ते

पाहून अनेकांना दुःख होत होते. त्याचा परिणामही उलटाच होत होता. यामुळे लाडावलेले असता ते अधिकच आडमुठेपणा आणि हट्ट करू लागले होते, अधिकाधिक आक्रमक होऊ लागले होते. गांधीजींनी त्यांच्या चांगुलपणाला आवाहन करावे आणि त्यांनी त्यांच्या सहिष्णुतेची नि सद्सद्विवेक बुद्धिची कसोटी पहावी, अधिकाराची मागणी करावी, असा जीवघेणा खेळ चालला होता. गांधीजी आणि मुसलमान समाज या दोहोंबद्दल त्यामुळे हिंदुंच्या मनात अधिकाधिक कडवटपणा येत चालला होता. ते एक दुष्ट चक्र होते.

शूराचा मान कसा ठेवावा हे शूरच जाणतात. गांधीजींनी ब्रिटिशांना उघड उघड आव्हान दिले आणि ते त्यांच्या विरुद्ध लढले. हा सरळ सरळ न्याय्य लढा होता. याची जाणीव असल्याने ब्रिटिशांनीही गांधीजींना तुरुंगात टाकले तरी त्यांचा सतत मान राखला. त्यांना आदरानेच वागवले. जनरल स्मटस् यांचे उदाहरण बोलके आहे. ते प्रतिस्पर्धी होते, परंतु गांधीजींचे प्रशंसकही होते. उभयतांमधील ही लढाई आमने-सामने लढली गेली, आणि लढाईतील आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या गुणांबद्दल कौतुकाची आणि आदराचीच भावना उभयतात होती. जनरल स्मटसूनी जोहन्सबर्ग येथील तुरुंगात गांधीजींना टाकले तरीही त्या अवधीत स्वतःच्या हाताने जोडे शिवून गांधीजींनी ते जनरलला भेट म्हणून पाठवून दिले होते. १९१४ सालातील ती घटना. पंचवीस वर्षांनंतर त्याची आठवण काढताना जनरल स्मटस् यांनी एके ठिकाणी लिहून ठेवले आहे की, ''ते जोडे मी किती तरी वर्ष वापरीत होतो. परंतु, येवढ्या थोर माणसाने तयार केलेले ते जोडे वापरण्याची आपली लायकी होती का, असे मला स्वतःलाच विचारावासे वाटते.''

: ४४ :
स्वातंत्र्याचे मोल

याचदरम्यान दिल्लीतील हंगामी संयुक्त तथाकथित राष्ट्रीय सरकारच्या पाया खालील वाळू सरकत होती. मुस्लिम लीगने आधी मान्य केलेली त्रिमंत्री शिष्टमंडळाची योजना आता झिडकारली आणि संकल्पित घटना समितीत सामील होण्यासही नकार दिला. सामोपचाराचा अखेरचा प्रयत्न म्हणून ॲटली मंत्रिमंडळाने काँग्रेस आणि लीगच्या नेत्यांना लंडनला परिषदेस हजर होण्याचे निमंत्रण दिले. परंतु त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. वेव्हेल यावेळी भारताचे व्हॉईसरॉय होते. त्याआधी आफ्रिकेच्या रणभूमीवर त्यांनी सेनापती म्हणून कामगिरी केली होती. युद्धभूमीवर जर्मन जनरल रोमेल यांनी त्यांचे लष्करी डावपेच उद्ध्वस्त केले, तर आता हिन्दुस्थानातील राजकीय प्रेचप्रसंगाने आपण पार गोंधळून गेल्याचे त्यांनी मान्य केले. राजकारणाच्या पटावरील बुद्धिबळाच्या खेळात, जिनासारख्या हट्टी, दुराग्रही नेत्याला तोंड देणे, वा कोठे त्याची समजूत काढणे, त्यांना कठीणच जात होते.

सारी परिस्थिती लक्षात घेऊन, हिन्दुस्थानबाबत ठाम धोरण जाहीर करावे आणि व्हॉईसरॉयपदी अन्य कोणाची नेमणूक करून ती योजना अंमलात आणावी असा ब्रिटिश सरकारचा आता निश्चय झाला होता. सुदैवानं लॉर्ड माउंटबॅटन यांची नवे व्हॉईसरॉय म्हणून नेमणूक झाली. ती काळवेळ लक्षात घेता, यापेक्षा अधिक योग्य व्यक्ती त्या पदासाठी सापडणे कठीण होते. भारतीयांचे हितसंबंध लक्षात घेऊन, जून १९४८ च्या आत हिन्दुस्थानावरील ब्रिटिशसत्ता संपुष्टात आणावी आणि त्यासाठी सुयोग्य मार्गाचा अवलंब करावा असाच त्यांना आपल्या सरकारचा आदेश होता.

माउंटबॅटन दिल्लीला पोहोचले तेव्हा गांधीजी बिहारच्या दौऱ्यावर होते. गांधीजींशी सल्लामसलत करण्यासाठी, माउंटबॅटन यांनी आल्या आल्या, त्यांना सर्वप्रथम दिल्लीला येण्याचे आमंत्रण दिले. गांधीजी लगेच दिल्लीला निघून आले आणि त्यांनी योग्य सल्ला दिलाही. नव्या व्हॉईसरॉय साहेबांनी सर्वप्रथम नेहरूंच्या नेतृत्वाखालील हंगामी

सरकार बरखास्त करावे, आणि जिनांना मंत्रिमंडळ बनविण्याचे आमंत्रण देऊन त्यांच्या पसंतीचे नवे हंगामी सरकार स्थापन करावे, असा होता गांधीजींचा सल्ला ! सल्ला फार धारिष्ट्याचा होता, असे माउटबॅटन यांचेही मत झाले. कॉंग्रेस पक्ष याबाबतीत सरकारला हवे ते सहकार्य करील, अशी गांधीजींनी व्हॉईसरॉयना हमी दिली. मात्र त्यावेळी जिनांनी हा प्रस्ताव अमान्य केल्यास, कॉंग्रेसपुढे हाच प्रस्ताव ठेवण्यात यावा, असेही गांधीजींनी सांगून ठेवले.

सूचना ऐकून माउंटबॅटन थक्क झाले. त्यांच्या सहकाऱ्यांना तर यात वेगळाच कावा दिसू लागला.त्यांनी व्हॉईसरॉयना गांधीजींच्या डावपेचांपासून सावध राहण्याचाही सल्ला दिला. या सल्ल्यानुसार माउटबॅटन यांनी पावले टाकली असती तर काय झाले असते हे सांगणे कठीण. देशात जातीय दंगलीचा यावेळी डोंब उसळला होता. काहीही करून जातीय सलोखा आणि एकी टिकवून ठेवण्याचा गांधीजींच्या आयुष्यातील हा एक अखेरचा प्रयत्न होता. परंतु येऊ पाहणारी आपत्ती टाळण्यासाठी आता घाईघाईने काही उपाययोजना करण्यास फार विलंब झाला होता.

विविध राजकीय पक्षांबरोबर आणि हितसंबंधी गटांशी चर्चा केल्यानंतर हिन्दुस्थानच्या भवितव्यासंबंधी काहीएक निर्णय घेणे आता माउटबॅटन यांना आवश्यकच होते. सारी परिस्थिती लक्षात घेऊन काय निर्णय घ्यावा, ते त्यांच्या ताबडतोब लक्षात आले. कॉंग्रेस पक्ष आणि मुस्लिम लीग यामधील मूलभूत मतभेद दूर करणे कठीण होते. सामोपचार, समझोता या शब्दांना काही अर्थ उरला नव्हता. यावर उपाय एकच आणि तो म्हणजे देशाची फाळणी करणे. माउंटबॅटन याच निर्णयाला आले. लवकर सत्तांतर घडून येऊन ब्रिटिशांनी भारत सोडला तर सर्वांच्याच दृष्टीने ते हिताचे ठरेल असे माउंटबॅटन यांचे मत होते. भरसमुद्रात चाललेल्या जहाजाला आग लागलेली असावी, आणि बोटीच्या गुदामात दारुगोळ्याचा साठा'' अशी हिन्दुस्थानची त्यावेळी स्थिती होती, असे वर्णन त्यावेळचे भारताचे सर सेनापती लॉर्ड इस्मे यांनी केले आहे. अशा बोटीचा ताबा आमच्याकडे असताना, आम्हाला कसे वाटत असेल, असा प्रतिप्रश्नही सेनापतींनी पुढे केला.

अशा परिस्थितीत काही कटू निर्णय घेणे आवश्यक आहे. हे माउंटबॅटन यांनी कॉंग्रेस नेत्यांना पटवून दिले. हंगामी मंत्रिमंडळातील मुस्लिम लीगवाल्या सदस्यांनी त्यांची आतापर्यंत चांगलीच निराशा केल्याने, अन्य पर्यायही उरला नव्हता. देशाची दोन भागात फाळणी करण्यापूर्वी, बंगाल आणि पंजाब या प्रांतांची विभागणी कशी करायची ते ठरविण्याचा त्यांना अधिकार देण्यासही, माउंटबॅटन यांनी, जिनांची संमती मिळविण्यात फार मोठे यश मिळविले होते. माउंटबॅटन यांच्या जबरदस्त

व्यक्तिमत्वामुळे आणि हस्तक्षेपामुळेही, तसंच त्यांनी पुढे ठेवलेल्या तर्कशुद्ध प्रस्तावामुळे आधीच जिना अस्वस्थ झाले होते. परंतु प्राप्त परिस्थितीत अन्य मार्ग उरला नव्हता. अखेरीस 'कुरतडलेल्या' (Moth-eaten) पाकिस्तानच्या योजनेचा स्वीकार करण्यावाचून त्यांना गत्यंतर राहिले नव्हते.

अशाप्रकारे स्वातंत्र्याच्या अखेरच्या पर्वात, भारतीय इतिहासाची पानं लाखो निष्पाप, निरपराध लोकांच्या रक्तात भिजून निघाली. इतिहासाच्या कालौघात, यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर, इतक्या अल्पावधीत येवढ्या मोठ्या संख्येनं एखाद्या देशात सर्वसामान्य, नि:शस्त्र माणसांची अशी अधम हत्या झाली नसावी.

''हिन्दुस्थानात पाऊल ठेवल्यापासून ७३ दिवसात फाळणीची योजना आम्ही जाहीर केली आणि त्यापुढील ७२ दिवसात आमच्या व्हॉईसरॉय पदाची अखेर झाली. ''असं माउंटबॅटन यांचे प्रसिद्धी प्रमुख ॲलन कॅम्पबेल-जॉन्सन यांनी लिहून ठेवले आहे.

हिन्दुस्थानवरील ब्रिटिश सत्तेचा लोप व्हावा ही गांधीजींची प्रबळ इच्छा होती. अन्य कोणत्याही नेत्यापेक्षा गांधीजीमुळे परकीय सत्तेचा देशावरील शेवट आता समीप येत होता. ब्रिटीशांचे हिन्दुस्थानवरील साम्राज्य आता मावळत चाललेले असताना गांधीजी मात्र सुखी-समाधानी नव्हते. भीतीग्रस्त होऊन कॉंग्रेसच्या नेत्यांनी फाळणी मान्य करू नये यासाठी त्यांचे मन वळविण्याचा गांधीजींनी आटोकाट प्रयत्न केला. परंतु वाघावर स्वार होण्याचा सर्व नेत्यांनी निश्चय केल्याने आता त्याच्या पाठीवरून उतरणे अशक्य होते. एकीकडे मनात स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद होता, तर दुसरीकडे मनाचा गोंधळही उडाला होता. एकीकडे मनात उत्साह-उत्कंठा दाटून आली होती, तर त्याबरोबरच दुसरीकडे मन धास्तावलेही होते. मनाच्या अशा अवस्थेत काय करावे, हे कोणालाच नीटसे कळत नव्हते. जिनांच्या इच्छेप्रमाणे एकदाची फाळणी होऊन पाकिस्तान निर्माण झाले की देशापुढील जातीय समस्येची डोकेदुखी पार निघून जाईल, अशी त्यांना आशा वाटत होती. मात्र पंडित जवाहरलाल नेहरूंना वस्तुस्थितीची कल्पना होती. नेहरु बुद्धिमान होते. भविष्याचा वेध घेण्याची त्यांची कुवत होती. इतर नेत्यांपेक्षा तसे ते याबाबतीत वेगळे होते. एकटेच विचार करीत बसले असता खाजगी रीत्या एकदा त्यांनी म्हटलं की, ''शिर कापून डोकेदुखी कायमची दूर करीत आहोत!''

देशाची फाळणी होणारच असेल तर ती स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्हावी, आधी नव्हे, यावर गांधीजींचा भर होता. ते म्हणत, ''ब्रिटिशांना एकदाचे इथून आधी जाऊ द्या. त्यानंतर काही काळ देशात अनिश्चितता, गोंधळ, अराजक माजेलही. तसे झाले तरी

परवडेल. या अराजकातून, अंधारातून आम्ही पवित्र होऊन बाहेर पडू.'' परंतु आता गांधीजींची इच्छा हे अरण्यरुदन ठरत होती. त्यांच्या हातून देशाच्या भवितव्याची सूत्रे केव्हाच निसटून गेली होती.

तीन दशकांपूर्वी, देशातील राजकीय चळवळीची सूत्रे हाती घेतल्यापासून गांधीजींनी आता स्वातंत्र्य देशाच्या दारी आणून ठेवले होते. स्वातंत्र्याची कवाडं उघडण्याच्या वेळी पुढे येणारे अडसर त्वरेने दूर करण्यासाठी सर्वत्र एकच घाईगर्दी चालली होती. कोणाच्या पदरात काय पडेल ते मिळविण्यासाठी एकच झुंबड उडाली होती. अशावेळी देशाचे आतापर्यंत समर्थ नेतृत्व करणारा तो महात्मा त्या गोंधळापासून दूर झाला. स्वातंत्र्यासाठी झालेले सारे होम हवन पुरे होत येत असताना दक्षिणा लाटण्यासाठी अनेक भिक्षुकांनी गर्दी केली होती. लुटारुही परिस्थितीचा लाभ उठवण्यास सिद्ध झाले होते. त्या चेंगराचेंगरीत किती जण भरडले जाणार होते ? किती गुदमरणार होते ? या पेंढारगर्दीपासून स्वतःचे संरक्षण करू शकू का, ही शंका गांधीजींना होतीच पण आता, स्वतःला वाचविण्याचीही गांधीजींना इच्छा उरली नव्हती.

हिन्दुस्थानची भारत आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रं म्हणून फाळणी करण्याची योजना जाहीर होण्याच्या आधी दोन दिवस दि. १ जून रोजी, सकाळी गांधीजी नेहमीपेक्षा लवकर उठले. त्यांच्या चरित्रकारांनी आणि सोबत राहणाऱ्या सेवकांनीच वर्णन केल्याप्रमाणे, रोजच्या प्रार्थनेला थोडा विलंब असल्याने, गांधीजी अंथरुणातच पडून राहिले. परंतु त्यांचे, ऐकू यावे असे स्वतःशीच बोलणे सुरू होते. '' आज मला फार एकाकी वाटत आहे. सरदार आणि जवाहरलाल या दोघांनाही वाटत आहे की माझे निदान चुकीचे असून फाळणी मान्य केली की देशात शांतता प्रस्थापित व्हायला दोन दिवसही लागणार नाहीत. फाळणी झालीच तर त्यात ब्रिटिशांचा हस्तक्षेप नसावा, किंवा ब्रिटिशसत्ता असताना या समस्येचा विचार होऊ नये, असे मी व्हॉईसरॉयना सांगितले म्हणूनही त्याना आवडले नाही. म्हातारपणाचा माझ्या डोक्यावर तर परिणाम झाला नाही, असेही त्यांना वाटत आहे. ते काहीही असो, काँग्रेस पक्षाच्या तसेच ब्रिटिश लोकांचाही सच्चा मित्र म्हणून मला योग्य वाटते ते बोलणे आवश्यक आहे. हा प्रश्न सोडवताना आम्ही चुकीच्या मार्गाने जात आहोत, अशी माझी खात्री आहे. नजिकच्या भविष्यात लगेचच याची प्रचीति येणार नाही; मात्र येव्हढे मोल देऊन आम्ही मिळविलेल्या स्वातंत्र्याचे भवितव्य काळेकुट्ट आहे, अशी भीती आतापासूनच मला वाटू लागली आहे.''

थोड्या वेळाने पुन्हा बोलण्यास त्यांनी सुरूवात केली, ''खरंही असेल, पुन्हा मी

अंधारात चाचपडत असेन. आणि ते सारे योग्य मार्गाने चालले असावेत. मात्र, माझ्या मनात जी कुशंका आणि भीती आहे, त्याप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खरोखरी या देशाला संकटा:तून जावे लागले तर, त्याबद्दल मी आधीच इशारा दिला होता, त्यांच्या विचारानेही मी किती अस्वस्थ नि दु:खी होतो हे भावी पिढ्यांना कळावे. कारण त्यावेळी मी हयात नसेन. हिन्दुस्थानचे तुकडे करण्याच्या डावात गांधीजी सहभागी झाले होते असे कोणी म्हणता कामा नये. आज सारे जण देशाच्या स्वातंत्र्यासाठी तहानेले आहेत, त्यामुळे त्यांना काही समजावून सांगणे कठीण आहे.''

दुसऱ्या दिवशी सोमवारी गांधीजी माउंटबॅटन यांना भेटावयास गेले. ॲलन कॅम्पबेल यांनी आपल्या आठवणीत म्हटलं आहे की गांधीजींच्या भेटीच्या वार्तेनंच माउंटबॅटन अस्वस्थ झाले. महात्माजींच्या मनात यावेळी काय असेल या धास्तीने. गांधीजींचा फाळणीला विरोध होता हे सर्वश्रुत होते, परंतु फाळणीची योजना उद्ध्वस्त करण्यासाठी ते काय करणार याचीच काळजी होती. परंतु प्रत्यक्ष भेटीच्या वेळी गांधीजींनी वापरलेल्या लिफाफ्याच्या आणि कागदाच्या मागे (काटकसरीचा उपाय म्हणून असे पाठकोरे कागद वापरण्याची त्यांना सवयच होती) लिहलं की आज सोमवार असल्याने त्यांच्या मौनाचा दिवस होता, तेव्हा माउंटबॅटन आश्चर्याने थक्कच झाले. मनावरचे ओझे आता उतरले होते. एका कागदावर गांधीजींनी लिहिलं होतं.'' माझ्या भाषणातून मी कधी एकही वावगा शब्द तुमच्याविरुद्ध काढला आहे का ?

मुलाखत आटोपल्यावर कॅम्पबेल आपल्या रोजनिशीत लिहिताना म्हणतात, ''माउंटबॅटन यांनी सारे कागदाचे तुकडे एकत्र गोळा केले. आपल्या ऐतिहासिक अवशेषात त्यांचे केव्हढे तरी मोल असेल, याची त्यांना तेव्हाच खात्री असावी. राजकारणापासून कायमचा संन्यास घ्यावा असे सूचित करणारे गांधीजींचे ते वागणे होते. राजकारणाच्या व्यासपीठावरून स्वत:ला कायमचे दूर ठेवण्यास जणू गांधीजींनी आता प्रारंभ केला होता, असं माउंटबॅटनना वाटले.''

भारताचे तुकडे करण्याच्या विचाराला गांधीजींचा कडवा विरोध होता. त्यामुळे देशाची एकता धोक्यात येईल आणि फाळणीनंतर उभय देशातून रक्ताच्या नद्या वाहू लागतील, याची त्याना पूर्ण कल्पना येऊन चुकली होती. ''यापूर्वी तुम्ही अनेकदा संकटाविरुद्ध सामना दिला आहे. आता पुन्हा एकदा या संकटाविरुद्ध का आवाज उठवीत नाही ?असं एका भेटीला आलेल्या व्यक्तीनं विचारले असता गांधीजी दु:खपूर्ण स्वरात उत्तरले की त्यांना आता त्यासाठी वेळ तरी कुठं होता ?''सध्याच्या

काँग्रेसच्या नेतृत्वाला आव्हान देणे मला शक्य होणार नाही. लोकांच्या त्या नेतृत्वावरील विश्वासाला धक्का देणे तसें कठीण आहे. त्यासाठी लोकांना आधी पर्यायी नेतृत्व मिळवून देणे आवश्यक आहे. असे नेतृत्व उभे करण्यास मला कोठे सवड आहे ? खेरीज सद्यस्थितीत सध्याच्या नेतृत्वाला दुबळे करणे चुकीचे ठरेल. म्हणून मी विनातक्रार कडुघोट गिळतो आहे.'' खरोखरीच ती कडू विषाची गोळी होती. ती पचविणे गांधीजींना केवळ अशक्य होते. स्वातंत्र प्राप्तीचा सुवर्णक्षण जवळ येत असताना, त्यांना त्याचा अवर्णनीय आनंद झाला असता. परंतु तो दिवस उजाडला तेव्हा स्वातंत्र्याचा त्या महान शिल्पकाराने दिल्लीत उपस्थित राहण्याचेही नाकारले. त्यांनी कलकत्त्यात राहाणेच पसंत केले. वर्षापूर्वी लीगच्या ''प्रत्यक्ष कारवाई''नंतर झालेल्या भीषण दंगलीनंतर आता तेथील दंगलग्रस्त लोकांचे अश्रू पुसणे, त्यांना धीर देणे, त्यांचे पुनर्वसन करणे निकडीचे होते.सह.नुभूतीच्या शब्दांची त्या सर्वांना गरज हाती.

स्वातंत्र्यदिनाच्या प्रसंगी गांधीजींचा संदेश रेडिओवरून प्रसारित करता यावा यासाठी सरकारतर्फे त्यांना तिनदा विनंती करण्यात आली. त्यांनी सुयोग्य असा संदेश दिला नाही तर ते यावेळी योग्य ठरणार नाही, असेही त्यांना सांगण्यात आले, - परंतु ''संदेश देण्यासारखे माझ्याजवळ काही नाही'' असेच उत्तर त्यांनी दिले. ''अनुचित वाटले तरी माझा नाईलाज आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. बी. बी.सी. कडून करण्यात आलेली अशीच विनंतीही यांनी अव्हेरली. ''मला इंग्रजी येतं हे आता त्यांनी विसरावं'' असे कडवट उद्‌गारही त्यांनी काढले. अत्यंत सहिष्णु, उदारमतवादी, प्रेमळ आणि इतरांच्या भावनेच्या नेहमी आदर करणाऱ्या एका महात्म्याकडून असे कडवट उद्‌गार निघाले, यावरून त्यांचं मन दुःखानं किती आक्रंदत असेल याची कोणालाही कल्पना यावी.

भारत आणि पाकिस्तान आता स्वतंत्र होत असताना खरा आनंद आणि अभिमान ब्रिटिशांना वाटत असावा. सुप्रसिद्ध अमेरिकन पत्रकार वॉल्टर लिपमन यांनी 'वॉशिंग्टन पोस्ट' मधील आपल्या खास लेखात लिहिताना जेव्हा म्हटलं की ''ब्रिटनच्या इतिहासातील अत्युत्कृष्ट क्षण कोठे भूतकाळात नसून हाच आहे-'' तेव्हा त्यांना ब्रिटिशांनी केलेले सत्तांतराचे महत्व अभिप्रेत होते. ब्रिटनच्या उमराव सभेत भारतीय स्वातंत्र्य विधेयकावर बोलताना लॉर्ड सॅम्युअल यांनी ''युद्ध न करता झालेला शांततेचा महान करार'' असे विधेयकाचे वर्णन केले ते समर्पकच होते.

: ४५ :

महात्म्याची शांती यात्रा

प्रारंभी नौखालीला जाण्याचा गांधीजींचा विचार होता. कारण फाळणीनंतर नौखाली पाकिस्तानात जाणार होते. परंतु त्यांना कलकत्ता सोडणे कठीण झाले होते." इथे भडकलेल्या आगीवर पाणी ओतून ती शांत करणेही आवश्यकच होते." असे त्यांनी एके ठिकाणी बोलताना म्हटले.आता तेथे बाजूही उलटली होती. आपल्या प्रांतात आणि प्रदेशात आपले राज्य आल्याने हिंदुना आनंद झाला होता. परंतु त्यामुळे त्यांच्यात आक्रमकताही आली होती. परिणामी तेथील मुसलमान आता काहीसे भीतीग्रस्त झाले होते. त्यांची बहुसंख्या असलेल्या भागात मात्र त्यांच्याकडून जोरदार प्रतिकार तर होत होताच- खेरीज, प्रसंगी आक्रमक पवित्राही घेतला जात होता. परंतु आता आपले दिवस सरले असून काही चमत्कार घडला तरच आपण यापुढे कलकत्ता शहरात आणि पश्चिम बंगालात स्वतःला वाचवू शकू, याची त्यांना पूर्ण कल्पना येऊन चुकली होती. येथून केव्हा हाकलले जाऊ याची धास्ती डोक्यावर होतीच.

बंगालचे माजी पंतप्रधान हसन सुऱ्हावर्दी यांचा सारा रुबाब आणि अहंकार आता उतरला होता. कलकत्यातील त्यांचा प्रभाव तर आता ओसरला होताच, खेरीज पूर्व बंगालमधील त्यांचे मुस्लिम लीगमधील नेतृत्वही संपुष्टात आले होते. कलकत्ता शहरातील परिस्थिती पूर्वपदावर येईतो, गांधीजींनी आपला तेथील मुक्काम वाढवावा, अशी त्यांनी विनंती केली होती.मोठे आव्हान असेल तेथे जाऊन ते स्वीकारण्याइतका गांधीजींना अन्य कोठला आनंद नसेल परंतु त्यांनी सुऱ्हावर्दींना एक अट घातली. तेथील वास्तव्यात आणि शांतीमोहिमेत त्यांनी आपल्याबरोबर सतत राहिले पाहिजे, त्यांनी सुऱ्हावर्दींना म्हटलं "तुम्ही ताबडतोब निर्णय कळवा असं मी म्हणत नाही. घरी जाऊन आधी आपल्या लाडक्या कन्येशी विचारविनिमय करा, तिचा सल्ला घ्या आणि मग काय ते ठरवा. पूर्वीचे सुऱ्हावर्दी मला नको असून नव्या

फकिरी वेषातील सुऱ्हावर्दी मला हवे आहेत,'' असे सूचक उद्‌गार गांधीजींनी काढले.

कलकत्त्यात गांधीजींनी आपल्या निवासासाठी ज्या जागेची निवड केली ती एका मुसलमान महिलेच्या मालकीची होती; आणि सरदार पटेलांच्या मते ते घर मोडकळीला आलेले तर होतेच, खेरीज ती वस्ती म्हणजे समाजकंटक गुंडांचा अड्डा होती. संतप्त हिंदू तरुण कधी येऊन गांधीजींवर हल्ला करतील याचा नेम नव्हता. वर्षापूर्वी हिंदुंची तेथे कत्तल झाली तेव्हा गांधीजी आले नाही नि आता मुसलमानांना वाचविण्यासाठी ते धावत आल्याने सारे हिंदू युवक चांगलेच संतप्त झाले होते. गांधीजींना याची पूर्वकल्पना होतीच. तरीही त्यांनी स्वतःसाठी सशस्त्र अंग रक्षक ठेवण्यास विरोध केला. ''स्वसंरक्षणाची तयारी न करता वा शस्त्र हाती न घेता संकटाला सामोरे जाणे हीच तर अहिंसेची खरी कसोटी आहे येथे फक्त हृदयात प्रेम, आपुलकी आणि मनात शुद्ध हेतू हवा.'' असं गांधीजींनी सांगून टाकलं.

बेलिया घाट येथील त्या पडक्या घरात दि. १३ ऑगस्ट रोजी गांधीजींनी प्रवेश केला, तेव्हा ''गांधीजी माघारी जा''च्या घोषणांनी त्यांचे संतप्त तरुणांनी स्वागत केले. सुऱ्हावर्दी तेथे आले तेव्हां त्यांच्या गाडीला घेराव घालण्यात आला. अखेरीस त्यातनं सुटका करून घेऊन ते त्या पडक्या घरात शिरताच इकडे गाडीवर दगडांचा वर्षाव झाला. गांधीजींनी निदर्शकांना बोलावून घेतले आणि आपल्या शांतीयात्रेचा हेतू त्यांना समजावून सांगितला. ''करेन वा मरेन पण मी माझ्या कर्तव्यापासून दूर होणार नाही-'' असा निर्धार त्यांनी बोलून दाखविला. गांधीजींच्या बोलण्याचा परिणाम झालाच. पुन्हा एकदा दुसऱ्या दिवशी गांधीजींशी बोलल्यानंतर तरुणांचा संताप हळूहळू ओसरू लागला. आणि त्यानंतर शहरातील वातावरण आणि परस्पर द्वेष निवळण्यास प्रारंभ झाला.

गांधीजींच्या आर्जवी शब्दांचा परिणाम इतका प्रभावी होता की सारा राग, संताप, द्वेष, चीड , खुनशीपणा, सूडाची भावना विसरून एकाएकी हिंदू आणि मुसलमान स्वातंत्रदिनाच्या आदल्या दिवशी उत्स्फूर्तपणे कलकत्त्याच्या रस्त्यातून एकत्र आले, आणि त्यांनी संयुक्तपणे, आनंदाने परस्परांना आलिंगन देत स्वातंत्र्याचे स्वागत केले. बंगाली कवी सुधीन्द्रनाथ दत्त यांनी कलकत्त्याच्या वातावरणातील हा फेरबदल पाहून म्हटले, की ''माझ्या आयुष्यात मी पाहिलेला हा बहुधा एकमेव चमत्कार असावा !''

परंतु गांधीजींचा आनंद मर्यादित होता. मनोवस्थेतील हा बदल तात्पुरता आहे की कायमचा याबद्दल त्यांना शंकाच होती. दुसऱ्या दिवशी स्वातंत्र्यदिन होता.

शेकडो वर्षाच्या पारतंत्र्यानंतर देश स्वतंत्र होत होता. हा भाग्यशाली दिवस उदयाला यावा म्हणून असंख्य देशभक्तांनी स्वातंत्र्य लढ्याचा वेदीवर आपले बलिदान केले होते. आनंदाने मोहरून उठावे, गावे, नाचावे असा हा दिवस. गांधीजींनी त्यांदिवशी उपोषण केले. फाळणीचे दुःख म्हणून की ब्रिटिश लोक हिन्दुस्थान सोडून जात होते म्हणून त्यांना धन्यवाद देण्यासाठी, वा कलकत्ता शहर पूर्वपदावर आले या आनंदात, वा आपले सहकारी आणि खाजगी चिटणीस श्री. महादेवभाई देसाई यांच्या पाचव्या पुण्यतिथीच्या स्मरणार्थ ते उपोषण होते हे सांगणे कठीण !

ॲगथा हॅरिसन यांना स्वातंत्र्य दिनाच्या दिवशीच लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी म्हटलं, की एखाद्या घटनेबद्दल आनंद व्यक्त करावयाचा असेल तर आपण परमेश्वराचे त्याबद्दल आभार मानण्यासाठी त्याला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना आणि उपोषण करतो. पश्चिम बंगालच्या नव्या मंत्रिमंडळाचे सदस्य त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी आले तेव्हा गांधीजी म्हणाले की, लक्षात ठेवा, आजपासून तुम्ही काटेरी मुकुट परिधान करावयाचा आहे. सत्तेपासून सावध रहा: कारण सत्ता भ्रष्ट करते. सत्तेचे सामर्थ्य, भपका आणि डामडौल यांनी हुरळून जाऊ नका. लक्षात ठेवा, देशातील ग्रामीण भागात खेडोपाडी राहणाऱ्या गोरगरीब लोकांच्या सेवेसाठी तुम्ही हे पद स्वीकारले आहे. ईश्वर तुम्हाला साह्य करो.

मीराबेन यांना लिहिलेल्या पत्रात महात्माजींनी म्हटलं आहे. ''लोक समुदाय आज आनंदात आहे, परंतु मला काही त्यात समाधान वाटत नाही. मग माझ्यात काही दोष आहे का ? हिंदू-मुसलमानात एकाएकी एकी झाली आहे असे वाटते, पण ती फसवी तर नसावी ? हा जो बद्दल घडून आला आहे त्याचे श्रेय मला दिले जाते, परंतु मला त्याचे आश्चर्यच वाटते आहे. मी नसतो तरी असेच घडले असते. बघुया काळ काय ते ठरवील.''

गांधीजींच्या मनात भीतीची आणि संशयाची जी पाल चुकचुकत होती, तसेच दुर्दैवानं घडत गेले. एकीचा तो 'चमत्कार' अल्पजीवी ठरला. फाळणीनंतर 'रक्ताच्या नद्या' वाहतील ही त्यांची भयसूचक भविष्यवाणी दुर्दैवानं कल्पनाही करवणार नाही इतक्या भीषण स्वरूपात पूर्णतया खरी ठरली. पश्चिम पाकिस्तानात फाळणीनंतर हाहा:कार उडाला. प्रचंड लोकसमुदायाचे जमावात रुपांतर झाले आणि त्याचे माथे एकदा फिरल्यानंतर साथीचे रोगही बळी घेणार नाहीत इतक्या भयंकर प्रमाणात निरपराध मानवी जीवांचे त्याने बळी घेतले. ती साथ सर्वत्र वेगाने पसरत गेली. कलकत्त्यातील पुर्वपदावर आलेली परिस्थिती पुन्हा बिघडू लागली. कसेबसे १५ दिवस, ३१ ऑगस्टपर्यंत त्या शहरात फसवी शांतता होती. गांधीजी पुन्हा

अस्वस्थ झाले. नौखालीत अपुरे राहिलेले आपले कार्य पुरे करण्यासाठी त्यांनी पुन्हा तिकडे जाण्याचा आपला बेत जाहीर केला. दुसऱ्या दिवशी निघण्याची तयारी करण्यासाठी सुदैवाने त्यांनी सुऱ्हावर्दींना त्यांच्या घरी परत जाण्याची परवानगी दिली होती.

कारण, त्याच रात्री १० वाजता गांधीजी नुकतेच झोपायच्या आपल्या खोलीकडे परतत असताना संतप्त तरुणांचा एका मोठ्या जमावाने त्या घरावर हल्ला चढवला. अनेकजण घरात घुसले आणि त्यांनी मोडतोड करण्यास सुरुवात केली. आरडाओरडा करीत आलेल्या त्या जमावाला तोंड देण्यासाठी गांधीजी हात जोडीत शांतपणे पुढे झाले. त्यांच्या दिशेने फेकलेली विटकर सुदैवाने त्यांना लागली नाही, काठीचा एक फटका मारण्याचाही प्रयत्न झाला, परंतु तो चुकला. जमाव प्रत्यक्षात सुऱ्हावर्दींचा समाचार घेण्यासाठी आला होता, परंतु सुदैवाने ते आधीच आपल्या घरी निघून गेले होते.

त्या जमावाला शांत करून पांगवल्यानंतर बातमी आली की मुसलमानांना घेऊन जाणाऱ्या एका ट्रकवर वाटेत हातबॉम्ब फेकण्यात आल्याने दोन जण ठार झाले. निर्मलकुमार बोस यावेळी गांधीजींच्या सहवासात होते. अहिंसेची गांधीजींची व्याख्या आणि त्यांनी त्याचा लावलेला लवचीक अन्वयार्थ, तसे पाश्चात्य शांती वाद्यांचा त्यासंबंधीचा घट्टसा ठोकळ (rigid) दृष्टिकोन, किंवा कोणत्याही जीवाला जराही दुखापत न करण्याचा जैन धर्माचा आदेश, यात कसा सूक्ष्म फरक आहे यासंबंधीच्या काही हकीकती बोस यांनी कथन केल्या आहेत.

एकदा तरुणांचा एक गट गांधीजींकडे आला. महात्माजींना याआधी शब्द दिल्याप्रमाणे, आपण मुसलमानांचे संरक्षण केले पाहिजे, असे या तरुणांचे मत होते. यासाठी आपण स्टेनगनचाही वापर करावा का ते विचारण्यासाठी ते आले होते. गांधीजींनी त्यास संमती दिली. काँग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री आणि शासन अल्पसंख्याकांना संरक्षण देण्यास समर्थ नसेल, आणि या तरुणांची तशी तयारी असेल तर त्यांनी शस्त्रास्त्रे वापरण्यास आपला पाठिंबा आहे, असे गांधीजींनी स्पष्ट म्हटले.

असे सांगितल्यानंतरही हा पेच सोडविण्यासाठी गांधीजींनी आपला मार्ग चोखाळला. इतकी गुंतागुंतीची नि नैतिकदृष्ट्या महत्वाची समस्या पुढे उभी असताना, केवळ सरकारी वा खाजगी प्रयत्नावर अवलंबून राहण्याची गांधीजींना केव्हाच सवय नव्हती. म्हणून, ''या दंगली संपेपर्यंत आपण उपोषण करू'' असे त्यांनी जाहीर केले.

नेहमीप्रमाणे उपोषणाचा अपेक्षित परिणाम दिसून येऊ लागला. शहरातील जातीय वैमनस्य संपुष्टात आणण्यासाठी आपण जीवाची बाजी लावू, असे आश्वासन देणारी पत्रं, उभय जमातींच्या नेत्यांकडून त्यांना लगेचच येऊ लागली. आता असे आश्वासन देताना, पत्रलेखकांचे खरोखरी हृदय परिवर्तन झाले होते का ? अन्य जमातीविरुद्धचा त्यांचा दुस्वास कमी झाला होता का ते कळणे कठीण आहे.

याचवेळी पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंधमध्ये भीषण हत्याकांड चालू झाल्याने, भयग्रस्त झालेले एक कोटीवर लोक आपली घरे-दारे, साधन-संपत्ती मागे सोडून आणि नव स्वतंत्र झालेल्या उभय देशांच्या सीमा ओलांडून सुरक्षितता मिळविण्यासाठी नुसते जीव घेऊन पळत होते. जगाच्या इतिहासात आतापर्यंत संहाराच्या भीतीपायी येव्हढ्या मोठ्या प्रमाणावर कधी कोठे असे स्थलांतर झाले नसेल. ''साठ मैल रस्त्यावर दोन्ही बाजूनी लोकांचा अखंड प्रवाह, मिळेल त्या वाहनाने, हाती घेता येईल तेव्हढे सामान घेऊन, सीमा ओलांडून सुरक्षिततेसाठी भारत वा पाकिस्तानकडे निघाल्याचे विलक्षण दृश्य मी विमानातून पहात होतो. अशी ॲलन कॅम्पबेल जॉन्सन यांनी प्रसिद्ध केलेल्या आपल्या रोजनिशीत नोंद केली आहे. ''इतिहासात अशाप्रकारे जातीय-धार्मिक तणावामुळे स्थलांतरे झाली असतील, परंतु ती येव्हढ्या मोठ्या प्रमाणावर नव्हे. येथे तर आपल्या मूळ गावी पुन्हा परतण्याची कोणालाच आशा नव्हती.''

पंजाबमध्ये व्हॉईसरॉयनी बंदोबस्ताची चांगली व्यवस्था केली असताही हत्याकांड झाले. पंजाबात दंगली काबूत आणण्यासाठी मी सैनिकांचे ५०,००० सीमा-सुरक्षा दल पाठविले, परंतु ते फारसे काही करू शकले नाही. इकडे बंगालमध्ये मात्र एकाच महात्म्याने तेथे आपल्या महान कर्तृत्वाने शांतता प्रस्थापित करण्यात यश कसे मिळविले ते मी काय सांगावे ? असे लॉर्ड माउंटबॅटन यांनी त्या कसोटीच्या दिवसांचे नंतर एकदा वर्णन करताना म्हटले.

जात्यांध दंगलीच्या वेढ्यात सापडलेल्या कलकत्ता शहरावर गांधीजींच्या प्रेमाच्या आणि बंधुभावाच्या संदेशाचा काहीसा चांगला परिणाम झाला, हे आधुनिक इतिहासातील एक सत्य होय असा मात्र निश्चितपणे दावा करता येईल. त्या महात्म्याच्या हिंसाचारविरोधी आक्रंदनाला बंगाली जनतेनं नंतर खरोखरीच उत्स्फूर्तपणे चांगला प्रतिसाद दिला. त्या लोकांना किती सहन करावे लागले, परंतु अत्याचार सहन करूनही आपण मनाने किती सहिष्णू आणि समजूतदार आहोत, ते त्यांनी आपल्या आदर्श वर्तणुकीने सिद्ध केलं. गांधीजींचा उदय होण्यापूर्वी ज्या थोर नेत्यांनी आधुनिक बंगालचं नेतृत्व केलं त्यांच्या विचाराला रचनात्मक वळण लावलं, त्यांचं जीवनकार्य असं वाया थोडंच जाणार होतं ?

: ४६ :
करेंगे या मरेंगे

पंजाबमध्ये चाललेल्या जातीय दंगलींवर फुंकर घालण्यासाठी तेथे जावे म्हणून गांधीजी सतत चिंतातूर होते. परंतु ९ सप्टेंबरला जेव्हा ते दिल्लीला परतले तेव्हा, पंजाबमध्ये उसळलेला जातीय दंगलींचा डोंब आता दिल्लीपर्यंत येऊन पोहोचल्याचे त्यांच्या लक्षात आले. दिल्ली शहरात हिंसाचाराने नंगानाच घातला होता. संकट असेल तेथे धावून जायचे ही गांधीजींची आतापर्यंतची परंपरा असल्याने ''करेंगे या मरेंगे'' या निर्धाराने त्यांनी दिल्लीतच रहाण्याचा निर्णय घेतला.

यावेळी मात्र महात्माजींना दिल्लीतील भंगी कॉलनीत असलेल्या झोपडीत जाऊन राहण्याचे भाग्य नव्हते. पंजाबातून आलेल्या स्थलांतरितांनी तेथील बऱ्याच जागा आणि ती झोपडी केव्हांच व्यापली होती. महात्माजींनी बिर्ला भवनात रहावे म्हणून त्यांचे मन वळविण्यात आले. तो भव्य प्रासाद, सभोवताली अनुयायांची गर्दी, आणि नव्याने अधिकारपदावर आलेल्या नेहरु मंत्रिमंडळाची साऱ्या सोयी पुरविण्याची तत्परता, अशी परिस्थिती असतानाही तेथे राहाणे गांधीजींना प्रशस्त वाटत नव्हते. पण ते आता हतबल झाल्यासारखे वाटत होते. याउलट, कलकत्त्यातील मुक्कामात त्या पडक्या घराभोवती संतप्त लोकांचा वेढा होता, सुऱ्हावर्दीसारख्या माणसाला बरोबर घेऊन गांधीजी शांतीयात्रेत हिंडत होते, त्याबद्दलची चीडही सर्वत्र जाणवत असे. परंतु त्याची गांधीजींनी कधी पर्वा केली नव्हती- पण आता पर्याय नव्हता.

विविध जाती - जमातींच्या लोकांनी दिल्लीत निर्माण केलेली स्फोटक परिस्थिती नियंत्रणाखाली आणावी यासाठी त्या जाती-धर्माच्या पुढाऱ्यांच्या मदतीने काम करण्याची आपली तयारी असताही मुसलमान, हिंदू वा शीख समाजाचे नेते काहीही पुढाकार घेत नव्हते याबद्दलची खंत गांधीजींनी आपल्या दिल्लीतील पहिल्याच प्रार्थना सभेत बोलून दाखविली. ही दु:खद कबुली म्हणजे एकप्रकारे

भावनाप्रधान तसेच चंचल बंगाली लोकांना अप्रत्यक्षपणे दिलेली शाबासकीच होय. आता शांत वाटणारे ते लोक प्रसंगी उग्र अवतार धारण करू शकत होते.

दिल्लीतील स्थलांतरितांच्या छावण्यातील हिंदू आणि शीख स्थलांतरितांची, तसेच पाकिस्तानकडे जाण्यासाठी निघालेल्या मुसलमानांची दयनीय अवस्था पाहून गांधीजींना भडभडून येई. परंतु त्या सर्व लोकांच्या डोळ्यातील संताप, आणि सूड घेण्याची भावना पाहून ते अधिकच दुःखी होत होते. निरपराधी असताही आपल्याला अनंत यातना सहन कराव्या लागल्या आता दुसऱ्या जमातीतील लोकांनाही तसाच धडा शिकविण्यासाठी त्यांचे हात शिवशिवत होते, काळीज संतापाने तडफडत होते. ''दिल्लीतील लोकांची माथी फिरली आहेत का ? त्यांच्यात माणुसकीचा लवलेशही उरला नाही का ?'' असं गांधीजींनी व्याकूळ होऊन विचारलं. भारताच्या राजधानीतील त्या घटना पाहून गांधीजींचा केवळ अंतरात्मा तडफडत नव्हता तर त्यांचा स्वाभिमानही दुखावला गेला होता. विविधतेत एकता साधणारा, सहिष्णू, उदारमतवादी, विविध संस्कृतींचा सुरेख संगम साधलेला देश म्हणून महात्माजींना भारताविषयी केव्हढा अभिमान. ''भारताचा अधःपात झाला तर साऱ्या आशिया खंडाचा सर्वनाश झालाच,'' असं ते नेहमी म्हणत. पाकिस्तानात काहीही होवो. मानवतेची, सुसंस्कृत आचरणाची ध्वजा या देशानं, तसंच दिल्लीनं सतत फडकत ठेवावी. तसं झालं तरच बेबंद अत्याचाराचे आणि अंधळ्या सूडाचे हे दुष्टचक्र आपण भेदू शकू'' - असा त्यांनी देशाला वारंवार इशारा दिला.

परंतु त्यांच्या उपदेशातील आणि मानवतावादी आवाहनातील जादू केव्हाच संपली होती. अविभक्त हिंदुस्थानात मुसलमानांनी गांधीजींना आपले एक नंबरचे शत्रू मानले, तर हिंदुंनी केवळ मैत्रीचा आव आणून आपली सतत फसवणूकच केली, असं मुसलमानांचं मत होतं. आता गांधीजींना पाण्यात पाहण्याची पाळी हिंदुंची होती. त्यांच्या मते गांधीजी म्हणजे एक नंबरचे अस्सल मुसलमान होते. हिंदुंवर अनन्वित अत्याचार करणाऱ्या मुसलमानांचीच गांधीजी अधिक काळजी करत होते. गांधी म्हणजे हिंदु पंचमस्तंभीय ते मोहनदास गांधी नव्हेत तर, हिंदुंच्या मते आता, ''मोहम्मद गांधी'' झाले होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात, ब्रिटिशांविरुद्ध झगडताना गांधीजींच्या प्रभावी आणि नैतिकदृष्ट्या अत्यंत उच्च कोटीतील अशा सामर्थ्यशाली नेतृत्वाची देशवासीयांना खरी गरज असल्याने त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले, सारे आदेश शिरोधार्य मानले; त्यांचा लहरीपणा, विचित्र मतेही सहन केली. परंतु आता देश स्वतंत्र झाल्यानंतर या

पवित्र भूमीचे पूर्वीचे वैभव तिला परत मिळवून देताना, त्या ''म्हाताऱ्याची'' पर्वा करण्याचे आता त्यांना काय कारण होते ? त्या म्हाताऱ्याची गरज आता संपली होती की ! लोकांच्या मनातील आणि वृत्तीतील हा फरक गांधीजींनी केव्हाच ओळखला होता. एखाद्या लहान मुलासारखी त्यांना वेळेवर चटकन झोप येत असे, परंतु आता वाईटसाईट स्वप्न पडून ते मध्येच दचकून जागे होत. कधी हिंदू, कधी मुसलमान लोकांचा जमाव आपल्यावर चालून येत आहे, अशी स्वप्नं त्यांना सुखाची झोप घेऊ देत नव्हती. स्वप्नातही ते त्या लोकांना आवाहन करीत, कधी कानउघाडणीही करीत.

सभोवताली चाललेल्या भीषण घटनांनी रोजचे चाललेले त्यांचे गीता-पठणही त्यांना मन:शांती मिळवून देऊ शकत नव्हते. आपण आपले कर्तव्य केले, पण निष्काम कर्मयोग्याप्रमाणे न वागता फळाची अपेक्षा तर धरली नाही ? या विचारानं आता गांधीजी फार अस्वस्थ झाले. हे आपले अपयश आहे, असे ते म्हणू लागले. ''जो त्या महान जगन्नियंत्याशी खरोखरी एकरूप झाला आहे, त्यानं सुखदु:ख, चांगलं-वाईट, ठरवणं त्याच्याकडे सोपवावं. स्वत:च कशाला काळजी करावी ? मला वाटतं मी ती अवस्था गाठू शकलो नाही आणि म्हणूनच मी माझ्या कर्तव्यधर्मात अपुरा पडलो; असं मला वाटतं-'' अशी खंत ते व्यक्त करू लागले.

दि. २ ऑक्टोबर रोजी महात्माजींच्या ७८ व्या वाढदिवशी जगाच्या सर्व भागातून त्यांना अभीष्टचिंतनपर तारा येऊ लागल्या तेव्हा ते खेदाने म्हणाले की मला आज आता सांत्वनपर शब्दांची अधिक गरज आहे. ''तुम्ही कधी प्रार्थना केलीत तर सध्याच्या भीषण परिस्थितीचा अंत व्हावा, अशी त्या जगन्नियंत्याकडे मागणी करा. चारही दिशांनी वणव्यात सापडलेल्या या देशात यापुढे माझा वाढदिवस एकदाही साजरा होऊ नये, अशी माझी इच्छा आहे.'' असं निकटवर्तीय कार्यकर्त्यांना गांधीजींनी म्हटलं. या कलहग्रस्त जगात १२५ वर्षं जगण्याची आपली इच्छा केव्हाच मेली, असे सांगून, आणखी कलह, झगडे, अन्याय, अत्याचार यापुढे पहावे लागू नयेत म्हणून डोळे कायमचे लवकर मिटावेत, असंही त्यांनी बोलून दाखविलं.

आपल्या देशबांधवांबद्दलचे आत्यंतिक प्रेम आणि देशाच्या महान आध्यात्मिक वारशाचा अभिमान मनात येऊन, सभोवतालची परिस्थिती गांधीजींना अधिकाधिक दु:ख सागरात लोटत होती. त्यातच त्यांची प्रकृती खालावत चालली होती. खोकला वाढत होता, पुरेशी झोपही मिळत नव्हती. आतापर्यंतच्या आयुष्यात अनेक चळवळी, लढे यशस्वीरित्या लढून झाल्यानंतर या अखेरच्या लढाईत आपला आणि

आपल्या विचारांचा पराभव झालेला पाहण्याची पाळी आल्यानं गांधीजींचं मन खचत चाललं होतं. ''माझ्या सत्याच्या प्रयोगात आणि अहिंसक आचरणात कोठेतरी उणीव असावी, म्हणून तर असं घडलं नसावं ना ? अशी शंका त्यांना बोचत होती. ''बहुधा ईश्वरानं मुद्दाम मला अंधारात ठेवलं असावं. मी तर म्हणेन की मी आंधळा होतो. त्यामुळे मला वस्तुस्थिती समजली नसावी.''

सप्टेंबरात गांधीजी दिल्लीला आल्यापासून आता परिस्थिती बरीच निवळली होती, परंतु त्यानं त्यांचं समाधान होण्यासारखं नव्हतं. ही शांतता वरवरची नि फसवी आहे, अशी गांधीजींची खात्री होती. एका पत्रकाराला १९४८ सालच्या नववर्षदिनी लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटलं की, ''दिल्ली शहरात शांतता आहे ती पोलिसांच्या भीतीनं. लोकांच्या मनात अद्यापी सूडाची नि संतापाची आग भडकलेलीच आहे. एकतर मी ही आग विझवली पाहिजे, वा त्यात आत्माहुती दिली पाहिजे याखेरीज अन्य मार्ग नाही.''

यातच केंद्रीय मंत्रिमंडळातील सहकाऱ्यात आता परस्परांबद्दलचा संशय आणि आप-आपसातील मतभेद नि कुरापती वाढत चालल्याच्या बातम्यांमुळे गांधीजी दु:खित झाले होते. खेरीज, कश्मिरचा प्रश्न सुटल्याखेरीज, पाकिस्तानला द्यावयाची त्या देशाच्या वाट्याची ५५ कोटी रुपये इतकी रक्कम रोखून ठेवण्याचा मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय, गांधीजींना नैतिकदृष्ट्या योग्य वाटत नव्हता. खाजगी रित्या त्यांनी त्याबद्दल व्हॉईसरॉय माउंटबॅटन यांना विचारले तेव्हा माउंटबॅटन म्हणाले, की अशाप्रकारे पाकिस्तानला द्यावयाची रक्कम रोखून धरणे भारताच्या प्रतिष्ठेच्या दृष्टिने अप्रशस्त आणि अयोग्य असं कृत्य ठरेल.

साऱ्या प्रतिकूल परिस्थितीचा गांधीजींच्या सद्सद्विवेक बुद्धिवर विचित्र दबाव येत होता. हतबलतेमुळे स्वभावात चिडखोरपणाही येऊ लागला होता. जीवाचा संताप होऊ नये म्हणून ते धडपडत होते. त्यांचे चिटणीस आणि चरित्रकार प्यारेलाल यांनी म्हटलं आहे की, ''आपला चिडखोरपणा वाढत असल्याबद्दल गांधीजी आता नेहमी तक्रार करू लागले होते. 'मी आता चितेवर जळत असल्याचं तुम्हाला दिसत नाही का ?'' असं ते वेळोवेळी म्हणत आणि कधी कोणाला काही सूचक सांगायचं असेल तर म्हणत की, ''आता माझं प्रेतच तुमच्याशी बोलत आहे, तुम्हाला काही सांगत आहे, असं समजा बरं का !'' आपल्या हृषीकेश येथील गोधन केन्द्राचे उद्घाटन करण्यासाठी आपण केव्हा चलणार, असं मीराबेन यांनी एकदा विचारलं तेव्हां ते म्हणाले, 'या मढ्याकडून आता कसली अपेक्षा करता ?'

देशातील सर्व जाती-जमाती, केवळ बाह्य दबावामुळे नव्हे तर मनापासून

परस्परांशी मित्रत्वानं आणि बंधुभावानं वागू लागेपर्यंत आपण उद्यापासून प्राणांतिक उपोषण सुरू करू, असं गांधीजींनी अखेरीस १२ जानेवारीला आपल्या प्रार्थना सभेत जाहीर केलं. त्यांच्या मनावरचा बोजा त्यामुळं कायमचा उतरलासा वाटला. ''परिस्थितीच्या भोवऱ्यात आपण हतबल, नपूंसक झाल्यासारखं मला वाटत होतं. आता उपोषण करण्याचा निर्धार केल्यानं तो बोजा खरोखरी उतरेल. गेले तीन दिवस यावर मी विचार करीतच होतो. अखेरीस हा निर्णय घेतल्याने आता मला बरं वाटू लागलं आहे.'' असं त्यांनी स्पष्टीकरण केलं. आपला संत्रस्त झालेला स्वभाव या महान उपोषणाच्या संकल्पामुळे पूर्वपदावर कसा आला याचे, स्वत: गांधीजींनीच मीराबेन यांना तीन दिवसानंतर लिहिलेल्या पत्रात मजेदार वर्णन केले आहे. '' आता पहाटेची प्रार्थना झाल्यानंतर साडेतीन वाजता मी तुला पत्र लिहीत आहे. त्याचवेळी, उपोषण करणाऱ्या माझ्यासारख्या माणसानं घ्यावयाचा आहार पोटात घेण्याचेही माझे काम चालू आहे. तुला हे वाचून धक्का बसला का ? पण हा आहार म्हणजे ७ औंस गरम पाणी ! महाकष्टानं ते माझ्या घशाखाली जात आहे. विष-प्राशन करावे तसे ते मी घेत आहे. अंती ते अमृतमय ठरेल हेही मला माहीत आहे. हे पाणी घेताच माझ्या चित्तवृत्ती उफाळून येतात. दिवसातून आठवेळा ते प्राशन करण्यास मला सांगण्यात आले आहे. आणि तरीही मी म्हणे उपोषण करीत आहे. लोकांनाही ते खरे वाटत आहे. काय विचित्र आहे हे जग !''

आपल्या आयुष्यातील अठराव्या आणि अखेरच्या उपोषणामुळे गांधीजींच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित झाल्या, परंतु सभोवतालच्या माणसांत स्वातंत्र्य प्राप्तीचा जो काही थोडा आनंद होता तोही हिरावल्यासारखा झाला होता. देशाला तर तो धक्काच होता. काय घडते याबद्दल सर्वजण चिंताग्रस्त झाले. उपोषण सुरू होताच मंत्रिमंडळाने आपला आधीचा निर्णय फिरवला आणि पाकिस्तानला द्यावयाची ५५ कोटी रुपयांची रक्कम ताबडतोब चुकती करण्याचा निर्णय घेतला. दीर्घकाल उपोषण चालू ठेवण्याइतकी आता गांधीजींची प्रकृती राहिली नव्हती. ती अधिकच खालावताच, मुसलमानांच्या जीवित, वित्त आणि मानमर्यादांना देशात यापुढे काडीचाही धक्का लागू दिला जाणार नाही, अशी विविध जातीधर्मांच्या नेत्यांकडून लेखी ग्वाही मिळविण्यासाठी सर्वत्र आटोकाट प्रयत्न सुरू झाले. उपोषणाच्या सहाव्या दिवशी प्रयत्नाला यश आले आणि अखेर गांधीजींनी उपोषण सोडले.

माउंटबॅटन यांचे प्रसिद्धी सचिव, ॲलम कॅम्पबेल जॉन्सन यावेळी दिल्लीतच होते. स्वत: पत्रकार असल्याने, उपोषणाची सर्वत्र काय प्रतिक्रिया घडते याकडे त्यांचे बारीक लक्ष होते. सर्वत्र हिंडून त्यांनी लोकांची प्रतिक्रिया जाणून घेतली होती. आपल्या रोजनिशीत ते म्हणतात : ''गांधीजींची इतरांना आकर्षित करून घेण्याची

ताकद केव्हढी होती ते स्वत: त्यांच्या सहवासात राहिल्याखेरीज कळणार नाही. लोकांवर प्रभाव कसा टाकावा, त्यांना आपल्या विचाराकडे आकृष्ट कसे करून घ्यावे याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे गांधीजींचे सारे जीवन होय. याबाबतीत आतापर्यंत त्यांना जे यश लाभले आहे ते पाहिल्यास नेतृत्व गुणांचा खरा समुच्चय असलेला जगातील न भुतो न भविष्यती असा एक महान कारागीर असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. साध्या प्रतिकात्मक कृतीतून महान कार्य साधण्याची किमया गांधीजींना सहज साध्य झाली आहे. त्या कृतीचा अन्वयार्थ इतरांच्याही सहज लक्षात येतो.''

दुर्दैवाने प्रतिकात्मक कृतीची क्षमता फार काळ टिकत नाही. जगातील त्या महान नेत्याला अखेर आपले ध्येय सिद्धीस नेण्यासाठी स्वत:चा क्रूस वाहून नेण्याची पाळी आली. प्रेम, बंधुभाव आणि हौतात्म्य यांचे प्रतिक असलेल्या आणि गांधीजींच्या आवडत्या क्रूसाचा संदेश देत त्यांनी सभोवताली पेटलेल्या वडवानलाला तात्पुरते थंड तर केले. परंतु त्यात किती यश आले ते विवाद्यच आहे.

गांधीजींच्या उपोषणाचे भारतीय मुसलमानांना धीर आला. उपोषणाचा बाह्यात्कारी तरी परिणाम दिसून येऊ लागला.

हा आपला ''एक नंबरचा शत्रू'' नसून पौर्वात्य देशातील एक महान सुपुत्र आहे याची जाणीव मुसलमानांना झाली. ''भारत आणि पाकिस्तान या देशांमध्ये मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध निर्माण होण्यास पोषक वातावरण त्यामुळे निर्माण झाले आहे''- असे पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी उद्‌गार काढले.

गांधीजींच्या उपोषणाचे खरे मर्म काय हे आता ब्रिटिशांनाही कळले. याआधी राज्यकर्ते म्हणून त्यांना उपोषणाचा विचार करावा लागे- आता ती परिस्थिती राहिली नव्हती. यापूर्वी उपोषणावर टीकेची झोड उडविणाऱ्या ब्रिटिश वृत्तपत्रांना उपोषणाच्या यशाने नवा साक्षात्कार झाला. ''महात्मा गांधींच्या यशस्वी उपोषणाचे सामर्थ ॲटमबॉम्बपेक्षा अधिक प्रभावशाली आहे. पाश्चिमात्यांनी या प्रयोगाकडे नव्या आशेने पहावे-'' लंडन टाइम्सने म्हटले की, ''गांधीजींच्या धीरोदात्त आदर्शवादाची यापूर्वी अशी कधी कसोटी लागली नसेल-''

कलकत्ता येथील 'स्टेट्समन' या वृतपत्राचे माजी संपादक ऑर्थर मूर तर इतके प्रभावित झाले की त्यांनीही सहानुभुतीपोटी उपोषण केले.

मानव जातीचे भले व्हावे आणि सर्वत्र नैतिक मूल्यांची मनापासून जोपासना व्हावी, असे चिंतिणाऱ्या सर्वांनीच, महान कार्य सिद्धीसाठी गांधीजींनी सोसलेल्या

त्रासाची, आणि केलेल्या आत्मत्यागाची प्रशंसा केली असल्यास नवल नाही. आपल्या मन:शुद्धीसाठी आणि इतरांनी आत्मपरीक्षण करावे यासाठी आपण उपोषण करतो, असे गांधीजी म्हणत. लोकांनी आत्मपरीक्षण केले पण ते अल्पकाळच. गांधीजींनी याप्रकरणी नैतिक बाजू मांडून एकप्रकारे आपले आयुष्य त्यासाठी पणास लावले. नैतिक मूल्यांसाठी प्रसंगी प्राणत्यागही करावा. त्याच्याहून अधिक मोलाचे या जगात देण्यासारखे काहीही नसते, हे तत्त्व गांधीजींनी भारतीय राजकारणात आपल्या उदाहरणाने ठसविले.

उपोषणाबद्दलची देशातील प्रतिक्रिया भिन्न भिन्न होती. ती अनुकूल तशीच चांगलीच प्रतिकूलही होती. मात्र या साऱ्याच घटनेने सर्वजण जणू चक्रावून गेल्यासारखे झाले होते. आपले उपोषण कोणाला त्रास देण्यासाठी वा दबाव आणण्यासाठी नसते असे गांधीजी म्हणत. परंतु, तो मुद्दा नेहमीच विवाद्य ठरला आहे. ज्यांचा त्या उपोषणाशी संबंध येत नव्हता त्यांना त्यात फार मोठा अर्थ दिसे. परंतु ज्यांच्यासाठी उपोषण असे, ते या नैतिक दडपणाने अस्वस्थ होत, हेही खरे. उपोषणाने हिंदू मोठ्या संख्येनं गांधीजींच्या विचारापासून आणि प्रभावापासून दूर गेले. हिंदुसाठी गांधीजी काहीही करत नाहीत, असा समज सर्वत्र होत गेला.

आपल्यासमवेत असलेल्या लोकांचे नैतिक आचरण शुद्ध असावे, यावर गांधीजींचा फार भर असे. नौखालीत पदयात्रा चालू असताना त्यांची नात मनू हिला याबाबतीत कठीण कसोटीतूनच जावे लागले होते. एखाद्या गावी पोहोचताच गांधीजी सर्वप्रथम आपले पाय धूत आणि मगच कोठे आसनस्थ होत. एकदा एका गावी पोहोचल्यावर लक्षात आले की ज्या विशिष्ट प्रकारच्या गोलाकार वज्रीनं गांधीजी आपल्या टाचा धुताना घाशीत तो वज्रीचा दगड मागल्या गावी राहून गेला आहे. मनूची ती जबाबदारी होती. ती तो दगड नीट बरोबर घ्यायला विसरली होती. तिनं ताबडतोब त्या गावी माघारी जाऊन ती वज्री घेऊन यावी अशी गांधीजींनी तिला आज्ञा केली.

रस्ता निर्मनुष्य होता. वाटेत अनेक अडचणी, संकटं येण्याचा धोका होता. तरी मनू जायला निघाली. सुदैवानं वाटेतच तिला तो दगड परत मिळाला. काहीही वावगे न घडता ती परतली, परंतु तिच्या डोळ्यात अश्रु उभे होते. गांधीजींनी ते पाहिले. तसं ते हसले नि म्हणाले: ''वाटेतील धोक्याची मला पूर्ण कल्पना होती. एखाद्या गुंडाने तुला पळवून नेण्याचा प्रयत्न केला असता आणि त्याला धैर्यानं विरोध करीत तू मेली असतीस तर मी आनंदाने नाचलो असतो. परंतु तू संकटाला भिऊन नामर्दासारखी पळालीस, असं मला कळतं तर मला फार दु:ख झालं असतं. तू रोज

तर गातेस की 'काहीही होवो, हे पांथस्था तू एकटा चालत रहा-' मला कधी कधी असं वाटतं की आपण हे गाणं गाताना उगाच शौर्याचा आव तर आणीत नाही? माझ्या प्रेमाच्या माणसांना किती कठीण कसोटीतून जावं लागतं ते आज तुझ्या चांगल्या लक्षात आलं असेल!''

यानंतर थोड्याच दिवसांनी पाटणा येथे मनूचं ॲपँडिसायटीसचं ऑपरेशन झालं तेव्हां शस्त्रक्रिया चालू असतानाही गांधीजी तोंडावर फडके बांधून जराही विश्रांती न घेता, प्रेमाने कपाळावर हात थोपटीत, तिच्या खाटेजवळ बसून राहिले.

अशा प्रेमाचे मोल जाणणारे, तसेच प्रेम देणारेही समाजात दुर्दैवानं अभावानेच आढळतात. हिंदू आणि शीख बांधवांनी सुसंस्कृत वर्तनाचा आदर्श घालून द्यावा, मानवतेचे खरे दर्शन घडवावे, इतकीच महात्माजींची अपेक्षा होती; परंतु या दोन्ही जमातींकडून यावेळी तशी अपेक्षा करणे कठीण होते. एकदा का आपला राग अनावर झाला की कोणी काही शहाणपणाचे दोन शब्द सांगितले तरी ते ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत कोणी असतं का? त्यामुळे महात्माजींच्या आवाहनाची दखल घेण्याच्या मन:स्थितीत कोणी नव्हतं. गांधीजी आपल्या सहनशीलतेचा अंत पहात आहेत आणि केवळ मुसलमानांचे हितसंबंध जपण्यासाठीच धडपडत आहेत, अशी प्रतिक्रिया सर्वसाधारण लोकात निर्माण झाली होती. गांधीजींचे उपोषण सुटल्यावर दोन दिवसांनी या कोंडलेल्या धुमसत्या संतापाचा स्फोट झाला.

: ४७ :
महात्म्याचे हौतात्म्य

प्रार्थनासभा भरवून लोकांसमवेत प्रार्थना करण्याचा गांधीजींचा परिपाठ बराच जुना होता. गांधीजी कोठेही असोत, दररोज सायंकाळी खुल्या मैदानावर लोकांच्या उपस्थितीत ते प्रार्थनासभा घेत. या सभांचं स्वरूपही एखाद्या धार्मिक प्रवचन सभेसारखं साचेबंद नसे. यानिमित्तानं सर्व धर्मांच्या लोकांना एकत्र आणण्याचा त्यांचा हेतु असे. विविध धर्मांच्या पवित्र ग्रंथातील निवडक श्लोक अथवा भक्तिपर गीतं प्रार्थनासभेत म्हटली जात. प्रार्थनेनंतर महात्माजी देशातील प्रचलित प्रश्नांवर आपले विचार थोडक्यात मांडत. रेडियोवरून त्याचे प्रसरण करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच वृत्तपत्रातूनही दुसऱ्या दिवशी सभेचा वृत्तान्त येत असे. समस्या कोठलीही असो, गांधीजींचा त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन नैतिक असे. मानवतेच्या हिताच्या दृष्टीने ते त्या समस्येचा विचार करीत असल्याने, प्रश्न राजकीय असला तरी, एखादा धर्मात्मा त्या प्रश्नाचं पवित्र निरूपण करीत आहे, असा भास सभेत होत असे.

सभेत कोणालाही मुक्त प्रवेश असे. प्रश्न मात्र विचारता येत नसत. एका उंच व्यासपीठावर सर्वांसमोर गांधीजी बसत. त्यांच्यावर निशाण धरून अचूक नेम साधणे कोणालाही सहज शक्य होते. लोक सभेला गर्दी करीत आणि त्यांच्या पायाला स्पर्श करून वंदन करण्यासाठी पुढे घुसत. ही गर्दी आवरणे हेच एक मोठे काम असे. पण आता काळ बदलला होता. लोकांच्या भावना भडकलेल्या होत्या आणि वातावरण सर्वत्र द्वेषाने भरले होते. पाकिस्तानमधील धर्मांध मुसलमानांनी इस्लामच्या नावाने हिंदू-शिखांवर चालविलेल्या अत्याचारामुळे त्याचे प्रतिसाद भारतात उमटत होते; आणि हिंदू-शिखांचे आक्रमणवादी गट मुसलमानांचा बदला घेण्यासाठी धडपडत होते. त्यात गांधीजींचा त्यांना अडसर वाटत होता.

धर्म संकटात आहे, अशी ओरड करून हिंस्त्र वर्तनाला, रानटीपणाला, पाकिस्तानात त्याचप्रमाणे भारतातही आदर्शवादाची झूल चढविण्यात येत होती.

गांधीजींना धोक्याचा इषारा देण्यात आला होता. आणि त्यांच्या संरक्षणासाठी काय करावे, अशा पेचात, सुरक्षा अधिकारी आणि पोलिस पडले होते. कारण कोणत्याही प्रकारे सशस्त्र संरक्षणास गांधीजींचा विरोध होता. जगेन तर लोकांच्या प्रेमावर, नाहीतर मृत्यू कसाही येवो, अशी त्यांची पक्की धारणा होती. ४० वर्षांपूर्वी जोहान्सबर्ग येथे एका संतप्त पठाणाने त्यांना धमकी दिली होती त्यावेळी ते शांतपणे म्हणाले होते : ''एखाद्या रोगाने मृत्यू येण्यापेक्षा माझ्या एका बांधवाच्या हातून जर मृत्यू येणार असेल, तर त्यात दुःख करण्यासारखे काय आहे ? समजा मला कोणी मारलेच तर मला राग येणार नाही वा मी त्या हल्लेखोराचा द्वेषही करणार नाही. कारण मृत्युनेच माझे भले होईल, असेही शक्य आहे.''

दि. २० जानेवारी रोजी, नियतीने त्यांची दहा दिवस आधी कसोटीच घेतली. आपल्या दैनंदिन प्रार्थनेनंतर गांधीजी उपस्थित जनसमुदायासमोर बोलत असताना, त्यांच्या बसल्या जागेपासून जवळच कांही फुटांवर एक बॉम्ब येऊन फुटला. परंतु त्याकडे लक्षही न देता गांधीजींनी आपले भाषण चालूच ठेवले. बॉम्ब फेकणाऱ्या तरुणाला अटक केल्यानंतर त्याने लगेच कबूल केले की गांधीजींना जीवे मारण्याच्या हेतूनेच त्याने बॉम्बस्फोट केला होता. लेडी माउंटबॅटन यांनी गांधीजींवरील प्राणसंकट टळल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले असता ते म्हणाले की, ''यात माझे अभिनंदन करण्यासारखे काय आहे ? मला वाटले की तो आवाज, नेमबाजीचा सराव करण्यासाठी लष्कराने नियमितपणे चालविलेल्या गोळीबाराच्या तालमीचा असावा. आता, एखाद्याने माझ्यावर गोळी झाडलीच, तर त्यावेळी अंतर्यामी ईश्वरनामाचा जप करीत मी हसतमुखाने त्यास तोंड दिले तरच मग मी खरोखरी अभिनंदनास पात्र ठरेन असे मला वाटते.''

महात्माजींना क्रूसाची आकृती फार आवडे. आपल्या माणसांच्या चुकांबद्दल स्वतः प्रायश्चित घेणाऱ्या आणि क्षालन करणाऱ्या ख्रिस्ताच्या त्या प्रतीकाने आयुष्यभर गांधीजींच्या मनाची ओढ घेतली होती. त्यांच्या अंतर्मनात आपण हुतात्मा व्हावे, अशी दुर्दम्य इच्छाच असावी. मानवतेच्या भल्यासाठी हौतात्म्य पत्करण्याची ही मनस्वी इच्छा, बॉम्बफेकीच्या त्या घटनेनं त्यांच्या मनात अधिकच तीव्र झाली असावी. त्या घटनेनंतर दहा दिवसपर्यंत, आपली नात मनू हिच्याकडून मस्तकास मालीश करून घेताना, पाय चोळून घेताना वा झोपी जाण्यापूर्वी 'खुन्यानं झाडलेल्या गोळ्यां'बद्दल किंवा 'गोळ्यांचा वर्षाव' होत असल्याबद्दल, गांधीजी काहीबाही पुटपुटत असत, अशा आठवणी तिने सांगितल्या आहेत. मात्र त्या सांगताना, त्यात काही अशुभसूचक आहे असा भाव नसे, तर आयुष्यभर सतत झगडलेल्या आपल्या जीवनाचा अंत अशाच काही प्रकारे व्हावा अशी सुप्त इच्छा

त्यात दडलेली असावी, असं वाटे.

आता अंत समीप आला होता. दि. २९ जानेवारी रोजी म्हणजे हौतात्म्याच्या आदल्याच दिवशी, महात्माजी मनूला म्हणाले: ''एखाद्या साध्या आजाराने वा रोगाने मला मृत्यू आला तर तू साऱ्या जगाला ओरडून सांग की हा खरा महात्माच नव्हता. लोकांनी त्याबद्दल तुझी छी: थु: केली तरी चालेल. त्याने माझ्या आत्म्याला खरी शांती लाभेल. याउलट, परवा माझ्यावर म्हणे कोणी बॉम्ब फेकला, त्याप्रमाणे माझ्या छातीवर कोणी गोळ्या झाडल्या आणि ओठावर रामाचे नाव घेत, जराही न कण्हता मी मृत्युला सामोरा गेलो तर तू म्हण की हा खरोखरीच महात्मा होता. त्यानेच माझ्या भारतीय बांधवांचे खरे कल्याण होईल.''

किती अचूक भाकित केले होते गांधीजींनी? मात्र, एखाद्या प्रेषिताप्रमाणे भविष्याचा वेध घेण्याची आपली पात्रता आहे, असा दावा गांधीजींनी कधीही केला नव्हता. तीन दिवसानंतर वर्धा येथील आपल्या जुन्या आश्रमाकडे जायला निघायचे त्यांचे बेत चालले होते. तेथून पुढं पाकिस्तानात जायचा त्यांचा विचार होता. भारत आणि पाकिस्तान यांचे संबंध सलोख्याचे असावेत, परस्पर विश्वास आणि सदिच्छाच उभय देशांच्या हिताची आहे हे जिना यांना तसेच त्यांच्या मुस्लिम लीग पक्षाच्या सरकारला पटवून देण्याचा त्यांचा विचार होता. आपण पाकिस्तानला भेट दिल्याने, तेथे मागे राहिलेल्या भीतीग्रस्त हिंदुंना दिलासा मिळेल, याची त्यांना जाणीव होती.

मात्र, यापूर्वी त्यांच्या दौऱ्याची, अगदी काटेकोर, बारीकसारीक तपशीलासह, कित्येक दिवस आधीच आखणी केली जात असे, तसे आता घडत नव्हते. कारण दौरा घडून येईलच अशी स्थिती राहिली नव्हती. गांधीजींनीही त्याबद्दल आता काळजी करण्याचे सोडून दिले होते. सर्वच बाबतीत आता ईश्वरावर हवाला ठेवून त्यांचा दैनंदिन जीवनक्रम चालला होता. वर्ध्याच्या दौऱ्यासंबंधी आधीच तिकडे कळवावे असे मनूने एकदा सुचविले तेव्हा गांधीजींनी त्यास नकार दिला. ते म्हणाले, ''नको कळवूस. उद्या काय होईल ते आज कोणी सांगावे?''

देश स्वतंत्र होऊन काही दिवस झाले नाहीत तोच लोकांच्या वृत्तीत पडत चाललेला फरक पाहून गांधीजी व्यथित होत होते. सर्वस्वाचा त्याग करून देशासाठी आत्मार्पण करण्याची, झिजण्याची प्रेरणा जाऊन आता त्याऐवजी सर्वत्र स्वार्थ आणि सत्तालोभ बळावत चालला होता. माणुसकी, प्रेम, अनुकंपा याची शिकवण देणाऱ्या धार्मिक तत्त्वांची पायमल्ली होत होती. धर्माच्या नावाने आता द्वेष, हिंसाचार, अत्याचार सर्वत्र माजत चालले होते. गांधीजींना काव्य आवडे ते

बोधपर. भक्तिगीते, अभंग त्यांना आवडत. परंतु हौतात्म्याच्या आदल्या दिवशी त्यांनी उर्दू कवी नझीर अकबराबादी (अकबराबाद हे आग्र्याचे दुसरे नाव) यांच्या काव्यपंक्ती म्हणायला सुरुवात केली. त्यांचा अर्थ असा : 'विश्वाच्या या सुंदर बागेत वसंतऋतु किती अल्पकाळ फुलतो. तो वसंतऋतु असेतो तू त्याला आपल्या नेत्रात सामावून घे.'

दि. ३० जानेवारी रोजी नेहमीप्रमाणे पहाटेस प्रार्थना पार पडली. मनूला गांधीजींनी एक श्लोक म्हणावयास सांगितले. आश्चर्य म्हणजे यापूर्वी त्यांनी हा श्लोक कधी म्हणायला सांगितले नव्हते. ह्या श्लोकाचा भावार्थ असा :

''तू थकलेला असो वा नसो-
हे मानवा, विश्रांती कधी घेऊ नकोस.''

स्वत: कितीही थकलेले असोत, वा मन खिन्न असो-गांधीजी कधी स्वस्थ बसले नाहीत. नेहमीप्रमाणे मुलाखती, पत्रव्यवहार, भेटीगाठीत घाईगर्दीचा दिवस सुरू झाला. आपल्या मृत्युपत्राचा मसुदा तयार करण्याची त्यांना अनेक दिवसांपासून चिंता होती. त्यांनी तो मसुदा लिहूनही काढला. चरित्रकारांनी या मृत्युपत्राचे वर्णन 'त्यांचा अखेरचा संदेश', 'पवित्र संदेश' असे केले आहे. वस्तुत: भावी काळात काँग्रेस पक्षाचे स्वरूप कसे असावे याचा तो मसुदा होता. काँग्रेसजनांनी त्यावर विचारविनिमय करावा, अशी गांधीजींची इच्छा होती.

तत्कालीन काँग्रेस पक्षाला जे अखिल भारतीय चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले होते, त्यात इतर कोणाहीपेक्षा गांधीजींचा वाटा सिंहाचा होता. समाजाच्या सर्व थरातील, सर्व जाती-धर्मातील लोकांना काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र आणून गांधीजींनी त्या जोरावर देश स्वतंत्र केला होता. आता काँग्रेसचे ते उद्दिष्ट सफल झाल्याने पक्ष बरखास्त करण्यात यावा, असे गांधीजींचे मत होते. शहरे वा महानगरे नव्हे तर देशातील लाखो खेडेगावांना, तेथील गरीब कष्टकरी लोकांना, सामाजिक, आर्थिक, नैतिक स्वातंत्र्याचा लाभ व्हावा या गांधीजींच्या विचारांशी जे काँग्रेसजन सहमत होते, त्यांनी आता 'लोक सेवक संघा'ची स्थापना करून देशातील ग्रामीण भागाच्या विधायक सेवेत स्वत:ला झोकून द्यावे, आणि शासन चालविण्याची जबाबदारी व्यावसायिक राजकारण्यांवर सोपवावी, असे महात्माजी म्हणत.

त्या दिवशी शेवटी भेटून गेले ते सरदार पटेल. जवाहरलाल आणि सरदार यांच्यातील मतभेद वाढत चालले होते. मंत्रिमंडळाचा कारभार सुरळीत चालावा आणि दोघांपैकी एकाला कोणताही हस्तक्षेप न होता मुक्तपणे काम करता यावे, यासाठी उभयतांपैकी कोणीतरी एकाने मंत्रिमंडळातून बाहेर पडले पाहिजे, असे

सुचविण्यात आले होते. देशाला दोघांचीही गरज आहे, हे सरदारांच्या मनावर ठसविण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. प्रार्थनेनंतर महात्माजी श्री. जवाहरलाल नेहरुंना भेटणार होते. सरदार आणि गांधीजी बोलत असतानाच मनूने निरोप आणला की काठेवाडहून आलेले दोन नेते गांधीजींच्या भेटीसाठी बाहेर खोळंबून बसले आहेत. तसं गांधीजी उद्गारले की, ''त्यांना सांग, की मी जर जिवंत असलो तर प्रार्थनेनंतर त्यांनी माझ्याबरोबर चालत माझ्याशी बोलावे.''

प्रार्थना सभेला आधीच उशीर झाला होता. बाहेर अंगणात मोठा जनसमुदाय जमला होता. आपल्या नाती मनू आणि आभा यांच्या खांद्यांचा आधार घेत गांधीजी झपाझप पाऊले उचलीत प्रार्थना सभेच्या जागेकडे निघाले. बिर्लाभवनच्या पायऱ्या उतरताच त्यांनी नातींच्या खांद्यावरील हात काढले आणि जनसमुदायाला नमस्कार केला. तेव्हढ्यात शरीराने चांगली मजबूत असलेली एक व्यक्ती झटकन गांधीजींच्या पुढे झाली. मनूने त्या माणसाला हाताने दूर करण्याच्या आधीच, गांधीजींच्या पायाला हात लावून वंदन करतोय असे भासवीत तो माणूस थोडा वाकला आणि क्षणार्धात त्याने अगदी जवळून महात्माजींच्या छातीवर पिस्तुलातून तीन गोळ्या झाडल्या. दोन गोळ्या सरळ छातीत घुसल्या, तर तिसरी उजवीकडील श्वास नलिकेत घुसली. महात्माजी खाली कोसळले. पडता पडता त्यांच्या मुखातून शेवटचे शब्द उमटले : ''हे राम !'' प्रार्थनासभेला जमलेल्या लोकांना काय झालंय ते कळण्याच्या आतच त्या महात्म्याचे पंचप्राण अनंतत्वात विलीन पावले होते.

आपल्या इच्छेप्रमाणे ईश्वराचे नाव ओठावर घोळवीत, जराही न कण्हता गांधीजी गेले. आपल्यापुढील महान उद्दिष्टानुसार आपण सतत कार्यरत राहू वा ते न जमल्यास मृत्युला सामोरे जाऊ असे गांधीजी म्हणत असत. त्या महान ध्येयसिद्धीसाठी अखेरच्या श्वासापर्यंत तो महात्मा कार्यरत राहिला. आता त्या जगन्नियंत्याने त्यांची प्रार्थना ऐकली होती, त्यांची इच्छा पूर्ण केली होती.

हा महान अंत शोकपर्यवसायी होता, असं म्हणण्याचा कोणाला अधिकार आहे ?

Printed at The Central Electric Press A-12/1 Naraina Indl. Area, Phase-I, New Delhi-28.